वाढती लोकसंख्या ही भारतातील अर्थव्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या इतर देशाचा विचार करता भारतात जलद लोकसंख्या वाढ होण्यास अनेक कारणे कारणीभूत ठरलेली दिसतात. त्यात अंधश्रद्धा, वारस, करमणुकीच्या साधनांचा अभाव, परंपरा इ. गोष्टींचा पगडा भारतीय माणसांच्या मनावर असल्यामुळे लोकसंख्या जलदगतीने वाढण्यास मदत मिळाली. इतर प्रगत देशात मात्र लोकसंख्या कमी कशी होईल याकडे गांभिर्याने पाहिले गेले. कुटुंबनियोजन व कार्यक्रम इंदिरा गांधीच्या कार्यकाळात राबविल्यानंतर थोड्याा फार प्रमाणात वाढत्या लोकसंख्येला रोखण्यास मदत झाली व लोकजागृतीच्या माध्यमातून लोकांच्या मानसिकतेत बदल घडवण्याचा प्रयत्न केला गेला.

भारतातील दारिद्रयाचा विचार करता भारतात दारिद्रयाचे प्रमाण इतर देशाच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसून येते. भारतात धर्मकारण आणि समाजकारण यांचा एक वारसा आहे व त्यातूनच दारिद्रयाचे दृष्टचक्र निर्माण झाले. हे दृष्टचक्र संपविण्यासाठी शोषण व अन्याय यांच्या विरोधात गरिबांना संघटीत करणे आवश्यक आहे. देशामध्ये जेव्हा शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक सुधारणा याबाबत कार्यवाही झाली तरच गरिबी दूर होण्यास मदत होईल. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले व यातूनच शैक्षणिक व सामाजिक सुधारणा होण्यास एक प्रकारे मदत मिळाली.

बेरोजगारी ही समस्या भारतात अलिकडच्या काळात उग्ररुप घेताना दिसून येते. भारतात 1991 पूर्वी मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला नव्हता. त्यामुळे लघु–कुटीरोद्योग मोठ्याा प्रमाणात चालत होते; परंतु आधुनिकीकरण व यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून हे उद्योगधंदे बंद पडले व बेरोजगारी ही समस्या निर्माण झाली. यातूनच शैक्षणिक क्षेत्रात शिक्षणाचा प्रसार व प्रचार झाल्यामुळे शिक्षीतांची बेरोजगारी आज मोठ्याा प्रमाणात झाली व यातून राज्यकर्ते व देशातील जनता यांच्यात विदार निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली.

गॅट व WTO च्या संदर्भात विचार करता या संघटनांचे सदस्यत्व भारताने स्वीकारले खरे; परंतु यातील बौद्धीक संपदाचे स्वामित्व या संदर्भात इतर देशाच्या तुलनेत भारत फारच मागे असल्याचे दिसून येते. आंतरराष्ट्रीय पातळीवर बऱ्याच बाबी संदर्भात भारत आपले स्वामित्व सिद्ध करू शकला नाही. यातून बरेच वाद निर्माण झाले. याला कारण म्हणजे या संदर्भात भारताने दाखवलेली बेफिकीरीवृत्ती. यामुळे ते आपल्याला माहित होते. त्यांचा वापर आपण फार पूर्वीपासून करत होते. त्यासंदर्भात इतर देशाने आपले स्वामित्व सिद्ध केले. मात्र आपण त्याविषयी अनभिज्ञ राहिलो. त्यामुळे अनेक वाद–विवाद निर्माण झाल्याचे दिसून येते.

भारताच्या संदर्भात विचार करता भारतात बहुसंस्कृती उदयास आलेली दिसून येते. बहुविध संस्कृतीच्या संमीलनातून अनेक भाषा आणि धर्म आणि वंश यांच्या भिन्न गटांनी आपली स्वतःची प्रतिमा जपण्याचा प्रयतन केला. त्यामुळे त्यातून काही प्रमाणात तणाव निर्माण होण्यास मदत मिळाली. भारतात अनेक राज्यात राज्याबाहेरील लोक व राज्यातील लोकात तणाव निर्माण झालेला दिसतो. महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्रात देशातील विविध राज्यातील लोक कामनिमित्त्य लोक स्थलांतरीत होवून महाराष्ट्रात स्थायिक झालेले दिसतात व अलिकडच्या काळात या दोन समूहात कलह निर्माण होण्यास सुरुवात झाल्याचे दिसून येते.

1991 नंतर भारतात सरकारने मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले असले तरी मात्र भारतात याचा विपरीत परिणाम लघू–कुटीरोद्योगांवर झालेला दिसून येतो. आजच्या घडीला हे लघू–कुटीरोद्योगाचा ऱ्हास झाल्यामुळे रोजगाराचा प्रश्न फार मोठ्याा प्रमाणावर निर्माण झाला आहे. त्यातच बहूराष्ट्रीय कंपन्यामुळे देशातील अकुशल कामगारांना काम मिळेनासे झाले. त्यातच देशातील केवळ राजकीय इच्छाशकती नसल्यामुळे सुधारणा कार्यक्रम थंडावला आहे. त्यामुळे देश फार मोठी किंमत चूकावत आहे.

थोडक्यात, वरीलप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेवर संस्कृती संघर्षाचा परिणाम झाला. संस्कृती संघर्षामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला काही प्रमाणात फायदा झाला. तसेच काही नुकसानही झाल्याचे दिसून येते.

संदर्भ :

1. मधुसुदन साठे, जागतिक अर्थव्यवस्था, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे–2007
2. L.D. Vaikunthe, Indian Economy Views and Vision, Serials Publication (P.) Ltd., New Delhi - 2016.
3. A. N. Agrawal, Indian Economy, New Age International Ltd., New Delhi - 2005.
4. भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, जी.एन.झामरे–पिंपळापूरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर–2008

ISSN 2349-638x
Impact Factor 3.025

INTERDISCIPLINARY NATIONAL SEMINAR

On

CULTURE CONFLICT IN LITERATURE AND HUMANITIES

16 th Sept. 2017

Organizer

Shri Datta Shikshan Prasarak Mandal, Panutre's

Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale

[Arts,Commerce and Science]

Tal .Panhala , Dist. Kolhapur (MS)

Website:- www.vpmkale.edu.in

Editors

Prin.Dr.Balasaheb Ladgaonkar

Mr.Nitin V.Patil

Mr.Krishna B.Patre

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

One-Day
Interdisciplinary National Seminar
on
Culture Conflict in Literature and Humanities



Organizer

Shri Datta Shikshan Prasarak Mandal, Panutre's
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
[Arts, Commerce & Science]
Tal – Panhala, Dist.- Kolhapur (416 205)
Maharashtra State
Ph. (02328) 232093, 232001.
Website : www.vpmkale.edu.in

Organizer
Dr.M.G.Dhuture

Co-ordinator
Dr.S.M.Selukar

Convener
Prof.N.V.Patil

Principal
Dr.B.M.Ladgaonkar

Organizing Committee

1] Dr.S.M. Selukar	Co-ordinator
2] Prof.N.V. Patil	Convener
3] Dr.M.G. Dhuture	Organizer
4] Prof.D.N. Sonkamble	Treasurer
5] Prof.M.J. Jadhav	Member
6] Prof.P.B. Tatale	Member
7] Prof.N.N.Suryanwanshi	Member
8] Prof.K.N. Rakshase	Member
9] Prof.K.B. Patre	Member

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
42.	डॉ.सरोज पाटील	ममता कालियालिखित उपन्यास 'दौड' में संस्कृति- संघर्ष	147 To 149
43.	डॉ.राजेखान शानेदिवाण	'इंधन' मधील संस्कृती संघर्ष	150 To 154
44.	प्रा.देवराव नामदेव सोनकांबळे	जागतिकीकरण : भारतीय आर्थिक संस्कृतीवर झालेला परिणाम	155 To 158
45.	प्रा.डॉ.विनोद कांबळे	तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या संघर्षाची कहाणी	159 To 163
46.	शिवदास दगा पावरा	कादंबरीतील आदिवासी जीवनचित्रण	164 To 166
47.	प्रा.प्रेरणा एल.चव्हाण	मराठीतील स्त्रीयांच्या कविता- संस्कृती आणि संघर्ष	167 To 170
48.	प्रा.डॉ.राहुल दत्ता मांडणीकर	राष्ट्र-राज्य व बहुसंस्कृतीवाद	171 To 174
49.	प्रा.आमित हुकुमचंद राऊत	योगा -पाश्चात्य व पौर्वात्य मानसशास्त्रीय अभ्यास	175 To 179
50.	प्रा.अशोक बा. जाधव	भांडवलशाही व भारतीय बहुसंस्कृती	180 To 182
51.	प्रा.डॉ.सौ.एन.डी. काशिद-पाटील	भारतीय संस्कृतीवर भौगोलीक स्थितीचा प्रभाव - एक भौगोलीक अभ्यास	183 To 186
52.	प्रा.पद्माकर बळीराम तटाळे	संस्कृती संघर्षाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम	187 To 189
53.	प्रा.डॉ.मधुकर धुतुरे	आदिवासी समाज संस्कृती व संघर्ष- एक समाजशास्त्रीय अभ्यास	190 To 196
54.	अनिल रामचंद्र महाजन	आंबेडकरवादी साहित्यातील संस्कृती संघर्ष	197 To 200
55.	प्रा.गुंडोपंत पाटील	ग्रामीण कादंबरी आणि संस्कृती	201 To 205
56.	प्रा.डॉ.सौ.सुनिता एस.राठोड	जागतिकीकरणातील नव प्रवाह	206 To 209
57.	प्रा.पद्माकर सदाशिव	मानवाधिकार व संस्कृती	210 To 214
58.	डॉ.शिवाजी जाधव	माध्यम संस्कृती	215 To 223
59.	गोविंद नागनाथराव ढोबळे	आधुनिकीकरण आणि संस्कृती	224 To 227
60.	डॉ.शिवाजी दत्तात्रय जाधव	महाराष्ट्रांच्या सांस्कृतिक इतिहासात सिद्धगिरी संग्रहालयाचे महत्त्व	228 To 231
61.	डॉ.शार्दुल सेलूकर	बहुसांस्कृतिवाद : राष्ट्रराज्यासमोरील एक आव्हान	232 To 235
62.	प्रा डॉ.बाबासाहेब नाईक	कापूसकाळ या कादंबरीतील कृषी संस्कृतीचे दर्शन	236 To 237

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

जागतिकीकरण : भारतीय आर्थिक संस्कृतीवर झालेला परिणाम

प्रा.देवराव नामदेव सोनकांबळे
अर्थशास्त्र विभाग
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

प्रस्तावना

जागतिक दुसऱ्या महायुध्दानंतर युनो, गॅट, आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक इत्यादी आंतरराष्ट्रीय स्तरावर संघटना स्थापन करण्यात आल्या. हया सर्व संघटनांचा उद्देश जगातील सर्व देशानी आपला आंतरराष्ट्रीय व्यापार कोणत्याही अडथळ्याविना करावा. अशा प्रकारचा संकल्पनेतूनच जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. भारताने २४ जुलै १९९१ रोजी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा अधिकृतपणे निर्णय घेतला. त्या वेळेस आपल्या देशाची अर्थव्यवस्था अत्यंत बिकट बनली होती. केन्द्र सरकारला आपल्या काही योजना व प्रकल्प स्थिगीत ठेवणे भाग पडले होते. देश परकीय कर्जाच्या सापळयात पुरता आडकला होता. परकीय चलनाची गंगाजळी जवळ-जवळ कोरडी पडण्याचा बेतात होती. देशांतर्गत राजकोषीय तूट वाढत जात होती. देशांतर्गत कर्ज, चलनवाढ वाढत होता. अशा बिकट परिस्थितीत मार्ग काढण्यासाठी चंद्रशेखर सरकारने १९९० मध्ये बँक ऑफ इंग्लंड व बँक ऑफ स्वित्झरलँड या बँकेत परकीय चलन मिळवण्याकरीता सोने गहाण ठेवावे लागले. तर जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडे सात अब्ज डॉलर चलनाच्या कर्जाची मागणी केली. अशा या विविध प्रश्नाने देशाची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाहक बनत चालली होती. अशा आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी व अर्थव्यवस्थेची घडी व्यवस्थित बसविण्यासाठी पी.व्ही. नरसिंगराव सरकारने १९९१ मध्ये या नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केला. या धोरणात आर्थिक, सामाजिक, रोजगारविषयक संघटित व असंघटित अशा रोजगाराचा अभ्यास करण्यात आला. तसेच आयात-निर्यात विषयक घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

उद्दिष्टये :-

१. जागतिकीकरणाची व्याख्या व संकल्पनेचा अर्थ समजावून घेणे.
२. जागतिकीकरणांच्या परिणामांचा अभ्यास करणे.

गृहीतके :-

१. एकूण रोजगार निर्मितिच्या प्रमाणात घट झालेली आहे.
२. कामगारांच्या संघटित वर्गाचा ऱ्हास झालेला आहे.

जागतिकीकरणाचा अर्थ :-

जागतिकीकरणाचा अर्थ थोडक्यात सांगावयाचा झाल्यास. जागतिकीकरण म्हणजे ही एक अशी प्रक्रिया आहे की, जी देशाच्या अर्थव्यवस्थेला व्यापक वैश्विक अर्थव्यवस्थेचा भाग बनवते. देशातील वस्तू व सेवा, उत्पादन घटक वित्तीय व्यवहार हे एक जागतिक बाजारपेठाचा भाग बनतात. देशाच्या आंतरराष्ट्रीय सीमा कायम राहतात. म्हणजेच देशाची विकासाची संकल्पना ही जगातील इतर विकसीत देशाच्या विकास संकल्पनेच्या स्वरुपासारखी बदलत जाते.

व्याख्या:-

- **जगदिश भगवती-** "जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रीय अर्थव्यवस्थाना जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये पुढील प्रक्रियेव्दारे समाविष्ठ करुन घेणे बहुराष्ट्रीय कंपन्या , व्यापार व महामंडळे यांच्याकडून प्रत्यक्ष होणारी गुंतवणू, अल्पकालीन भांडवलाचा प्रवाह, कामगार व एकूण मानवाची आंतरराष्ट्रीय गतीमानता आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह"
- **रुसी मोदी-**"जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे तसेच संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तू सेवांची विक्री करणे होय."
- **जागतिक बँक-** "उपभोग्य वस्तूसह सर्व वस्तू वरील आयात निर्बंध हळूहळू रद्द करणे, आयात जकातीच्या दरात कपात करणे आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे खाजगीकरण करणे म्हणजे जागतिकीकरण होय."

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

संकल्पना:-

जागतिकरणाची संकल्पना ही व्यापक आहे. विविध देशानी जागतिक व्यापार संघटनाच्या परिघामध्ये एकत्रित यावे साधारणपणे विचार केल्यास हे एक तौलनिक खर्च लाभ सिध्दांताचे एक आधुनिक रुप आहे. या सिध्दांतात आंतरराष्ट्रीय विशेषीकरणाने दोन्ही देशांना लाभ होतो. म्हणजेच जागतिकीकरणाने जगातील सर्व देशानी आंतरराष्ट्रीय व्यापारावरील बंधने कमी करुन देशामध्ये भांडवलाचा मुक्त प्रवाहास वाव मिळण्यासाठी योग्य वातावरण तयार करुन तंत्रज्ञानाच्या मुक्त प्रवाहासास परवानगी देवून योग्य वातावरण तयार करणे तसेच जगातील विविध देशात कामगारांचा मुक्त संचार होण्यासाठी योग्य वातावरणाची निर्मिती करणे जगातील प्रगत राष्ट्र जागतिकीकरणाचे घटक म्हणून व्यापार, भांडवल व तंत्रज्ञान यांचा प्रवाह मुक्त असावा. असा आग्रह धरतात. पण विकसनशील देशांना ही व्याख्या मान्य नाही. तर त्यांनी हया तीन घटकाबरोबर जागतिकीकरणाचा चौथा धटक म्हणून कामगारांच्या गतीमानतेवर बंधन असू नये असे मानतात. जागतिक व्यापार संघटना व इतर समित्यांच्यामते कामगारांच्या गतीमानाचा प्रश्न अतिशय महत्वाचा आणि आवश्यक घटक आहे. यावरुन जागतिकीकरणाची संकल्पना स्पष्ट होते.

जागतिकीकरणाचे परिणाम :-

आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत वेग घेतल्याने अनेक अभ्यासक व संशोधक यांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. यामुळे यांची एक परिभाषा तयार होवून या विषयाबद्दल साहित्याचे एक भांडारच तयार झाले. जागतिक बँकेतील एका आर्थिक विचारवंताने जागतिकीरणाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. जागतिकीकरणाचे सामाजिक मोजमाप करण्यासाठी एक जागतिक संस्था आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना केली. या परिक्षणानुसार जागतिकीकरणाचा जगावर काय परिणाम झाले याबद्दल मत मांडण्यात आले.

१. आंतरराष्ट्रीय व्यापार :-

देशात वस्तू व सेवांचा व्यापार वाढविणे हा एक जागतिकीकरणाचा मुख्य हेतू आहे. तसेच त्या देशाच्या अहवालानुसार १९९० मध्ये एकूण जागतिक व्यापारातील निर्यातीचा भारताचा हिस्सा ०.५६ टक्के होता. तो १९९६ मध्ये ०.६० टक्के झाला. याच काळात चीन. दक्षिण कोरीया व ब्राझील या देशांच्या हिश्यात अनुक्रमे १.९५ टक्क्यावरुन २.७८ टक्के, २.०३ टक्क्यावरुन २.३० टक्के आणि ०.८३ टक्क्यावरुन १.७६ टक्के वाढ झाली. आज भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सीमा वाढलेल्या आहेत. युरोप, आफ्रिका, अमेरिका या खंडातील देशाशी व्यापार वाढत आहे. देशाची एकूण निर्यात सन २०००-०१ मध्ये २०३५७ कोटी रुपये होती. तर ती सन २०१४–१५ मध्ये १८९७०२६ कोटी रुपये झाली आहे. तर देशाची एकूण आयात सन २०००-०१ मध्ये २३०८७३ कोटी रुपये होती. तर सन २०१४-१५ मध्ये २७३४०४९ कोटी रुपये इतकी झाली आहे. या माहितीवरुन आपणांस असे लक्षात येते की, देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होत आहे.

२. आयात-निर्यातीवरील परिणाम :-

आज जगात कोणताही देश पूर्णपणे स्वयंपूर्ण नाही. नैसर्गिक व भौगोलिक उ परिस्थितील भिन्नतेनुसारव उत्पादन धटकातील विपूलतेनुसार उत्पादन धटकावर होणारा अतिरिक्त ताण याचा परिणाम म्हणून उत्पादनाचा खर्च वाढत आहे. त्यामुळे सर्व वस्तू व सेवांच्या किंमतीत भिन्न देशात भिन्नता दिसून येते. त्यामुळे जगात आयात-निर्यात ही प्रक्रिया प्रत्येक देशात चालू असते यावरुन आपणांस भारताच्या आयात-निर्यात व्यापाराचा आलेख खालील दिलेल्या कोष्टकात दिसून येतो.

सन	आयात, मिलीयन डॉलरमध्ये	निर्यात
२००८–२००९	३०३६९६.३	१८५२९५
२००९–२०१०	२८८३७२.९	१७८७५१.४
२०१०–२०११	३६९७६९.१	२५११३६.२
२०११–२०१२	४८९३१९.५	३०५९६३.९
२०१२–२०१३	४९१४८७.२	३००५७०.६

वरील कोष्टकात दर्शविलेली माहिती नुसार आयात आणि निर्यातीमध्ये सातत्याने देशात वाढ होत आहे. अपवाद म्हणून २००९–१० हया आर्थिक वर्षात आयात आणि निर्यातीमध्ये थोडी धट झालेली दिसून येते. यावरुन देशातील आयात-निर्यात व्यापाराचा आलेख दिसून येतो.

170

३. परकिय गुंतवणूक :-

जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत परकिय गुंतवणूकीत वाढ होत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भारतातील स्वस्त कामगार वर्ग यामुळे परकिय उद्योग संस्था भारतात गुंतवणूक करण्यास उत्सूक झाल्या आहेत. सिंगापूर, अमेरिका, जपान, जर्मनी, फ्रान्स, नेदरलॅंड, दक्षिण कोरीया, इंग्लंड व महरिशस इत्यादी देशांनी भारतात केलेली परकीय गुंतवणूक मोठी कौतुकास्पद आहे.

वर्ष	२०१२–२०१३	२०१३–२०१४	२०१४–२०१५	२०१५–२०१६	२०१६–२०१७
गुंतवणूक डॉलर मिलीयनमध्ये	१८२८६	१६०५४	२४७४८	३६०६८	३१३१३

Ref. - RBI Annul Report -2017

वर दर्शविलेल्या कोष्टकात जगातील विभिन्न देशांनी भारतात केली परकीय गुंतवणूक २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच आर्थिक वर्षात सातत्याने वाढत गेलेली आहे. अपवाद म्हणून २०१३-१४ या आर्थिक वर्षात १२ गुंतवणुकीत कपात झालेली दिसून येते. तर खालील क्षेत्रात केलेली परकिय गुंतवणुक हाटेल, वाहतूक, बांधकाम, संगणक, वित्तीय संस्था, उद्योग सेवा, संशोधन, विद्युत क्षेत्र, मॉनिफॉक्चर अशा विविध क्षेत्रात केलेली गुंतवणूक ही कौतूकास्पद आहे. तर नुकतेच संरक्षण क्षेत्र, पशु संवर्धन, नागरी उडाण क्षेत्र यात १०० परकिय गुंतवणुक करण्यात येत आहे. म्हणजेच जागतिकीकरणामुळे देशातील बहुतांश क्षेत्रात परकीय गुंतवणूकीचे प्रमाण सातत्याने वाढत आहे हे वरील माहितीवरुन स्पष्ट होते.

४. भारतातील रोजगाराची परिस्थिती:-

जागतिकीकरणाच्या काळात भारतात रोजगाराच्या बाबतीत फारसा बद्दल झालेला दिसत नाही. याचे महत्वाचे मुख्य कारण म्हणजे भांडवलीकरण होय. देशातील बहुतांश उद्योग हे खाजगी क्षेत्रात समावेश झाल्याने आज त्या उद्योग क्षेत्रात आधुनिक स्वरुपाचे तंत्रज्ञान संगणक वापरले जात असल्याने कामगाराची कपात होत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार देशातील काही प्रमुख राज्यातील बेरोजगारीचे प्रमाण दाखविले आहे.

राज्य	लो. प्रत्यक्ष वाढ	लो.नै वाढ	स्थलांतर	शे. बेरोजगारी
तामिळनाडू	१५.६	८.५	७.१	३.२
महाराष्ट्र	१६	१०.४	५.६	३.२
हरियाणा	२०	१५.३	४.७	२.५
गुजरात	१९.२	१४.६	४.६	१.८
पंजाब	१३.७	९.४	४.३	४८
कर्नाटक	१५.७	११.७	४	२.७
प. बंगाल	१३.९	१०.१	३८	४
केरळ	४.९	८.२	—३.३	७.३

स्त्रोत आर्थिक सर्वेक्षण २०१३-१४

वर दर्शविलेल्या कोष्टकात राज्याच्या लोकसंख्येत प्रत्यक्षात झालेली नैसर्गिक वाढ आणि रोजगारासाठी स्थलांतरीत झालेल्या लोकसंख्येचे शेकडा वाढ व बेरोजगारीचे शेकडा प्रमाण दर्शविले आहे.वास्तविक पाहता कोणत्याही देशात समावेशक वृध्दी निर्माण करण्यासाठी रोजगार निर्माण करणे आवश्यक असते.पण अशा प्रकारे रोजगारात देशातील प्रमुख घटक राज्यात घट होत गेल्यास देशाच्या विकास प्रवाहात व्यत्य निर्माण होईल.त्याचबरोबर देशात दारिद्रय निर्मूलन, आर्थिक विषमता, पायाभूत सुविधा हे आर्थिक विकासाचे मुलभूत घटक असून ते रोजगारावर अवलंबून आहेत. पण जागतिकीकरणात अशा प्रकारे रोजगारात घट होत गेल्यास जागतिकीकरणाचे ध्येय साध्य करणे अशक्य होईल.

महिला रोजगाराच्या बाबतीत ही परिस्थिती समाधानकारक आहे.कारण जागतिकीकरणाने महिलांना खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात जास्त रोजगारांत वाढ झालेली दिसून येते. पण खाजगी क्षेत्रापेक्षा सार्वजनिक क्षेत्रात रोजगारांत वाढ झालेली दिसून येते.

सन	सार्वजनिक क्षेत्र	खाजगी क्षेत्र	एकूण
१९९१	२३.४७	१४.३४	३७.८१
१९९५	२६	१६.२८	४२.२८
२००५	२९.२१	२०.९५	५०.१०
२००८	३०.४	२४.७२	५५.१२
२०१०	३१.९६	२६.६३	५८.५९

स्त्रोत Economic Survey -2011-12

वर दर्शविलेल्या कोष्टकात सन १९९१ ते २०१० या दोन दशकातील सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात झालेली रोजगारात वाढ दर्शविलेली आहे.यात खाजगी क्षेत्रापेक्षा सार्वजनिक क्षेत्रात निर्माण झालेला रोजगार जास्त आहे. हे वरील कोष्टकावरुन दिसून येते.

५. कामगार वर्ग-

जागतिकीकरणाच्या काळात संघटीत कामगार वर्गाचा ऱ्हास होत असलेला दिसून येतो. त्यामुळे त्यांना पूर्णवेळ रोजगाराची शाश्वती राहिलेली नाही. आज कामगारांना सुट्या, कामाचे तास, वेतन, पेन्शन अशा आवश्यक बाबी मिळणे जागतिकीकरणाच्या स्पर्धेत अशक्य झालेले आहे.

६. भांडवलशाहीच्या स्पर्धेत कल्याणकारी राज्य दूर्बल होत आहे :-

जागतिकीकरणाच्या काळात सरकाने भारतीय अर्थव्यवस्थेत कमीत कमी हस्तक्षेप व जास्तीत जास्त बाजाराधिष्ठित भूमिकेला प्रधान्य दिले आहे. एकंदरीत यांचा परिणाम देशाच्या सार्वभौम सत्तेला दुबळे करण्याचा आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक सरकारवर सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करण्यासाठी दबाव टाकत आहे अनेक क्षेत्रात परकीय गुंतवणूकीला वाव दिला जात आहे. परिणामी देशातील लघू व कुटीर उद्योग बंद पडून बेरोजगारी वाढत आहे. तर याच काळात देशातील काही प्रगतशील राज्यात आर्थिक विषमता वाढून काही लोकांचे दारिद्रय कमी झाले आहे तर पर्यावरणावर त्याचा घात झाला आहे. भारत हा कृषीप्रधान देश असून देशातील ६० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत पण जागतिकीकरणचे धोरण हे शेती टाळण्याचा प्रयत्न करत आहेत. तर कामगारांच्या बाबत कामगारांचे कौशल्य, कामगारांना प्रशिक्षण,कामगारांना दिल्या जाणाऱ्या सवलती इत्यादी बाबतीत सरकार बघ्यांची भूमिका घेत आहे.

७. कमी वेतनावर काम करणारे महिला कामगार:-

जागतिकीकरणाच्या काळात महिलांना रोजगाराच्या प्रमाणात वाढ झाली असली तरी या असंघटित क्षेत्रात वेतनाचे दर कमी आहेत. त्या उद्योगात श्रमप्रधान उत्पादन तंत्राच्या सहाय्याने उत्पादन केले जाते. तेथे कमी वेतनावर काम करणाऱ्या महिलांना प्राधान्य दिले जाते. अशा प्रकारच्या उद्योगाची संख्या ही असंघटित क्षेत्रात जास्त प्रमाणात आहे. तसेच घरगुती उद्योगातील अकुशल व कमी कौशल्य असलेल्या श्रमीकामध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे. अशा वेळी किमान वेतनापेक्षा कमी वेतन महिलां कामगारांना दिला जातो.

निष्कर्ष :-

जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम पहात असताना आपणांस असे आढळून येते की, देशाची एकूण निर्यात ही काही विशिष्ठ वस्तूंची व विशिष्ठ देशांना झालेली दिसून येते. तसेच देशात बेरोजगारीचे प्रमाण सतत वाढत आहे. पण ती पूर्व आशियात जास्त प्रमाणात वाढत आहे. तसेच कामगार वर्गात टाळेबंदी व संपाचे प्रमाण वाढले आहे. कामगारांच्या असंघटित वर्गात श्रमाची नम्यता वाढत असल्यामुळे हंगामी रोजगार, कंत्राटी रोजगाराचे प्रमाण वाढत आहे. तसेच या काळात कामगारांची कपात, सौदाशक्ती व आर्थिक विषमता व दारिद्रयाचे प्रमाण वाढत आहे. जागतिकीकरणाचे कमी वेतनावर काम करणाऱ्या स्त्री कामगारांचे प्रमाण वाढले आहे. विशेषता जागतिकीकरणामुळे श्रम बाजार, रोजगार, आर्थिक विषमता, दारिद्रय, अस्थिरता व लिंगभाव यावर परिणाम झालेला दिसून येतो.

संदर्भ

१) भारतीय अर्थव्यवस्था प्रा. डॉ. राजेंद्र अ. रसाळ
२) भारतीय अर्थव्यवस्था डॉ. आर. एस. सोळुखे , डॉ. व्ही. बी. कक्कडे
३) भारतीय अर्थव्यवस्था प्रा.ज्ञानेश्वर बा.मगर
4) RBI Annul Report -2012-13
6) RBI Annul Report -2016-17
6) आर्थिक सर्वेक्षण –2013–14
7) आर्थिक सुधारणा आणि विकासाचा मानवी चेहरा– डॉ.भालचंद्र मुणगेकर
8) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र– प्रा. डॉ. जी. एन. झामरे
9) www. pmindia.gov.in

TRUE COPY
TRUE COPY
PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal Pandhala, Dist Kolhapur (M.S.)
PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale

19 2017-18 (3)

"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture"
-Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

कोल्हापूर

NAAC accredited "A"
in 3rd cycle

With CGPA - 3.24

58th Rank in NIRF -2017

Vivekanand College, Kolhapur

Dept. of History &
Political Science

PROCEEDINGS

One day International Seminar on

"Emerging Movements & Trends in Humanities and Sciences"

22nd September, 2017

A Special issue of

Aayushi International Interdisciplinary Research Journal

Special Issue- XV ISSN –2349-638x

Dr. S. R. Kattimani
Editor

Dr. Manjushri Ghrorpade
Co-Editor

Prof. D. A. Pawar
Co-Editor

Dr. S. Y. Hongekar
Principal, Vivekanand College, Kolhapur

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
63.	Ashwini N. Patel And Dr.Atik Asgar Shaikh	Work Life Balance of Female Employees Working In Manufacturing Sector: Movement Towards A New Era	247 To 250
64.	Shri. Bharat Patil And Dr. B.S. Jadhav	Spatio Temporal Changes of Lift Irrigation Scheme In Kolhapur District: A Geographical Analysis (1980-2016)	251 To 256
65.	Lokhande Sangita Kiran	Social Movements	257 To 266
66.	Dr. Nalini Avinash Waghmare	Buddha And Basaveshwara	267 To 273
67.	Mr. Vinodkumar Ashok Pradhan	Salient Features of English Literary Movements	274 To 279
68.	Prof. Pandit S. Waghmare	Dalit Movement in India	280 To 287
69.	Dr. Pramodkumar A. Olekar	Post Truth: New Trends In Modern Political Culture	288 To 292
70.	Harichand S. Shirsat	Searching Revolutionary Thoughts Of Women Reflected In Ice-Candy Man& Inside The Haveli Novels	293 To 295
71.	Vasant Bajarang Bhagwat	Impact Of Information Technology On Education	296 To 299
72.	Basavaraj S Math	The Acts For The Preservation Of The Ancient Monument	300 To 303
73.	Dattatraya Ramesh Machale	The Swadeshi Movement (1905-1908)	304 To 308
74.	Sandeep Patil And Dr. Ankush Jadhav	Movements In Teacher Education	309 To 311
75.	Kamalakar N. Rakshase	National Reference of Dalit Movement In Maharashtra	312 To 313
76.	Bhimashankar .M. Birajdar,	Jaitapur Anti-Nuclear Power Project Movement: A Historical Study	314 To 317
77.	Dr. Mrs. Manisha Darshan Bagawade	Senior Citizen's Movement Towards Agewell Programme	318 To 325
78.	Rajendra G. Patil	Significance of Non-Cooperation Movement In Indian Freedom Struggle	326 To 329
79.	Dr. Swarali Chandrakant Kulkarni	Revolutionary Thoughts Of Tarabai Shinde	330 To 332
80.	Dr. Kavita Gagarani	A Study Of Emerging Cultural Trends In The Princely State Of Kolhapur	333 To 335
81.	Dr. Ramjan Fattukhan Mujawar	Recent Trends In Agriculture Sector Of Indian Economy	336 To 339
82.	Aalam Gafur Shaikh	Impact Of New Economic Policy On Labour Market In India	340 To 343

204

National Reference of Dalit Movement In Maharashtra

Prof. Kamalakar N. Rakshase
Vitthalrao Patil Mahavidyalaya,
Kale, Tal.Panhala, Dist.Kolhapur
E-Mail : kamlakar7662@gmail.com.

The Dalit movement has a prominent place in politics and social system of Maharashtra. When we study thoroughly the social life of Maharashtra, we will come to know that Dalit Class of people are known as untouchables in Hindu Religion.Dalit means exploited and deprived class. The untouchables have been the victims of absorption from every angle in the country like India and beyond doubt, it remains continued even today. A note of Dalit Movement has been taken at universal level in Maharashtra and even in India.

Social disparity has been in India from many years. Say it is a big fault or blame. This blame is of Hindu Religion which is completely based on Caste System, Race System of India.

The roots of caste and untouchability are into existence right from the ancient time of which proofs i.e. archaeology and apparatus are still available.It is found that how Arya came in India and established their superiority.It gave birth to caste system and untouchability out of Superior and Inferior complex.They formed their own tribe so called community.Their invasion B.C. 1500 from the north-west on our Indian Country, battle with the local people of India, they ultimately took the hold and control of this land.

"Dalit", the word already mentioned, labeled as inferior, untouchables, affiliated, oppressed, distressed, are now irrited by this caste system of India.Their pride and feelings are suppressed. All these started to happen from the period 1970. Earlier untouchable came into politics and they formed a group called. "Dalit Panthers". They were revoluntries.They established this party in Mumbai. They sowed a seed of pride and taught them to fight against the bad system in India.They formed a new culture in India.In Modern India, Dalit movement means a collected community.It brought equality and enlighted the millions who were stumbling into darkness.

Though Dalit movement and Dalit politics are going hand in-hand, Dalit Movement has a very broad / deep meaning. Dalit politics is a part of Dalit Movement. Dalit politics plays a dynamic role to bring out over all development and improvement of Dalit and deprived women of India. Movement helps Dalits to get involved in Indian Political Power and to have political identity. It is observed that, Dalits are intentionally neglected in social, economic and political fields as well. They are exploited by these ways. That is what the Dalit movement works to bring these deprived people out of thralldom. It helps them to give new identity of Hindu Religion.This power and energy formed among the pioneers of Dalit movement through the Father of Indian Constitution Dr. B. R. Ambedkar.

The aim of Dalit Movement was to form the feeling of nationality.If you study the social condition before independence, the Dalits had no any social, economic and political rights. There was a fundamental question considering the place of Dalits in Independent India. Dalits would remain absorbed and exploited among majority of Hindus, if they would not get constitutional rights.

The Dalit community has scattered throughout the country like India. Especially, we found much Dalit population in Constituent States.Dalits were/are lead by, guided by the Dalit Movement in Maharashtra, as Dr. B. R. Ambedkar was from Maharashtra.Ambedkarism Movement in Maharashtra has actually implemented throughout India.

Dr. B. R. Ambedkar belonged to Maharashtra and he was a great leader of the country. Ambedkar used to lead / and represent Dalits as he came across with Britishers and Hindu Culture based on caste.He put great efforts to gather Dalits and homeless (Wanderers) together out of Maharashtra.

PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Mr. Ghansham Shaha has made analysis of Dalit Movement at national level. He described two types of Dalit Movement (1980), one is deformational and other one is optional movement. First one works to resolve the problems of untouchability and to improve caste system and second one to enter in another religion or by educating, to improve social culture so as to become strong by economic reputation and by political power.

My personal analysis is that the first movement i.e. deformational movement. Psychologically is not ready to relieve themselves from slavery and the other i.e. optional movement may somehow form self-awareness.To enter another religion, I mean, to accept Boudh religion. Because it is the religion which is based on science and humanity.Boudh religion is a major religion in Asia Continent. The second movement i.e. optional movement never adopts "political stunts but rather it propagates people by enlightening or awakening.

Hon'ble Kashiram says that, we can solve any riddle or problem if we have political power. Because of that majority of Dalits entered / participated in politics by the year 1990 and consequently BSP got political success at last. To fight against self is called a "New Political Movement of Dalits."

Dr. Ambedkar demanded an independent election committee for Dalits and because of that there was a word war between Ambedkar and Gandhi. According to Gandhi, "Untouchability" is not a political subject. Dalits assured that, they were being received by the "Pune Agreement". In the year 1946, movements took place for independent election committee in the different regions like Nagpur, Kanpur, Lakhnau, Pune.Dr.Ambedkar thought that the status of Dalits can be improved or taken to highest level if we give up the Hindu Religion.He convinced the Dalits they had no any option except to give up their existed religion.Bouddh religion is a perfect religion that can make you free from the slavery of Hinduism.

The Republican Party came into existence after Dr. B. R. Ambedkar. Actually Dr. Ambedkar thought of it earlier.The followers of Dr. Ambedkar established the Republican Party on 3rd October, 1957 at Nagpur. Approximately 7-8 Lakhs people gathered for the formation of this party. The entire country witnessing the power of public (Dalits) but later the aims and dreams of the party fragmented.

By the year 1959, the Republican Party divided into two units.These units were known as reformed units and un-reformed units. This party was very powerful even in Central South and North India till the year 1959.

Mr. B. C. Kamble was the first who separated from the body and formed another new body. This newly formed group is known as reformed body whereas unreformed body was of N.Shivraj. The party was divided into two groups to see whether to make adjustment on communism or not.

Dalit movement worked hard to enlight the untouchable society, which was deprived of socially, economically and politically right from hundreds of years. By this, I mean, Republican Party has played a dynamic role.None could lead Dalits after N-Shivraj and Dadasaheb Gaikwad. In fact, Dalit Leaders were expoiting Dalits and doing dirty politics against Dalit Community.

Briefs :

1. Dalits are involved in major programmes from political point view.
2. The movement has forced some intellectual scholars to examine the system of education.
3. The Dalit movement successfully has brought a great pressure on powerful class.
4. The mythological stories born out of Brahmin idealism are completely vanished.
5. Gaile Amvet is of the opinion that the Dalit movement has stopped functioning after Dr. B. R. Ambedkar.
6. Because of this movement, some of the major issues of oppression or suppression are disclosed. But the movement has completely failed to show some changes and improvements for the betterment of Dalit Community and the nation at large.

References :

1. Ghanshyam Shaha, Social movement in India, अनुवाद प्राची चिकटे
2. Dalit in Modern India, Editor - S. M. Maickel, Diamond Publication.
3. Gopal Guru, Mukhya Pravatil Dalit Movement .

UGC Journal

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ) Detail

q=Aayushi+International+Interdisciplinary+Research+Journal+(AIIRJ) by MR.+PRAMOD+PRAKASHRAO+TANDALE)

Name of the Journal :
Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

ISSN Number :
-

e-ISSN Number :
-

Source :
UNIV

Subject :
Education;Social Sciences(all) (../../../Subject-Wise-Journal/Education-Social-Sciences(all))

Publisher :
MR. PRAMOD PRAKASHRAO TANDALE (../../../Publisher-Wise-Journal/MR-PRAMOD-PRAKASHRAO-TANDALE)

Country of Publication :
India

Broad Subject Category :
Multidisciplinary

Export as PDF

TRUE COPY

PRINCIPAL
Mahavirao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur (M.S.)

Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-X Oct. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

TRUE COPY
PRINCIPAL

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

October 2017 – Index

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
1.	Madhu.S, K. And Ramachandra	Force Fit Bell Curve Appraisal – Perceptions of HR Professionals	1 To 4
2.	K.Ananthapadmanabha And Dr.K.Udayakumar	Verification of Match Fixing in Cricket Using Sports Data Mining and Algorithmic Design Notation	5 To 13
3.	Balasaheb A. Kotalagee	All India Kisan Sabha :A Historical Studay	14 To 17
4.	Dr. Smt. Geetanjali S. Patil	Gandhi's Struggle in South Africa : A Path to Realization of God	18 To 21
5.	Dr.Prashant M. Mannikar	Arthur Miller's The Crucible: A Tragedy of a Common Man	22 To 25
6.	Muskan Gumber	Demonetisation- War Against Corruption	26 To 28
7.	Gyatri Sethi	Role of RRB	29 To 30
8.	Sonam kalra	Application of Psychological Tools for Better Understanding And Counselling Of Disabled Children	31 To 34
9.	Gyatri Sethi	Demonetization	35 To 38
10.	Dr. Kishor G. Shende	SWOT Analysis of E- Commerce	39 To 42
11.	Dr. N. S. Pol	Agricultural Land Use and Land Degradation: In Nerle Village District Sangli Maharashtra. India: A Study Of Environmental Geography	43 To 46
12.	Dr. N. S. Pol	The study of Changes in General and Agricultural Land Use in Village Tisangi, District Sangli (Maharashtra) : A Geographical Analysis	47 To 50
13.	Dr. B. R. Gadave	Issues in Ethical Marketing	51 To 54
14.	Dr. B. R. Gadave	Advantages and Disadvantages of Personal selling	55 To 57
15.	Kirandeep	Inclusive Education: Moving From "Why?" To "How?"	58 To 63
16.	Dr. Prakash. N. Meshram	Whitman's Song of Myself – Quest of the Divine Soul	64 To 70
17.	Dr. Jyotsna S. Pusate	Correlation in HRM and Home Management and Employment (Job) Development	71 To 74

October 2017 – Index

18.	Aayushma And Vd.P.R.Kanade	Garbhini Paricharya & Its Clinical Significance	75 To 83
19.	Dr. Shalaka Mohan More And Dr. Paner Paras C.	Review on Anjana – A Type of Kriyakalpa	84 To 90
20	Dr. Rajaesh Kumar S. Upadhyay And Dr. Ujwala M.Divekar	Importance of Post - Mortem (Medicolegal Autopsy)	91 To 93
21	Dr.Arjun Wagh	Advances Agriculture Geography	94 To 99
22	Kamalakar Baburao Gaikwad	Aristotle's Concept of Tragedy	100 To 103
23	Dr.N.G.Kannur And Nitin Singh	Indigenous Games; An Analysis On Selected Physical Fitness And Physiological Parameters Of Free Style Wrestlers And Kabaddi Players Of Hyderabasd Karnataka Region	104 To 106
24	Dr.N.G.Kannur And Suresh B.Sangolgi	A Compaarative Stydy on Psychomotor Abilities Between High School Basket Ball And Hand Ball Players Of Hyderabad Karnataka Region	107 To 109
25	Dr.Ratnakar.D.Hosamani	Socio-Economic Thoughts of Dr. B.R. Ambedkar To Enrich Socio-Economic Conditions	110 To 113
26.	Dr.Ravikiran Bakkappa	A Study on Attitude Of Students In Higher Secondary Level Using Internet For Education In Kalaburgi District (Urban)	114 To 119
27.	Dr. Sandeep Kataria	Study of Social And Emotional Intelligence of School Going Adolescents of Working And Non Working Mothers	120 To 126
28.	Milind Apte And Dr.Dipti Christian	A Comparative Study of Leadership Effectiveness of Collegiate Students from Urban and Rural areas of Vidarbha	127 To 132
29.	Pradeep J. Singh And Surendra Tiwari	Effect of Intervention on Knowledge, Attitude, Skills and Sports Performance of Players Participating in Individual and Team Games (With Special Reference to Students of International Schools of Mumbai City)	133 To 136
30.	Rain Kumar Jamwal And Surendra Tiwari	Impact of Behaviour Orientation on Performance of Athletes Participating in Different Level Tournaments	137 To 141
31.	Stanley Venance Gregory And Sanjay R. Choudhary	A Study of Emotional Competence of Football Referees Officiating at Different Levels	142 To 146

October 2017 – Index

32.	Lalit Nagar, Lamo Ringzin And K.N. Dwivedi	Concept of Ideal formulation (Yoga) in Charak Samhita	147 To 151
33.	Ms.Meghana Joshi	To Study The Bird Diversity And Suggestion For An Ecological Park Plan of Gandhari Birding Area As A Urban-Restoration Project	152 To 158
34.	Smt. Pratibha Bhimrao Gaikwad	E-Resources in Library	159 To 161
35.	विवेक पाठक	मौर्य सम्राट अशोक के अंतर्गत प्रशासनिक व्यवस्था	162 To 169
36.	*डॉ.निभा शांतीलाल उपाध्याय*	*डॉ.रामप्रकाशजी के काव्य मे आधुनिक यथार्थवाद*	170 To 174
37.	ज्योति	हिन्दी की वर्तमान स्थिति	175 To 176
38.	डॉ . बालाजी श्रीपती भुरे	कृष्णा अग्निहोत्री की कहानियों में नारी चेतना : संवेदना एवं स्वरूप	177 To 181
39.	*संभाजी शंकर कांबळे*	*महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री-शिक्षणविषयक कार्य*	182 To 185
40	पदमाकर सदांशिव	राजर्षी छत्रपती शाहु महाराज व ☐डाक्षेत्र	186 To 189
41.	गजेंद्र मोतिरामजी शेन्डे व डॉ. मनोज अरमरकर	विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील सांघिक खेळांच्या विकासाचे तुलनात्मक अध्ययन	190 To 196
42.	ईश्वर सिताराम बोरसे	कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सामाजिक समायोजन आणि अभ्यास सवयी यांतील सहसंबंधाचा अभ्यास	197 To 199
43.	डॉ . लहू वाघमारे	व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमधील दलित पात्रांची आदर्शमूल्ये	200 To 203
44.	ए.एच.भोंडवे व डॉ. आठवले संहिता	वित आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्था	204 To 210
45.	डी . के .डाके	व्यक्तिमत्व विकासात चित्रपटाची भुमिका ः एक समाजशास्त्रीय अभ्यास	211 To 213
46.	पंडगे संतोष रमेशराव	पंडगे संतोष रमेशराव महात्मा गांधीजीचे सत्याग्रह संकल्पनेविषयी तात्विक विचार	214 To 215
47.	डॉ. विजया विनायक पाटील	पीएच.डी च्या विद्यार्थ्यांची 'स्व-ओळख - जीवन कौशल्य' : एक अभ्यास	216 To 220
48.	*सातलिंग काशिनाथ गौंड*	*जागतिकिकरणाचे स्त्री जीवनावरील परिणाम :स्त्रीवादी दृष्टिकोणातून अभ्यास*	221 To 225

October 2017 – Index

49.	अमोल बबन उबाळे डॉ.शोभा व्ही. काळेबाग	भेदाधारीत अनुदेशन एक प्रभावी अनुदेशन तंत्र	226 To 234
50.	दैवत रघुनाथ बोरकर प्रा. डॉ. नंदाजी राघोबाजी सातपुते	सुधीर मुनगंटीवार यांच्या विविध विकासकार्यांचे राजकीय दृष्टीकोनातुन अवलोकन	235 To 240
51.	डॉ.सुनीता पुरुषोत्तम सांगोले	भाषा शिक्षणातील नव्या पद्धती	241 To 246
52.	डॉ.लिना एस. गावंडे	सरोगसी : मातृत्वाची संधी की व्यापार	247 To 249
53.	डॉ.शार्दुल सेलूकर	कारगील, उरी : भारत – पाकिस्तान संघर्षाचे तुलणात्मक अध्ययन	250 To 255

TRUE COPY
PRINCIPAL
Madhavrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal Panhala, Dist. Kolhapur, (M.S.)

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - IV Issue-X OCTOBER 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

कारगील, उरी : भारत — पाकिस्तान संघर्षाचे तुलणात्मक अध्ययन

डॉ. शार्दुल सेलूकर
राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे.
(संलग्नित — शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

"You can do a lot with diplomacy but of course you can do a lot more with diplomacy backed up with firmness and force.... Prime minister, ladies and gentlemen, sound defence is sound foreign policy". [Kofi Annan - The UN secretary-general]

१ .प्रस्तावना

फाळणीनंतर स्वतंत्र झालेल्या भारत आणि पाकिस्तानचे संबंध परस्पर संशय, तणाव, संघर्ष, युध्द इ मुळे प्रभावित झालेले दिसतात. मुळातच पाकिस्तान म्हणजे *'not India'* या भावनेमुळे किमान तेथिल राजकारणी आणि सैन्य यामध्ये भारताविषयी शंका आणि व्देशाची भावना असने क्रमप्राप्त होते. फाळणीचे अनुभव, स्विकारलेली शासन पध्दती, धार्मिकता विरुध्द धर्मनिरपेक्षता नव्याने निर्माण होणारे वाद आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील परस्पर विरोधी भुमिका यामुळे भारत — पाकिस्तान संबंध गेली ७ दशके सलोख्याचे नव्हते असेच म्हणावे लागेल. संपत्तीच्या हस्तांतरणाचा आणि मोबदल्याचा प्रश्न, संस्थानांच्या विलीणीकरणाचा प्रश्न, नदयांच्या पाणीवाटपाचा प्रश्न टप्प्या टप्प्याने सोडवण्यात यश आले मात्र सीमावाद व काश्मिर प्रश्न सोडवण्यात आलेल्या अपयशामुळे दोन्ही देशांचे संबंध कायम प्रभावित राहिले.

भारत पाकिस्तान यांच्या दरम्यान १९४८, १९६५, १९७१ असे तीन पारंपारीक व मोठे युध्द झाले आहेत. या तीन्ही युध्दात पाकिस्तानचा पराभव झाला. १९७१ मध्ये तर पंतप्रधान इंदिरा गांधींच्या मुत्सददी धोरणामूळे भारताला तिहेरी यश मिळाले, एक म्हणजे पाकिस्तानची फाळणी, दुसरे म्हणजे युध्दात आपण पाकिस्तानला पराभूत करुन त्यांचे मोठया प्रमाणावर सैन्य जेरबंद केले आणि पाकिस्तानला शिमला करार करावयास भाग पाडले आणि तिसरे म्हणजे याहया खानची लष्करी सत्ता नष्ट करुन जुल्फिकार अली भुटटोंचे लोकशाही शासन प्रस्तापित झाले. यामुळे पाकिस्तान काश्मिर सह सर्व समस्यांची सोडवणुक व्दिपक्षीय चर्चेने करण्यास बाध्य झाला. सलग ३ पारंपारीक युध्दामध्ये आपण भारताला पराभूत करु शकलो नाही हे ओळखून पाकिस्तानने १९८० नंतर भारतासोबत दहशतवादाच्या रुपाने नव्या युध्दाचा पुरस्कार केला. (bleed India through a thousand cuts – Policy) त्यानुसार प्रथम पंजाब व नंतर काश्मिर

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

मध्ये पाकिस्तानने दहशतवाद पसरवला. पंजाबमधील दहशतवाद मोडीत काढण्यात इंदिरा गांधींना यश आले मात्र काश्मिर आजही एक धगधगते रण बनले आहे.

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये आपण यानंतरच्या बदललेल्या युध्दनीतीचा व भारताच्या बदललेल्या प्रतिक्रयांचा आढावा घेणार आहोत.

२.कारगील

१९८० च्या नंतर अमेरिका – पाकिस्तान – चीन हा त्रिकोण आकार घेत होता. भारतासाठी ही चिंता वाढवणारी बाब होती. यावर प्रतिक्रीया म्हणून वाजपेयी सरकारला १९९८ मध्ये अणुस्फोट घडवून आणावे लागले. प्रतिक्रीया म्हणून पाकिस्ताननेही अणुचाचन्या केल्या. मात्र अण्वस्त्र संपन्नतेनंतर युध्दाच्या विस्ताराबाबत कायमच भारताला जागतीक दबावाला सामोरे जावे लागले आहे. याचाच फायदा घेत पाकिस्तानने भारताविरुध्द असंख्य वेळा पारंपारिक युध्द पुकारलेले दिसते, मात्र केवळ तिव्र शब्दात निषेधाशिवाय भारत काहीच करु शकला नव्हता. हा पाकिस्तानचा एका प्रकारचा अनैतिक विजयच म्हणावा लागेल.

एकीकडे अणुचाचणीने भारताला अण्वस्त्र सज्ज देशांच्या पंक्तीला नेवून बसवले परंतू त्याच बरोबर पाच दशके एक विवेकी सत्ता म्हणून भारताने मिळवलेला जगातला दर्जा भारताला अण्वस्त्रांच्या प्रथम वापराबाबतचा हक्क नाकारत होता. म्हणूनच भारत पहिल्यांदा अण्वस्त्रांचा वापर करणार नाही हे भारताला निक्षुण सांगावे लागले. या नैतिक बंधनाचा १९९९ च्या कारगील युध्दाच्या वेळी प्रत्यय भारताला आला. १४० कि.मी. सीमेवरील पाकची घुसखोरी निपटवायला भारताला अडीच महिने झुंजावे लागले. विशेष म्हणजे यापुर्वी पाकिस्तानने भारतावर युध्द लादल्यानंतर भारताने आपले सैन्य थेट पाकिस्तानमध्ये घुसवले होते आणि कोणत्याही भीतीविना पारंपारिक युध्द केले व जिंकले. मात्र करगील युध्दाच्या वेळी आपणावर अणुयुध्दाच्या भीतीमुळे हे करता आले नाही.

कारगील मध्ये जन. परवेझ मूशर्रफ यांच्या नेतृत्वामध्ये मुजाहिदीन दहशतवादयांच्यात मिसळून सैन्याने अनेक चौक्यांवर कब्जा केलेला होता. पंतप्रधान नवाज शरीफ यांना जेव्हा वाजपेयी यांनी ही बाब सांगीतली तेव्हा शरीफ यांनी आपल्याला यातील काहीच माहिती नसल्याचे म्हटले. कारगील प्रकरणामधील पंतप्रधान नवाज शरीफ यांची भूमिका संशयास्पद होती. मला सैन्याने (जन. परवेझ मुशर्रफ यांनी) घुसखोरी (Operation Badr) बाबत पुरेशी माहिती दिली नाही या त्यांच्या दाव्याबाबत शंका उपस्थीत होते. (General Malik V.P.. 2000. Pg 26)

कारगील युध्दाच्या वेळी बनवण्यात आलेल्या ॲडहॉक कायसीस कमीटीचे सदस्य जे. एन. दिक्षीत यांच्या मते 'भारताने आपले हवाई दल तैनात करत असताना आपण युध्दाचा धोका वाढवत आहोत आणि पाकिस्तानच्या प्रतिक्रियेला तयार रहावे लागेल यासंबंधी समीती जागरुक होती.' (Dixit J. N. 2002. Pg 55) पाकिस्तान अणुयुध्दाची सुरुवात करणार आहे अश्या स्वरुपाची गुप्तचर यंत्रणांची माहिती शासनाला मिळत होती. अण्वस्त्र असने एक बाब आहे व त्यांचा वापर दुसरी बाब आहे. या साठी पाकिस्तानला अमेरिका व चीनच्या तंत्रज्ञानाची आवश्यकता होती. ज्यावर हस्तांतरणाच्या वेळीच काही बंधने घातलेली असतात. त्यामुळे भारत अश्वस्त होता की अमेरिका असो व चीन कोणीही भारताविरुध्द पाकिस्तानला अणुयुध्द करण्यास परवाणगी देणार नाही. भारताचे तत्कालीन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार ब्रिजेश मिश्रा यांनी पाकिस्तानच्या अण्वस्त्र वापराच्या धमकीला अतिशय बेजबाबदार आणि अर्थहिन वक्तव्य म्हटले होते. २ जून १९९९ च्या टाईम्स ऑफ इंडीयामध्ये पाकिस्तानच्या धमकीला 'Crying Nuclear Wolf' असे म्हटले होते. तरीही खबरदारी म्हणून भारतानेही पावले उचललेली होती. विशेष म्हणजे भारताला अण्वस्त्रांच्या वापरासाठी कोणाचीही संम्मती घेण्याची आवश्यकता नव्हती. भारत अण्वस्त्रांचा वापर तर करणारच नाही परंतू मोठया प्रामणावर युध्द भारताला परवडणारे नाही असे ठाम मत असणाऱ्या पाकिस्तानी नेतृत्वाला (राजकीय आणि सैनिकी) भारताची वायुसेना आणि जलसेना यांच्या तैनातीच्या निर्णयाने धक्का बसला होता. (General Malik V.P. 2000. Pg 26) दोन महिण्याच्या मर्यादीत युध्दानंतर ब्रिजेश मिश्रा व खुदद वाजपेयी यांनी जेव्हा कारगील मधुन सैन्य माघारी घ्या अन्यथा आम्हाला युध्दाचा आवाका वाढवावा लागेल अशी धमकी पाकिस्तान आणि मध्यस्थांना दिली तेव्हा अमेरिकेने व युरोपीय संघाने पाकिस्तानला सैन्य माघारी घेण्यास भाग पाडले. (General Malik V.P. 2000. Pg 192)

कारगील युध्दातील ठळक मुददे :

१. अन्वस्त्र संपन्नतेमुळे पाकिस्तान सैन्य आणि नेते यांच्यात भारताशी बरोबरी केल्याची भावना निर्माण झाली होती.
२. 'सीमारेषा ओलांडायची नाही' या धोरणामुळे भारताच्या सैन्यक्षमतेवर मर्यादा येत होत्या.
३. दिर्घकाळचे युध्द भारताला परवडणारे नाही हे पुन्हा सिध्द झाले.
४. युध्दादरम्यान भारत एक जबाबदार अणुसत्ता म्हणून पुढे आला. यामुळेच अमेरिकेने भविष्यात चीनच्या विरोधात भारताचा संतूलक म्हणून वापर करण्याचे धोरण आखले. (Brig. Bhonsle Rahul (Retd). 2009)
५. भारताची संरक्षण सिध्दता अश्या प्रसंगामध्ये भविष्यात चीन सारख्या शत्रुसोबत कमी पडू शकते हे संरक्षण मंत्र्यांना प्रकर्शाने जाणवत होते.

६. कारगील मध्ये दहशतवादयांच्या आडून पाक सैन्याने घुरखोरी केली हे उघड झाले. यापुढे दहशतवादयांसोबत घुसखोरीत पाकिस्तान सैन्य असणार नाही याची काळजी पाकने घेतली.

३.उरी (पीर पंजाल सर्जीकल स्ट्राईक)

कारगील युध्दानंतर पाकिस्तानमध्ये मुशर्रफ यांनी शरीफ यांचे लोकशाही शासन संपवून पुन्हा एकदा लष्करी अमल सुरु केला तर दुसरीकडे अमेरिकेने भारताचे महत्व ओळखुन अणुचाचण्यानंतर लादलेले निर्बंध माघारी घेण्यास सुरुवात केली. वाजपेयी शासनानंतर २००४ मध्ये मनमोहन शासन सत्तेमध्ये आले. ते दहा वर्षे सत्तेत होते. २०१४ साली जवळपास ३ दशकानंतर मोदी शासनाच्या रुपाने एक पुर्ण बहूमताचे शासन सत्तेत आले. एन डी ए च्या घोषणापत्रात जरी दहशतवादास चोख प्रतिउत्तर देण्याची भाषा असली (Election Manifesto 2014: Ek Bharat Shreshta Bharat) तरी अंबुश: मणिपुर — २०१५, गुरुदासपुर — २०१५, पठाणकोट नगरोटा व उरी — २०१६, हे गेल्या तीन वर्षातील मोठे दहशतवादी हल्ले आहेत.

१८ सप्टेबर २०१६ रोजी जैश ए महोंम्मद या दहशतवादी संघटनेच्या ४ दहशतवादयांनी भारताच्या उरी या लष्करी तळावर हल्ला केला. यात भारताचे १८ जवान शहीद झाले तर २० जखमी झाले. एका पाठोपाठ लष्करी तळावर होणारे हल्ले हे जवानांचे मनोधैर्य खच्चीकरण करणारे होते. भारताने या हल्ल्यानंतर नेहमीप्रमाणे सर्व साक्षी पुरावे जगजाहिर केले मात्र एवढे करुन आता भागणार नाही याची जाणीव नेतृत्व व सेना दोघांनाही होती. ले. जनरल हुडा यांच्या नेतृत्वामध्ये एक वर्षापुर्वीच मॅनमार येथे अश्याच प्रकारे भारतीय सैन्यतळावरील दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून एक सर्जीकल स्ट्राईक करण्यात आली होती. विशेष म्हणजे याबाबतची माहिती पहिल्यांदाच भारतीय सैन्याने प्रेस कॉन्फरन्स करुन जगाला दिली. भविष्यात पाकिस्तानकडून भारताला चिथावनी देणारी एखादी घटना झाली तर भारताने पाकिस्तानमध्येही अश्याच प्रकारची सर्जीकल स्ट्राईक करावी अशा प्रकारचे मत संरक्षणमंत्री मनोहर पर्रिकर व काही सैनिकी अधिकारी यांचे बनत चालले होते. हा भारतीय मानसिकतेतील एक क्रांतीकारी बदल होता. (Nitin A. Gokhale . 23.09.2017 - *The Diplomat*)

गुप्तचर यंत्रणेकडून भारतावरील संभाव्य दहशतवादी हल्ल्याची सूचना मिळाली. यानुसार २९ सप्टेबर २०१६ रोजी पहाटेच्या आंधारात पाक व्याप्त काश्मिरमध्ये जवळपास १०० कि.मी. च्या सीमेवर पीर पंजाल भागात विविध ठिकाणी जवळपास चार तास ही लष्करी कार्यवाही करुन दहशतवादी लॉच पॅड उध्वस्त करण्यात यश मिळवले. विशेष म्हणजे यादरम्यान सीमापार केलेल्या एकाही सैनिकाला कोणतीही इजा न होता ही कार्यवाही पार पाडण्यात सैन्याला यश आले. याच वेळेला ही कार्यवाही संपली असली तरी यावरील कोणत्याही प्रतिक्रीयेला भारतीय

सैन्य तयार आहे हे लष्करी अधिकारी सांगायला विसरले नाहीत. या हल्ल्याने भारताने भारतावरील दहशतवादी हल्यापाठीमागचा खर्च (Cost of Terrirism)वाढवण्यात यश मिळवले. (Chadha Vivek and Others. 2016. Pg. 1-12)

सर्जीकल स्ट्राईक मधिल काही महत्वपूर्ण बाबी पुढील प्रमाणे—

१. दहशतवादी हल्ला होण्यापुर्वीच भारताने संरक्षणात्मक खबरदारी म्हणून पहिल्यांदाच सीमेपार एवढया मोठया प्रमाणात अशी कार्यवाही केली होती.

२. या कार्यवाहीचे व्हीडीओ रेकॉर्डिंग करण्यात आले होते, जे वॉर रुममध्ये बसून पंतप्रधान, सैन्याचे जेष्ट अधिकारी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार व इतर महत्वाच्या वक्ती घटनाक्रम घडत असताना पहात होत्या. कालांतराने सैन्याने हे रेकॉर्डिंग सार्वजनिक केले.

३. ही कार्यवाही दहशतवादांच्या लॉच पॅडस वर केल्याचे खुद्द सैन्याने जगाला सांगीतले.

४. १५० सैनिकांपैकी एकाही सैनिकाला मोठी इजा/दुखापत झाली नाही.

५. भारत सीमारेषा ओलांडून दहशतवादयांवर कार्यवाही करु शकतो हे भारताने पाकिस्तानला, दहशतवादी गटांना व जगाला दाखवून दिले होते.

रॉ चे माजी सचिव ए एस दौलत, आय एस आय चे माजी संचालक असद दुर्राणी व लेखक अदित्य सिंन्हा यांनी एकत्र येवून The Spy Chronicles - RAW, ISI And The Illusion Of Peace हे पुस्तक लिहीले. यामध्ये ISI Chief असद दुर्राणी अशी भीती व्यक्त करतात की, 'पुन्हा जर २६/११ किंवा संसदेवरील हल्ल्यासारखा प्रसंग उदभवला तर मोदींची प्रतिक्रया काय असेल याचा आंदाज घेणे अवघड आहे'. माझ्या मते हेच या सर्जीकल स्ट्राईकचे यश म्हणावे लागेल. (A.S. Dulat, Asad Durrani and Aditya Sinha. 2017. Pg 169)

४.सारांश

प्रस्तुत लेखात आपण कारगील व उरी हल्ल्याच्या वेळी भारताच्या प्रतिक्रियेचा आढावा घेतला. दोन्ही घटनांच्या वेळी भारतीय नेतृत्वासमोरील परिस्थीती, मर्यादा आणि पर्याय यामध्ये भिन्नता होती. कारगील प्रसंगावेळी भौगोलिक अडचणी, वाजपेयी सारखे मवाळ परंतू मुत्सददी नेतृत्व, नुकत्याच दोन्ही राष्ट्रांनी केलेल्या अणुचाचण्या व त्यानंतरची बंधने याला अनुसरुन भारताला निर्णय घ्यावे लागले. तेव्हाचे संरक्षण मंत्री जसवंत सिंग कोणत्याही परिस्थीतीत सीमारेषा ओलांडायची नाही या मतावर ठाम होते. तुलनेने पुढील दोन्ही प्रसंग हे भारतीय नेतृत्वाच्या विचारातील बदल दर्शवनारे होते. मोदी दोन्ही प्रसंगी सैन्याच्या मागे ठामपणे उभे होते. संसदेवरील हल्ला असेल किंवा मुंबईवरील हल्ला असेल सैन्य दोन्ही वेळा कोणत्याही पातळीवर लढून दोषींना शिक्षा देण्याच्या मनस्थीतीत होते. मात्र तेव्हाच्या नेतृत्वाने आम्हाला संमती दिली नाही असे निवृत्त सैन्यअधिकारी उघड उघड वाहिण्यांवर सांगत आहेत. याउलट मोदी भाषणांमधून सैन्याला पुर्ण स्वातंत्र्य आहे असे म्हणत आहेत.

उरी हल्ल्याला जो प्रतिसाद भारताने दिला आहे त्यातुन भारतीयांची प्रतिष्ठा सैन्याने कायम राखल्याच्या लोकांच्या भावना आहेत. मागील तीस वर्षे कायम दहशतवादी हल्ले आणि त्यास ठरावीक तोंडी प्रत्युत्तर एकून भारतीय जनता कंटाळी होती.

आता भारतीय सैन्याने सीमारेषा ओलांडायची नाही अशी मानसिकता टाकून दिलेली दिसते. सीमारेषा ओलांडायचे प्रयत्न याअधीही भारतीय सैन्याकडून झाले होते मात्र त्याचे स्वरुप अत्यंत मर्यादीत होते. यावेळी १९७१ नंतर पहिल्यांदाच भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या भूमिवर आक्रमण केलेले होते. हे आक्रमण दहशतवादा विरुध्द आहे अशी मांडणी करुन एकाच वेळेला भारतीय सैन्याने दहशतवादी संघटना आणि पाकिस्तान सैन्य दोघांच्याही मनात दरारा निर्माण केला आहे. दोन्ही कार्यवाहयामध्ये सर्पराइझ इलिमेंट कमालीचा होता. यातच यश दडलेले होते.

सर्वात महत्वाचे म्हणजे नेतृत्व व सैन्यक्षमता याबाबतचा आत्मविश्वास आपल्या परराष्ट्र धोरणामध्येही प्रतिबिंबीत होत आहे. चीन सारखा एखादा अपवाद वगळता पाकिस्थान जागतिक पटलावर एकाकी पडलेला दिसला. अमेरिका, इंग्लंड व युरोपियन युनियन, एशियन संघटनेमधील सदस्य देश, रशिया या सर्वांचे भारताला समर्थन दिवसोंदिवस वाढत आहे. एवढेच काय तो संस्थापक सदस्य असलेल्या इस्लामिक राष्ट्रांच्या परिषदेतही भारताचे महत्व वाढत आहे. हे भारतीय राजनयाचे मोठे यश आहे.

शेवटी कोफी अन्ना म्हणतात तसे, ***"You can do a lot with diplomacy but of course you can do a lot more with diplomacy backed up with firmness and force.... Prime minister, ladies and gentlemen, sound defence is sound foreign policy".*** [Kofi Annan - The UN secretary-general]

संदर्भ —

1- Dixit J. N. 2002. *India—Pakistan in War and Peace*. London: Routledge
2- Election Manifesto 2014: Ek Bharat Shreshta Bharat (http://cdn.narendramodi.in/wp-content/uploads/2014/04/Manifesto2014highlights.pdf)
3- Chadha Vivek and Others. 2016. *Uri, Surgical Strikes and International Reactions*. Institute for Defence Studies and Analyses (*IDSA*)
4- Dulat A.S., Durrani Asad and Sinha Aditya. 2017. *The Spy Chronicles - RAW, ISI and the Illusion of Peace*. Noida: Harper Collins Publishers.
5- Brigadier Bhonsle Rahul K (Retd). 2009. *Kargil 1999: Limited War, Unlimited Consequences.* CLAWS Journal l Summer 2009.
6- Nitin A. Gokhale - The Inside Story of India's 2016 'Surgical Strikes' - ***The Diplomat*** (September 23, 2017)

TRUE COPY
PRINCIPAL
Vasantdada Patil Mahavidyalaya, Kate
Arts, Commerce & Science)
Miraj, Dist. Sangli (M.S.)

2017-18 (2)
199

Dnyansadhana Shikshan Prasarak Mandal Niwade, Sanchalit

M.H.Shinde Mahavidyalaya ,Tisangi

Tal. Gaganbavada, Dist. Kolhapur (M.S.)

One Day
Interdisciplinary National Seminar
17th Feb.2018

On
Nation Builders

A Special Issue of

Aayushi International Interdisciplinary Research Journal

Special Issue - **XXI**

ISSN –2349-638x UGC Approved No. 64259

Impact Factor 4.574

Editor

PRIN. DR . N. K. SHINDE

DR . VINOD KAMBLE

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kal
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Organised By	M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मनिरपेक्ष राष्ट्रबांधणी

प्रा. कमलाकर एन. राक्षसे,
राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

प्रस्तावना : आपल्या देशात अनेक परकीयांनी आक्रमणे केली. आपल्या देशाची अनेक परकीयांनी संपत्तीही लुटून नेली. यामध्ये इंग्रज, डच, फ्रेंच, मुघल इत्यादींचा समावेश होतो. भारतासारख्या एवढ्या मोठ्या भूभागावर मूठभर लोकांनी सत्ता गाजवली. भारतातल्या सर्व लोकांनी परकीयांच्या विरोधात शस्त्रे उगारली नाहीत. त्याचे कारण भारत हा विविधतेने नटला असला तरी विविधतेने फाटलेला सुध्दा होता. वर्ण व्यवस्थेनुसार काही विशिष्ट लोकांनीच लढायचं, काही विशिष्ट लोकांनीच ज्ञानसाधना करायची. अशा काही बंदिस्त स्तरीकरणामुळे भारताची शक्ती विभाजीत झाली होती. आज भारताच्या संविधानाने सर्व जाती धर्माच्या लोकांना समान अधिकार दिल्याने ते एकसंघ झाल्याचे दिसतात. म्हणून आज तरी भारतावर हल्ला करण्यापूर्वी त्यांना हजार वेळेस विचार करावा लागेल. कारण विविधतेने नटलेल्या भारताला एकाच माळेत गुंफण्याचे काम स्वातंत्र्यानंतरच्या काळात झालं.

प्रस्तुत संशोधन लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मनिरपेक्ष राष्ट्रबांधणी यांचा संशोधनपर उहापोह करण्यात आलेला आहे.डॉ.आंबेडकरांना या देशाचे सामाजिक आणि राजकीय ऐक्य अतिशय महत्वाचे वाटत होते.देशात स्वातंत्र्यापूर्वी सामाजिक व राजकीय परिस्थिती फारशी समाधानकारक नव्हतीच.हा समाज वेगवेगळ्या गटा–गटात विभागलेला होता. तरी पण काही काळानंतर व उचित प्रयत्नानंतर ही परिस्थिती पालटू शकेल अशी खात्री डॉ.आंबेडकरांना होती. भारत एक एकात्म राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहील असा आशावाद त्यांनी घटना समितीसमोर भाषण करताना व्यक्त केला होता.

मानवी इतिहासात राष्ट्रवादाने हाहा:कार केले आहेत. प्रचंड हत्याकांडे व रक्तपात घडवून आणले आहेत. पण त्याचबरोबर नव्या राष्ट्रांनाही जन्म दिला आहे. अनेक राष्ट्रांनी स्वातंत्र्य सांभाळलेली आहेत.म्हणजे राष्ट्रवाद ही केवळ विध्वंसक शक्ती नसून ती एक विधायक व रचनात्मक शक्तीही आहे. मानवाला त्या शक्तीने मोलाची शिकवण ही दिली. लेनिन सारखी डॉ. आंबेडकर राष्ट्रवादाची परिभाषा करीत नाहीत.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, स्वातंत्र्य म्हणजे काय ? ते जनतेचे स्वातंत्र्य अनेक स्वतंत्र देशाची जनता खऱ्या अर्थाने स्वतंत्र होतच नाही. देशांतर्गत गुलामगिरी ती भक्ष्य ठरते. या संदर्भात डॉ. आंबेडकर अमेरिकेतील निग्रोचे उदाहरण देतात. अमेरिकेला सर्वांत अगोदर स्वातंत्र्य मिळाले. परंतु अमेरिकेतील देश बांधवांना (निग्रोना) स्वातंत्र्य मिळाले नाही. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की, राष्ट्राचे खरेखरे स्वातंत्र्य व्हायचे असेल तर त्या राष्ट्रातील सर्व जाती/वर्गांना प्रामुख्याने गुलामगिरीत खितपत पडलेल्या वर्गांना प्राप्त झाले पाहिजे. गरजा, भय, छळ, या सर्वांपासून स्वतंत्र असलेली जनताच स्वातंत्र्याचा खरा अर्थच आणून देत असते.

डॉ. आंबेडकरांच्या मते, राष्ट्राच्या ऐक्यापुढे महत्वाचा अडथळा कोणता असेल तर तो म्हणजे आपल्या देशातील जातीयता, राष्ट्राचे ऐक्य व सहजीवनातील आनंद या दोहोंना जातीयता मारक ठरते. संकुचितपणा व समाजविघातक वृत्ती यांची जोपासना ती करते. एखाद्या गटाचे संरक्षण बेकायदेशीर व बळजबरीच्या मार्गाने करणे एवढेच त्याचे उद्दिष्ट असते. डॉ.आंबेडकरांना केवळ राजकीय ऐक्य अभिप्रेत नव्हते. भातृभावाच्या प्रखर भावनेने परस्परबध्द झालेला लोक समुदाय अशी त्यांनी राष्ट्राची व्याख्या केलेली आहे. सामाजिक उतरंड, सामाजिक स्तरीकरण यामुळे भेदभाव पडतात. अशा बाबींना एखाद्या सार्वभौम राष्ट्रात स्थानच असू शकत नाही.

जागतिक क्षेत्रात आक्रमकता आंबेडकरांना मान्य नव्हती. तसेच अंतर्गत राजकारणात, आंदोलनाचे मार्ग त्यांना त्याज्य वाटतात. ते गांधींच्या चळवळींच्या मार्गांना विरोध करायचे. त्याचे कारण असे की, चळवळीमुळे वाईट पायंडे पाडले जावू शकतात जे की ताबडतोब मिटविता येणे शक्य होत नाही. अशा चळवळी हिंसक व विध्वंसक बनून सामाजिक व राष्ट्रीय ऐक्यास बाधा उत्पन्न करू शकतात. तात्कालिक ऐक्याच्या हेतूने एखाद्या गटासंबंधी अनुयायांचे धोरण स्विकारणेही डॉ. आंबेडकर अमान्य करतात. कारण की, अनुयायी संबंधीत गटाचे समाधन करू शकत नाहीत. काँग्रेसच्या मुस्लीम विषयक धोरणाला आंबेडकरांनी विरोध दर्शविला. अनुयायांच्या मार्गाने हिंदू–मुस्लीम यांचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच चिघळत जावून जटील बनत गेले. त्यापेक्षा तडजोडीचा मार्ग आंबेडकरांना जास्त पसंत होता. तडजोड घडवून आणण्याकरीता स्वतंत्र पाकीस्तानची निर्मिती करणे भाग पडले तर तेही पत्करले,

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

कारण त्यामुळे किमान मुस्लीमांचा अनुनय नेहमी करण्याची गरज उरणार नाही. म्हणूनच सर्वांनी पाकिस्तानचेही स्वागत करायला तयार राहिले पाहिजे असे त्यांचे मत होते.

राष्ट्राच्या ऐक्यासाठी समान भाषा हा मुख्य आधार ठरू शकतो असे त्यांना वाटत असे. भारतामध्ये अनेक भाषा आहेत. यामुळे देशाच्या ऐक्यात निश्चितच अडथळा निर्माण होऊ शकतो. एक समान भाषा असल्यास राष्ट्र निर्मितीस साह्यभूत ठरते. सर्व भारतीयांना जर एकत्रित होऊन एक समान संस्कृती उभारावयाची असेल तर त्यांना हिंदी भाषा अंगीकारावी लागेल यात तीळमात्र शंका नाही.

देशात १९५३ साली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना होण्याच्या अगोदर म्हणजेच १९४८ साली भाषावार प्रांत रचना आयोगाला एक प्रतिवेदन सादर केले होते. त्यांनी भाषावार प्रांत रचनेचा मुद्दा उचलून धरला होता. त्यांनी 'एक भाषा एक राज्य' हे सूत्र नाकारून 'एक राज्य एक भाषा' हे सूत्र मांडले होते.

या सुत्राचे विश्लेषण करताना एक विशिष्ट भाषा बोलणाऱ्या लोकांचे एकच असे संपूर्ण राज्य असावे. ते आकाराने कितीही मोठे असले तरी चालेल या विचाराला त्यांचा विरोध होता. एकच भाषा बोलणारे जर मोठ्या प्रमाणावर असतील तर त्या भाषेच्या आधारावर एकापेक्षा अधिक राज्यांची निर्मिती केली पाहिजे असे त्यांचे सूत्र होते. छोट्या राज्यांची कल्पनासुध्दा राष्ट्रीय ऐक्यासाठी महत्वाची आहे असे डॉ. आंबेडकरांचे प्रतिपादन आहे. हे विचार आजही प्रासंगिक आहेत.

डॉ. आंबेडकर भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकतेची सुरूवात ईश्वराला स्मरून करण्याच्या सुचनेविरूध्द होते.डॉ. इस्माईल फारूखी यांच्या अयोध्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असा निवाडा दिला आहे की, सर्व व्यक्तींना धार्मिक बाबतीत समानता असणे आणि राज्यसत्तेला कोणताच धर्म नसणे अशी आपल्या राज्यघटनेची योजना आहे.

संविधानाच्या कसोटीवर कोणत्याही कायद्याची वैधता निश्चित करायची असेल तर संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाचा अन्वयार्थ अनु.२५ ते अनु.२८ यातील तरतुदींसह प्रास्ताविक तेचे वाचन करूनच लावायला पाहिजे. भारतीय धर्मनिरपेक्षतेचे तत्व विविध धर्म समुहांशी, परस्पराविषयीची सहिष्णुता आणि धर्माच्या आधारे नागरिकांमध्ये पक्षपात न करण्याची राज्यसत्तेची भूमिका यावर आधारित आहे.

डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर संविधानाच्या प्रास्ताविकतेत काही बदल केले गेले. डॉ. आंबेडकर हे परिवर्तनवादी होते. त्यामुळे संविधानाच्या ३६८ व्या कलमान्वये भारतीय संविधानात कालसाक्षेप बदल करण्याची मुभा त्यांनी संविधानात दिली आहे. भारतीय संविधान मनुष्य निर्मित आहे. तिच्यात काळानुसार दुरूस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे. डॉ. आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने संविधानाचा ड्राफ्ट तयार करत असताना त्यांच्यासमोर आदर्श राज्यपध्दत होती. ती बुध्दकालीन गणराज्याची जगभराच्या विशेषत: अमेरिका व इंग्लंड येथील घटना धर्मातीत होत्या. त्यांना धर्मसत्ता अमान्य होती. त्यामुळे धर्म आणि राजकारण हे दोन विभिन्न घट एकमेकांना समांतर असलेले. त्यामुळे धर्मनिरपेक्षता हा शब्द मूळ संविधानाच्या प्रास्ताविकतेत घालावा असे आंबेडकरांना वाटले नाही.

भारतातील विविधता लक्षात घेवूनही देशी आणि विदेशी घटनातज्ज्ञांनी आपली मते मांडली आहेत. तत्कालीन घटना समितीचे ज्येष्ठ सदस्य के.टी. शहा यांनी धर्मनिरपेक्ष हे विशेषण लावले जावे असा आग्रह धरला होता. तशी दुरूस्ती सुचविली होती. या दुरूस्तीला आंबेडकरांनी विरोध केला होता. तेंव्हा ते म्हणाले होते की, 'प्रजासत्ताकाला अशी विशेषणे लावणे म्हणजे लोकशाही नष्ट करण्यासारखे आहे. भारतीय राज्यघटनेतील तत्वांची, मुल्यांची अंमलबजावणी जाणीवपूर्वक व जबाबदारीने होणे गरजेचे आहे.'

गेल्या साठ-पासष्ठ वर्षात राष्ट्र बांधणीचे आणि राष्ट्र उभारणीचे कार्य करण्यात डॉ. आंबेडकरांची भूमिका अतुलनीय आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. डॉ. भोळे भा. ल. - आधुनिक भारतातील विचार, पिंपळापूरे पब्लीकेशन, नागपूर.
२. डॉ. भोळे भा. ल. - भारतीय शासन आणि राजकारण - पिंपळापूरे पब्लीकेशन, नागपूर.
३. डॉ. मोहन दिवाण, प्रा. जयंत देवधर, प्रा.विवेक दिवाण - भारतातील राज्यांचे राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर.
४. ज. वि. पवार - धर्मनिरपेक्षता, संविधान आणि डॉ. आंबेडकर - दि.६ डिसेंबर, २०१५ - महाराष्ट्र टाईम्स मधील लेख.
५. जटावा डी. आर. - दि पोलिटीकल फिलॉसॉफी ऑफ आंबेडकर, फोनिक्स प्रकाशन, आग्रा.
६. डॉ. आंबेडकर - रायटींग आणि स्पीचेस - महाराष्ट्र शासन प्रकाशन.

Dnyansadhana Shikshan Prasarak Mandal Niwade, Sanchalit

M.H.Shinde Mahavidyalaya ,Tisangi

Tal. Gaganbavada, Dist. Kolhapur (M.S.)

One Day
Interdisciplinary National Seminar
17th Feb.2018

On
Nation Builders

A Special Issue of

Aayushi International Interdisciplinary Research Journal

Special Issue - **XXI**

ISSN –2349-638x **UGC Approved No. 64259**

Impact Factor 4.574

Editor

PRIN. DR . N. K. SHINDE

DR . VINOD KAMBLE

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Organizing Committee

Prin. (Dr.) N. K. Shinde
Chairman

Shri. P. G. Kumbhar
Convener

Shri. J. S. Jadhav
Organizing Secretary

Co-ordinators

Dr. N. K.Mole
Smt. V. U. Jadhav
Dr. S. A. More
Shri.B. D. Patil
Dr. D. B. Ingawale
Dr. B. S. Padval

Organizing Committee Members

SMT. M. B. SAWANT
DR. P. K. POWAR
SHRI. A. B. MOHITE
SHRI. A. D. PHALKE
SHRI. M. P. SHINDE

One Day Interdisciplinary National Seminar 17 th Feb.2018
Special Issue On Nation Builders

Organised By	M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

Sr. No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
1.	प्रा. डॉ. दत्ता पाटील	राष्ट्रउभारणीत नवमानवतावादी विचार आणि सं. कायदेभंग नाटक	1 To 2
2.	डॉ. दीपककुमार वळवी	भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी स्त्री स्वातंत्र्य सेनानी : दशरीबेन	3 To 4
3.	प्रा.शिवाजी विठ्ठल सुतार	यशवंतराव चव्हाण. यांचे भाषाविषयक विचार	5 To 7
4.	प्रा. डॉ. नामदेव कृष्णा मोळे	महात्मा जोतीराव फुले यांच्या शेतीविषय विचारांचे महत्व	8 To 10
5.	श्री. एम. वाय. पोवार	ग्रामीण साहित्याची चळवळ आणि ग्रामीण साहित्य	11 To 12
6.	प्रा. महादेव ज.जाधव	मराठी कविता व नाटकाचे राष्ट्र उभारणीतील योगदान	13 To 14
7.	रेखा काशिनाथ पसाले	राष्ट्रबांधणीत समाजसुधारकांच्या साहित्याचे योगदान	15 To 17
8.	प्रा. श्रीमती नंदा श्रीपती पाटील	महात्मा फुले यांचा शैक्षणिक दृष्टिकोन	18 To 21
9.	श्री. अनिल रामचंद्र महाजन	भारतीय विकासात शिक्षणाचे योगदान	22 To 24
10.	प्रा.प्रेरणा एल.चव्हाण	'कृष्णाकाठ' मधील राष्ट्रउभारणी विषयक विचार	25 To 27
11.	प्रा. सौ.एस.एस. पाटील	कादंबरी वाङ्मयाचे राष्ट्रीय योगदान	27 To 29
12.	प्रा.सौ. ऋचा ऋतुराज जांभळे	यशवंतराव चव्हाण - राष्ट्रीय विचार	30 To 31
13.	श्री. संभाजी राजाराम उबारे	कविवर्य नारायण सुर्वेचे साहित्यातील योगदान (सुर्वेच्या कवितेतील स्त्री रुप)	32 To 33
14.	प्रा.आशालता नारायण खोत	कुसुमाग्रंजांच्या साहित्यातील सामाजिक जाणिवा	34 To 35
15.	कु. शैलजा शहाजी हिरवे	राजर्षि शाहू महाराजांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान	36 To 37
16.	प्रा.सुखदेव नारायण एकल	राष्ट्रबांधणीत समाजसुधारक महात्मा फुले यांचे योगदान	38 To 40
17.	प्रा. डी. एन. सोनकांबळे	पंतप्रधान : इंदिरा गांधी यांचे राष्ट्रउभारणीतील योगदान	41 To 43
18.	डॉ.वर्षा शिरीष फाटक	पुरोगामी विचारवंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज	44 To 46
19.	प्रा.सौ.अश्विनी हिरीकुडे	राष्ट्रबांधणीतील १९४२ च्या लढ्याचे योगदान	47 To 48
20.	प्रा.ए.ए.घोडके	राष्ट्रनिर्माणातील शिक्षकांचे योगदान	49 To 52
21.	प्रा. डॉ. मधुकर ग. धुतुरे	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान	53 To 57
22.	अमर रंगनाथ दीक्षित	ग्रंथालय विध्वंस (Library Vandalism) : ग्रंथालय विकासातील अदृष्य शत्रू	58 To 61
23.	प्रा.डॉ.आर.पी.आडाव श्री. सरदार निवृत्ती पाटील	राष्ट्र उभारणीमध्ये ग्रंथालयांचे स्थान	62 To 66
24.	प्रा. उदयकुमार. ना. लाड	सहकारी चळवळ आणि राजकारण : विकासात्मक वाटचाल	67 To 70
25.	प्रा. कमलाकर एन. राक्षसे	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मनिरपेक्ष राष्ट्रबांधणी	71 To 72
26.	प्रा. दयानंद इनामदार	डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व दलित नेतृत्वांची चळवळ (संदर्भ : गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बनसोडे)	73 To 75
27.	प्रा. मच्छिंद्रनाथ मारुती सूर्यवंशी	पंडीत नेहरू /राष्ट्रवाद, लोकशाही विचार	76 To 77
28.	प्रा. ए. बी. मोहिते	महाराजा सयाजीराव गायकवाड - सुशासित राज्यकारभाराचा आदर्श	78 To 81
29.	प्रा. भरत पाटील प्रा.डॉ.बी.एस.जाधव	पर्यावरण संवर्धन चळवळ व्यक्तीगत संस्थात्मक वा गटात्मक	82 To 83
30.	कु. श्रध्दा तुकाराम भालेकर	भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात राष्ट्रभक्ती गीतांचे असणारे योगदान	84 To 85

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

One Day Interdisciplinary National Seminar 17 th Feb.2018
Special Issue On Nation Builders

Organised By	M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

पंतप्रधान : इंदिरा गांधी यांचे राष्ट्रउभारणीतील योगदान

प्रा. डी. एन. सोनकांबळे,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
अर्थशास्त्र विभाग.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला. देशाच्या विकासाकरीता आवश्यक असलेले मूलभूत व पायाभूत उद्योगाचा समावेश सार्वजनिक क्षेत्रात करण्यात आला. तर कमी महत्वाचे असलेल्या उद्योगाचा समावेश खाजगी क्षेत्रात करण्यात आला. अशा स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचे नियोजन करून, नियोजनाचा मार्ग स्वीकारण्यात आला. पहिल्या योजनेत शेतीला प्राधान्य देण्यात आले. तर दुसऱ्या योजनेत उद्योगाला प्राधान्य देण्यात आले. या योजनेचा लाभ देशाच्या शाश्वत विकासाला भविष्यात होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. पण बदलत्या काळानुसार अर्थव्यवस्थेत होणारे बदल, नैसर्गिक आपत्ती, परकीयांचे हल्ले, वाढते परकीय कर्ज व इतर काही कारणाने देशाच्या आर्थिक विकासात अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्येतून बाहेर पडण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देश हितासाठी काही महत्वाचे निर्णय घेतलेले आहेत. त्यात मक्तेदारी नियंत्रण कायदा, व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण, परकीय चलन, विनिमय नियंत्रण कायदा व इतर सामाजिक कल्याणाच्या हेतूने घेतलेले निर्णय, गरिबी हटावचा नारा, निराधार अनुदान योजना, इंदिरा आवास योजना व स्वयंरोजगार योजना इत्यादी निर्णयाने देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात महत्वाचे कार्य पूर्ण केले.

उद्दिष्टे :

१. इंदिरा गांधी यांचा राजकीय प्रवास यांचा अभ्यास करणे.
२. इंदिरा गांधींनी देशाच्या विकासाकरीता केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

बालपण :

जन्म १९ नोव्हेंबर, १९१७ रोजी इलाहाबाद येथे झाला. त्यांचे पूर्ण नांव इंदिरा जवाहरलाल नेहरू असे होते, तर आईचे नांव कमला नेहरू. आजोबा मोतीलाल नेहरू. मोतीलाल नेहरू व्यवसायाने वकील होते तसेच भारतीय काँग्रेसचे तें आघाडीचे नेते होते. इंदिराजींचे शिक्षण ऑक्सफर्ड विद्यापीठात पूर्ण झाले. युरोपमध्ये वास्तव्यादरम्यान त्यांची ओळख फिरोज गांधी सोबत झाली. ही ओळख नंतर प्रेमात बदलून अखेर दोघांचा विवाह झाला.

राजकारणात प्रवेश :

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून १९५९ मध्ये इंदिरा गांधी निवडून आल्या. जवाहरलाल नेहरू यांच्या मृत्यूनंतर लाल बहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. यात त्यांनी माहिती व नभोवाणी मंत्र पद जबाबदारीने सांभाळले. जानेवारी, १९६६ मध्ये लाल बहादूर शास्त्री यांचे हृदय विकाराने निधन झाले. राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष श्री.कामराज यांच्या नेतृत्वाने इंदिरा गांधी यांनी १९ जानेवारी, १९६६ रोजी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या.

कार्ये :

पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे कार्य देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात उल्लेखनीय आहे. त्यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख आज समाजात कौतुकास्पद आहे. निराधार अनुदान योजना, इंदिरा आवास योजना, स्वयंरोजगार योजना ह्या योजना तसेच देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता इंदिरा गांधींनी घेतलेले निर्णय म्हणजे देशाच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका बजावत आहेत.

१.मक्तेदारी नियंत्रण कायदा, १९६९ : स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक कल्याणाचा संकल्प करण्यात आला. या संकल्पाचा हेतू साध्य करण्याकरीता अर्थव्यवस्थेतील आर्थिक संरचनेचा अभ्यास करण्यात आला असता अर्थव्यवस्थेत देशातील काही मोजक्याच भांडवलदारांचे वर्चस्व निर्माण होत आहे. अशा प्रकारचे वर्चस्व देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता अडथळा ठरू शकतो. आर्थिक व सामाजिक लोकशाही धोक्यात येऊ शकते. यावर वेळीच उपाय योजना करणे गरजेचे आहे. म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती के.सी. दासगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने अर्थव्यवस्थेतील आर्थिक केंद्रीकरणाचे प्रमाण आणि परिणाम यांचा अभ्यास करणे. तसेच त्यावर मक्तेदारी प्रतिबंधित व्यापारी पध्दतीची कारणे शोधून त्यावर उपाय सुचविणे हे काम समितीकडे सोपविले होते. अशा प्रकारच्या थोड्या उद्योगपतीकडे देशाच्या आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण झाल्याने अनेक क्षेत्रात

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

वर्चस्व गाजवितात आणि त्यांचे परिणाम इतर राजकीय, लोकशाही आणि सामजिक कल्याणाच्या मूल्यावर होतो. यावर वेळीच अंकुश ठेवणे देशहिताच्या दृष्टीने योग्य आहे. असे समजून पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मक्तेदारी विरोधी कायदा लोकसभेत संमत केला. (M.R.T.P.Act, 1969) १ जून, १९७० पासून लागू करण्यात आला. सदर कायद्यात १९७४, १९८०, १९८२, १९८४ आणि १९९१ मध्ये बदल करण्यात आला.

सदर कायद्यात – ''एक कोटीपेक्षा जास्त भांडवल गुंतवणूक असलेल्या उद्योग संस्थेचा विस्तार, एकत्रीकरण आणि विलिनीकरण आणि त्यांच्या संचालक नियुक्त्यांबाबत नियमन करण्यात आले. २० कोटीपेक्षा जास्त मालमत्ता होईल अशा उद्योगाशी संलग्न होऊ इच्छिणाऱ्या नवीन उद्योगाचे नियमन करण्यात आले. सार्वजनिक हिताला बाधक ठरतील अशा मक्तेदारी आणि प्रतिबंधित व्यापारी प्रथाचे नियंत्रण व त्यावर बंदी घालण्यात आली. तसेच वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण व विपणन नियंत्रित ठेवून त्यांच्या किंमती अवाजवी ठेवणे, यावर कायद्याने बंदी घालण्यात आली.''

२.व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण (१९६९) : अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाकरीता व्यापारी बँकांची भूमिका महत्वाची आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात काही जमीनदार श्रीमंत लोक आणि संस्थानिकांनी देशात बँका सुरू केल्या. आपल्याच भौगोलिक क्षेत्रातील उद्योग आणि व्यापाराला चालना देणे हाच उद्देश त्यांच्या समोर होता. स्वाभाविकपणे श्रीमंत व्यापारी आणि उद्योगपतींना कर्ज पुरवठा होत होता. सामान्य नागरिक, शेतकरी, भूमिहीन, अल्प उत्पन्न गटातील लोकांना कर्ज पुरवठा होत नव्हता. अशा लोकांनी त्यांच्या कर्जाची गरज, खाजगी सावकार, व्यापारी, जमीनदार याच्याकडे जावून भागवित असत. पण यांच्या कर्जाच्या अटी मात्र जाचक स्वरूपाच्या असत. अवाजवी व्याज दर असून अशा प्रकारची वित्त संरचना देशाच्या आर्थिक विकासाला अयोग्य आहे असे समजून स्वातंत्र्यानंतर व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्याचा संकल्प १९६० च्या सुमारास करण्यात आला होता. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अखिल भारतीय काँग्रेसच्या समितीच्या वार्षिक अधिवेशनात, ''Stray thoughts on Bank Nationalization'' असा शोधनिबंध सादर करण्यात आला. या शोधनिबंधात बँकांच्या राष्ट्रीयकरणाची ध्येय धोरणे जाहीर करण्यात आली. याचे सर्वांनी जाहीर स्वागत केले. त्यानंतर एक अध्यादेश काढून देशातील ज्या बँकांचे भाग भांडवल किमान ५० कोटी आहे, अशा १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण १९ जुलै, १९६९ रोजीच्या मध्यरात्री पासून करण्यात आले. पुढे दोन आठवड्यात संसदेत अशा प्रकारचा कायदा करून ("Banking Companies Bill") त्यास १ ऑगस्ट, १९६९ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली. तर पुढे १५ मार्च, १९८० रोजी अशाच प्रकारच्या ६ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. ज्यांचे भाग भांडवलाची मर्यादा २०० कोटी रूपये होती. अशा प्रकारे व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयकरणानंतर अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच देशातील वित्तीय संरचनेत सुसुत्रता निर्माण होऊन – एकूण बचत – गुंतवणूक – रोजगार विकासाला उत्तेजन मिळेल, लघु व मध्यम उद्योगांना चालना मिळेल, सामान्य लोक, शेतकरी, भूमिहीन, अल्प उत्पन्न असणारे लोक यांना कर्जाची सुविधा मिळेल, तर सरकारचे मौद्रिक धोरण नियंत्रित करण्यास मदत होईल. एकंदरीत अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. आर्थिक व सामाजिक लोकशाहीचा विकासाचा हेतू साध्य होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

३.परकीय चलन विनिमय नियंत्रण कायदा, १९७३ : स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता परकीय गुंतवणूकीचे स्वागत करण्यात आले असले तरीही त्यावर काही मर्यादा असणे आवश्यक आहे. कारण देशातील उद्योगांच्या विकासाचे महत्व लक्षात घेवून ही मर्यादा घालण्यात आली. परकीय चलन विनिमय व हस्तांतरण यांचे नियोजन करून देशाच्या विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. या कायद्याचे ध्येय, भारतीय नागरिकांकडून मिळविलेले परकीय चलन व त्यांच्याकडून देण्यात येणारे परकीय चलन यावर कार्यक्षमपणे नजर ठेवून आर्थिक विकासाला गती कशी मिळेल या दृष्टीने परकीय चलनाचा वापर करणे.

या कायद्यात भारताच्या रिझर्व्ह बँकेला दिलेले अधिकार :

१. भारतीयांकडून होणाऱ्या निर्यातीपासून मिळविलेले परीय चलनांचा हिशोब ठेवणे.
२. भारतीयांनी मिळविलेले परकीय चलन व त्यांनी देवू केलेले परकीय चलन या व्यवहारावर नियंत्रण ठेवणे.
३. व्यापारी बँका, प्रवासी संस्था व परकीय चलनाशी संबंधीत असणाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणे.
४. या संबंधित नियमन करून संबंधितांना कळविणे.

यासंबंधी करण्यात आलेले नियमन :

१. कोणत्याही परदेशी व्यक्तीस किंवा कंपनीस कोणत्याही प्रकारच्या व्यापाराशी किंवा औद्योगिक व्यवहाराशी संबंधी किंवा भारतीय उद्योगाचे भाग भांडवल खरेदीचा व्यवहार करायचे झाल्यास त्या परदेशी व्यक्तीस किंवा कंपनीस भारताच्या रिझर्व्ह बँकेची

अगोदर परवानगी घ्यावी लागेल.

२. सर्वसाधारणपणे परदेशीयांना किंवा भारताबाहेर कायमचे राहणाऱ्यांना एखाद्या भारतीय औद्योगिक कंपनीच्या भाग भांडवलापैकी ४०% पेक्षा जास्त भाग भांडवल खरेदी करता येणार नाही.

३. रिझर्व्ह बँकेकडून परवानगी मिळाल्यानंतरच परदेशी चलनाशी व्यवहार करता येईल.

४. रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय कोणत्या भारतीय नागरिकांना परदेशात परकीय चलन वापरता येणार नाही.

५. भारतातून केली जाणारी निर्यात किंवा आयतीद्वारा किंमतीत खोटी वाढ दाखवून परस्पर परकीय चलन मिळवून त्यांची मालकी परदेशात स्थापन करणे बेकायदेशीर ठरविले जाईल.

६. भारतात न राहणाऱ्या भारतीयांकडून भारतात कोणतीही मालमत्ता विकत घेणे किंवा विकणे व इतर व्यवहार रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय करता येणार नाही.

अशाप्रकारे वर नमूद करण्यात आलेल्या सर्व नियमांचे पालन करून परकीय गंगाजळीत वाढ करून देशाच्या अर्थव्यवस्थेला विकासाच्या हेतूने प्रोत्साहन देण्यात आले.

४.कल्याणकारी राज्य : तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या लोकांना आर्थिकदृष्ट्या समृध्द करण्यासाठी नवीन काही योजना चालू केल्या आहेत. त्यात निराधार अनुदान योजना, इंदिरा आवास योजना व स्वयंरोजगार रोजगार व इतर कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून देशातील निराधार, वृध्द व्यक्ती, अंध, अपंग, शारीरिक व मानसिक आजाराने रोगगृहस्थ व्यक्ती, विधवा व अत्याचारीत महिला, वेश्या व्यवसायातून मुक्त असलेल्या महिला, घटस्फोटीत महिला या सर्व व्यक्तिश: आर्थिक साह्य करून त्यांचे जीवन सुखी व आनंददायी करण्याच्या हेतूने १९८० मध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना चालू करण्यात आली. तर १९७९ मध्ये मागासवर्गीय समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना प्रशिक्षण देवून त्यांना स्वयंरोजगार करण्यास प्रोत्साहन देण्याची योजना राबविण्यात आली. तर त्याचबरोबर अशा मागासलेल्या जातीतील दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या बेघर कुटुंबांना इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकूल योजनांची सुरूवात करण्यात आली. तर पाचव्या पंचवार्षिक योजनेत 'गरीबी हटाओ' नारा देण्यात देवून, समाजातील दलित व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना विभिन्न योजनांच्या माध्यमातून आर्थिक साह्य करण्याचा निर्णय घेण्यात आला.

इतर कार्य :

त्यांच्या वर दर्शविलेल्या कार्याचा गौरव करावा तितका कमीच असून आणखीन ही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. १९८० च्या औद्योगिक धोरणात खाजगी क्षेत्रांना दिलेले झुकते माप, १९७१ मध्ये बांग्लादेशाच्या प्रश्नावरून भारत-पाकिस्तानात झालेल्या युध्दात भारताचा झालेला विजय हा त्यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेला गौरवच आहे. त्यांनी त्यांच्या पंतप्रधान पदाच्या काळात केलेली कार्ये देशाला जागतिक स्तरावर सन्मान मिळवून देणारे होते.

निष्कर्ष :

तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता केलेले कार्य हे अविस्मरणीय आहे. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून १९७२ मध्ये त्यांना भारतरत्न पुरस्कार देवून त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्याची लोकप्रियता जगातल्या बहुतांश देशांनी मान्य केली होती, तर अमेरिकेच्या मदर पुरस्काराने व इटलीच्या इसाबेल डीइस्टे पुरस्काराने गौरविण्यात आले होते. तर संयुक्त राष्ट्र मुख्यालयामध्ये देखील आपल्या उपस्थितीने छाप पाडली होती. जगातल्या बहुतांश देशांचा दौरा करून आपल्या देशाकरीता काय करता येईल याविषयी घेतलेले निर्णय हे विकासाच्या दिशेने वाटचाल करणारेच ठरले हे मात्र निश्चित झाले.

संदर्भ ग्रंथ :

१. भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. देसाई भालेराव
२. दृष्टीआडच्या इंदिरा गांधी - डॉ. के. पी. माथुर.
३. लोकसत्ता - दिनांक १० जुलै, २००६.
४. shodhganga.inflibnet.ac.in
५. Internet-www.samanyagyan.com.
६. Internet-www.india.gov.in.

TRUE COPY

PRINCIPAL
Vasantrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur M.S.

Dnyansadhana Shikshan Prasarak Mandal Niwade, Sanchalit

M.H.Shinde Mahavidyalaya ,Tisangi

Tal. Gaganbavada, Dist. Kolhapur (M.S.)

One Day
Interdisciplinary National Seminar
17th Feb.2018

On
Nation Builders

A Special Issue of

Aayushi International Interdisciplinary Research Journal

Special Issue - XXI

ISSN –2349-638x UGC Approved No. 64259

Impact Factor 4.574

Editor

PRIN. DR . N. K. SHINDE

DR . VINOD KAMBLE

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Organised By	M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

Sr. No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
1.	प्रा. डॉ. दत्ता पाटील	राष्ट्रउभारणीत नवमानवतावादी विचार आणि सं. कायदेभंग नाटक	1 To 2
2.	डॉ. दीपककुमार वळवी	भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी स्त्री स्वातंत्र्य सेनानी : दशरीबेन	3 To 4
3.	प्रा.शिवाजी विठ्ठल सुतार	यशवंतराव चव्हाण. यांचे भाषाविषयक विचार	5 To 7
4.	प्रा. डॉ. नामदेव कृष्णा मोळे	महात्मा जोतीराव फुले यांच्या शेतीविषय विचारांचे महत्व	8 To 10
5.	श्री. एम. वाय. पोवार	ग्रामीण साहित्याची चळवळ आणि ग्रामीण साहित्य	11 To 12
6.	प्रा. महादेव ज.जाधव	मराठी कविता व नाटकाचे राष्ट्र उभारणीतील योगदान	13 To 14
7.	रेखा काशिनाथ पसाले	राष्ट्रबांधणीत समाजसुधारकांच्या साहित्याचे योगदान	15 To 17
8.	प्रा. श्रीमती नंदा श्रीपती पाटील	महात्मा फुले यांचा शैक्षणिक दृष्टिकोन	18 To 21
9.	श्री. अनिल रामचंद्र महाजन	भारतीय विकासात शिक्षणाचे योगदान	22 To 24
10.	प्रा.प्रेरणा एल.चव्हाण	'कृष्णाकाठ' मधील राष्ट्रउभारणी विषयक विचार	25 To 27
11.	प्रा. सौ.एस.एस. पाटील	कादंबरी वाङ्मयाचे राष्ट्रीय योगदान	27 To 29
12.	प्रा.सौ. ऋचा ऋतुराज जांभळे	यशवंतराव चव्हाण - राष्ट्रीय विचार	30 To 31
13.	श्री. संभाजी राजाराम उबारे	कविवर्य नारायण सुर्वेंचे साहित्यातील योगदान (सुर्वेंच्या कवितेतील स्त्री रुप)	32 To 33
14.	प्रा.आशालता नारायण खोत	कुसुमाग्रंजांच्या साहित्यातील सामाजिक जाणिव	34 To 35
15.	कु. शैलजा शहाजी हिरवे	राजर्षि शाहू महाराजांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान	36 To 37
16.	प्रा.सुखदेव नारायण एकल	राष्ट्रबांधणीत समाजसुधारक महात्मा फुले यांचे योगदान	38 To 40
17.	प्रा. डी. एन. सोनकांबळे	पंतप्रधान : इंदिरा गांधी यांचे राष्ट्रउभारणीतील योगदान	41 To 43
18.	डॉ.वर्षा शिरीष फाटक	पुरोगामी विचारवंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज	44 To 46
19.	प्रा.सौ.अश्विनी हिरीकुडे	राष्ट्रबांधणीतील १९४२ च्या लढयाचे योगदान	47 To 48
20.	प्रा.ए.ए.घोडके	राष्ट्रनिर्माणातील शिक्षकांचे योगदान	49 To 52
21.	प्रा. डॉ. मधुकर ग. धुतुरे	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान	53 To 57
22.	अमर रंगनाथ दीक्षित	ग्रंथालय विध्वंस (Library Vandalism) : ग्रंथालय विकासातील अदृष्य शत्रू	58 To 61
23.	प्रा.डॉ.आर.पी.आडाव श्री. सरदार निवृत्ती पाटील	राष्ट्र उभारणीमध्ये ग्रंथालयांचे स्थान	62 To 66
24.	प्रा. उदयकुमार. ना. लाड	सहकारी चळवळ आणि राजकारण : विकासात्मक वाटचाल	67 To 70
25.	प्रा. कमलाकर एन. राक्षसे	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मनिरपेक्ष राष्ट्रबांधणी	71 To 72
26.	प्रा. दयानंद इनामदार	डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व दलित नेतृत्वांची चळवळ (संदर्भ : गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बनसोडे)	73 To 75
27.	प्रा. मच्छिंद्रनाथ मारुती सूर्यवंशी	पंडीत नेहरू /राष्ट्रवाद, लोकशाही विचार	76 To 77
28.	प्रा. ए. बी. मोहिते	महाराजा सयाजीराव गायकवाड - सुशासित राज्यकारभाराचा आदर्श	78 To 81
29.	प्रा. भरत पाटील प्रा.डॉ.बी.एस.जाधव	पर्यावरण संवर्धन चळवळ व्यक्तीगत संस्थात्मक वा गटात्मक	82 To 83
30.	कु. श्रध्दा तुकाराम भालेकर	भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात राष्ट्रभक्ती गीतांचे असणारे योगदान	84 To 85

PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)

Organised By	M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान

प्रा. डॉ. मधुकर ग. धुतुरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

प्रस्तावना :

भारतीया समोरील वर्तमानात जे जे मूलभूत प्रश्न आहेत ते सर्व प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पूर्वीच मांडले हे प्रश्न सर्व समाजाचे समाजाच्या उत्थापनाचे आहेत. प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द आपल्या कार्यातून लेखनातून विद्रोह केला. सर्व जाती-जमाती धर्म यातील शोषित पीडितांचे शोषणमुक्त जीवन उभारण्यासाठी त्यांचा हा लढा होता. कोणत्या एका जातीचे एका जमातीचे एका धर्माचे नेतृत्व त्यांना कधीच करायचे नव्हते ते ज्या शोषित, पीडित जाती-जमातीत जन्मले. त्या जाती-जमातीच्या माणसांच्या आत्मसन्मानासाठी ते लढले त्यांनी अनुभवलेल्या पीडा भविष्यात नको म्हणून त्यांनी प्रस्थापित व्यवस्थे विरुध्द युध्द पुकारले. या युध्दात जे जे सोबत होते त्यांना सोबत घेतले जे सोबत नव्हते पण पीडित, शोषित होते त्यांच्या प्रश्नासाठीही हे युध्द होते हे आज समजून घेण्याची गरज आहे ही गरज का व कशासाठी १७ नोव्हेंबर, १९५१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक येथील जाहीर सभेत केलेल्या भाषणात यांची उत्तरे सापडतात. ''ह्या देशात जनतेची सर्वांगीण हित करणारा असा कोणताही पक्ष पुढे आला. त्याने कोणतेही नाव धार केले तरी त्याला ज्योतिबाचे धोरण त्यांचे तत्वज्ञान आणि त्यांचे कार्यक्रम घेऊन पुढे जावे लागेल तोच एक खराखुरा लोकशाहीचा मार्ग आहे. समाजातील ८०% लोकास विद्याप्राप्ती करुन देणे आणि त्यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय गुलामगिरीत जखडून ठेवणे हे दिवस असता स्वराज्य - स्वराज्य म्हणून ओरडण्यात काय फायदा. स्वराज्याचा फायदा सर्वांना मिळाला पाहिजे. मागासलेल्या वर्गाचा सर्वांगीण उन्नतीचा कार्यक्रम घेऊन पुढे आल्याशिवाय कोणताही पक्ष आज जनतेचे नेतृत्व देऊ शकत नव्हता हे सुर्यप्रकाशा एवढे स्पष्ट आहे. या देशाची विषय पत्रिका होऊ शकते तेच समजून घेण्याची गरज आहे. सर्व समाजासाठी काम करावे नाहीतर हे ते जातीवादी आहेत असे मला म्हणता येईल हे विसत्रत वर्तन आज दिसत आहे. परिणामी या देशातील तमाम शोषित पिडित लोकांसाठी काम करणारे सारे महापुरुष आम्ही जातीमध्ये अडकून टाकतो आहोत.''

'का बांधून घेतो आहे प्रत्येकजन स्वत:ला
जातीच्या दावणीला ?
सुरक्षिततेच्या सांस्कृतिक अफवेवर विश्वास ठेवून.....
जयभवानी - जयशिवाजी
अल्लाहो अकबर
जयभीम बोलो'

या आरोळ्यानी विभागून टाकलंय माझ्या सुंदर मानसाना जातीतली माणसं
मायभूमीपेक्षा मोठी आणि प्यारी वाटतील तोपर्यंत खुशाल समजा माणुसकीची लढाई आम्ही हरलो आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जातीच्या, धर्माच्या, राज्याच्या सीमा नव्हत्या तर ते या देशाच्या सर्व प्रश्नांशी, सर्व चळवळीशी, सर्व आंदोलनाशी, सर्व समाजाशी एकरुप झालेले महान नेते होते. आपल्या देशाचा एकूण इतिहास आणि डॉ. आंबेडकरांचा जीवनपट त्यांच्या समकालीन झालेलया चळवळी आणि त्यांनी केलेल्या चळवळी यांचा एक अनुबंध आपल्या लक्षात येतो. या देशातील अनेक सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक समस्यांचा गुंता सोडविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान फारच महत्वाचे आहे. आजही त्यांचे कार्य, तत्वज्ञान आणि कार्यक्रम सुंदर समाजनिर्मितीसाठी आवश्यक आहेत.
प्रस्तुत शोध निबंध संशोधन पध्दती पैकी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे :

१)भारतीय स्त्री विषयी विचार :- स्त्री स्वातंत्र्याचा आणि समानतेचा पुरस्कारही त्यातून स्पष्ट होतो. स्त्रियांना सर्व हक्क मिळावेत आणि त्यासाठी स्त्रियांना आत्मभान यावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सतत सर्घंषात्मक भुमिका घेतात. स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल. त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मोजत असतो असे सांगून डॉ. बाबासाहेब म्हणतात स्वच्छ राहण्यास शिका, सर्व दुर्गुणापासून मुक्त रहा, तुमच्या मुलांना शिक्षण द्या, हळूहळू त्यांच्या मनात महत्वकांक्षा जागृत करा. ते थोर पुरुष होणार

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal Panhala, Dist. Kolhapur

Organised By	M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

आहेत, असे त्याच्या मनात बिंबवा, त्यांच्यातील हीनगंड नाहीसा करा, लग्न करण्याची घाई करु नका, लग्न म्हणजे जबाबदार, लग्नामुळे निर्माण होणारी आर्थिक जबाबदारी पार पाडण्या इतपत आर्थिकदृष्ट्या समर्थ झाल्याशिवाय त्याच्यावर लग्न लादू नका जे लग्न करतील त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की अती जास्तमुळे हे दृष्टहुल्या आहे. आपल्या लहानपणी आपणाला मिळू शकलो. त्यापेक्षा अधिक चांगली परिस्थिती आपल्या प्रत्येक मुलांला देणे हे आईवडीलांचे कर्तव्य आहे. प्रत्येक मुलीने पतीची मैत्रिण म्हणून त्यांच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे. मात्र गुलामासारखे वागण्यास खंबीरपणे तिने नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा.

कोणत्याही देशाच्या विकासाचे समतोल विकासाचे मापदंड स्त्रियांच्या विकासावर अवलंबून असतात म्हणूनच या देशातील कुमारी, विवाहीता, परित्यक्ता, विधवा, घटस्फोटीत स्त्रियांच्या संरक्षणाचा हक्क आणि विकासाचा हेतू ठेवून हिंदू कोड बिलाचा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धरला होता. या बिलाचे महत्व फार मोठे आहे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी मान्य केले, मात्र बिलाला पाठिंबा देत त्यांचे कायद्यात रुपांतर होऊ शकले नाही हे वास्तव आहे.

हिंदू कोड बिलातील तरतुदी खालीलप्रमाणे :

१) वैवाहिक हक्काची भरपाई म्हणून पतीच्या संपतीमध्ये पत्नीचा हक्क मिळालेल्या स्त्रीधनावर पत्नीचा हक्क, विधवा झाल्यावर संपतीचा वारसा हक्क.

२) स्त्रीला पतीपासून घटस्फोट मागण्याचा हक्क, नवऱ्याने घटस्फो दिल्यास पोटगीची तरतूद.

३) स्त्रीला दत्तक निवडण्याचा, घेण्याचा हक्क पारंपारिक दत्तक विधान पध्दती रद्द आणि कायदेशीर तरतुदीनुसार दत्तक घेण्याची पध्दत निश्चित आपला मुलगा दत्तक देण्याचा मातेस अधिकार देण्याची तरतूद.

४) अल्पवयीन मुलाचे पालकत्व वडील ह्यात नसल्यास आईकडे जाण्याची तरतूद निसर्गदत्त पालकाने धर्मल्याग केल्यास अगर संसार त्याग केल्यास त्यांचे पालकत्व निसर्गदत्त पालकाकडेच राहील ही तरतूद.

५) दत्तकास संपतीचा अर्धाहिस्सा आणि आईस संपत्तीचा अर्धा हिस्सा मिळेल संपतीचा अर्धा हिस्सा तिच्याच ताब्यात राहून ती उपभोग होईल. दत्तक आपल्या मातेस संपतीच्या हक्कापासून वंचित करणार नाही.

६) एकपत्नी त्याची तरतूद स्त्री जीवनाला स्थैर्य.

७) वडिलांच्या मिळकतीत मुलीला हिस्सा.

८) स्त्रीला स्वत:चा वारस ठरविण्याचा अधिकार.

९) ज्यांना पारंपारिक पध्दतीचे विवाह करावयाचा आहे त्यांना मोकळीक मात्र वर्ण, जात, पोटजात या बाहेरील पध्दती विवाह केला तर तो कायदेशीर विवाह म्हणून मान्यता देणारी तरतूद.

लहान राज्य व डॉ. आंबेडकर :- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२८ ते १९५६ या कालावधीत भारताच्या राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडतेसाठी विविध क्रांतीकारी बदल सुचविले होते. ब्रिटीश कालावधीत बाबासाहेबांनी १९२८ मध्ये सायमन कमिशन पुढे साक्ष देताना भाषावार प्रांताची भुमिका फेटाळून लावली होती त्याचबरोबर त्यांनी भिती व्यक्त केली ती म्हणजे भाषावार प्रांतामुळे स्थानिक राष्ट्रवाद प्रांतीय किंवा विभागीयवाद व स्थानिक लोकामध्ये स्वत:चे जे अस्थितत्व आहे ते जोपासण्यासाठी चढाओढ लागेल व त्यामुळे भारताच्या स्थैर्याला आणि विकासाला खिळ बसेल. बाबासाहेबांनी भाषावार प्रांत रचनेला दोन कारणासी विरोध केला.

१) विभागीय जागरुकता निर्माण होऊन राष्ट्राच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो.

२) एकाच जातीच्या लोकांकडे राज्याची सत्ता किंवा सरकारे हस्तांतरीत होऊ शकतात.असे बाबासाहेबांनी राष्ट्रहिताच्या दृष्टिकोणाचा विचार करुन विचार मांडले होते. तेच आपल्याला पुरक आहेत कारण आजही भारताच्या अंतर्गत सुरक्षेचा जेव्हा आपण विचार करतो तेंव्हा प्रांतिय व भाषावादामुळे किंवा राज्या-राज्यामधील सिमाप्रश्न, पाणीवाटप व केंद्र सरकाराद्वारा दिली जाणारी आर्थिक मदत यावर विविध विरोधा भाषा भुमिका आपल्याला आढळते. आजही कांही राज्यांची सरकारे एका विशिष्ट जातीच्या गटाच्या लोकाकडेच आहे.

बाबासाहेबांनी भाषावार प्रांतीय रचनेबाबत अशी मागणी केली की भारता सामाजिक आणि राजकीय समानता निर्माण करण्यासाठी Checks & Balances ची गरज आहे. त्यांना अशी भिती वाटत होती की, नविन भाषावार प्रांतीय रचनेत प्रगत जातीचे प्राबल्य जास्त असणार आहे. व त्याच्याकडेच राज्याच्या सत्तेचे केंद्रीकरण होणार आहे त्यांनी मोठ्या राज्याची कल्पना मोडीत काढली व लहान राज्य निर्माण करण्यासाठी सूचना दिल्या त्यामुळे अल्पसंख्याक दलित आदिवासी व उच्च वर्गीय यांचे समान विभाजन होऊन राज्ये निर्माण झाले पाहिजे, ही त्यामागील त्यांची भुमिका होती बाबासाहेबांच्या प्रत्येक दिवसात भारताच्या राष्ट्राची सुरक्षितता आणि

Organised By	M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

अखंडता ही कशी टिकवता येईल यासाठी त्यांचा प्रयत्न होता आजही दक्षिण भारत हा शैक्षणिक व सांस्कृतिक बाबतीत उत्तर भारतापेक्षा सरस आहे. त्यांचे महत्वाचे कारण शिक्षण, प्रशासकीय व राजकीयदृष्ट्या येथील राज्यांनी केलेले कार्य हे विसरता येणार नाही आजही मराठी भाषेच्या आणि प्रातांच्या अस्मितेचे राजकारण काही मंडळी करीत आहेत. परंतु जोपर्यंत सर्व भारतीय एक आहेत असा सर्व समावेशक दृष्टिकोन ठेवत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारत एक संघ होणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार भारताच्या धोरण निश्चितीत उपयुक्त :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे त्यांनी आपल्या देशातील तत्कालीन आर्थिक प्रश्न संशोधनाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचविले, त्यांची चर्चा केली या शिवाय शिक्षणपूर्ण झाल्यानंतर त्यांनी वेळोवेळी केलेल्या लिखाणातून आणि शोध निबंधातून महत्वाचे आर्थिक विचार मांडले आहेत त्यामुळेच डॉ. आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ तर होतेच त्याच बरोबर ते अंतरराष्ट्रीय किर्तीचे आर्थिक धोरणकर्तेही होते याची जाणीव असणे आजच्या परिस्थितीला गरज वाटते.

डॉ. आंबेडकरांनी अनेक आर्थिक विचार स्वातंत्रपूर्व काळात आणि स्वातंत्रोतर काळातही मांडले आहेत. भारताची सध्या आर्थिक स्थिती आणि समस्या विचारात घेता आजही डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार देशाच्या आर्थिक धोरण निश्चितीत उपयुक्त आहेत. त्यामुळेच डॉ. आंबेडकर हे आर्थिक धोरणकर्ते अर्थशास्त्रज्ञ आहेत असे म्हणणे वावगे ठरु नये. डॉ. आंबेडकरांनी दारिद्र व आर्थिक विषमता या प्रश्नांच्या सोडवणुकीस अधिक महत्व अग्रक्रम द्यावा असे सांगितले होते. आज आपण दारिद्रयाची अत्यंत संकुचित आणि अन्य व्यवहारिक संकल्पना स्विकारली आहे. तर विषमतेचा प्रश्न १९९१ नंतर गंभीर होत असतांना त्यांचे नियंत्रण करण्यासाठीचे उपाय आपण राबवत नाहीत. आपल्या देशातील भाववाढीचा प्रश्न नियंत्रीत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चलन विषयक विचार प्रामुख्याने स्थिर आणि मर्यादित अपरिर्वतनीय चलन पध्दत उपयुक्त आहे. आपण करण्याचे व्यवस्थेचा वापर विषमता नियंत्रणासाठी करु शकतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार :

डॉ. आंबेडकरांचे कृषिविषयक विचार देशाला आणि शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत. शेतकऱ्याच्या समस्यावरील उपाय "Small Holdings in India and Their Remedies and stats and minorities" यामधून व्यक्त केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मुख्य भुमिका अशी होती की, स्वांतत्र भारतात ग्रामजीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करेल त्यांचा पाया सामाजिक न्याय हाच असला पाहिजे. औद्योगिकरण व शेती यांचे अतूट नाते असले पाहिजेत. शेती मालावर प्रक्रिया करणारे उद्योग शेतकऱ्यांच्या शेतमंजूराच्या लाभासाठी निर्माण करणारे आवश्यक आहे. विकास कार्यक्रमातून मिळणाऱ्या लाभाची न्याय तत्वावर समान वाटणी आणि आजवर जे वंचित म्हणून जगत आहेत. अग्रहक्क देण्याची गरज त्यानी वारंवार प्रतिपादन केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटीश सरकारला परखडपणे बजावले की, भारतावरील कर्जाचा बोजा काही अंशतरी शिरावर घ्यावा आपल्या विश्लेषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात १९५८ कायद्यानुसार लाभ होईल. तो इंग्लडच्या खिशात आणि कर्जाचा डोंगर भारताच्या डोक्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे विश्लेषण त्यांच्या प्रचंड राष्ट्रीय बाण्याचे प्रतिक आहे.

अ) दामोदर नदी प्रकल्प :-

१९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या दामोदर नदीपूर चौकशी कमीटी समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत सरकारचे मंजूर प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण शेतकऱ्याला हितावह ठरते. दामोदर नदिच्या पुरामुळे हाजारो लोकांचे प्राणजात आणि लाखोरुपयांचे नुकसान होते असे दामोदर नदीला पुर येऊ नये त्या पाण्याचा उपयोग शेती, विद्युत आणि वाहतूकीसाठी करता यावा म्हणून दामोदर नदी प्रकल्पला मान्यता मिळवण्याची शिफारस केली.

ब) नद्याजोड चे प्रवर्तक :-

पाण्यामुळे आज महाराष्ट्रात दुष्काळाची परिस्थिती आहे. पाण्याच्या बाबतीत डॉ. बाबासहेब आंबेडकर गंभीर होते याचे विस्तृत वर्णन एल.टी. लवात्रे यांनी केले आहे. 'बिहारमध्ये १९४३ रोजी भिषण पुर आला सत्तर गावे नष्ट झाली ११ हजार घरे वाहून गेली. पुराने बंगाल आणि भारताचा संपर्क तुटला पुढे बंगालमध्ये दुष्काळाने २५ हजार लोक मरण पावले. तेव्हा या नदीवर धरणे बांधण्याची कल्पना डॉ. आंबेडकरांनी ती ब्रिटीशांच्या गळी उतरवली तिचे काम सुरु आहे. बिहार, ओरिया आणि बंगालला जीवदान दिले. व्हॉईसरॉयच्या मंत्री मंडळात असतांना त्यांनी नद्याजोड प्रकल्पांची कल्पना मांडली. जलवाहतूक, विजनिर्मिती, पॉवर ग्रीड या कल्पनाही त्यांनीच मांडल्या.'

Organised By	M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

क) खोत पध्दत कायदाकरुन नष्ट केली.:-

१७ सप्टेंबर, १९३७ रोजी बाबासाहेबांनी खोत पध्दती नष्ट करण्या संबंधीचे विधेयक मांडले. खोत हा गावचा मालक आहे त्यास ते गांव गहान टाकता येते. विकता येते. खोत कुलाची धारेकडील कुळे बनविता येतात. सरकारला खोताने कबुली दिली म्हणजे सरकारला ती नाकारता येत नाही. भात जमिनीतून होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धाभाग आणि वरकस जमिनीतील पिकाचा एक तृतियांश भाग खोताने कुळाकडून वसुल करावा अशी पध्दत होती. ओसाड तसेच जंगलानी वेढलेल्या पडित बुडित जमिनी अपार श्रमकरुन आणि भांडवल खर्च करुन लागवडीस आणल्या आणि अशा प्रकारे कुळाला त्रास देऊन गावच्या गावे बसविली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खोत पध्दती नष्ट करण्या संबंधीचे विधेयक आणून जमिनदाराकडून होणारी शेतकरी कुळाची पिळवणूक कमी करण्याचा प्रयत्न केला आणि खोत ही प्रवृत्ती शेतकऱ्यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळाचे संरक्षण व्हावे अशा स्वरुपाचे कायदे केलेत. राष्ट्रीय स्तरावर सर्वांच्या फायद्याचे काम करुन डॉ. आंबेडकरांना राष्ट्रीय एकात्मतेत भर घातली. शेतकऱ्या विषयी डॉ. बाबासाहेबांना केवढी कनवा होती हे ह्या वरुन दिसून येते.

डॉ. आंबेडकर आणि महाराष्ट्र :-

संयुक्त महाराष्ट्रराज्य समितीसाठी महाराष्ट्रातील माणसांनी अत्यंत संघटितपणे चिवट असा लढा दिला आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सर्वापेक्षा आगदी भिन्न आणि वेगळी अशी भुमिका बजावली. कॉग्रेसच्या मूळ धोरणानुसार स्वातंत्र्यपूर्व काळात भाषावार प्रात निर्मितीचे वचन देण्यात आले होते. न्या. दार यांच्या अध्यक्षतेखाली १९४८ साली भाषावार प्रांत रचनेच्या संदर्भात एक आयोग नेमण्यात आला या आयोगामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'महाराष्ट्र ॲज ए लिंग्विस्टक प्रॉव्हिन्स' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि तुलनात्मक आकडेवारीसह निवेदन सादर के. यामध्ये मुंबई महाराष्ट्राची आहे या संबंधी अत्यंत जोरदार समर्थन केले. 'भाषावार प्रांत रचनेची मागणी मान्य केल्यास मुंबई शहर महाराष्ट्राचा अविभाज्यभाग असल्यामुळे ते महाराष्ट्रापासून अलग करु नये' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट नमूद केले.

मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे ते निषेपार्ह आहे. मुंबई महाराष्ट्राचा अविभाज्य भाग असून भौगोलिक ऐतिहासिक व संस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्रापासून मुंबई विलग करण्याचे कोणतेही षडयंत्र खपवून घेतले जाणार नाही आणि अशी बाब न्यायाला धरुन होणार नाही. मुंबईस संयुक्त महाराष्ट्राची मागणी आंदोलन पूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वरील विषयात लेखी स्वरुपात मांडले आहेत.

लोकसंख्या विषय विचार – डॉ. बाबासाहेब आंबेडकर :- लोकसंख्या वाढत जाईल ती समस्या बनेल हे बाबासाहेबांनी खूप आधी जाणून दिले होते ते म्हणतात. 'लोकसंख्या सुख दु:खाचा ज्या आर्थिक परिस्थितीशी संबंध असतो. त्यात सुधारणा घडवून आणण्या सोबतच जन्माचे प्रमाण कमी करण्याच्या उपायाचा अवलंब करुन वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्याची आपण काळजी घेतली नाही तर लोकांच्या जीवन मानात भरीव आणि कायमस्वरुपी वाढ शक्णार नाही. त्यामुळे लोकसंख्या वाजवीपेक्षा अधिक वाढणार नाही. ती नियंत्रणात राहील यासाठी प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. त्याशिवाय दारिद्र्याचे निर्मुलन करता येणार नाही. आणि ते जर झाले नाहीतर वाढत्या लोकसंख्येचा देशातील विविध वस्तुच्या उत्पादनाशी मेळ घालणे केवळ अशक्य होईल. लोकसंख्या वाढीमुळे वनांची तसेच कुरणांची जमीन दिवसेनदिवस कमी होत आहे. इतर देशाच्या तुलनेत आपल्या देशातील जमिनीचे प्रमाण अगोदित नगण्य आहे. त्यामुळे आपल्या देशात गुराढोरांची अवस्था दयनिय आहे. आज लोकांच्या निवासाची समस्या निर्माण झाली आहे. जोवर वाढत्या लोकसंख्येला आळा घालता येत नाही तोवर शासनाचे विकासाचे प्रश्न तसेच असतील.'

भारताचे संरक्षण व परराष्ट्रीय धोरणाबाबत :- गेल्या सात दशकापासून खऱ्या अर्थाने सर्वकक्ष चर्चा केली नाही. किंबहुना चर्चा होऊ दिली नाही. त्यामुळे आजही दहशतवाद, नक्षलवाद अंतर्गत सुरक्षचे प्रश्न निर्माण झाले होते.

जुलै १९४१ मध्ये ब्रिटीश सरकारने कार्यकारी मंडळाची पुनर्रचना व सदस्याची वाढ करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्यकारी मंडळात संरक्षण सल्लागार समितीत निवड केली.त्यामुळे बाबासाहेबांनी दुसऱ्या महायुध्दाच्यावेळी या समितीची जबाबदारी स्विकारुन भारताच्या संरक्षण सिध्द बाबत व लष्करी शिक्षणासोबतच व इतर महत्वाच्या बाबीमध्ये विचार राष्ट्रीय सुरक्षेच्या मंडळात आपले विचार मांडले.

३ सप्टेंबर १९३९ मध्ये नाझी जर्मनीने पोलंडवर कब्जा केल्यानंतर दुसऱ्या महायुध्दाला सुरुवात झाली त्या वेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताने आपल्या सुरक्षिततेसाठी व जागतिक सुरक्षतेतेबाबत नाझी जर्मनिचा विरोध करावा व त्यासाठी भारत

VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAYA, KALE
Arts, Commerce & Science
VPM

Dnyansadhana Shikshan Prasarak Mandal Niwade, Sanchalit

M.H.Shinde Mahavidyalaya ,Tisangi

Tal. Gaganbavada, Dist. Kolhapur (M.S.)

One Day
Interdisciplinary National Seminar
17th Feb.2018

On
Nation Builders

A Special Issue of

Aayushi International Interdisciplinary Research Journal

Special Issue - **XXI**

ISSN –2349-638x UGC Approved No. 64259

Impact Factor 4.574

Editor

PRIN. DR . N. K. SHINDE

DR . VINOD KAMBLE

TRUE COPY

PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur (M.S.)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Organised By	M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

61.	प्रा.सौ.स्मिता तानाजी पाटील	राष्ट्र बांधणीसाठी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य	179 To 181
62.	प्रा.नरेंद्र एन. सूर्यवंशी	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जल व विज निर्मिती धोरण – ऐतिहासिक राष्ट्र कार्य	182 To 183
63.	कु. वैशाली दशरथ चोरगे	विटा शहरातील रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक योगदान	184 To 188
64.	युवराज आनंदराव पाटील	माहिती साक्षरता आणि ग्रंथालय	189 To 190
65.	डॉ. शर्मिला अशोक साबळे सौ. लक्ष्मी दादासो भोसले	कर्मवीर भाऊराव पाटील यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य	191 To 198
66.	श्री.तुकाराम महादेव पाटील	महात्मा जोतिराव फुले – एक द्रष्टा शिक्षण तज्ञ	199 To 202
67.	प्रा. विक्रम सयाजी यमगेकर	ऑलिम्पिकवीर- खाशाबा जाधव - एक दृष्टीक्षेप	203 To 205
68.	प्रा. डॉ अभिजित वणिरे	भारतीय क्रीडा क्षेत्राचे जागतिक स्तरावरील स्थान व देशाच्या उभारणीतील क्रीडा क्षेत्राचे योगदान	206 To 208
69.	कु. स्वाती सरदार पाटील	लोकमान्य टिळक व त्यांची चतुःसुत्री	209 To 212
70.	प्रा.एस. बी. देसाई	व्यवस्थापणातील आधुनिक तंत्र : सकल गुणवता व्यवस्थापण	213 To 215
71.	प्रा. सौ. चंद्रलेखा चव्हाण	हिंदी काव्य में राष्ट्रीय चेतना	216 To 218
72.	प्रा. सौ. वसुंधरा उदयसिंह जाधव	राष्ट्र निर्माण में महात्मा गांधी के विचारों का योगदान	219 To 221
73.	प्रा.अजित दादू फाळके	राष्ट्र निर्माण में राष्ट्रसंत तुकडोजी का योगदान	222 To 223
74.	प्रा. श्रीमती एस.के.पाटील	प्रवासी महाकवि हरिशंकर आदेश का राष्ट्र निर्माण में योगदान	224 To 227
75.	प्रा.डॉ.सरोज पाटील	राष्ट्रनिर्माण में महात्मा गांधी की भूमिका	228 To 230
76.	प्रा. सौ. सुपर्णा संसुद्धी	राष्ट्रभक्त कवयित्री शुभद्राकुमारी चौहान	231 To 232
77.	प्रा. सौ. स्मिता वणिरे	देश के आजादी की लडाई में हिंदी साहित्यिकों का योगदान	233 To 235
78.	प्रा. शंकर दळवी	देश–विदेशों में हिंदी भाषा का योगदान	236 To 237
79.	प्रा.स्नेहलता गौतम कांबळे	आधुनिक भारत का जनक-राजाराममोहन राय	238 To 239
80.	प्रा. सुचिता संतोष भोसले	'रंगबसन्ती' नाटक में चित्रित भगतसिंह	240 To 240
81.	प्रा. नितीन विठ्ठल पाटील	राष्ट्र निर्माण में मैथिलीशरण गुप्त जी के साहित्य का योगदान (भारत–भारती काव्यकृति के संदर्भ में)	241 To 243
82.	Dr. Neeta Vijaykumar Jokhe	Anita Desai's : Cry, the Peacock : A Psychoanalytical Study	244 To 245
83.	Dr. N.P. Khavare	Cultural Ghetto In Jhumpa Lahiri's Mrs. Sen's	246 To 248
84.	Dr. Dadasaheb Ganpati. Ghodake	Exploration of Indianness in The God of Small Things of Arundhati Roy	249 To 250
85.	Mrs.Megha Nikam	Study on Chetan Bhagat's Novels and Its Impacts on Society	251 To 254

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

One Day Interdisciplinary National Seminar 17 th Feb.2018
Special Issue On Nation Builders

Organised By	M.H.Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur	ISSN 2349-638x Impact Factor 4.574

राष्ट्र निर्माण में मैथिलीशरण गुप्त जी के साहित्य का योगदान
(भारत-भारती काव्यकृति के संदर्भ में)

प्रा. नितीन विठ्ठल पाटील
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय,
कळे, तहसील-पन्हाळा, जिला-कोल्हापुर ।

मैथिलीशरण गुप्त जी हिंदी के सबसे चर्चित कवि रहे हैं । उनका सारा साहित्य राष्ट्र के लिए समर्पित साहित्य है । अपने समय की प्रत्येक विचारधारा, संस्कृति और विभिन्न चेतनाओं का समन्वय अपने साहित्य में करने का काम गुप्त जी ने किया है । समय की आवश्यकताओं को समझकर उन्होंने अपने साहित्य का सृजन किया है । कलम की ताकत से उन्होंने युवाओं में जोश भरने का काम किया है । उनकी काव्यकृति भारत-भारती देश की स्वतंत्रता संग्राम में काफी प्रभावशाली साबित हुई । इसीके चलते महात्मा गांधी जी ने उन्हें राष्ट्रकवि घोषित किया था । राष्ट्र निर्माण में मैथिलीशरण गुप्त जी का योगदान सराहनीय रहा है । इस योगदान को भारत देश सदियों तक भूल नहीं सकता है ।

राष्ट्र निर्माण में राष्ट्र से जुडे हर पहलू का ध्यान रखना अत्यंत आवश्यक है । राष्ट्र निर्माण का संबंध केवल राजनीति से नहीं है । देश के विकास एवं निर्माण के लिए राजनीति के साथ-साथ शिक्षा, उद्योग, कृषी इन क्षेत्रों पर भी ध्यान देना आवश्यक है । लेकिन राष्ट्र निर्माण के लिए यह सभी क्षेत्रों के साथ देश के लोगों में एकता की भावना, देशप्रेम एवं संगठन की शक्ति का निर्माण करना भी महत्त्वपूर्ण है । यह सभी कार्य केवल साहित्य के माध्यम से ही संभव है । हम देखते हैं कि भारत विभिन्न धर्मों एवं जातियों में बटा हुआ है । आज भी धर्म एवं जाति के नामपर लोगों को भडकाया जाता है । इसी कारण आज भी कहीं न कहीं हमें थोडासा संगठन शक्ति का अभाव दिखाई देता है और यह एक राष्ट्र के विकास के लिए घातक चीज है । इसी संबंध में राष्ट्र की संकल्पना स्पष्ट करते हुए ए. ई. जिमर्न ने लिखा है - ''राष्ट्र ऐसे लोगों का समूह है जो घनिष्ठता, अभिन्नता और प्रतिष्ठा की दृष्टि से संगठित है और एक मातृभूमि से संबंधित है ।''[1] मैथिलीशरण गुप्त जी ने अपने समय में साहित्य के माध्यम से राष्ट्रप्रेम, संगठन शक्ति एवं जनजीवन मे उत्साह बढाने का काम किया है ।

भारतीय स्वतंत्रता संग्राम में जनमानस को जागृत करने का काम गुप्त जी ने अपने साहित्य के माध्यम से किया । गुप्त जी ने अनुभव किया की भारत की स्थिति दिन-ब-दिन बिगडती जा रही है । अंग्रेज सरकार ने भारतीय लोगों पर बहुत सारे अन्याय, अत्याचार किए । आजादी की माँग से यहाँ की जनता दूर रहे इसलिए लोगों में खुद के प्रति हीनता की भावना को जन्म देने का काम अंग्रेजों ने किया । गुप्त जी ने इस बात को समझा कि राष्ट्रभावना को लोगों में जागृत कर भारत को पराधीनता की जंजीरों से मुक्त कराया जा सकता है । उन्होंने देश के प्रति समर्पित होने की प्रेरणा देने का काम किया । देश के अतीत का गौरव-गान सुनाकर उनसे शक्ति पाकर उठ खडे होने का संदेश दिया । वे लिखते हैं -

''हम कौन थे, क्या हो गए और क्या होगे अभी
आओ विचारें आज मिलकर ये समस्याएं सभी ।''[2]

राम गणेश गडकरी यांनी 'गर्वनिर्वाण' हे अपूर्ण नाटक लिहिले. साहित्याच्या विविध क्षेत्रांत आपला ठसा उमटविणारे एक थोर क्रांतीकारक विनायक दामोदर सावरकर यांनीही आपल्या तत्वांच्या प्रचारासाठी 'उःशाप','संन्यस्त खड्ग', 'उत्तरक्रिया' अशी नाटके लिहिली. नाटयगुणापेक्षा या नाटकातील विचारसणी,तत्वचिंतन, सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा यांना अधिक महत्व होते.

खाडिलकरांप्रमाणेच ज्यांनी राजकारणात रस घेऊन नाटय निर्मिती केली असे एक नाटककार म्हणजे वीर वामन जोशी हे होते. 'राक्षसी महत्वकांक्षा', 'रणदुंदुभी','धर्मसिंहासन','झोटींग पादशाही','शीलसंन्यास' यापैकी पहिली दोन विशेष गाजली.

वासुदेव रंगनाथ शिरवळकरांनी 'अस्मानी सुलतांनी अथवा पानपतचा मुकाबला' व वि.त्रिं. मोडक यांनी लिहिलेली 'रांणा भीमदेव' ही नाटके इतकी गाजली की, जोरदार भाषा, आवेशपूर्ण दणदणीत आवाज, स्वदेशाचा उत्कट अभिमान इत्यादी विशेषांमुळे अशा दणकेबाज नाटकांना राणा भीमदेवी नाटके म्हणण्याची चाल पडली.

भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांनी ही राजकीय समस्या आपल्या नाटकातून मांडल्या. अशा प्रकारे वरील सर्व नाटककारांनी आपल्या राजकीय नाटकातून समस्या मांडत आपल्या अभिव्यक्तीव्दारे राष्ट्र उभारणीचे महत्वपूर्ण कार्य केले हे मान्य करावे लागते.

निष्कर्ष

१) राष्ट्र उभारणीसाठी मराठी साहित्याचे योगदान महत्वपूर्ण आहे.
२) मराठी कवितेने राष्ट्र उभारणीकामी आपल्या काव्याच्या माध्यमातून महत्वाचे कार्य केलेले दिसते.
३) मराठी नाटकांनी राजकीय समस्यांचे निराकरण व राष्ट्रभक्ती निर्माण करण्यासाठी नाटक या वाड.मय प्रकाराचा अतिशय योग्य वापर केला आहे.

संदर्भ :

१) प्र.न. जोशी– मराठी वाड.मयाचा विवेचक इतिहास– अर्वाचिन काळ, स्नेहवर्धन प्रकाशन– पूणे सुधारित आवृत्ती –२००९.
२) ल.रा. नशिराबादकर– प्राचीन मराठी वाड.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन–कोल्हापूर,दहावी आवृत्ती–२०१०
३) प्राचार्य डॉ. वसंत बिरादार–आधुनिक मराठी वाड.मयाचा इतिहास–कैलास औरंगापूरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती–२०१४
४) (संपा.)प्राचार्य रा.,तु.भगत– संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मूलन, चैतन्य प्रकाशक, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती–२०१२

या त्यांच्या ओळी त्या काळात घरोघरी व युवकांच्या पथकांतून म्हटल्या जात असत. आनंदराव कृष्णाजी टेकाडे यांच्या आनंदगीता मधील अनेक कविता राष्ट्रभक्तीने भारावलेल्या आहेत. ना.के. बेहरे यांच्या 'मोत्यांची माळ' या कविता संग्राहातील राष्ट्रीयवृत्तीच्या अनेक कविता आहेत.

या बरोबर सेनापती बापट, य. ख. कुलकर्णी, त्र्यं.य.घाटपुरे, मो.वि.जोशी, रा.बा.नाबर, गो.रा. हिंगणेकर, गं.रा. साने अशा आणखीही कवींनी या काळात राष्ट्रीयवृत्तीची कविता लिहिली. पांडूरंग दत्तात्रेय खाडिलकर, रंगनाथ विष्णू खाडिलकर, अ.ब. कोल्हटकर, ब.ग. खापर्डे, रं.वि. खानविलकर, गं.वि. गोखले, दासगणू, म.ना. नानिवडेकर, सि.ब. मुचाटे, हैदर लहरी, वि.गो. साठे, श्री.य.सोनाळीकर, सोपानदेव, न. शे. पोहनेरकर अशा अनेक शाहिरानी जुन्या पोवाडयाची परंपरा टिकवून राष्ट्रीयवृत्तीची चांगली जोपासना केलेली दिसते. आपल्याा कवितेच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी वरील कवींनी मोलाचे कार्य केलेचे दिसते.

मराठी नाटकाचे राष्ट्र उभारणीसाठी योगदान –

मराठी नाटयसुष्टीनेही आपले महत्वपूर्ण योगदान राष्ट्र उभारणीकामी दिले आहे. किर्लोस्कर देवल यांच्याप्रमाणेच आपल्या थोर नाटयकृत्तीनी मराठी रंगभूमी गाजविली ती कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी हिंदुस्थानातील राजकीय चळवळीतील संघर्ष आपल्या नाटकातून मांडलेला दिसतो. अशा राष्ट्रीयवृत्तीच्या क्रियाशील लेखकाची एकूण पंधरा नाटके रंगभूमीस मिळाली. पौराणिक नाटकाची जुनीदृष्टी बदलून ती नव्या काळास अनुसरुन हेतूनिष्ठ बनविण्याचे कार्य खाडिलकरांनी केले. त्यांचे 'किचकवध' हे नाटक पौराणिक असले तरीही समकालीन कर्झनशाहिच्या संदर्भात फार मोठा प्रक्षोभ निर्माण करणारे ठरले. आपल्या नाटकातून राजकीय परिस्थितीवर भाष्य करुन देशभक्तीची प्रेरणा देण्यास खाडिलकर समर्थ ठरले. एक समर्थ नाटककार म्हणून खाडिलकरांच्या या नाटकाने कीर्ती प्राप्त करुन दिली. त्याचे हे नाटक अर्थातच त्यावेळच्या सरकारनेही जप्त ही केले.

राम गणेश गडकरी यांनी 'गर्वनिर्वाण' हे अपूर्ण नाटक लिहिले. साहित्याच्या विविध क्षेत्रांत आपला ठसा उमटविणारे एक थोर क्रांतीकारक विनायक दामोदर सावरकर यांनीही आपल्या तत्वांच्या प्रचारासाठी 'उःशाप','संन्यस्त खड्ग', 'उत्तरक्रिया' अशी नाटके लिहिली. नाटयगुणापेक्षा या नाटकातील विचारसणी,तत्वचिंतन, सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा यांना अधिक महत्व होते.

खाडिलकरांप्रमाणेच ज्यांनी राजकारणात रस घेऊन नाट्य निर्मिती केली असे एक नाटककार म्हणजे वीर वामन जोशी हे होते. 'राक्षसी महत्वकांक्षा', 'रणदुंदुभी','धर्मसिंहासन','झोटींग पादशाही','शीलसंन्यास' यापैकी पहिली दोन विशेष गाजली.

वासुदेव रंगनाथ शिरवळकरांनी 'अस्मानी सुलतांनी अथवा पानपतचा मुकाबला' व वि.त्रिं. मोडक यांनी लिहिलेली 'रांणा भीमदेव' ही नाटके इतकी गाजली की, जोरदार भाषा, आवेशपूर्ण दणदणीत आवाज, स्वदेशाचा उत्कट अभिमान इत्यादी विशेषांमुळे अशा दणकेबाज नाटकांना राणा भीमदेवी नाटके म्हणण्याची चाल पडली.

भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांनी ही राजकीय समस्या आपल्या नाटकातून मांडल्या. अशा प्रकारे वरील सर्व नाटककारांनी आपल्या राजकीय नाटकातून समस्या मांडत आपल्या अभिव्यक्तीव्दारे राष्ट्र उभारणीचे महत्वपूर्ण कार्य केले हे मान्य करावे लागते.

निष्कर्ष

१) राष्ट्र उभारणीसाठी मराठी साहित्याचे योगदान महत्वपूर्ण आहे.
२) मराठी कवितेने राष्ट्र उभारणीकामी आपल्या काव्याच्या माध्यमातून महत्वाचे कार्य केलेले दिसते.
३) मराठी नाटकांनी राजकीय समस्यांचे निराकरण व राष्ट्रभक्ती निर्माण करण्यासाठी नाटक या वाड.मय प्रकाराचा अतिशय योग्य वापर केला आहे.

संदर्भ :

१) प्र.न. जोशी- मराठी वाड.मयाचा विवेचक इतिहास- अर्वाचिन काळ, स्नेहवर्धन प्रकाशन- पूणे सुधारित आवृत्ती -२००९.
२) ल.रा. नशिराबादकर- प्राचीन मराठी वाड.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन-कोल्हापूर,दहावी आवृत्ती-२०१०
३) प्राचार्य डॉ. वसंत बिरादार-आधुनिक मराठी वाड.मयाचा इतिहास-कैलास औरंगापूरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती-२०१४
४) (संपा.)प्राचार्य रा.,तु.भगत- संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मूलन, चैतन्य प्रकाशक, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती-२०१२

VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAY, KALE
VPM
Arts, Commerce & Science

Aarhat Publication & Aarhat Journal's

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

Peer Reviewed Interdisciplinary Research Journal

ISSN- 2277-8721

Online and Print Journal

Impact Factor: 5.20 (EduIndex)

UGC Approved Journal No - 48833

10th March, 2018

Vol. VII Issue IV

Chief Editor

Ubale Amol Baban

Guest Editor

Prin. Dr. Purandhar Dhanpal Nare

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

18	शिक्षण आणि भारतीय स्त्रिया : वर्तमानकालीन स्थिती एक दृष्टीक्षेप	एस .एस .खेडेकर	77
19	हिंदी और मराठी नाटको में प्रतिबिंबित आंबेडकरवादी चेतना	डॉ भानुदास आगेडकर	81
20	नागार्जुन के काव्य मी जनवादी चेतना	डॉ भास्कर भवर	88
21	हिन्दी की स्त्री लेखिकाएँ : इतिहास की रेखाओं में	डॉ. साईनाथ विट्ठल चपले	91
22	कहानीकार कमलेश्वर : एक मूल्यांकन	डॉ .मोहन सावंत	98
23	नाटककार : जगदीशचंद्र माथुर	प्रा.रगड़े पी.आर	103
24	भूमंडलीकरण और हिंदी भाषा	प्रा .शिवाजी चवरे	109
25	हिंदी साहित्य में संत कबीर की प्रासंगिकता	विकास विधाते	112
26	हिंदी भाषा और साहित्य के संदर्भ में	संजय पाटिल	116
27	कोल्हापुर संस्थानातील छत्रपती शाहू काळातील मल्लविद्या व इतर खेळांचा अभ्यास (सन १९८४ -१९२२) - एक चौकिस्तक अभ्यास	प्रा.वाय.ए .आवळे	122
28	प्रबळ विरोधी पक्षाची गरज	प्रवीण पोवार	125
29	१६ ते २० वयोगटातील कब्बडी खेळाडूच्या शारीरिक क्षमतेच्या घटकांचा अभ्यास	विशाल पाटील	128
30	इचलकरंजी संस्थानच्या शैक्षणिक विकासामध्ये श्रीमंत ना.बा.घोरपडे यांचे योगदान	डॉ .सपकाळ रामेश्वर	131
31	सामाजिक वंचितता व समावेशान या संकल्पनांचा भारतीय संदर्भातील अभ्यास	डॉ .किशोर खिलारे	135
32	ग्रंथालयातील वाचन साहित्याचे नवे स्त्रोत :ई स्त्रोत (प्रकाशने)	नलवडे सुनंदा	139
33	भारतीय खेळाचा इतिहास व विकास	यमगेकर व्ही.एस	146
34	"फाईव्ह तिबेटीयन राईटची माहिती व फायदे "	रतन नाईकनवरे	150
35	वर्तमान शिक्षा प्रणाली : दशा और दिशा	डॉ.खंदारे चंदू	154
36	डॉ परशुराम शुक्ल के सूचनात्मक बाल साहित्य का मूल्यांकन	डॉ. एम.आर.मुडकर	156

भारतीय खेळाचा इतिहास व विकास

प्रा. यमगेकर व्ही.एस.

शारीरिक शिक्षण संचालक, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

आधुनिक युगात खेळाला जगात अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. जर आपण खेळाचा शोध घेतल्यास असे दिसून येईल की खेळाचा उगम हा मानव भूतलावर जन्माला आल्या पासून आहे. तसेच आपण शारीरिक शिक्षण व खेळ यांच्या व्याख्या अभ्यासल्यास यामध्ये हालचालींना, व्यायामांना, विविध क्रीडा प्रकारांना महत्व प्राप्त झाले आहे. कारण प्रत्यक्ष मैदानावर विविध शारीरिक किया व कौशल्याद्वारे दिले जाणारे शिक्षण म्हणजे शारीरिक शिक्षण व खेळ होय. म्हणून प्राचीन काळापासून जगात व त्याच बरोबर भारतात खेळाचा उगम झालेला दिसून येतो.

खेळाचा इतिहास :

खेळाच्या ऐतिहासिक अभ्यासाच्या दृष्टीने भारताचे प्राचीन व अर्वाचीन असे कालखंड पडतात. प्राचीन कालखंड हा इ.स. पू. ५००० ते इ.स. ७९९ पर्यंत मोजला जातो. यामध्ये वैदिक काळ हा इ.स.पू. ५००० ते इ.स.पू. २००० पर्यत मोजमापात येतो. तसेच, महाकाव्यकाळ इ.स.पू. २००० ते इ.स.पू. ६०० पर्यत येतो. तसेच बुध्दकाळाची गणना इ.स. पू. ६०० ते इ.स.पू. ३०० पर्यंत येते.

१) वैदिक काळ :

वैदिक काळात आर्यानी बल, शक्ती, युक्ती इत्यांदीसाठी व्यायामाचा वापर केला. त्याचे महत्वाचे मुलभूत शिक्षण म्हणजे बल संवर्धन होय. त्यातून त्यांनी लाठीकाठी, भाला चालविण्याचे प्रशिक्षण मिळविले. त्यांनी आयुर्वेदिक व्यायाम पध्दतीचा वापर केला. शरीर, मन, आत्मा उत्तम स्थितीत ठेवणे आणि त्याकरिता आहार विहार यासाठी रोजची दिनचर्या यावर विशेष महत्व दिले. वैदिक काळात, मुष्टियुध्द, घोडस्वारी, शिकार करणे, दोरीवर, तारेवर, मलखांबावर कौशल्य करणे, धावणे व पोहणे, धनुर्विद्या, योगविद्या या बाबी खेळाच्या माध्यमातून केल्या जात असत.

२) महाकाव्यकाळ :

वैदिक काळापासून महाकाव्यापर्यत भारतात खूपच सुधारणा झाल्याच्या दिसून येतात. तत्कालीन समाजातील रानटीपणा जाऊन सुसंस्कृतपणा येऊ लागला. हळूहळू खेडी व छोटी-छोटी राज्ये निर्माण होऊ लागली. या काळामध्ये समाजात चढाओढ, श्रेष्ठकनिष्ठ, सामंजस्य दिसून येत होते. लोक स्वरक्षणाबरोबरच कुटुंबाचेही रक्षण करू लागले. काही हुशार लोक लोकहिताची कल्याणकारी कामे करू लागले. या काळात विद्वानांचे, पंडिताचे व ऋषीमुनींचे मागदर्शन मोलाचे मानले जात असत आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसारच द्वंद्व, घोडस्वारी, धनुर्विद्या, योगविद्या या खेळाचा वापर होत होता. रामायण व महाभारत याच कालखंडात झालेले आहेत. उदाहरण द्यावयाचे झाल्यास रामायण व महाभारतात जे योध्दे होते ते आपल्या खेळात निपूण होते. उदा. धनुर्विद्या, मल्लविद्या, द्वद्व युध्द इत्यादीचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

३) बुध्दकालीन शारीरिक शिक्षण :

या काळात शरीर व आरोग्यासाठी नियमावली तयार करण्यात आली. व्यायाम, मालिश, विश्रांती इत्यादीसाठी प्रोत्साहन

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

भारतात खेळाला प्रोत्साहन मिळावे यासाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. उदा. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, शालेय क्रीडा स्पर्धा, विविध संघटनांमार्फत विविध खेळाच्या स्पर्धा घेतल्या जातात. खेळाडूंना सतत प्रोत्साहन मिळावे यासाठी विविध खेळाच्या स्तरानुसार स्पोर्टस् ॲथोरिटी ऑफ इंडियामार्फत क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येते.

खेळाच्या विकासासाठी शालेय स्तरापासून महाविद्यालय व विद्यापीठ स्तरापर्यंत विविध अभ्यासक्रम नेमण्यात आले. तसेच खेळाडूंचा सन्मान व्हावा, सतत प्रोत्साहन मिळावे यासाठी महाराष्ट्र व भारत सरकारने उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना नोकरी या क्षेत्रात ५ टक्के आरक्षण देण्याची तरतूद केली आहे. तसेच आज खेळाचा स्तर उंचावण्यासाठी उच्च दर्जाची प्रशिक्षण केंद्रे व संशोधन केंद्रे स्थापन करून वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या साहाय्याने खेळाडूंना मार्गदर्शन करून त्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी सरकारमार्फत प्रयत्न मोठया प्रमाणात करण्यात येत आहेत.

जुन्या ऑलम्पिक स्पर्धा :

इ.स.पू. ७७६ पासून या स्पर्धांना सुरूवात झाली. त्या जवळ जवळ इ.स. ३३० पर्यत चालल्या. या स्पर्धा दर चार वर्षानी होत असून पाच दिवस चालत. या स्पर्धामध्ये फक्त पुरूषांना प्रवेश होता म्हणजेच स्त्रीयांना प्रवेश नव्हता. खेळाडू उमेदवारांसाठी वयाची अट असून ३० वर्षापर्यत मर्यादा होती. यामध्ये खेळाडूंना १० महिने अगोदर स्पर्धेच्या ठिकाणी सरावासाठी उपस्थित राहावे लागत असे. पंचाची समितीही अस्तित्वात होती. धावणे, मुष्ठियुध्द, कुस्ती, तलवार बाजी, रथाच्या शर्यती, घोडस्वारी, धनुर्विद्या यांचा यामध्ये समावेश होता. या स्पर्धा ग्रीस देशातच होत असून झीजस देवीच्या मंदिरासमोर स्पर्धा भरविल्या जात.

नविन ऑलम्पिक स्पर्धा :

डॉ. सर कुबटीन हे या ऑलिम्पिकचे जनक असून इ.स. १८९६ (५ ते १५ एप्रिल) मध्ये यांनी पहिली आधुनिक ऑलिंम्पिक स्पर्धा अथेन्स येथे भरविली होती. त्यामध्ये १३ राष्ट्रांनी सहभाग घेतला होता. तेव्हापासून नवीन ऑलम्पिक सुध्दा दर ४ वर्षानी विविध देशात आयोजित केया जातात. ऑलिंम्पिकचे ध्येय गतिमान, उच्चतम व बलशाही हे ध्वजावर बोधचिन्ह देऊन ते साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. सत्य, शुचिता, चिकाटी, प्रामाणिकपणा, खिलाडूवृत्ती ही या ऑलम्पिकची मुलतत्वे आहेत. ऑलम्पिकचा ध्वज २ : ३ मिटर लांबी - रूंदी असलेला पांढऱ्या रंगाचा असून त्यावर ५ खंडाचे ५ रिंग असतात. या ध्वजाची सुरूवात १९९६ च्या बर्लिन ऑलम्पिक स्पर्धेपासून सुरू करण्यात आली. या स्पर्धा १५ दिवस चालतात. यामध्ये स्त्री व पुरूष सहभागी होऊ शकतात. तसेच वयाची मर्यादा नाही. जवळजवळ सर्वच क्रीडा प्रकाराचा यात समावेश आहे. विजेत्या खेळाडूंना मेडल दिले जातात.

भारताने १९२८ मध्ये पहिल्यांदा यामध्ये सहभाग घेतला. भारताने १० वेळा ऑलम्पिक स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले. या व्यतिरिक्त खाशाबा जाधव यांना कुस्ती या क्रीडा प्रकारात कास्यपदक मिळाले आहे. राजवर्धन राठोड रायफल शुटींग या क्रीडा प्रकारात रौप्य पदक विजेता असून नेमबाजीत अभिनव ब्रिंदाला सुवर्ण पदक मिळाले.

आशियाई क्रीडा स्पर्धा :

४ मार्च १९५१ मध्ये पहिली आशियाई क्रीडा स्पर्धा भारतात दिल्ली येथे सुरू करण्यात आली. दर ४ वर्षांनी या स्पर्धा आशिया खंडातील विविध देशांमध्ये घेतल्या जातात. या स्पर्धाचा ध्वज पांढऱ्या रंगाचा असून त्यावर सुर्याचे चित्र व एकमेकांत गुंतलेल्या निळया रंगाची वर्तुळे असतात. त्याच्या खाली Ever Onward...! (सतत पुढे जा...!) ही अक्षरे

VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAY, KALE
Prin

ISBN: 978-81-927211[illegible]-6

SANGRUL EDUCATION SOCIETY'S

S.B.KHADE MAHAVIDYALAYA, KOPARDE,

TAL KARVEER DIST. KOLHAPUR

PROCEEDING

A ONE DAY

NATIONAL SEMINAR

ON

GOODS AND SERVICE TAX IN INDIA

TUESDAY , 20TH February, 2018

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Ka
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Edited by

Prin. Dr. D.D.Kurlapkar **Dr. B.K.Katkar** **Prof. P.B.gaikwad**
Prof. B.M.Kumbhar **Prof. S.R.Suryavanshi** **Prof. D.B.Mane**

©Editor

Sangrul Shikshan Sanstha, Sangrul's
S.B. KHADE MAHAVIDYALAYA, KOPARDE
TAL. KARVEER, DIST. KOLHAPUR 416 204.

ISBN: 978-81-927211-6-6

No part of this publication may be reproduced or transmitted in any form by any means, electronic or mechanical, including photocopy, recording or any information storage and retrieval systems without permission in writing from the copyright owners.

DISCLAIMER

The authors are solely responsible for the contents of the papers compiled in this volume. The publishers or editors do not take any responsibility for the same in any manner. Errors, if any, are purely unintentional and readers are requested to communicate such errors to the editors or publishers to avoid discrepancies in future.

Publisher:

PraRup Publications
Kolhapur. (Maharashtra)
Pin – 416 008

Sr. No.	Title	Author	Page No.
18	'एक राष्ट्र, एक कर' वस्तु व सेवा कर	प्रा.तटाळे पद्माकर बळीराम	120
19	जी.एस.टी. — एक राष्ट्र — एक कर — एक बाजारपेठ	प्रा. ए. बी. कांबळे	123
20	जीएसटी संकल्पना आणि सध्याचे जीएसटीचे दर	प्रा. के.पी. वाघमारे	128
21	ग्राहक आणि जीएसटी	प्रा. प्रशांत देशमुख	133
22	**वस्तू आणि सेवा कर – अप्रत्यक्ष करातील एक आमूलाग्र बदल**	डॉ. इंगवले डी. बी. डॉ. पोवार पी. के	138
23	वस्तू व सेवा कराची संकल्पना व गुणदोष	प्रा. सोनकांबळे डी.एन.	144
24	वस्तू व सेवा कर आमूलाग्र बदल व ग्राहक	प्रा. कु. नूतन दत्तात्रय राऊत	149

■■■

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

ISBN: 978-81-927211-6-6
One Day National Seminar on: Goods and Service Tax in India (GST)

'एक राष्ट्र, एक कर' वस्तु व सेवा कर

प्रा.तटाळे पद्माकर बळीराम
अर्थशास्त्र वि□ग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

प्रस्तावना—

वस्तु व सेवा कर हा अप्रत्यक्ष कराचा एक प्रकार आहे. वस्तु व सेवा कराच्या संद□ात विचार करता अशा प्रकारचा कर जगात सर्व प्रथम एप्रिल १९५४ मध्ये फ्रान्समध्ये लावला गेला व त्यानंतर अनुक्रमे इंग्लंड, जपान, कॅनडा, ऑस्ट्रोलिया, मलेशिया या सारख्या देशात लावला गेला. □रतात १ एप्रिल २०१६ पासून हा कर लावण्याचे प्रस्तावित केले परंतू □रतात हा कर प्रत्यक्षात १ जुलै २०१७ पासून लावला गेला.

राज्यघटनेच्या कलम २६५ नुसार सरकारांना कर गोळा करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. कर म्हणजे ''शासनाने लोक कल्याणासाठी लोकांकडून सक्तीने गोळा केलेली रक्कम म्हणजे कर होय.''

देशात सरकार आपल्या जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवित असते व त्याच्या खर्चासाठी अनेक प्रकारचे कर लावून महसूल गोळा करत असते. □रतात यापैकी काही कर केंद्र सरकार काही राज्य सरकारे व काही कर स्थानिक स्वराज्य संस्था कर लावताना व त्यापासून कर महसूल गोळा करताना दिसून येतात.

□रतीय कर रचनेचा विचार करता □रतात दोन प्रकारचे कर लावले व गोळा केल्याचे दिसून येतात. त्यात एक प्रत्यक्ष कर, प्रत्यक्ष कर म्हणजे शासनाने ज्या व्यक्तीवर कर□र लावला आहे व त्याच व्यक्तीकडून कर आकारणी केली जात असेल तर अशा कराला प्रत्यक्ष कर असे म्हटले जाते. उदा. उत्पन्न कर

तर दुसरा कर म्हणजे अप्रत्यक्ष कर, अप्रत्यक्ष कर म्हणजे शासनाने ज्या व्यक्तीवर कर लावला आहे त्या व्यक्ती ऐवजी दुसऱ्याच व्यक्तीवर कर□र पडणे होय. उदा. विक्रीकर

वस्तु व सेवा कर हा देखील एक प्रकारे अप्रत्यक्ष कराचा प्रकार आहे. □रतात देखील अनेक कराला पर्याय म्हणून हा कर स्वीकारला गेला व त्याची वसूलीची प्रक्रिया चालू केली गेली.

संशोधन लेखाची उद्देश—

सदर संशोधन लेख लिहिताना खालील उद्देश समोर ठेवून लिहिला गेला आहे.

१) वस्तु व सेवा कर म्हणजे नेमके काय हे समजून घेणे.
२) वस्तु व सेवा कर दराची रचना पाहणे.
३) वस्तु व सेवा कराचे फायदे अभ्यासणे.
४) वस्तु व सेवा कराची सद्यस्थिती अभ्यासणे.

संशोधन पध्दती—

सदर संशोधन लेख लिहिण्यासाठी प्रामुख्याने दुय्यम आधार सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. यात वस्तु व सेवा करावरील विविध पुस्तके, वर्तमानपत्र व इंटरनेट वरील साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

□रतात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर सुधारणा करण्यासाठी विजय केळकर यांची समिती स्थापन केली होती. या समितीने २००३ मध्ये आपला अहवाल □रत सरकारला सोपावला होता. त्या अहवालामध्ये या समितीने वस्तु व सेवा कराच्या संद□ात विस्तृतपणे माहिती दिली व □रतात अशा प्रकारचा कर लावला जावा हे सुचवले परंतु □रतात वस्तु व सेवा कराची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यघटनेत बदल करणे आवश्यक असल्याने लोकस□ा व राज्यस□ा विधेयक पास होणे गरजेचे होते. व त्यासाठी १२२ व्या घटना दुरुस्तीने हे विधेयक प्रथमत: डिसेंबर २०१४ मध्ये लोकस□ा मांडले गेले व ते मे २०१५ मध्ये संमत झाले व राज्यसभेने या विधेयकास ऑगस्ट २५०१६ मध्ये मंजूरी दिली व प्रत्यक्षात १ जुलै २०१७ पासून वस्तु व सेवा कर □रतात लावला गेला.

□रतात वस्तु व सेवा कर हा तीन स्तरावरुन आकारला जात आहे. त्यात (१) केंद्रीय वस्तु व सेवा कर (CGST)(२) राज्य वस्तु व सेवा कर (SGST) (३) आंतरराज्य वस्तु व सेवा कर (IGST)

एखाद्या राज्यातील उत्पादक आपले उत्पादन दुसऱ्या राज्यात विकत असेल तर अशा राज्याला ''ळैज आकारता येत असल्याने त्याचाच ला□ होईल उत्पादक राज्याचा नाही म्हणून प्ळैज आंतरराज्य वस्तु व सेवा कर आकारुन अशा राज्याला त्याची करातील वाटा दिला जातो.

१ जुलै २०१७ पासून वस्तु व सेवा कर लावला गेल्यामुळे राज्य व्हॅट, केंद्रीय विक्रीकर, अधि□र, उपकर, सेवा कर, करमणुक कर, केंद्रीय उत्पादन शुल्क यासारखे विविध कर हटवले गेले तर पेट्रोलियम पदार्थावरील कर, अबकारी कर, निर्यात शुल्क, टोल, सिमा शुल्क, मालमत्ता कर यासारखे कर २०१७ नंतर देखील चालू असल्याचे दिसून येतात.

वस्तु व सेवा कराचे दर –

वस्तु व सेवा कर पुढीलप्रमाणे

वस्तुवरील कर

या कराची वि□गणी ६ प्रकारे होते.

१.	० टक्के	—	शेतीवर अवलंबून असणारा माल
२.	३ टक्के	—	सोने,चांदीचे दागिने
३.	५ टक्के	—	आवश्यक खाद्यपदार्थ
४.	१२ टक्के	—	मोबाईल, ना□ैरिक औषधे, लोखंड, पोलाद
५.	१८ टक्के	—	कॅमेरा, स्टीलच्या वस्तु. औद्योगिक उत्पादने
६.	२८ टक्के	—	चैनिच्या वस्तु

सेवांवरील कर–

१.	० टक्के	—	शिक्षण, आरोग्य सेवा
२.	५ टक्के	—	वाहतूक सेवा.
३.	१२ टक्के	—	उपहार गृहे
४.	१८ टक्के	—	वित्तसेवा , टेलिफोन
५.	२८ टक्के	—	पंचतारांकित हॉटेल, ७५०० पेक्षा जास्त भाडे असणारी हॉटेल

वस्तु व सेवा हा सर्व समावेशक कर असून तो संपूर्ण देश□ र लागू झाला आहे. पूर्वी उत्पादकांना वेगळा कर तर व्यापाऱ्यांना दुसराच कर असे पण वस्तु व सेवा करात सर्वजण सामील झाले आहेत व कर आकारणीची पध्दतही सगळयांना सारखी आहे.

नोंदणी–

ज्या व्यक्तीची करपात्र उलाढाल एकस्पोर्ट, करमाफ वस्तु व सेवाचा पुरवठा या सर्व बाबी धरुन एका आर्थिक वर्षात किमान २० लाख रुपये आहे. त्या सर्वांनी जीएसटी कायद्याखाली नोंदणी करणे आवश्यक आहे. मात्र विशेष श्रेणीतील राज्यासाठी ही मर्यादा किमान १० लाख इतकी आहे. जर तुम्हाला नोंदणी रद्द करायची असल्यास ३० सप्टेंबर पर्यंत सरकारच्या ळैज पोर्टलवर जावून तुम्ही नोंदणी रद्द देखील करु शकता.

वस्तु व सेवा कराचे फायदे–

वस्तु व सेवा कर हा आताच लावला गेला असला तरी त्याचे फायदे पुढील प्रमाणे होतील.

सुटसुटीत कर पध्दत–

वस्तु व सेवा करामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकारचे विविध कर सामील झाल्यामुळे ही कर पध्दत अधिक सुटसुटीत होण्यास एक प्रकारे मदत मिळू शकते.

ग्राहकावर कमी □र–

करावरील कर हा परिणाम वस्तु व सेवा कर प्रणालीमध्ये दुर केला जात असल्याने ग्राहकावर कराचा □र कमी होण्यास एक प्रकारे मदत झाल्याचे आढळते.

किंमती कमी होण्यास मदते–

वस्तु व सेवा करात कराचा परिणामकारक दर कमी झाल्यामुळे वस्तु व सेवाच्या किंमती होण्यास एक प्रकारे मदत झाली व त्यामुळे वस्तु व सेवांच्या किंमती कमी होण्यास मदत झाली.

महसूलात वाढ होईल–

वस्तु व सेवा कर ही प्रणाली सुटसुटीत, कराचा कमी दर, कार्यक्षम कर प्रशासन यामुळे शासनाच्या कर महसूलात वाढ होण्यास एक प्रकारे हात□र लागू शकतो.

□रतात मागील कर रचनेचा विचार करता कर चुकवेगीरी मोठया प्रमाणात होताना दिसून येते. मात्र वस्तु व सेवा करामुळे ही करचुकवेगीरीला आळा बसून कर महसुलात वाढ होण्यास एक प्रकारे मदत मिळू शकते.

थोडक्यात वस्तु व सेवा कराचा विचार करता तो इतर कराच्याप्रमाणे वेगवेगळया राज्यात वेगवेगळा कर आकारला जात नाही तर परंतु वस्तु व सेवा कर विशेष राज्य वगळता इतर सर्व राज्यात एकाच दराने हा कर आकारला जाईल व त्यामुळेच कराला 'एक राष्ट्र एक कर' असे म्हटले जाते.

संद□ :

१. GST सर्वांसाठी – सतीश शेवाळकर, राजहंस प्रकाशन पुणे.
२. आर्थिक सुधारणा व कायदे– योगेश नेतनकर, केसागर पब्लिकेशन पूणे
३. स्पर्धा परीक्षा विविध मासिके
४. विविध वर्तमानपत्रे
५. वेबसाईट वरील माहिती
६. असा आहे जीएसटी कायदा– गोविंद पटवर्धन, सकाळ पेपर्स, पूणे

■■■

Reseaxch Papex Publication

2018-19

One-Day
Interdisciplinary National Seminar

on

Role of Women in Literature, Humanities, Commerce and Sciences

Organizer

Shri Datta Shikshan Prasarak Mandal, Panutre's

Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale

[Arts, Commerce & Science]

Tal – Panhala, Dist.- Kolhapur (416 205)

Maharashtra State

Ph. (02328) 232093, 232001.

Website : www.vpmkale.edu.in

I/C PRINCIPAL

Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale

(Arts, Commerce & Science)

Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
61	अनिल मोहनराव चव्हाण	मधु कांकरिया का उपन्यास 'सेज पर संस्कृत' में नारी संघर्ष	198 To 199
62	प्रा.सुनिल खोत	भीष्म साहनी का 'माधवी' नाटक : स्त्री जीवन की कहानी	200 To 201
63	डॉ. प्रदीप लाड	आधुनिक हिंदी कविता में नारी की भूमिका (रेवा टिबरेवाल की कविता बुद्ध होना आसान है। के संदर्भ में)	202 To 204
64	डॉ. विनोद प्रभाकर चन्नाळ	अलका सरावगी का उपन्यास 'शेष कादम्बरी' में चित्रित नारी	205 To 206
65	प्रा. डॉ.प्रकाश शंकरराव चिकुर्डेकर	हिंदी आत्मकथा साहित्य में महिला लेखिकाओं की भूमिका	207 To 211
66	श्री. नामदेव आप्पा नांदवडेकर	स्त्री शिक्षण व समाज विकास	214 To 215
67	प्रा. पी.बी. तटाळे	भारतीय कुटीरउद्योगातील स्त्रियांचे महत्त्व	216 To 217
68	प्रा. विक्रम सयाजी यमगेकर प्रा. सुरेश गणपतराव धुरे	वायूकन्या पी.टी.उषा - क्रीडा क्षेत्रातील योगदान	218 To 220
69	डॉ. शार्दुल सेलूकर	स्त्रीवादी चळवळीचा महाराष्ट्रातील प्रथम अविष्कार (१८६० ते १९२०)	221 To 225
70	प्रा. कमलाकर एन. राक्षसे	स्त्रीवादी चळवळीचा आढावा	226 To 228
71	प्रा.नरेंद्र एन.सुर्यवंशी	प्राचीन भारतीय इतिहासामध्ये स्त्रीयांचे संपत्तीविषयी अधिकार	229 To 231
72	डॉ. प्रमिला सुभाष भोसले	जागतिकीकरणाचा भारतीय स्त्रियांवर झालेला परिणाम - एक आढावा	232 To 234
73	प्रा. प्रेरणा एल. चव्हाण	सामाजिकता आणि कथालेखिकांची भूमिका	235 To 236
74	प्रा. डी. एन. सोनकांबळे	दारिद्रय निर्मुलनात महिला बचत गटाचे योगदान	237 To 240
75	प्रा. डॉ. मधुकर धुतुरे	भारतातील स्त्री चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास	241 To 245
76	श्री.महादेव ज.जाधव	मराठी साहित्यातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक चिंतन	246 To 248
77	प्रा.सरला गोपाळ तांबे	बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण	249 To 252
78	श्री डी. एन. महाडिक	महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास	253 To 257
79	प्रा. डॉ.एकनाथ आळवेकर	१९९० नंतरच्या ग्रामीण मराठी कादंबरीतील स्त्री	258 To 259
80	प्रा.श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे	भवभूतीच्या नाटकांतील स्त्रीभूमिका: एक अभ्यास	260 To 264
81	कु. नम्रता देविदास ढाळे	भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री म्हणून स्मिता पाटील यांचे योगदान	265 To 268
82	प्रा. डॉ.सौ. सुनिता एस. राठोड	महिला संक्षमीकरणातील बचतगटाची भूमिका	269 T 272

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

मराठी साहित्यातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक चिंतन

श्री.महादेव ज.जाधव
सहा.प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता.पन्हाळा,
जि.कोल्हापूर.

प्रस्तावना

मराठी साहित्य हे विपूल अशा लेखनाने समृद्ध झाले आहे. यामधील लेखन कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, निबंध इ. या वाङ्मय प्रकारामध्ये वर्गीकरण केले आहे. अशा समृद्ध वाङ्मयाची बारकाईने चिकित्सा केल्यास आपल्याला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, पुरुष लेखकांच्या तुलनेत स्त्रियांचे लेखन हे संख्यात्मक दृष्टीने अल्प आहेच, तर गुणवत्तात्मक विचार केल्यास ते पुरुषांपेक्षा नक्कीच सरस नाही. वाङ्मयाच्या कोणत्याही प्रकाराची चिकित्सा केली तरी आपल्याला स्त्री म्हणून समाजामध्ये असणाऱ्या मर्यादाचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात उमटलेले दिसते. याची कारणमिमांसा पहात असताना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रिला सर्व क्षेत्रे मोकळी झाली असली तरी स्त्री-दास विमोचन संपले नाही. पिढ्यानपिढ्या स्त्रिला समाजास दुय्यम स्थान आहे. यमुळे स्त्रियांची लेखन क्षेत्रामध्ये अपेक्षित वाढ होऊ शकली नाही.

परंतु आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार हा वरील विवेचनाला अपवाद आहे. मराठीत जी आत्मचरित्र लिहिली गेली त्यातील चांगली आत्मचरित्रे स्त्रियांनीच अधिक लिहिली आहेत. म्हणूनच मराठी साहित्यातील स्त्रियांच्या आत्मचरित्रांचा परामर्श होणे क्रमप्राप्त ठरेल.

उद्दिष्ट्ये

मराठी साहित्यातील स्त्रियांची आत्मचरित्र : एक चिंतन या निबंधामधून खालील उद्दिष्ट्ये पहाणे अपेक्षित आहे.

१. मराठी साहित्यातील स्त्रियांच्या आत्मचरित्राचा चिकित्सक अभ्यासक करणे व विश्लेषण करणे.
२. मराठी साहित्यातील पुरुषांनी लिहिलेल्या व स्त्रियांन लिहिलेल्या आत्मचरित्राचे वेगळेपण अधोरेखित करणे.
३. स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्राचा परामर्श अभ्यासणे व विश्लेषण करणे.

स्त्रियांचे आत्मचरित्र लेखन

पुरुषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रापेक्षा स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रामध्ये जिव्हाळा, प्रांजळपणा, स्त्रियांची स्थिती, गृहस्थिती, दबलेल्या भावना, मनाचे आकंदन व मूल्य, राहण्याची वृत्ती इ. चित्रण दिसते. तशी स्त्रियांची आत्मचरित्रे ही पति-चरित्रेच आहेत. पेशवे काळातील 'आनंदीबाईची दिनचर्या' हे आत्मकथनपर लेखन वगळले तर अव्वल इंग्रजी कालखंडात एकाही स्त्रिने आत्मचरित्र लिहिले नाही. पहिल्या स्त्रियांनी लिहिलेले आत्मचरित्र म्हणजे रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे होय. यानंतर यशोदाबाई जोशी - 'आमचा जीवन प्रवास', आनंदीबाई कर्वे - 'माझे पुराण', लक्ष्मीबाई टिळक - 'स्मृतिचित्रे', सत्यभामाबाई सुखात्मे - 'गेले ते दिवस', पार्वतीबाई आठवले - 'माझी कहाणी', कमलाबाई देशपांडे - 'स्मरण साखळी', लीलाबाई पटवर्धन - 'आमची अकरा वर्षे', आनंदीबाई शिर्के - 'सांजवत', गंगुताई पटवर्धन - 'चाकोरी बाहेर', सुधाताई अत्रे - 'गोदातरंग', सरोजिनी सारंगपाणी - 'दुर्देवाशी दोन हात', आनंदीबाई विजापुरे - 'अजुनि चालतेचि वाट', गिरिजाबाई केळकर - 'द्रौपदीची थाळी', हंसा वाडकर - 'सांगत्ये ऐका', स्नेहप्रभा प्रधान - 'स्नेहांकिता', उषाताई डांगे - 'पण ऐकतं कोण?' शीलावती केतकर - 'हे मीच सांगायला पाहिजे का?', सुमती शहा - 'हे गीत जीवनाचे' अशी अनेक समृद्ध व शैलीदार आत्मचरित्रे स्त्रियांनी मराठी साहित्यात दिली आहेत.

PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्राचा आढावा

रमाबाई रानडे यांनी आपल्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या आत्मचरित्रामध्ये पतीच्या सुख-दुःखाशी, त्यांच्या श्रेयाशी पूर्णपणे समरस झालेल्या स्त्रिचे दर्शन या लेखनातून घडते. स्त्री शिक्षणातील अडचणी, मानसिक त्रास, आपल्या लग्नाची हकीकत, दुसरे लग्न असणाऱ्या रानडेच्या पत्नी म्हणून रमाबाईचा समंजसपणा, रमाबाई व माधवराव यांच्या प्रेमाचे दर्शन यातून घडते. पतीला प्रेमाने जिंकणाऱ्या व स्त्री सुख हे पती सुखातच आहे असे मानणाऱ्या रमाबाई आहेत. माधवरावाचे व्यक्तिमत्त्व, कर्तृत्व स्वभावाचे पैलू रमाबाईंनी आपल्या आत्मचरित्रातून चित्रित केले आहे.

लक्ष्मीबाई टिळक यांनी 'स्मृतिचित्रे' मधून आपल्या पतीच्या जीवनाची कहाणीच सांगितली आहे. हे कलात्मकदृष्ट्या उत्कृष्ट आत्मचरित्र बनले आहे. झाले गेले आता काय त्याचे, त्या आता गतगोष्टी याकडे लक्ष्मीबाई अलिप्त पहातात. आत्महत्या करण्याचा विचार वारंवार मनामध्ये येऊन ती केली नाही. दुःख सोसण्याची, संकटाला सामोरे जाण्याची वृत्ती त्यांच्या लेखनामागे आहे. रे.टिळकांचे मन, लक्ष्मीबाईच मत तत्कालीन जीवन त्यांची गुंतागुंत यामध्ये आहे. पत्नीने कृती करावे व डोळे झाकून पत्नीने त्याचे आचरण करावे इतका विश्वास व त्याचे चित्रण यामध्ये प्रांजळपणे येते. संसारामधील भांडणतंटा, ताण-तणाव, राग-द्वेष यांचे चित्रण या आत्मचरित्रामधून येते. तर पत्नी अभिमान, पतीचे कौतुक हा आत्मचरित्राचा महत्त्वपूर्ण भाग बनला आहे. टिळकांची आई, छळ करणारे मामंजी, भिकूताई, बालकवी, डॉ.ह्यूय, सखाराम भाऊजी इ. व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. स्मृतिचित्रांची शैली हा एक फार महत्त्वाचा विशेष आहे. छोटी छोटी वाक्ये व प्रवाही निवेदन यामुळे हे आत्मचरित्र वाचनीय झाले आहे.

श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनी लिहिलेले 'माझी कहाणी' हे आत्मचरित्र म्हणजे अनात बालिकाश्रमात प्रचारिका म्हणून केलेल्या कामाची हकीकत आहे. जुन्यात चांगले कायम ठेवून नव्याचा स्वीकार करणे हे कठिक काम पार्वतीबाईंनी केले. अधू नवऱ्याबरोबर वयाची वीस वर्षे होईतो संसार व नंतर वैधव्यदशेत आयुष्य कुठले ही पार्वतीबाईची कहाणी आहे. केशवपनाच्या चालीविरूद्ध असलेल्या पार्वतीबाईंनी मुंडनस्थितीत २० वर्षे घालविली. पार्वतीबाईच्या कहाणीत प्रेमविवाह नको असा विचारही मांडला आहे.

आनंदीबाई उर्फ बाया कर्वे यांचे 'माझे पुराण' हे आत्मचरित्र बायाच्या निःसंकोचपणाने आणि प्रांजळपणाने केलेल्या निवेदनामुळे चित्त वेधून घेते. आपल्या नवऱ्याच्या कर्तृत्वाची जाणीव व अहंकार ही होता. अनाथ व दरिद्री मुलांना सांभाळणे यातील व्यवहार व स्वार्थ प्रामाणिकपणे मांडला आहे. तरुणपणी आपल्याशी पापवृद्धीने कोणी कशी लगत केली हेही त्या निःसंकोचपणे सांगतात. आनंदीबाईच्या पुराणामधून नवऱ्याचे कर्तृत्व मांडले असले तरी स्वतःचे आत्मचरित्र तितक्याच ताकदीने मांडले आहे, हे त्याचे महत्त्व मान्य करावे लागते.

कमलाबाई देशपांडे यांनी आपल्या 'स्मरण साखळी' या आत्मचरित्रात आत्मसमर्थन केल्यामुळे कंटाळवाणे बनले आहे. सामाजिक योगदान देण्याऐवजी 'मी' चा अहंकार 'मी' ने केलेल्या कृतीचे तपशीलवार समर्थन वाचण्याचे नशिबी येते. शिक्षण संस्था, स्त्रियांची दुःखे, स्त्रियांची स्वप्ने इ. गोष्टीकडे तटस्थपणे पहाताच आले नाही.

लीलाबाई पटवधून यांच्या आमची अकरा वर्षे या आत्मचरित्राचे स्वरूप निराळे आहे. रमाबाई किंवा लक्ष्मीबाई यांच्याप्रमाणे लीलाबाईंनी माधवरावांच्या बरोबर जो अकरा वर्षे संसार केला व या संसारामधील अनुभव, अपुरी स्वप्ने व माधवरावांबद्दल वाटणारी भिती, आदर या आत्मचरित्रातून प्रकट होताना दिसतात.

याप्रमाणे आनंदीबाई शिर्के, गंगुताई पटवर्धन, सुधाताई अत्रे, सरोजिनी सारंगपाणी, आनंदीबाई विजापुरे, गिरिजाबाई केळकर, हंसा वाडकर, अन्नपुर्णाबाई रानडे, इंदिरा भागवत, माधवी देसाई या आत्मचरित्र लेखिकांनी आपल्या वाट्याला आलेले जीवन सांगत असताना पती स्वभव, प्रेम, आदर अधिक विस्ताराने विशद केलेला दिसतो.

निष्कर्ष

मराठी साहित्यातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक चिंतन या निबंधाच्या अभ्यासांती खालील निष्कर्ष मांडता येतील.

१. मराठी साहित्यातील स्त्रियांच्या आत्मचरित्रामधून 'स्व' बरोबर पतींचे चरित्र जास्त प्रमाणात आल्याचे दिसते.

२. स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रामध्ये संसार, नातेसंबंध, कौटुंबिक स्थितीचे वर्णन येते. परंतु पुरुषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रामध्ये मात्र स्वकर्तृत्व, पराक्रम, शौर्य या गोष्टी येताना दिसतात.

३. स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रामधून जिव्हाळा, प्रांजळपणा, स्त्रियांची स्थिती, गृहस्थिती, दबलेल्या भावना, मनाचे आक्रंदन व मुक राहण्याची वृत्ती दिसते.

समारोप

आत्मचरित्र हा आत्मशोध असतो. 'स्व' रुपाकडे ज्याला तटस्थपणे पाहता येते तो आत्मचरित्र चांगला लिहू शकतो. या अर्थाने स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्र एखादा अपवाद वगळता अतिशय छान व वाचनीय झाली आहे. या काळातील पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांची आत्मचरित्र सरस आहेत, हे मान्य करावे लागते.

संदर्भ ग्रंथ

१. भालचंद्र फडके – मराठी लेखिका : चिता आणि चिंतन, श्री विद्या प्रकाशन, पुणे –२१ सप्टें. २०४७.

२. प्र. न. जोशी – मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास – अर्वाचित काळ – स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – २४, एप्रिल २००९.

३. म. ना. देशपांडे – आधुनिक मरठी वाङ्मयाचा इतिहास (भाग दुसरा) – व्हिनस प्रकाशन, पुणे. जानेवारी १९५८.

४. अनिता काळे–जाधव – ग्रामीण साहित्यातील स्त्री दर्शन, निवाद प्रकाशन, पुणे–२६. जानेवारी २०१४.

One-Day
Interdisciplinary National Seminar
on
Role of Women in Literature, Humanities, Commerce and Sciences



Organizer

Shri Datta Shikshan Prasarak Mandal, Panutre's

Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale

[Arts, Commerce & Science]

Tal – Panhala, Dist.- Kolhapur (416 205)

Maharashtra State

Ph. (02328) 232093, 232001.

Website : www.vpmkale.edu.in

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
61	अनिल मोहनराव चव्हाण	मधु कांकरिया का उपन्यास 'सेज पर संस्कृत' में नारी संघर्ष	198 To 199
62	प्रा.सुनिल खोत	भीष्म साहनी का 'माधवी' नाटक : स्त्री जीवन की कहानी	200 To 201
63	डॉ. प्रदीप लाड	आधुनिक हिंदी कविता में नारी की भूमिका (रेवा टिबरेवाल की कविता बुद्ध होना आसान है। के संदर्भ में)	202 To 204
64	डॉ. विनोद प्रभाकर चन्नाळ	अलका सरावगी का उपन्यास 'शेष कादम्बरी' में चित्रित नारी	205 To 206
65	प्रा. डॉ.प्रकाश शंकरराव चिकुर्डेकर	हिंदी आत्मकथा साहित्य में महिला लेखिकाओं की भूमिका	207 To 211
66	श्री. नामदेव आप्पा नांदवडेकर	स्त्री शिक्षण व समाज विकास	214 To 215
67	प्रा. पी.बी. तटाळे	भारतीय कुटीरउद्योगातील स्त्रियांचे महत्त्व	216 To 217
68	प्रा. विक्रम सयाजी यमगेकर प्रा. सुरेश गणपतराव धुरे	वायूकन्या पी.टी.उषा - क्रीडा क्षेत्रातील योगदान	218 To 220
69	डॉ. शार्दुल सेलूकर	स्त्रीवादी चळवळीचा महाराष्ट्रातील प्रथम अविष्कार (१८६० ते १९२०)	221 To 225
70	प्रा. कमलाकर एन. राक्षसे	स्त्रीवादी चळवळीचा आढावा	226 To 228
71	प्रा.नरेंद्र एन.सुर्यवंशी	प्राचीन भारतीय इतिहासामध्ये स्त्रीयांचे संपत्तीविषयी अधिकार	229 To 231
72	डॉ. प्रमिला सुभाष भोसले	जागतिकीकरणाचा भारतीय स्त्रियांवर झालेला परिणाम - एक आढावा	232 To 234
73	प्रा. प्रेरणा एल. चव्हाण	सामाजिकता आणि कथालेखिकांची भूमिका	235 To 236
74	प्रा. डी. एन. सोनकांबळे	दारिद्रय निर्मुलनात महिला बचत गटाचे योगदान	237 To 240
75	प्रा. डॉ. मधुकर धुतुरे	भारतातील स्त्री चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास	241 To 245
76	श्री.महादेव ज.जाधव	मराठी साहित्यातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक चिंतन	246 To 248
77	प्रा.सरला गोपाळ तांबे	बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण	249 To 252
78	श्री डी. एन. महाडिक	महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास	253 To 257
79	प्रा. डॉ.एकनाथ आळवेकर	१९९० नंतरच्या ग्रामीण मराठी कादंबरीतील स्त्री	258 To 259
80	प्रा.श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे	भवभूतीच्या नाटकांतील स्त्रीभूमिका: एक अभ्यास	260 To 264
81	कु. नम्रता देविदास ढाळे	भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री म्हणून स्मिता पाटील यांचे योगदान	265 To 268
82	प्रा. डॉ.सौ. सुनिता एस. राठोड	महिला सक्षमीकरणातील बचतगटाची भूमिका	269 T 272

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

भारतीय कुटीरउद्योगातील स्त्रियांचे महत्त्व

प्रा. पी.बी. तटाळे
अर्थशास्त्र विभाग
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्थेत ज्याप्रमाणे कृषिक्षेत्राला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेतील लधू व कुटीर उद्योगाचे योगदान आपणांस विसरून चालणार नाही. ज्याप्रमाणे भारताचे पूर्व पंतप्रधान लाल बहाद्दूर शास्त्री यांनी "जय जवान-जय किसान " हा नारा दिला. त्याचे कारण म्हणजे अर्थव्यवस्थेतील शेतकऱ्याचे स्थान. कारण आजही देशातील जवळपास ६० टक्के लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. परंतु आजच्या परिस्थितीचा विचार करता शेतकऱ्यांची अवस्था फारच बिकट झालेली दिसून येते. या पाठीमागच्या कारणांचा विचार करता भारतात असलेली वाढती लोकसंख्या. शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरण, शेती क्षेत्राला दिला जाणारा अपुरा वित्त पुरवठा, सिंचनाच्या सोयीचा अभाव, नवनवीन तंत्रज्ञानाची कमतरता, अपुरे भाग भांडवल या कारणांमुळे शेती क्षेत्राची प्रगती होऊ शकली नाही. त्यामुळे शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नाचा वाटा हळूहळू कमी होत चालला आहे. याला पर्याय म्हणून भारतात पूर्वीपासून चालत आलेला लधू व कुटीर उद्योगाचा विकास करायला पाहिजे. तरच ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व बेरोजगारी काही प्रमाणात कमी करण्यास मदत मिळेल.

संशोधन लेखाची उद्दिष्टये

भारतीय कुटीर उद्योगातील स्त्रियांचे योगदान किंवा महत्त्व हा संशोधन लेख लिहित असताना खालील उद्दिष्ट्यो समोर ठेवून तयार करण्यात आला.

१. कुटीर उद्योग म्हणजे काय? हे पाहणे.
२. कुटीर उद्योगाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
३. कुटीर उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा अभ्यास करणे.
४. कुटीर उद्योगात महिलांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

वरील उद्दिष्ट समोर ठेवून सदर संशोधन लेख तयार करण्यात आला.

संशोधन पद्धती

भारतीय अर्थव्यवस्थेतील कुटीर उद्योगातील स्त्रियांचे महत्त्व हा संशोधन लेख तयार करण्यासाठी दुय्यम आधार सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे.

कुटीर उद्योग म्हणजे नेमके काय? हे सर्वप्रथम पाहणे गरजेचे आहे. भारतात प्राचीन काळापासून या उद्योगाचे महत्त्व सर्वमान्य आहे. कुटीर उद्योग म्हणजे असा उद्योग की जो कुटुंबाच्या सदस्याच्या मदतीने पूर्णकालीन किंवा अंशकालीन व्यवसाय म्हणून चालविण्यात येणाऱ्या उद्योगाला कुटीर उद्योग म्हणतात. भारतात अशा प्रकारचे उद्योग प्रामुख्याने शेती क्षेत्राशी संबंधित आहेत.

ज्या उद्योगात ७.५ लाख रुपयापेक्षा कमी भांडवल गुंतवलेले असते. अशा उद्योगांना कुटीर उद्योग असे म्हणतात.

थोडक्यात, ज्या उद्योगाचे भागभांडवल अल्प असते व ज्यात १० पेक्षा कमी व्यक्ती काम करतात. त्या व्यवसायास कुटीर उद्योग म्हणून संबोधले जाते.

कुटीर उद्योगाची वैशिष्ट्ये

कुटीर उद्योगाच्या व्याख्येवरून कुटीर उद्योगाचे खालीलप्रमाणे वैशिष्ट्यो सांगता येतील.

१. साधारणपणे ग्रामीण भागातील लोकांना आवश्यक असणाऱ्या वस्तूचे यात उत्पादन केले जाते.
२. या उद्योगात उत्पादनाचे प्रमाण अल्प असते.
३. या उद्योगात कुटुंबातील सदस्य काम करतात.
४. यात श्रमशक्तीचा उपयोग मोठ्याा प्रमाणावर केला जातो.

VC PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

५. गुंतवणुकीचे प्रमाण अल्प असते.

६. वाहतूक खर्चाचा अभाव.

७. उत्पादकांना स्थानिक बाजारपेठ उपलब्ध असते.

साधारणपणे वरील प्रकारचे वैशिष्ट्यो कुटीर उद्योगाचे आपणांस पहावयास मिळतात. यावरूनच भारतात ग्रामीण भागात आलुतेदारी व बलुतेदारी ही पद्धती प्रयत्नीत झालेली दिसते. तसेच या कुटीर उद्योगात वेगवेगळ्या जातीचे लोक काम करताना दिसून येतात.

कुटीर उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व व त्यातील महिलांचा सहभाग

भारतात कुटीर उद्योगाचा व्यवसाय फार प्राचीन काळापासून चालत होता. नंतरच्या काळात हे उद्योग ऱ्हास पावू लागले आहेत. परंतु असे जरी असले तरी या व्यवसायात स्त्रियांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. भारतात आज वाढत जाणारी लोकसंख्या व वाढत्या लोकसंख्येला सामावून घेणाऱ्या क्षेत्राचा अभाव असल्यामुळे आपणांस कुटीर उद्योगास चालना देण्याशिवाय पर्याय नाही. त्यातल्या त्यात या उद्योगात महिलांचा सहभाग फार मोठ्याा प्रमाणात दिसून येतो.

आर्थिक विषमता कमी करण्यासाठी हे उद्योग सहाय्यक ठरू शकतात. कारण मोठ्याा उद्योगाच्या स्थापनेमुळे उत्पन्नाचे केंद्रीकरण एका ठिकाणी होते व आर्थिक विषमता मोठ्याा प्रमाणावर निर्माण होते. त्यामुळे भारतात मोठ्याा प्रमाणात कुटीर उद्योगाची स्थापना झाली तर महिलांना अल्प भांडवलात आपला व्यवसाय स्थापन करता येईल व रोजगाराचा प्रश्न मिटून संपत्तीचे विकेंद्रीकरण होण्यास एक प्रकारे मदत होईल.

कुटीर उद्योगात उपलब्ध साधन सामुग्रीचा वापर केला जात असल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ होण्यास मदत मिळते. स्त्रियांचे घरकामाचे मोल राष्ट्रीय उत्पन्नात समावेश केला जात नाही. परंतु कुटीर उद्योगात केलेला कामाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात गृहित धरण्यात येतो. त्यामुळे स्त्रियांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होण्यास एक प्रकारे मदत मिळू शकते.

भारतात तसेच प्रगत देशात मोठ्याा उद्योगात यंत्राच्या साहाय्याने मोठ्याा प्रमाणात उत्पादन होत असल्याने मजूराच्या कौशल्याला वाव मिळत नाही. परंतु कुटीर उद्योगात महिला तसेच कुटुंबातील सदस्य काम करीत असल्यामुळे त्यांच्या कौशल्याला वाव मिळतो. त्यामुळे महिला आपले सर्व कौशल्य पणाला लावून काम करते व त्यामुळे अत्यंत कलापूर्ण व सुबक वस्तू तयार होतात व अशा वस्तूंना विदेशातून मोठ्याा प्रमाणावर मागणी असते. त्यामुळे देशाला विदेशी चलन मोठ्याा प्रमाणावर मिळण्यास एक प्रकारे मदत होऊ शकते.

शेती क्षेत्रावरील अतिरिक्त लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी हे कुटीर उद्योग मोलाची जबाबदारी उचलतात. आजच्या परिस्थितीत ग्रामीण भागातील तरुण लोक मोठ्याा प्रमाणात रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करू लागले आहेत. साहजिकच ग्रामीण भागात शती करण्याची जबाबदारी महिलांवर येऊन पडत आहे. तसेच धरातील बेरोजगार लोक देखील हाताला काम मिळत नसल्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीवरच अवलंबून आहेत. त्यामुळे लधू व कुटीर उद्योगामुळे शेतीवरील भार कमी करण्यास एक प्रकारे मदत मिळू शकते.

लधू व कुटीर उद्योगात विदेशी यंत्रसामुग्रीची आवश्यकता नसते. त्यामुळे देशातील विदेशी चलनाचा उपयोग हे यंत्रसामुग्री आयात करण्यासाठी वापरली जात नाही. त्यामुळे देशात उपलब्ध असलेल्या विदेशी चलनावर त्याचा ताण पडत नाही.

थोडक्यात, वरील विवेचनावरून कुटीर उद्योग व या कुटीर उद्योगातील महिलांचे योगदान स्पष्ट होण्यास मदत मिळू शकेल. भारतात जवळपास ४७ टक्के स्त्रियांचे प्रमाण आहे. परंतु या स्त्रियांना रोजगाराच्या संधी अल्प प्रमाणात मिळताना दिसून येतात. त्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त करून देण्यास लधू व कुटीर उद्योग मदत करू शकतात. त्यामुळे भारतात पूर्वीप्रमाणेच लधू व कुटीर उद्योगाची स्थापना झाली तर महिलांना तसेच कुटुंबातील सदस्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व त्यातून बेरोजगाराचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

संदर्भ

१. श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, २००४.

२. डह्.जी.एल. झामरे, भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, २००८.

3- Datta R and K.P.M. Sundran, Indian Economy, S. Chand & Company, New Delhi - 2001.

४. कुटीर उद्योग विकिपीडिया.

५. विविध वर्तमानपत्रातील लेख.

Interdisciplinary International Conference contemporary Issues & Challenges in Social Sciences & Languages

22nd Sept.2018

Organizer

Deparitment of Political Science,

Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

Special Issue published By

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

ISSN 2349-638x

Peer Review and Indexed Journal

Impact Factor 4.574

Website www.aiirjournal.com

Email :- aiirjpramod@gmail.com

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
236	डॉ.सुरेश एम.चव्हाण	ऐतिहासिक संशोधनातील आव्हाने	867 To 869
237	तानाजी माने	भारताचे परराष्ट्र धोरण(काल, आज आणि उद्या)	870 To 874
238	उदयकुमार लाड	भारतातील धर्मनिरपेक्ष व समान नागरी कायदया संदर्भाची चिकीत्सा	875 To 877
239	श्रीमती उज्वला उत्तम संकपाळ डॉ. श्रीमती रूपाली उत्तम संकपाळ	भाषा अध्यापनातील सामाजिक, राजकीय आणि वैयक्तीक वादग्रस्त मुद्दे	878 To 881
240	डॉ. वसंत भूपाल शिंदे	अलिप्ततवादी चळवळ : सातत्य, स्थित्यंतर आणि प्रस्तुतता	882 To 888
241	कमलाकर एन राक्षसे	भारतातील जात आणि राजकारण	889 To 891
242	तटाळे पद्माकर बळीरा	जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम	892 To 894
243	डॉ. राक्षसे सिद्धार्थ गुणाजी	सायबर दहशतवाद	895 To 897
244	डी.आर पाटील	महाराणी येसूबाइ यांचे कार्य कतत्व	898 To 899

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम

प्रा.तटाळे पद्माकर बळीराम
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

प्रस्तावना

भारतात जागतिकीकरणाची सुरुवात विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात झाली. परंतु इतर विकसित देशात ही जागतिकीकरणाची प्रक्रिया विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून चाललेली दिसून येते. १९९० च्या दशकात भारतात आलेल्या आर्थिक आरिष्ट्यामुळे व त्याचबरोबर जागतिक बँक व आयएमएफ च्या मोठ्या दबावामुळे तत्कालीन पंतप्रधान मा.पी.व्ही. नरसिंहराव यांनी नवीन आर्थिक धोरण स्वीकारावे लागले. २४ जुलै १९९१ पासून भारतात या नव्या आर्थिक धोरणाची सुरुवात झाली. तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंगानी विदेशी कर्ज, देशात असलेला परकीय चलनाचा साठा याचा विचार करून देशात नव्या आर्थिक धोरणांना सुरुवात केली. जागतिकीरण, उदारीकरण व शिथीलीकरण यांचा समावेश होता. पुर्वीच्या काळी देशातील अर्थव्यवस्था अंशतः बंदिस्त होती. ती २४ जुलै १९९१ पूर्णतः खुली करण्यात आली व त्यानंतर भारत हा देश खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाच्या प्रवाहात आला.

संशोधन लेख तयार करताना सर्वप्रथम जागतिकीकरण म्हणजे काय? हे आपणांस पहावे लागेल. जागतिकीकरण संदर्भात वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. त्यातील निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे –

जागतिकीकरणाच्या व्याख्या

''जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूची किंवा घडामोडींची जागतिक स्तरावर स्थलांतरणाची प्रक्रिया.''

ॲथनी गिडन्सच्या मते, ''जागतिकीकरण म्हणजे जगभरात सामाजिक संबंधाचे सधनीकरण घडून येणे होय.''

थोडक्यात, जागतिकीकरण म्हणजे देशा–देशांतर्गत व्यापार, भांडवल स्थलांतर, तंत्रज्ञान हस्तांतरण यावर असलेली बंधने दूर करून मुक्त व्यापार पद्धतीत व्यापार प्रस्थापित करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

व्यापार ही संकल्पना अगदी अलिकडील संकल्पना नसून व्यापार हा मानवाच्या विकासासोबतवच घडून आलेली संकल्पना आहे. मानवाने जसजसी प्रगती केली तसतसे व्यापार वाढीला एक प्रकारे चालना मिळत गेली. पुर्वीच्या काळी मानवाला आवश्यक असलेल्या वस्तूचे उत्पादन केले जात होते. परंतु जसजसे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वस्तू व सेवाचे उत्पादन केले जाऊ लागले तसतसे उत्पादन वाढ होण्यास मदत मिळाली व त्याचा परिणाम म्हणून या जादा उत्पादित झालेल्या मालास बाजारपेठ उपलब्ध व्हावी या उद्देशाने वसाहतवादासारखी संकल्पना जगभरात रुजली गेली. परंतु विकसनशील देश व मागासलेल्या देशात आज विकसित देशातून येणाऱ्या वस्तू व सत्तेवर अनेक प्रकारचे बंधने लादली जावू लागली. त्यामुळे विकसित देशातील उत्पादित झालेल्या वस्तू व क्षेत्रांना बाजारपेठ मिळणे कठीण होऊ लागले. त्यामुळेच जागतिकीकरणाची संकल्पना खऱ्या अर्थाने उदयास आली.

संशोधन लेखाची उद्दिष्ट्ये

जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम हा संशोधन लेख खालील उद्दिष्ट्ये समोर ठेवून लिहिला गेला आहे.

१. जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेणे.
२. जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवर झालेला परिणामांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती

हा संशोधन लेख लिहित असताना प्रामुख्याने यात दुय्यम आधारसामुग्रीचा वापर करण्यात आला आहे.

जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम

जागतिकीकरणामुळे अनेक क्षेत्रावर अनुकूल व प्रतिकूल परिणाम झाले; परंतु भारताच्या संदर्भात विचार करता भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

आज देश २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर असतानासुद्धा भारतात आजही शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे भारतीय शेतीला आजही अनेक अडचणीला तोंड द्यावे लागताना आपणांस पहावयास मिळते. त्यातच

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

भारतात असलेली रूढी, परंपरा व पूर्वीपासून चालत आलेल्या साधनाच्या मदतीने केल्या जाणाऱ्या शेतीमुळे शेती क्षेत्राचा विकास झाला नाही.

भारतात चालत आलेल्या रुढी परंपरा यामुळे आज भारतात शेती क्षेत्राचा आकार हा लहान होत चालला आहे. त्यातच तुकडीकरण व विभाजन यामुळे भारतात प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करता येऊ शकत नाही. त्याचा परिणाम म्हणून अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होऊ शकत नाही.

जागतिकीकरणानंतर शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविता येते. परंतु भारतात शाश्वत अशा जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध नसल्यामुळे या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही. इस्त्राईल सारख्या अवर्षण देशात आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती केली जाते. परंतु तशा प्रकारची शेती भारतात जागतिकीकरणानंतर ही केली जात असल्याचे दिसून येत नाही.

आधुनिक बी-बियाणे तसेच कमी पाण्यावर उत्पादित होणारी पिके यासारख्या नवनवीन तंत्रज्ञान जागतिकीकरणामुळे आपणांस सहजपणे उपलब्ध होते. परंतु आजचा शेतकरी नवनवीन प्रयोग न करता पारंपारिक पीक पद्धतीचा वापर करताना दिसतो. त्यामुळे तो अधिकच आर्थिक आरिष्टात सापडत चाललेला दिसतो.

आज जगातील बहुतेक देशात शेतकरी वर्ग आत्महत्या सारख्या समस्येत सापडलेला दिसतो. परंतु हे प्रमाण भारतात फार मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. याला विविध कारणे कारणीभूत असल्याचे दिसते. त्यात प्रामुख्याने वाढते व्याजदर, शेती क्षेत्राला अपुरा कर्जपुरवठा, खते-बियाणे सबसिडीचे कमी प्रमाण याचे पर्यवसन भारतीय शेतकरी हा प्रगत देशातील शेतकऱ्याशी स्पर्धा करू शकत नाही. त्यामुळे त्याचा उत्पादित मालाला जागतिक बाजारपेठ निर्माण होत नाही. त्यातून तो अधिक आर्थिक आरिष्टात सापडताना दिसतो. त्यामुळेच भारतात शेतकऱ्याच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत जाताना दिसते.

विश्व व्यापार संघटना व गॅटवर भारताने स्वाक्षरी केल्यामुळे सुरुवातीला या संस्थेच्या स्थापनेमुळे जागतिक व्यापार सुलभ व न्यायपूर्ण होऊन गरीब देशाला फायदा होईल व जगातील गरिबी, बेकारी दूर होईल असे स्वप्न दाखवण्यात आले. परंतु तसे काही झाले नाही. कारण आज गरीब व विकसनशील देशावर विकसित देशाचा प्रभाव वाढताना दिसतो. १९४७ मध्ये आपल्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा ५०% इतका होता. तो आज केवळ १२ ते १५% इतकाच राहिला आहे. आज देशात अन्नधान्याची निर्यात वाढण्याऐवजी आयातच वाढताना दिसून येते.

जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून भारतात अन्नधान्याची उत्पादनात घट होताना दिसून येते. तर व्यापारी पिकाचे उत्पादन वाढताना दिसते. पीक रचनेतील अशा बदलाची तीव्रता आज जरी आपणांस कमी वाढत असली तरी कालांतराने यात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देशातील वाढीव लोकसंख्येला अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात अनंत अडचणी समोर आहेत. लोकसंख्या वाढ व अन्नधान्य वाढ या दोन्हीतील समतोल बिघडत चालल्याने भारताची अन्नधान्य सुरक्षितता संपुष्टात येऊन भारतीय अर्थव्यवस्थेला आयातीवर विसंबून रहावे लागेल.

जागतिकीकरणामुळे भारतात आज बहुराष्ट्रीय कंपन्यांनी शेती क्षेत्रात प्रवेश करायला सुरुवात केली आहे. यामध्ये कारगील, शिडस्, हिंदूस्थान लिव्हर, बेजो, शितल शिडस्, सॅडोज, पायोनियर यासारख्या कंपन्यांचा समावेश होतो. या कंपन्या बी-बियाणे, रासायनिक खते यांसारख्या वस्तू घेऊन बाजारात उतरल्या आहेत. त्यामुळे स्थानिक लोकांना बाजारपेठ उपलब्ध होईल की नाही हे सांगता येणार नाही. अलिकडेच अमेरिकेतील पेप्सी आणि कारगील या कंपन्यांनी गुजरात व पंजाब या राज्यात शेतीविषयक करार केले असून ते कंत्राटी शेती सुद्धा करू शकतील. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांसमोर अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

थोडक्यात वरीलप्रमाणे जागतिकीकरणामुळे शेती क्षेत्रावर अनेक परिणाम झाले असले तरी भारतीय शेतीस जागतिकीकरणामुळे प्रगती करण्यास एक प्रकारे मदत मिळाली. त्यात प्रगत बी-बियाणाचा उपलब्धता, कमी पाण्यावर उत्पादित होणारे सुधारित बियाणे, उत्पादित झालेल्या मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ प्राप्त झाली, शेती मालाला योग्य किंमत मिळाली, रोजगाराच्या संधीत वाढ झाली यांचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास एक प्रकारे मदत मिळू शकते.

संदर्भ :

१. जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे.
२. भोसले, काटे, जागतिक अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. योजना मासिक, २०१०, २०१२.
४. रुद दत्त व के.पी.एम. सुंदरम्, इंडियन इकॉनामी, एस.चांद प्रकाशन, न्यू दिल्ली.
५. विकिपिडीया.

18-19

One-Day
Interdisciplinary National Seminar
on
Role of Women in Literature, Humanities, Commerce and Sciences

Organizer

Shri Datta Shikshan Prasarak Mandal, Panutre's

Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale

[Arts, Commerce & Science]

Tal – Panhala, Dist.- Kolhapur (416 205)

Maharashtra State

Ph. (02328) 232093, 232001.

Website : www.vpmkale.edu.in

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
61	अनिल मोहनराव चव्हाण	मधु कांकरिया का उपन्यास 'सेज पर संस्कृत' में नारी संघर्ष	198 To 199
62	प्रा.सुनिल खोत	भीष्म साहनी का 'माधवी' नाटक : स्त्री जीवन की कहानी	200 To 201
63	डॉ. प्रदीप लाड	आधुनिक हिंदी कविता में नारी की भूमिका (रेवा टिबरेवाल की कविता बुद्ध होना आसान है। के संदर्भ में)	202 To 204
64	डॉ. विनोद प्रभाकर चन्नाळ	अलका सरावगी का उपन्यास 'शेष कादम्बरी' में चित्रित नारी	205 To 206
65	प्रा. डॉ.प्रकाश शंकरराव चिकुर्डेकर	हिंदी आत्मकथा साहित्य में महिला लेखिकाओं की भूमिका	207 To 211
66	श्री. नामदेव आप्पा नांदवडेकर	स्त्री शिक्षण व समाज विकास	214 To 215
आजकल रिश्ते–नाते, पारिवारिक संबंध खोखले बन चुके है। मनुष्य केवल पैसों के पिछे भाग रहा हैं। झूठी शान के लिए तिलमिला रहा है। इस कहानी का पिता अपने पुत्र की भावनाओं की अपेक्षा बॉस की प्रतिष्ठा को महत्त्व देता है। बेटे के जन्मदिवस के अवसर पर पिता बॉस के आने की राह देखता है। बॉस समय पर नहीं आता है, इससे बच्चा भी नाराज हो जाता है। बॉस के आने के बाद बच्चा बबलू उनके पास जाने से मना करता है। इससे पिता और भी चिढ जाता है और बबलू को मारते हैं। इस कहानी के माध्यम से सूर्यबाला जी ने आज के कृत्रिम सभ्यता की पोल खोल दी है। 'पराजित' नामक कहानी में वर्तमान समय में मनुष्य की बदलती सोच की ओर हमारा ध्यान खींचा है। आदमी अपने प्रमोशन या तरक्की के लिए किसी भी हद तक जाने के लिए तैयार है। इस कहानी का नायक बसंत अपने प्रमोशन के लिए बीवी का सहारा लेना चाहता है। इससे परिवार में तनाव का माहौल बनता है। 'पडाव' जैसी कहानी में सूर्यबाला जी ने नयी पीढी की मानसिकता एवं बुजुर्गों के दुःखों का चित्रण किया है। इस कहानी में परिवार से अलग रहनेवाले बुजुर्गों के दुखों की दास्तान हमें दिखाई देती है।

सूर्यबाला जी ने नारी मन को अभिव्यक्त करनेवाली कहानियाँ भी लिखी है। 'झील' नामक कहानी उसके अंतर्गत आती है। नारी के अकेलेपन की पीडा को यह कहानी अभिव्यक्त करती है। इस कहानी का नायक जब रिटायर्ड हो जाता है, तब वह घर में खुद को अकेला पाता है। लेकिन वह यह समझ नहीं पाता है कि यह दुख तो अपनी पत्नी कितने सालों भोग रही है। सूर्यबाला जी इस कहानी के माध्यम से हमें यह बताना चाहती हैं कि नारी को भी मन, भावनाएँ होती है, उसे भी हमें

310

जानने की कोशिश करनी चाहिए । 'खोह' नामक कहानी में पुरूषों की मानसिकता का पर्दाफाश किया है। इस कहानी के जयंत की पत्नी कैन्सर की बिमारी से त्रस्त होती है। लेकिन फिर भी काम की व्यस्तता में से जयंत अपनी बीवी के लिए समय नहीं निकालता है। एक दिन उसकी मृत्यु भी हो जाती है। इस संबंध में जे.जे. का कथन है – "उसके लिए बाजार से सबसे महंगी साडी मंगवायी थी। ..... जो नहीं जानते थे, एक दूसरे को पूछने लगे कि कोई नेता मरा है या फिल्मस्टार।"[5] पत्नी के मरने का जरा सा भी दुख जयंत को नहीं है। यहाँपर मनुष्य के स्वार्थी स्वभाव पर चिंता व्यक्त की है। आधुनिक समाज में मनुष्य की भावनाश्यूनता पर प्रकाश डाला गया है।

सारांश रूप में हम कह सकते है कि सूर्यबाला जी ने हिंदी कहानी साहित्य में बहुत बडा योगदान दिया है। उन्होंने अपनी कहानियों के माध्यम से नए विषयों को हमारे सामने रखा है। इनकी कहानियाँ पढने के बाद पाठक सोचने के लिए मजबूर हो जाता है। कहानियों के पात्र, सभी घटनाएँ, अपने आसपास के ही लगते हैं। कभी–कभी पाठक को कहानी के पात्र का दर्द खुद का दर्द लगता है। इतनी ताकत उनकी कहानियों में देखने को मिलती है। सूर्यबाला जी ने नारी के मन की अभिव्यक्ति, उसके अकेलेपन, उसकी कुंठित इच्छाओं को कहानियों के माध्यम से व्यक्त किया है। मध्यमवर्गीय परिवार की विभिन्न आर्थिक समस्याओं को बहुत सारी कहानियों का प्रमुख विषय बनाया है। युवाओं की बेरोजगारी की समस्या, परिवार द्वारा होनेवाली उपेक्षा, उनकी मानसिकता आदि विषयों पर सूर्यबाला जी ने लेखनी चलायी है। साथ में बुजुर्गों की समस्याएँ, मनुष्य की स्वार्थी वृत्ति, भारतियों का विदेशी प्रेम आदि विषय भी गंभीरता से चित्रित किए हैं। पुराने घिसे–पिटे विषयों को छोडकर नए गंभीर विषयों को कहानी के माध्यम से वर्णित किया गया है।

संदर्भ ग्रंथ :

1. मेरा विद्रोह – सूर्यबाला, पृष्ठ 7
2. गुजरती हदे – सूर्यबाला, पृष्ठ 22
3. दिशाहीन – सूर्यबाला, पृष्ठ 112
4. थाली भर चाँद – समीक्षिका सुमति अय्यर 'प्रकर' – अगस्त 1988
5. खोह – सूर्यबाला, पृष्ठ 15

TRUE COPY

PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur (M.S.)

VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAYA, KALE
ARTS, COMMERCE & SCIENCE

ISSN 2349-638X
IMPACT FACTOR 4.574

INTERDISCIPLINARY NATIONAL SEMINAR

on

Role of Women in Literature, Humanities, Commerce & Sciences

15th sept. 2018

ORGANIZER

VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAYA, KALE

[Arts, Commerce And Science]

Tal. Panahala Dist. Kolhapur (MS)

SPECIAL ISSUE OF
AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
PEER REVIEW & INDEXED JOURNAL
www.aiirjournal.com

EDITORS
Prin. Ladgaonkar B.M.
Dr. Selukar S.M.
Prof. Patil N.V.
Prof. Jadhav M.J.
Prof. Kamble J.A.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
61	अनिल मोहनराव चव्हाण	मधु कांकरिया का उपन्यास 'सेज पर संस्कृत' में नारी संघर्ष	198 To 199
62	प्रा.सुनिल खोत	भीष्म साहनी का 'माधवी' नाटक : स्त्री जीवन की कहानी	200 To 201
63	डॉ. प्रदीप लाड	आधुनिक हिंदी कविता में नारी की भूमिका (रेवा टिबरेवाल की कविता बुद्ध होना आसान है। के संदर्भ में)	202 To 204
64	डॉ. विनोद प्रभाकर चन्नाळ	अलका सरावगी का उपन्यास 'शेष कादम्बरी' में चित्रित नारी	205 To 206
65	प्रा. डॉ.प्रकाश शंकरराव चिकुर्डेकर	हिंदी आत्मकथा साहित्य में महिला लेखिकाओं की भूमिका	207 To 211
66	श्री. नामदेव आप्पा नांदवडेकर	स्त्री शिक्षण व समाज विकास	214 To 215
67	प्रा. पी.बी. तटाळे	भारतीय कुटीरउद्योगातील स्त्रियांचे महत्त्व	216 To 217
68	प्रा. विक्रम सयाजी यमगेकर प्रा. सुरेश गणपतराव धुरे	वायूकन्या पी.टी.उषा - क्रीडा क्षेत्रातील योगदान	218 To 220
69	डॉ. शार्दुल सेलूकर	स्त्रीवादी चळवळीचा महाराष्ट्रातील प्रथम अविष्कार (१८६० ते १९२०)	221 To 225
70	प्रा. कमलाकर एन. राक्षसे	स्त्रीवादी चळवळीचा आढावा	226 To 228
71	प्रा.नरेंद्र एन.सुर्यवंशी	प्राचीन भारतीय इतिहासामध्ये स्त्रीयांचे संपत्तीविषयी अधिकार	229 To 231
72	डॉ. प्रमिला सुभाष भोसले	जागतिकीकरणाचा भारतीय स्त्रियांवर झालेला परिणाम - एक आढावा	232 To 234
73	प्रा. प्रेरणा एल. चव्हाण	सामाजिकता आणि कथालेखिकांची भूमिका	235 To 236
74	प्रा. डी. एन. सोनकांबळे	दारिद्रय निर्मुलनात महिला बचत गटाचे योगदान	237 To 240
75	प्रा. डॉ. मधुकर धुतुरे	भारतातील स्त्री चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास	241 To 245
76	श्री.महादेव ज.जाधव	मराठी साहित्यातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक चिंतन	246 To 248
77	प्रा.सरला गोपाळ तांबे	बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण	249 To 252
78	श्री डी. एन. महाडिक	महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास	253 To 257
79	प्रा. डॉ.एकनाथ आळवेकर	१९९० नंतरच्या ग्रामीण मराठी कादंबरीतील स्त्री	258 To 259
80	प्रा.श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे	भवभूतीच्या नाटकांतील स्त्रीभूमिका: एक अभ्यास	260 To 264
81	कु. नम्रता देविदास ढाळे	भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री म्हणून स्मिता पाटील यांचे योगदान	265 To 268
82	प्रा. डॉ.सौ. सुनिता एस. राठोड	महिला सक्षमीकरणातील बचतगटाची भूमिका	269 T 272

PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

भारतातील स्त्री चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास

प्रा.डॉ.मधुकर धुतुरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

प्रस्तावना

भारतीय समाजामध्ये स्त्रियांच्या सामाजिक दर्जासंदर्भात कमालीचा विरोधाभास आढळतो. एका बाजुला स्त्रियांचे धर्माधिष्ठित गौरविकरण (काल्पनिक) व दुसऱ्या बाजूला समाजात प्रत्यक्षात दुय्यम स्थान, शोषण असा हा विरोधाभास आहे. एका बाजूला स्त्री प्रतिष्ठा हा समाजाच्या श्रेष्ठत्वाचा निकष व दुसऱ्या बाजूला सामाजिक स्तरीकरणामध्ये शेवटचे स्थान असा हा विरोधाभास आहे.

भारतीय समाज मुख्यतः पुरुषप्रधान राहिला आहे. अर्थात, केरळमधील नायर, मंगळूरमधील शेट्टी, बंगाली काही भटक्या जमातीमध्ये स्त्री प्रधानतेचे प्रमाण दिसते. परंतु सर्वसामान्यपणे विचार करता भाटतो समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान असल्याचे प्रकर्षाने जाणवते. तद्वतच अनेक रुढी परंपरा यामुळे स्त्रियांवर अन्याय शोषण, न्याय अधिकार यावर आधारित चळवळी व संघटना उभ्या राहिल्या.

भारतीय चळवळीचे तीन टप्पे करता येतात. पहिला टप्पा 1830–1915, दुसरा टप्पा 1915 ते 1940, तिसरा टप्पा 1947 पासून पुढे.

पहिल्या टप्प्यामध्ये मुख्यतः काही पुरोगामी पुरुषांच्या पुढाकारामुळे महत्त्वाचे बदल घडताना दिसतात. यामध्ये सतीबंदी कायदा (1829), विधवा पुनर्विवाह कायदेशीर मान्यता 1856 स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधक कायदा (1870) अंतर जमाती विवाहास मान्यता 1872 समती वयामध्ये वाढ, 1891 यांचा समावेश होतो. या संदर्भात विश्वरचंद्रा विधासागर, वीरेशलिंग पंतुलू, पंडित रमाबाई, राजा राममोहन रॉय, धोंडो केशव कर्वे, सुष्णलक्ष्मी, जोतिबा, सावित्रीबाई फुले यांचे कार्य महत्त्वाचे ठरते.

दुसऱ्या टप्प्यामध्ये भारतीय महिला परिषद, भारत स्त्री महामंडळ, विमेन्स इंडियन असोसिएशन (WIR) नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन फॉर इंडिया विमेन्स कॉन्फरन्स AIWC या संघटनांचा उदय होतो. या संघटित चळवळीद्वारे प्रांतामध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार 1921 बालविवाह प्रतिबंधक कायदा 1929 स्त्रियांना मर्यादित प्रमाणात मालमत्तेचा हक्क 1937 यासारखे महत्त्वपूर्ण बदल झाले.

उद्दिष्टये

संबंधित संशोधन पेपर सामाजिक संशोधनातील दुय्यम सामुग्रीच्या आधारे तयार करण्यात आला आहे.

1. स्त्री चळवळीच्या उदयाचा आढावा घेणे.
2. स्त्री चळवळीच्या आयामाचा आढावा घेणे.
3. स्त्री चळवळीचे नवे यश व मर्यादा यांचा अभ्यास करणे.
4. स्त्री चळवळीची पुढील आव्हाने जाणून घेणे.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळीचे पुन्हा तीन टप्पे करता येतात.

1947 ते 1970 या दशकापर्यंत राष्ट्रबांधणीच्या कार्याला प्राधान्य दिले गेले. अर्थात संविधानात अंतर्भूत मूलभूत हक्क व राज्याची मार्गदर्शक तत्त्वे यामध्ये स्त्रियांचे हक्क व अधिकार यांचा योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला. पण या तरतुदीच्या अंमलबजावणीत अपयशामुळे 1970 च्या दशकात स्त्री चळवळीचा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दुसरा टप्पा सुरू झाला.

असमान वेतन, स्त्रियांचे अकुशल कामगारात वर्गीकरण, विना मोबदला श्रम, सामजिक संस्थामधील जात, धर्म, कुटुंब इ. सत्तेच्या संरचनेतील पुरुषी वर्चस्व या समस्यावर भर होता. स्वातंत्र्योत्तर

VC PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

कालखंडातील 21 व्या शतकातील टप्प्यामध्ये स्त्री चळवळ स्त्री–पुरुष समानतेच्या पलिकडे जाऊन स्त्रियांची वैयक्तिक जीवन ठरवण्याची सत्ता व त्यांचे सबलीकरण यांसारख्या मुद्द्यांवर प्रकाश टाकते.

भारतामध्ये स्त्री चळवळीचा एक प्रवाह वरील आढाव्यावरून स्पष्ट होतो. आजही अनेक गंभीर स्त्री समस्या भारतीय समाजासमोर उभ्या आहेत. रुढी परंपराचा पगडा, प्रत्येक धर्मातील खाजगी जीवन नियंत्रित करणारे धार्मिक कायदे, विवाहित स्त्री–पुरुष प्रमाण, समाज नागरी कायद्याचा अभाव, कौटुंबिक हिस्सा, हुंडाबळी, बलात्काराच्या घटना, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न यांसारख्या समस्यांना स्त्री समाजाला आजही तोंड द्यावे लागते. या समस्याचे आकलन व त्यावरील उपाय याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

1975 साल हे संबंध जगभरच एका नव्या क्रांतीचे वातावरण निर्माण करवून गेले. या काळापर्यंत फ्रान्स, जर्मनी, व्हिएतनाम, लॅटिन अमेरिका, अमेरिकेतील ब्लॅक पँथर आंदोलन, चीनमधील नवजनवादी क्रांती अशा अनेक चळवळींतून समाजव्यवस्थेत बदल होत होते. स्त्रियांचे प्रश्न हे तर विश्वव्यापी आहेत हे लक्षात आल्यावर संयुक्त राष्ट्रसंघाने 1975 हे महिला वर्ष म्हणून घोषित केले आणि 8 मार्च हा महिला दिवस म्हणून घोषित झाला, त्यालाही वस्त्रोद्योगातील गिरणी कामगार स्त्रियांनी केलेल्या चळवळीचा संदर्भ होता. स्त्रियांचे प्रश्न यानिमित्ताने पृष्ठस्तरावर येऊ लागले आणि संबंध जगातच ते इतके जटिल होते की, पुढची दहा वर्षे महिला दशक म्हणून घोषित करण्यात आली. दुर्देवाने या घटनेला तीस वर्षे झाल्यावरही स्त्रियांच्या कित्येक समस्या अजून सुटलेल्या नाहीत.

स्त्री चळवळींचे नवे आयाम

देशाला लागलेले आणीबाणीचे ग्रहण 1977 मध्ये सुटले आणि देशभर स्त्रियांच्या चळवळी पुन्हा एकदा नव्याने जोर धरू लागल्या. अनेक स्त्री चळवळींचा मोठा सहभाग होता. स्त्री समस्या वर्गसापेक्ष असूनही प्रॉयोरिटी झीन मध्ये टाकण्यात आली. जशा ट्रेड युनियन, शेतकरी समिती इ. शाखा उदयाला आल्या. त्याचप्रमाणे स्वतंत्र, स्वायत्त, बिगरसरकारी संस्था स्त्रियांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मोठ्या प्रमाणात स्थापन झाल्या. परदेशातून अनुदाने मिळू लागली. 1977 मधील महिला दक्षता समितीला सरकारी जनता दलाचा पाठिंबा होता आणि त्याला प्रमिला दंडवते यांचेकडे स्त्रीचे नेतृत्व होते, त्यामुळे स्त्रियांचा आवाज संसदेपर्यंत पोचू शकला आणि काही कायदेविषयक सुधारणा दृष्टिपथात आल्या.

याच सुमारास बिहारमधल्या बोधगया जिल्ह्यात जयप्रकाश नारायणांच्या विचारसरणीने प्रभावित झालेल्या छात्र युवा संघर्ष समितीच्या महिला शाखांनी मंदिरातील महंताच्या सावकारी पाशात असलेल्या कित्येक जमिनी भूमिहिनांना परत मिळवून दिल्या. 1980 मध्ये त्यांनी 'औरत' नावाचं एक पोस्टर प्रसिद्ध केले. त्यात म्हटले होते की, समाज बदलेल तेव्हा व्यक्ती बदलेल आणि जेव्हा व्यकती बदलेल तेव्हा समाज बदलेल. त्यासाठी पुरुष–पुरुष, पुरुष–स्त्री आणि स्त्री–स्त्री यांच्यातलं नातं बदलावं लागेल. याच काळात पुरुषांच्या वर्चस्वाचे मुद्दे चर्चेत आले, तेव्हा बोधगयामध्ये एक स्त्री शिबीर आयोजित करण्यात आले. त्यात पुरुषांबरोबर जमिनीच्या मालकी हक्कात स्त्रियांचेही नाव लावले जावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली. तथापि ही संघटना फक्त स्त्रियांचीच नसल्याने स्त्रियांच्या मागण्यांचा फारसा प्रभाव पडू शकला नाही.

राजकीय पक्षांशी संबंधित स्त्री शाखेच्या कार्यकर्तृत्वाला नेहमीच मर्यादा पडत गेल्या आणि त्या त्या राजकीय पक्षांच्या धोरणाबाहेर जाऊन काम करणेही अशक्य झाले. सत्तरच्या दशकातील उत्तरार्धात दिल्लीमध्ये 'समता' किंवा 'स्त्री संघर्ष' या नावाने एकत्र आलेल्या गटांत कोणतीही स्त्री राजकीय पक्षाची असणार नाही याची कळजी घेण्यात आली.

दिल्लीतील मानुशी गट करत असलेले 'ओम स्वाहा' हे पथनाट्य आणि महाराष्ट्रात ज्योती म्हापसेकरांनी लिहिलेल्या 'मुलगी झाली हो' या पथनाट्याचे रस्त्यावर प्रयोग करून सामान्य स्त्री–पुरुषांपर्यंत स्त्रियांवरचे अन्याय, हुंड्यासाठी होणारे छळ, स्त्रियांना जिवंत जाळण्याच्या घटना इत्यादी प्रश्नांची झळ सर्वदूर पोचवली. अश्लील पोस्टर्सबद्दलची निदर्शने, जाहिरातीतील स्त्री शरीराचे

प्रदर्शने, नाटक–सिनेमांमधील अश्लील दृष्ये आणि भाषा यांच्याबद्दल मोर्चे काढून स्त्री संघटनांनी स्त्रियांच्या अवमूल्यनाकडे समाजाचे लक्ष वेधले.

विद्यापीठांमधून स्त्रीविषयक अभ्यासक्रम व स्त्री अभ्यास केंद्रे सूरू झाली. संशोधनाच्या स्तरावर स्त्री प्रश्न आल्यामुळे स्थूल आणि सूक्ष्म या दोन्ही पातळ्यांवर तळागाळातल्या स्त्रीच्या जगण्यापासून उच्चस्तरीय स्त्रीच्या जीवनशैलीबद्दल अनेक वास्तवे उजेडात येऊ लागली आणि सर्वच स्तरावरील स्त्रियांच्या शोषणाचा विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भात अभ्यास सुरू झाला. पितृप्रधानता, लिंगभाव यासंबंधी मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र यांच्या दृष्टिकोनातून नवीन संशोधनाला चालना मिळाली. स्त्री चळवळींच्या पायावरच स्त्रीवादी साहित्याची इमारत उभी राहिली आणि मराठी साहित्यात तिने एक नवा प्रयोग आणला. विवाहातील दुय्यम भूमिका, समाजाची दुटप्पी नीती, पुरुषसत्ताकाची अरेरावी, स्त्रियांचे दडपलेपण, लैंगिक शोषण इत्यादी अनेक प्रश्नांवर धीट भाष्य करणाऱ्या कविता, कथा, कादंबऱ्या यांनी स्त्री जीवनाचे वास्तव जगासमोर उघड केले.

स्त्री चळवळींची व्याप्ती आणि जरुरीही दिवसेंदिवस वाढत आहे. हुंडाबळी, हिंसाचार, बलात्कार, एकतर्फी प्रेमातून हत्या, गर्भलिंग परीक्षा, स्त्री–भ्रूण हत्या, स्त्रियांचे विकृत चित्रीकरण, कौटुंबिक अत्याचार, स्त्रियांचा व्यापार आणि विक्री, परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न, अंधश्रद्धेने दिले जाणारे कुमारिकांचे बळी, बालिकांचे लैंगिक शोषण, स्त्री प्रश्नांची ही मालिका संपता संपत नाही. गेली 30–35 वर्षे स्त्रियांच्या चळवळी यातील एकके प्रश्न घेऊन लढू लागल्या.

स्त्री चळवळींचे यश अन् मर्यादा

स्त्री संघटनांच्या खऱ्या अर्थाने कृतिशील चळवळीची 1975 ते 2000 ही 25 वर्षे होती. स्त्रियांचे प्रश्न अगणित आणि स्त्री चळवळींची शक्ती मर्यादित आणि आपल्याला भौगोलिक क्षेत्रातल्या प्रश्नांची बांधिलकी जास्त मानणारी. त्यामुळे काळी विधायक कार्यक्रम हाती घेऊन स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी पावले उचचलेली दिसून येतात. स्त्री मुक्ती संघटनेने 'स्त्री मुक्तीची ललकारी' हे चळवळीतल्या प्रबोधनात्मक आणि मनोरंजनात्मक सोप्या चालीवरच्या गाण्याचे पुस्तक तयार केले. ते इतके लोकप्रिय झाले की त्याच्या पन्नास हजार प्रती खपल्या.

महिला मंडळे, कारखाने, शेतमजूर स्त्रिया यांच्यासमोर कलापथकाचे कार्यक्रम करताना सुरुवातीला जोशपूर्ण म्हटल्या जाणाऱ्या या गाण्याने एकोप्याची भावना निर्माण होई आणि उत्साहपूर्ण वातावरणात पुढचे कार्यक्रम सादर होत. 'मुलगी झाली हो' हे असेच पथनाट्या आणि प्रभावीपणे त्यातून दिसणारी स्त्री जीवनाची विदारक शोकांतिका यामुळे इतके परिणामकारक ठरले की त्याची 1200 हून अधिक प्रयोग झाले. नऊ भाषेत त्याचे रुपांतर होऊन ते इतर राज्यांमध्ये पोचले. आंतरराष्ट्रीयच महिला अधिवेशनातही ते सादर करण्यात आले. 1986 मध्ये याच स्त्री मुक्ती संघटनेने 'प्रेरक ललकारी' हे मुखपत्र सुरु केले. स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण, दारिद्रय, बेकारी, हिंसा, कुटुंबनियोजन, स्त्रीविषयक कायदे आणि पर्यावरण हे विषय त्यात प्रामुख्याने चर्चिले जात. दृश्य माध्यमे ही लिखित माध्यमांपेक्षा अधिक परिणामकारक असतात. त्यामुळे मासिक पाळी, गरोदरपणा, बाळंतपण यांची शास्त्रशुद्ध माहिती देण्यासाठी 'कहाणी नहाणीची', 'कहाणी नऊ महिन्यांची', 'कहानी जन्माची' असे स्लाइड शो तयार करण्यात येऊन ते स्त्रियांपर्यंत पोचवले गेले. याच काळात पुण्यातून 'बायजा' मासिक निघत होते. ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न आणि त्यासाठी चालणारे विविध उपक्रम यावर या मासिकाचा विशेष भर होता. 'मिळून साऱ्या जणी' हे मासिकही स्त्री प्रश्नांनाच वाहिलेले असून गेली चौदा वर्षे स्त्री–पुरुष संवादावर विशेष भर देऊन ते अव्याहतपणे चालू आहे. 1983 मध्ये 'सहेली' या दिल्लीतील स्त्री संस्थेने भारतातील स्त्री प्रतिनिधींची एक कार्यशाळा घेतली. स्त्रियांच्या जीवनात सकारात्मकता आणणे, स्त्रियांची एकजूट घनिष्ठ करणे, विविध प्रांतातील स्त्रियांमध्ये संवाद प्रस्थापित करणे,

2000 पूर्वीच्या स्त्री चळवळींपुढे अनेक आव्हाने होती आणि आपापल्या मर्यादित कुवतीत त्यांनी त्यातून वाढ काढलीही. विशेषतः रात्री, अपरात्री घरातून बाहेर काढल्या गेलेल्या, शोषित, अत्याचारग्रस्त, घटस्फोटित स्त्रियांसाठी तात्पुरती निवारा केंद्रे, मोफत वकिली सल्ला, समुपदेशन, आर्थिक–मानसिक

आधार, रोजगाराची व्यवस्था यासाठी स्त्री मुक्ती संघटना, नारी समता मंच, भारतीय स्त्री शक्ती जागरण, स्त्री आधार केंद्र इत्यादी अनेक संस्थांनी अशी तात्पुरती निवारा केंद्रे काढली. पुढील काळात चोवीस तास सल्ला देणारी हेल्पलाइन सुरू झाली. महिला दक्षता समितीने मुंबई, दिल्ली, बंगळरू, हैदराबाद इथे शासनमान्य कुटुंब सल्ला केंद्रे सुरू केली. कायदेविषयक सल्ला देणारी केंद्रे उघडली. दिल्ली, कर्नाटक, आंध्रप्रदेश इथे आप्तकालीन निवारे उभे केले. मुंबईत 3 हजार प्रकरणात केंद्रामार्फत वैद्यकीय, मानसोपचार, पोलीसांशी संवाद इत्यादी मदत देण्यात आली. स्त्रियांशी संबंधित कायद्यातील त्रुटी दूर होण्यासाठी कायदाविषयक अभ्याससत्रे भरवण्यात आली, तर पुण्याच्या समजावादी महिला सभेने शासनाच्या सहकार्याने जन–केंद्रे (कम्युनिटी सेंटर्स), आरोग्य केंद्रे, साक्षरता केंद्रे सुरू केली. समाजवाद, कायदे, आरोग्य, शिक्षण या विषयांवर 16 पुस्तिका प्रसिद्ध केल्या. फिलिप्स इंडियाच्या सहकार्याने लाकडी खेळणी करणे, वायर वाइंडिंग, ड्रिलिंग करणे अशी कौशल्ये शिकवून अर्थार्जनाची सोय करण्यात आली. नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी पाळणाघराची जरुती होती, अनेक स्त्री संस्थांनी त्या काळात अशी पाळणाघरे सुरू केली.

स्त्री–पुरुष समानता, विवाह संस्था, जोडीदाराची निवड, लैंगिक शिक्षण इत्यादी स्त्रीविषयक मुद्दे घेऊन महाविद्यालयीन मुलामुलींची शिबीरे आयोजित केली. कुमारवयीन मुलामुलींची जिज्ञासा, मूल्यशिक्षण, किशोरवयीन मुलींना वयात येताना मार्गदर्शन यासाठी स्त्री मुक्ती संघटनेने जिज्ञासा प्रकल्प हाती घेतला. पालिकेच्या शाळेतील 2000 मुलींना मार्गदर्शन केले. शाळांमधून पालकांसाठी समुपदेशन केंद्रे काढण्यात आली. मुलींच्या शिक्षणात येणाऱ्या अडचणी, सोयींचा अभाव, आर्थिक दुर्बलता, गैरसोयी, असुरक्षितता याकडे महिला आघाडीने विशेष लक्ष केले दिले. जीवनावश्यक वस्तू विजेचे वाढते दर यावर नियंत्रण असावे, स्वस्त धान्य दुकानातील भ्रष्टाचाराला आळा घालावा. पिण्याचे पाणी सहज उपलब्ध व्हावे, प्रसारमाध्यमातील अंधश्रद्धा व धार्मिक कट्टरतावाद थांबवावा, लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी तोडली जावी, असंघटित क्षेत्रातील स्त्रियांनी एकत्र येऊन आपल्या मागण्या मांडाव्यात. त्यांनाही बोनस व बाळंतपणाची हक्काची रजा मिळावी इत्यादी मागण्या स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समितीने वारंवार करून त्यांचा पाठपुरावा केला. घरकाम करणाऱ्या कामकरी स्त्रियांन पुण्यात उत्स्फुर्त संप केला व त्यातून मोलकरीण संघटना तयार झाली. लाल निशाण पक्षातील स्त्री कार्यकर्त्यांनी त्यांना सतत पाठिंबा दिला. अंगणवाडी योजनेमुळे एक लाखांवर स्त्रियांना रोजगार मिळाला. अंगणवाडी स्त्रियांची एकजूट चांगली असून आपल्या मागण्यांसाठी त्या वारंवार मोर्चे काढतात. धरणे धरतात. परिचारिका संघटनाही वेळोवेळी आपल्या मागण्यांसाठी जागरुक राहून एकजुटीने काम करत आहेत. कचरा वेचक स्त्रियांची संघटना बांधणे, त्यांना परवाना मिळवून देणे, भंगार मालाला योग्य भाव मिळवून देणे, ओला–सुका कचरा वेगळा करण्याचे शिक्षण, ओल्या कचऱ्याचे खत बनवणे, त्यांच्या मुलांसाठी खेळवाडी चालवणे, मुलींना शिकायला प्रवृत्त करणे इत्यादी कामे जशी स्त्री मुक्ती संघटनेतर्फे चालतात तशीच निरंतर शिक्षण योजनेमार्फत एस. एन.डी. विद्यापीठातही चालतात. याशिवाय नर्मदा बचाव आंदोलन, अंधश्रद्धा निर्मुलन, पर्यावरण रक्षण, लोकविज्ञान चळवळ, अण्वस्त्र विरोधी मोहीम यातही स्त्री चळवळींचा सहभाग राहिला.

स्त्री चळवळींचा अस्त

विसाव्या शतकाच्या शेवटच्या तीन दशकांत अशा अनेक स्त्री चळवळी अस्तित्वात आल्या. स्त्रियांवरच्या अन्याय निवारणाच्या कामी या चळवळींनी बहुमोल कार्य केले. स्त्रियांवरचे प्रश्न पृष्ठभागावर आणणे, सरकारचे त्याकडे लक्ष वेधणे, दबाव गट निर्माण करणे, कायद्यात विधायक बदल घडवून आणण्याजोगी परिस्थिती निर्माण करणे आणि मुख्य म्हणजे स्त्री सुद्धा माणूस आहे आणि पुरुषांइतकाच समाजाचा एक जबाबदार सदस्य आहे याची जाणीव स्त्री–पुरुषांच्या मनात करून देण्याचे महत्त्वाचे काम स्त्री चळवळींनी केले. पण गेल्या 10 ते 15 वर्षात स्त्री चळवळींचा हळूहळू ऱ्हास होत गेला, त्या प्रभावहीन झाल्या आणि काही प्रमाणात संपल्याही असे दृश्य आहे. त्यांची जागा राजकीय पक्षांच्या महिला आघाड्या, बिगरशासकीय संस्था, परदेशी फंडिंगवर प्रोजेक्ट घेऊन तेवढ्यापुरते काम करणाऱ्या संस्था,

बचत गट चालवणाऱ्या संस्था इत्यादींनी घेतली आहे. स्वायत्त स्त्री संघटना आणि हे नवे गट यांच्या मूलभूत दृष्टिकोनातच फरक आहे. समाजकार्य या विषयाची पदवी घेऊन या कार्यक्षेत्रात उतरलेल्या स्त्री–पुरुषांची बांधीलकी निरपेक्ष समाजसेवेची नसते. समाजकार्य हा त्यांच्या कार्यक्षेत्राचा भाग असला तरी त्यांना त्यातून पगार मिळतो. प्रोजेक्टवर फंडिंग मिळाल्यानंतर त्या प्रोजेक्टपुरती बांधीलकी मर्यादित होते. संस्था व काम चालू ठेवण्यासाठी समाजातील धर्मादाय संस्था, शासन व परकीय मदत यावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे स्त्री प्रश्नांची आता एक चाकोरी तयार झाली असून तुकड्याा तुकड्याने त्या त्या प्रश्नांचा विचार होतो. समग्र स्त्री वर्गाच्या उत्थापनाचा विचार त्यात अनुस्यूत नसतो.

पूर्वीच्या स्त्री चळवळींमध्ये एक उत्स्फुर्तता होती. घरदार सांभाळून समाजकार्याची हौस असलेल्या स्त्रियां, स्त्रियांवरच्या अन्यायाने व्यथित होणाऱ्या स्त्रिया, इतर अन्यायग्रस्त स्त्रियांच्या प्रति आपली भगिनीभावाने बांधीलकी मानणाऱ्या स्त्रिया, आपला वेळ आणि प्रसंगी पैसाही देऊ शकणाऱ्या स्त्रिया अशा विविध मनोवृत्तीच्या स्त्रिया एकत्र येऊन असे गट निर्माण झाले. हे वैविध्य ही त्यांची शक्ती होती, तशीच मर्यादाही होती. जेथे अशा गटांना खंबीर नेतृत्व लाभले ते गट टिकले व त्यांनी काही ठोस विधायक कामेही केली. या गटांची कार्यशैली अनौपचारिक होती. त्यामध्ये औपचारिक पदव्यवस्था वा गटशिस्तीचा अभाव होता. तसेच कोणाचेच गटावर खास नियंत्रण व मार्गदर्शन नव्हते. नवनवीन कार्यकर्त्यांना जोडून घेणे, आपले संख्याबळ वाढवणे, नवनवीन कार्यक्षेत्रे धुंडाळणे ही वृत्ती नव्हती. त्यामुळे हे गट त्यांच्या त्यांच्या कार्यकर्त्यांपुरते व कामापुरते मर्यादित राहिले. गटामध्ये वैचारिक भांडणे, एखाद्या प्रश्नासंबंधी मतभेद, कार्यपद्धतीबद्दल विकल्प यामुळे गट फुटत गेले, त्यांची शकती क्षीण होत गेली. काही काळापुरते भरघोस कार्य आणि मग संपुष्टात येणे सुरू झाले. या गटांमधून लोकशाही पद्धत अभिप्रेत असली तरी त्यांच्यावर काहीजणींचे वैयक्तिक प्राबल्य व अधिकार केंद्रितता आली व नेत्या म्हणून त्यांना अधिक प्रसिद्धी मिळाली. काही कार्यकर्त्यांनी यामुळे निराश होऊन गटाला रामराम ठोकला.

सारांश

भारतात स्त्री चळवळींचा मुख्य प्रवाह समाजवादी स्त्रीवादी राहिला आहे. वैचारिक जवळीकतेमुळे मार्क्सवादाशी त्याची जवळीक आहे. जनवादी महिला संघटना, भारतीय स्त्री शक्ती जागरण वगैरे काही संस्था मर्यादित कार्यक्षेत्रात अजूनही कार्य करत आहेत. पण विसाव्या शतकाची शेवटची दोन दशके ज्या अर्थाने स्त्री संघटनांनी गाजवली, तो करिश्मा आता राहिलेला नाही. काळाच्या ओघात पुढील भविष्यात कदाचित स्त्री संस्था पुन्हा मूळ धरतीलही, पण आता वर्तमानात तरी त्यांचे अधिष्ठान संपत गेले आहे.

संदर्भ सूची

1. स्त्री चळवळ : नवे परिमाण हवे – लता प्रतिमा मधुकर आंदोलन विशेषांक 1998.
2. महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळीचा मागोवा – महिला दिन विशेषांक, प्रबोधन प्रकाशन ज्योती फेब्रुवारी 2007.
3. समर्थ महिला समर्थभारत – योजना अंक 3 ऑक्टो. 2008.
4. स्त्री सबलीकरण समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या – चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
5. भारतातील सामाजिक चळवळी – डायमंड प्रकाशन, घनश्याम .....
6. महिला दिन विशेषांक – प्रबोशन प्रकाशन ज्योती, फेब्रुवारी 2008.
7. सक्षम महिला – प्रगत महाराष्ट्र – लोकराज्य मार्च 2010

2018-19

One-Day
Interdisciplinary National Seminar
on
Role of Women in Literature, Humanities, Commerce and Sciences

Organizer

Shri Datta Shikshan Prasarak Mandal, Panutre's

Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale

[Arts, Commerce & Science]

Tal – Panhala, Dist.- Kolhapur (416 205)

Maharashtra State

Ph. (02328) 232093, 232001.

Website : www.vpmkale.edu.in

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
161	डॉ. संभाजीराव आनंदा मोरे	पंडिता रमाबाई स्त्री स्वातंत्र्याचा अविष्कार	563 To 565
162	प्रा. डॉ. सुरेश मारूती चव्हाण	थोर समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक चळवळीतील योगदान	566 To 568
163	प्रा. संदिप भैरू जाधव	मध्ययुगीन भारतातील महान राज्यकर्ती : राणी रुद्रमा देवी	569 To 573

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Ka
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

मध्ययुगीन भारतातील महान राज्यकर्ती : राणी रुद्रमा देवी

प्रा. संदिप भैरू जाधव
विठ्ठलराव पाटील महाविध्यालय,
कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

गोषवारा :-

प्रामुख्याने भूतकाळाचा इतिहास हा बऱ्याचवेळा पुरुषी दृष्टीकोनातून पहिला जातो. सामान्यतः सर्व ऐतिहासिक लिखाणामध्ये स्त्रियांना गौण स्थानावर ठेवलेले दिसून येते. कारण स्त्री ही परावलंबी असते म्हणून तिच्याकडे पहिले गेले. त्यामुळे पुरुषांच्या कार्याला उजाळा दिला जातो व स्त्रियांच्या कार्याकडे दुर्लक्ष केले जाते. स्त्रियांच्या प्रशासकीय क्षमता इतिहासाच्या पानावर सामान्यपणे नसतात. पण थोडसे आपण इतिहासाकडे बारकाईने पाहिल्यास आपल्या लक्ष्यात येते कि, कित्तूरची राणी चेन्नम्मा, गोंडवानाची राणी दुर्गावती, काकतीय राणी रुद्रमादेवी, महाराष्ट्रातील ताराबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, रझिया सुलताना, चांदबीबी यासारख्या अनेक स्त्री सत्ताधीशांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही आपल्या कार्याचा ठसा इतिहासाच्या पानापानावर उमठविला आहे. यापैकीच एक वारंगळच्या काकतीय राज्याची राणी रुद्रमादेवीच्या कार्यावर आपण प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्रकाश टाकणार आहोत. राणी रुद्रमादेवी दक्षिणेतील काकतीय राजवंशातील प्रमुख शासकांमधील एक होती, जिने अत्यंत बिकट परिस्थितीत काकतीय राज्याचे प्राणपणाने रक्षण करून काकतीय राज्याला वैभवशाली दिवस आणले.

प्रस्तावना:-

अनेक शतकापासून आपण भारतातील महान पुरुष योद्ध्यांच्या विजयाच्या गाथा वाचत असतो. त्यामध्ये ते उत्कृष्ठ तलवारबाजी होते, घोडेबाजीमध्ये तरबेज होते आणि असेच काही. पण यामध्ये काही स्त्रियादेखील होत्या. आपण इतिहाकडे बारकाईने पाहिल्यास आपल्या लक्षात येते कि,अनेक स्त्री भारतीय सत्ताधीशांनी कठीण परिस्थितीतही आपल्या कार्याचा ठसा भारतीय इतिहासामध्ये उठविला. यामध्ये कित्तूरची राणी चेन्नम्मा, गोंडवानाची राणी दुर्गावती, महाराष्ट्रातील ताराबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, रझिया सुलताना, चांदबीबी, काकतीय राज्याची राणी रुद्रमा देवी या सर्व स्त्रिया लढाई लढल्या, त्यांनी सैन्यांचे नेतृत्व केले आणि महान सत्ताधीश बनल्या.

मध्ययुगीन भारतीय इतिहासामध्ये ज्या काही स्त्री सत्ताधीश वारसाहक्काने सिंहासनावर आल्या, त्यापैकी सध्याच्या आंध्र प्रदेश व तेलंगणाच्या भागातील काकतीय या स्वतंत्र सार्वभौम राज्याची राणी रुद्रमादेवी ही एक होती. जिने इ. स. १२६२ ते इ.स. १२८९ या काळात राज्य केले. दक्षिण भारतातील मध्ययुगीन इतिहासातील ती एकमेव यशस्वी राज्यकर्ती होती. शेजारील आक्रमक राज्यांचे हल्ले परतावून लावून तिने काकतीय राज्याचे रक्षण केले. काकतीय राज्याच्या अंतर्गत धोरणात धोरणात्मक बदल करून काकतीय राज्याला एक समृद्ध परंपरा दिली. त्यामुळे दक्षिण भारतीय लोकांनी तिच्या स्मृती जपून ठेवलेल्या दिसून येतात.

VC PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

उद्दिष्टे:-

१. एक स्त्री राज्यकर्ती म्हणून राणी रुद्रमादेवीचा अभ्यास करणे.

२. राणी रुद्रमादेवीच्या कार्याचा अभ्यास करणे.

३. राणी रुद्रमादेवीच्या इतिहासातील योगदानाचा अभ्यास करणे.

Methodology संशोधन पद्धती :-

या शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. त्यामध्ये पुस्तके, वर्तमानपत्रे संशोधन पत्रिका, लेख, मासिके यांचा साधन म्हणून वापर केला आहे.

सध्याच्या तेलंगाना व आंध्रप्रदेशावर राज्य करणाऱ्या वारंगळचा काकतीय राजवंश हा दक्षिण भारतातील एक महत्वाचा राजवंश असून त्याने भारतीय इतिहास व संस्कृतीला आकार दिला. काकतीय साम्राज्याची पायाभरणी गोदावरी व कृष्णा नदीच्या परिसरात आठव्या, नवव्या शतकात झाली. आरगळू Argallu आताचे नाव वारंगळ ही त्याची राजधानी होती.[१]

१३ व्या शतकातील वारंगळचा काकतीय राज्याचा सम्राट गणपतीदेव यास रुद्रम्बा म्हणजे रुद्रमादेवी व जनपमादेवी या दोन मुली होत्या. राजा गणपतीदेवाला मुलगा नसल्यामुळे त्याने आपली मुलगी रुद्रम्बाचा औपचारिकपणे मुलगा म्हणून प्राचीन काळापासून चालत आलेला पुत्रिका समारंभ केला व तिचे रुद्रदेव असे पुरुषवचणी नाव ठेवले. प्रत्येक राजकुमाराला जसे राजनिती, युद्धकला व प्रशासकीय नितीचे शिक्षण दिले जाते तसेच शिक्षण रुद्रमादेवीलाही लहानपणीच दिले गेले होते. रुद्रमादेवीचा विवाह पूर्वीय चालुक्यवंशीय निदडवेलू Nidadavolu या राजवंशातील वीरभद्र या राजकुमाराशी झाला होता.[२] हा विवाह भविष्यातील राजकीय दृष्टीकोनातून राजा गणपतीदेवाने घडवून आणला होता. वीरभद्रने विवाहानंतर रुद्रम्मादेवीच्या प्रशासनात भाग घेतल्याचा उल्लेख कोठेही मिळत नाही.या दाम्पत्याला दोन मुली झाल्या.

राजा गणपती देवाने त्याच्या उत्तरार्धात काकतीय राज्याचा विख्यात प्रधानमंत्री शिवदेव याचा सल्ला घेऊन वारसदार म्हणून रुद्रमादेवीचे नामांकन केले. जेव्हा रुद्रमादेवी १४ वर्षाची होती तेव्हा ती वडिलांचा वारसदार म्हणून काम पाहू लागली. पहिल्या दोन तीन वर्षामध्ये रुद्रमादेवीने वडिलांच्याबरोबर संयुक्तपणे राज्यकारभार केला. जेव्हा दक्षिणेतील पांड्य राजा जातवर्मा सुंदर पांड्य याने काकतीय राज्यावर आक्रमण केले आणि काकतीय राज्याचा त्यांच्या सहयोगी राज्यासह नेल्लोरजवळील मुत्तुकुर Muttukur च्या रणक्षेत्रात अपमानकारक पराभव केला.[३] काकतीय राजा गणपती देव शेवटी हे आक्रमण परतावून लावण्यात यशस्वी झाला असला तरी त्याने आपला काही प्रदेश व प्रतिष्ठा गमावली. त्यामुळे त्याचे जहागीरदारांवरचे वर्चस्व कमी झाले आणि वरिष्ठ अधिकारी (Nobels) डळमळीत झाले . त्यामुळे काकतीय राज्यात गोंधळ व अराजकता माजली. या

सर्व परिस्थितीमुळे राजा गणपतीदेव सक्रिय राजकारणातून निवृत्त झाला. त्यामुळे खरी सत्ता ही रुद्रमादेवीच्या हातात आली. त्यामुळे तिने प्रशासनात आपले लक्ष देण्यास सुरुवात केली.

राणी रुद्रमादेवी

वडील गणपतीदेव व पती वीरभद्र यांचा अल्पावधीतच मृत्यू झाल्याने रुद्रमादेवीला याचा मोठा धक्का बसला आणि या दु:खातून सावरणे तिला अशक्य बनले. ती पूर्णपणे उध्वस्त झाली आणि यातून तिने मरण्याचे ठरवले. परंतु राज्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी (Nobels) व मंत्र्यांनी राज्याची देखभाल घेण्याबाबत तिचे मन वळवून तिला तिचा निर्णय बदलावयास भाग पाडले. शेवटी राणी रुद्रमादेवीने इ. स. १२६९ ला राज्याभिषेक केला.[४]

एका स्त्रीने राजा म्हणून राजगादीवर बसणे आणि राज्यकारभार चालवणे हे काही वरिष्ठ अधिकारी व तिच्या जवळच्या नातलगांना सहन न होणे स्वाभाविक होते. त्यामुळे हरिहरा देव (Harihara Deva) व मुरारी देव (Murari Deva) या तिच्या चुलतभावानी काही अधिकाऱ्यांच्या सहाय्याने एक स्त्री राज्यकर्ती म्हणून रुद्रमादेवीविरोधी बंड केले. पण रुद्रमादेवीने अतिशय चाणाक्षपणे जगनीदेव (Jaganideva) व गोना गणा रेड्डी (Gona Ganna Reddy) यासारख्या कार्यक्षम वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहाय्याने हे बंड मोडून काढले.[५]

राजा गणपती देवाने कलिंगच्या राज्याचा पराभव केला होता. काकतीय राज्यात निर्माण झालेल्या अंतर्गत परिस्थितीचा फायदा घेऊन आपल्या पराभवाचा बदला घेण्यासाठी व गेलेला प्रदेश परत मिळवण्यासाठी कलिंग राजा नरसिंहम पहिला (Narasimha-I) याने गोदावरी मुखाजवळील त्रिभुज प्रदेशात सर्वशक्तीनिशी हल्ला केला व तो प्रदेश जिंकून घेतला. पण काही काळानंतर नरसिंहम पहिला याचा पुत्र व उत्तराधिकारी कलिंग राजा वीरभानूदेव पहिला (Vira Bhanudeva-I) व त्याचा साथीदार अर्जुनदेव यांचा पराभव पोती नायक (Poti Nayak) व प्रोली नायक (Proli Nayak) या रुद्रमादेवीच्या सेनापतींनी केला.[६] अशाप्रकारे आंध्र किनारपट्टीवर काकतीय राज्याची सत्ता पुनर्प्रस्थापित झाली.

Interdisciplinary International Conference contemporary Issues & Challenges in Social Sciences & Languages

22nd Sept.2018

Organizer

Department of Political Science,

Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

Special Issue published By

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

ISSN 2349-638x

Peer Review and Indexed Journal

Impact Factor 4.574

Website www.aiirjournal.com

Email :- aiirjpramod@gmail.com

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
277	विजय मारोती मगरे ज्ञानेश्वर आत्माराम कोळूके	भारतीय लोकप्रशासन आणि समस्या	1045 To 1047
278	विनायक यशवंत वनमोरे	भारतातील कापड उद्योगाची वाटचाल आणि समस्या	1048 To 1051
279	डॉ.सचिन महादेव पाटील	भारतातील वाढती असहिष्णुता	1052 To 1057
280	वैशाली तातोबा चौगुले	बहादूर थापा आणि इतर कविता – एक आकलन	1058 To 1064
281	मोनालिसा अरुण खानोरकर	अर्थशास्त्राच्या तत्त्वज्ञानाचे सामाजिक महत्व	1065 To 1066
282	मारोती बालाजी जाधव	World Cat - वर्ल्ड कॅट एक आदर्श ग्रंथालय संकल्पना	1067 To 1069
283	डॉ. संजय गव्हाणे	सद्यःस्थितीत भारतीय संसदीय लोकशाही व्यवस्थेसमोरील आव्हाने	1070 To 1074
284	डॉ. वंदना अरूण सातपुते	लोकप्रशासनावर माहिती तंत्रज्ञानाचा पडलेला प्रभाव व परिणाम	1075 To 1076
285	डॉ. व्ही. एच. मटकर	भारतीय लोकशाही प्रकिया आणि राजकारण	1077 To 1080
286	अभय विष्णू मनसरे	नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील कापूस पीकाच्या उत्पादनाचा तुलणात्मक अभ्यास	1081 To 1083
287	डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे	नक्षलवादी चळवळीचे बदलते स्वरुप	1084 To 1086
288	दुर्गाप्रसाद विश्वासराव बोरकर	लोकशाही शासन व्यवस्थेसमोर आंदोलने एक आव्हाण	1087 To 1088
289	प्रा. बालाजी गणपतराव भंडारे	समकालीन जगण्याचा तळ शोधणारी व भीषण वास्तवाचे भान देणारी कविता :' माझ्या वर्तमानाची नोंद '	1089 To 1093
290	प्रा.डी.एस. सोनकांबळे	भारतीय शेतकऱ्यांच्या समस्या	1094 To 1096
291	प्रा.डॉ. कृष्णा भवारी	आदिवासी महादेव कोळी जमातीचे समाजशास्त्र आणि भाषिक आव्हाने	1097 To 1099
292	प्रा.डॉ.मधुकर धुतुरे	स्त्री–भ्रूण हत्या : एक सामाजिक समस्या	1100 To 1105
293	प्र.निर्मल तुकाराम बाघव	शिक्षणामध्ये नवीन तंत्रज्ञानाची भूमिका	1106 To 1111
294	प्रा.राजदेव हरी पाटील	समकालीन साहित्यप्रवाह	1112 To 1115
295	डॉ.सोनेर प्रभाकर कावडे	भारतीय राज्यघटना निर्मितीमधील स्त्रीयांची भूमिका	1116 To 1119
296	सविताबाई चंद्रकांत रामगिरवार	सुशासनाची गुरुकिल्ली : ई–प्रशासन	1120 To 1125
297	डॉ. सुनंदा विकास पाटील	ग्रंथालया समोरील बहुपैलू आव्हाने	1126 To 1130
298	डॉ. नेवलिनी बी. मुडेवर	पर्यटन क्षेत्र : आर्थिक विकास व आव्हाने (विशेष संदर्भ – भारत)	1131 To 1136

I/C PRINCIPAL
Vithalrao Patil Mahavidyalaya Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

स्त्री-भ्रूण हत्या : एक सामाजिक समस्या

प्रा.डॉ.मधुकर धुतुरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता.पन्हाळा,
जि.कोल्हापूर.

प्रस्तावना

भारतामध्ये प्राचीन काळापासून स्त्रिला अगदी दुय्यम दर्जा देण्यात आला आहे. कुठल्याही गोष्टीत तिने ढवळाढवळ केलेली पुरुष वर्गाला चालत नाही. स्त्रीने फक्त चूल आणि मूल सांभाळावी अशी सक्ती असते. आता आपणाला हे चित्र बदलतयं असे वाटत असले तरी तो भ्रम आहे. कारण स्त्री कितीही शिकली तरी तिच्या वडिलांना मुलाच्या बापाला हुंडा हा द्यावाच लागतो. आणि हेच कारण की काय म्हणून या मुलीला जन्म देण्याआधीच मारले जाते. सोनोग्राफीद्वारे मुलगा की मुलगीचे निदान केले जाते. मुलगा असेल तर ठीक नाहीतर मुलगी असेल तर तिचा गर्भ तिथेच खुडला जातो.

ज्या लोकांचा या पद्धतीला विरोध असतो. त्याच्यावर जेव्हा ही वेळ येते. तेव्हा त्यांना सुद्धा मुलीचा जन्म नकोसा असतो. पण हे कुणीही उघडपणे सांगत नाही. याला एखादा अपवाद असतो नाही असे नाही पण मुलगी म्हणजे परक्याचे धन हीच गोष्ट अजून कुणाच्या मनातून जात नाही. तिला लहानाचे मोठे करायचं, शिकवायचं, व्यवस्थित पालन पोषण करायचे आणि एकं दिवस परक्या घरी विवाह करून द्यायचा. त्यात आपण ही जमेची बाजू धरली तर त्या निष्पाप बाळाला हे जग बघण्या आधिच त्याचा अंकूर खोडून टाकायचा हा कुठला न्याय आहे.

आपण जेव्हा सकाळी पेपर उघडतो तेव्हा कुठे ना कुठे तरी आपणाला कुठल्यातरी डॉक्टरांना सोनोग्राफीचा बेकायदेशीर वापर करून गर्भलिंग निदान केल्याची बातमी वाचण्यास मिळते आणि पोलीसांनी त्यांना अटक केली हे वाचून बऱ्याच जणांचे पित्त खवळत असलेही हा जो काय भयंकर प्रकार चालला आहे त्यांचा खूप मोठा परिणाम आपल्याला भोगावा लागणार आहे. निसर्गाच्या विरूद्ध जर काही घडत असेल तर निसर्ग त्याचा परिणाम दाखवल्याशिवाय राहणार नाही आणि आपणाला माहितही असेल की चालू वर्षी पुरुषांच्या मागे स्त्रियांचे प्रमाण १४४ असे आहे. या प्रमाणात अशीच तफावत होत राहिली तर आपणाला कुठल्या परिणामाला तोंड द्यावे लागेल? हा विचार करणे अतिशय अपरिहार्य आहे.

उद्दिष्टे

प्रस्तुत शोध निबंध हा सामाजिक संशोधनातील दुर्य्यम तथ्यांच्या आधारित आहे.

१. स्त्री-भ्रूण हत्येच्या कारणांचा आढावा घेणे.
२. स्त्री-भ्रूण हत्येच्या परिणामांचा आढावा घेणे.
३. स्त्री-भ्रूण हत्या कमी करण्यासाठी उपाययोजनांचा आढावा घेणे.

भारतातील लिंग गुणोत्तरातील बदल हा गेली अनेक दशके लोकसंख्यातज्ञ, सामाजिक शास्त्रज्ञ व आरोग्य विशेष तज्ञामध्ये चर्चेचा विषय बनला आहे. अलिकडेच त्यांची व्याप्ती चार भिंती आडच्या बौद्धिक चर्चेकडून या विषयासंबंधी जनजागृती साधण्याच्या दिशेने वाटचाल करू लागली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील उखअ व णछत्रझअ सारख्या पूर्णतया भिन्न संस्थांनी वेगवेगळ्या कारणासाठी लक्षावधी भारतीय लढ्याच्या जन्मापूर्वी किंवा जन्मानंतर केल्या जाणाऱ्या निःशब्द संहाराबदल व परिणामी भारताच्या विषम गुणोत्तराबद्दल चिंता व्यक्त केली आहे. सामाजिक, आर्थिक निर्देशांकांशी पडताळून पाहणारे जुने सिद्धांत व मापदंड आता कालबाह्य ठरले आहे. तरी देखील दुसरीकडे, लिंगभेदात्मक गर्भपातासारख्या सामाजिक घडामोडीची संभाव्य कारणमीमांसाही अस्पष्ट आहे. या लोकसंख्यात्मक आपत्तीच्या महाकाय

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

व्याप्तीबद्दल जरी बहुसंख्य जनता अनभिज्ञ असली तरी समाजातील संवेदनशील व सचेतन घटक या समस्यांचा वेध घेण्यास व त्यावर उपाय शोधण्यास उत्सुक आहेत.

एका विशिष्ट प्रदेशात पुरुषांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होण्याने त्या प्रदेशाच्या लिंग गुणोत्तरावर परिणाम हा होणारच. खालील तक्त्यात लिंग गुणोत्तर दर्शविणारे तक्ता आहे.

निवडक देशाचे लिंग गुणोत्तर

अ.नं.	देश	लिंग गुणोत्तर
१)	कतार	८३५
२)	कुवैत	६५८
३)	युएई	६९९
४)	भारत	९४३
५)	चीन	९४३
६)	बांग्लादेश	९५२

वरील तक्त्यामध्ये काही निवडक देशांचे लिंग गुणोत्तर दिले आहे. या तक्त्यावरून स्पष्ट होते की, आखातीय देशातील कमी लिंग गुणोत्तर हे मुख्यत्वे त्या देशात पुरुषांच्या स्थलांतरामुळे आहे तर भूतपूर्व रशियन प्रजासत्ताकमधील अत्याधिक लिंग गुणोत्तर हे मुख्यत्वे त्या प्रदेशाबाहेर होणाऱ्या पुरुषांच्या स्थलांतराशी निगडीत आहे. मात्र चीन व दक्षिण आशियातील कमी लिंग गुणोत्तर हे ह्या समाजातील पुरुष वर्चस्वामुळे स्त्रियांच्या जन्मदरात होणारी घट व त्यांच्या मृत्यूदरात होणाऱ्या वाढीशी संबंधित आहे. परंतु स्थलांतरासारख्या कारणाच्या अभावी, सतत घटणाऱ्या लिंग गुणोत्तरास संबंधित समाजात स्त्रियांना जगण्याच्या संधी कमी असतात. या निष्कर्षाप्रत आपण सुचवू शकतो.

जन्माच्यावेळी लिंग गुणोत्तर हे अधिक उपयुक्त मापक आहे. सामान्यतः प्रत्येक हजार पुरुषामागे जन्मणाऱ्या स्त्रियांची संख्या ही ९३४-९५३ असणे स्वाभाविक मानले जाते. त्यामुळे कुठल्याही सांख्यिकीदृष्ट्या महत्त्वपूर्ण लोकसंख्येत या प्रमाणापासून विचलन आढळल्यास ती तज्ञ व घोटर्णहत्यासाठी धोक्याचा इशारा ठरतो. किंबहुना याच निकषाच्या दक्षिण कोरियातील स्त्री रोग तज्ञांनी देशात मोठ्या प्रमाणात लिंग भेदात्मक गर्भपात होत असल्याचे आढळले. भारतात मात्र अजूनही अनेक ठिकाणी गरोदरपण व अर्भकाच्या सुश्रुषेला संख्यात्मक पाठबळ नसल्यामुळे जन्म नोंदणी पद्धतीमध्ये बऱ्याच त्रुटी राहतात. परिणामी जेथे १०% जन्म नोंदणी होते अशा मुंबई सारख्या महापालिका वा सुक्ष्म अभ्यासाखालील काही विभाग वगळल्यास जन्मावेळचे लिंग गुणोत्तर हे देखील लिंग भेदात्मक गर्भपात व त्यांचा लोकसंख्यात्मक संतुलनावर होणारा परिणाम जोखण्यासाठी उपयुक्त साधन नाही या पाईक भूमीवर.

सामाजिक संदर्भ जाणून घेणे आवश्यक ठरते. खोलवर रुजलेली पितृसत्ताक मूल्याव्यवस्था, परंपरा, रुढी, श्रद्धा व त्यांना शतकानुशतके पाठबळ पुरवणारे धर्माचरण यांच्या संदर्भ चौकटीतच संपूर्ण भारतात व त्यांच्या विशिष्ट प्रदेशात होणारे लिंग गुणोत्तरातील व बाल लिंग गुणोत्तरातील बदल नीट उकलता येतील. त्यामुळे देशात सती, स्त्री अर्भक हत्या, वधुना जाळणे, स्त्री-भ्रूण हत्या ते गर्भधारणापूर्व लिंगनिवड यासारख्या स्त्री निःपाताच्या विविध पद्धती एकत्र नांदताना आढळल्यातर संशोधकांनी त्यांचे आश्चर्य वाटून घेऊ नये. यात जात, वर्ग, सत्तीबरोबर पितृसत्ताकतेची दिन हजारो घटातून व्यक्त होत असते.

भारतातील दक्षिणेकडील राज्यामधील लिंग गुणोत्तर हे उत्तरेतील राज्यापेक्षा नेहमीच अधिक राहिले आहे. यासाठी त्यांनी उत्तरेतील वाढीव स्त्री मृत्यूदरास जबाबदार धरले. वृद्धापकाहात मूलाच्या आधाराचे आर्थिक मूल्य तर दुसरीकडे हुंडा पद्धतीमुळे मुलगी ही कुटुंबावर भार असते या समजुतीची भारतामध्ये पुत्र प्राप्तीसाठी हव्यास बळावला. १९८१ च्या

[illegible] लिंग गुणोत्तराविषयीच्या गंभीर चर्चेस प्रारंभ झाला. वाढता माता मृत्यूदर, मुलीच्या [illegible] स्त्री अर्भक हत्या व जनगणनेतील पुरुषी पूर्वग्रह यांना लोकसंख्येतील स्त्रियांच्या घटतया [illegible] वैद्यकीय सेवा व पोषण याबाबत स्त्रियांप्रती उत्तरेत केला जाणारा भेदभाव तसेच उत्तर [illegible] स्त्रीच्या तफावतीमुळे या विभागाच्या लिंग गुणोत्तरात फरक आढळून येतो.

[illegible] बिहार, राजस्थान व उत्तरप्रदेश या राज्यासाठी इखचअठण हा आद्याक्षरी शब्द रूढीपूा [illegible] लोकसंख्या या राज्यात असून लोकसंख्या वाढीतील त्यांचे योगदान ४२% आहे व भारतातील [illegible] या कारणास्तव त्यांनी त्यांना इखचअठण म्हणून संबोधले. या राज्यातील सामाजिक दुर्दशेमुळे [illegible] मग तो प्रजनन दर असो वा साक्षरतेचे प्रमाण त्याच बरोबर माता मृत्यू दर असोत, त्याचा [illegible]

प्रसुतिपूर्व गर्भलिंग चाचणी

१९७५ मध्ये नवी दिल्लीतील ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस मध्ये गर्भजल परीक्षेसारख्या प्रसुतिपूर्व गर्भलिंग चाचणी सुतोवाच होतो ना होतो तोच त्या'पद्धतीचा लिंग निर्धारणासाठी व नंतर स्त्री-भ्रूण हत्येसाठी गैरवापर सुरू झाला. १९७८ मध्ये मिळाली केंद्र सरकारने त्यावर्षी अधिसूचनेद्वारे सरकारी आस्थापनात या चाचणीच्या गैरवापरावर बंदी आणली व परिणाम तिचा खाजगी वैद्यकीय क्षेत्रावर फैलाव झाला. मुंबई, दिल्ली, पंजाब व गुजरातमध्ये झपाट्याने लिंग निर्धारणेचा धंदा फोफावला व तेथून तो पश्चिम व उत्तर भारतातील इतर प्रदेशात पसरला. या प्रदेशात पुत्र प्राप्तीबद्दल हव्यास व स्त्री अर्भकाकडे दुर्लक्ष करण्याचा हव्यास असल्यामुळे लिंग गुणोत्तर घसरू लागले.

२००१ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार दोन चांगल्या बाबी हाती आल्या. एक प्रजनन स्तराव झालेली घट व दोन सार्वकि लिंग गुणोत्तरात ९२७ ते ९३३ अशी नोंदविण्यात आली. परंतु या आकडेवारीत अस्वस्थ करणारी अन्य माहितीही होती. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्याबाबत उत्तर व दक्षिणेधमील वाढती दरी व बाललिंग गुणोत्तराची ९४५ वरून ९२७ वर झालेली घसरण ह्या त्यातील काही ठळक बाबी होत्या. २००१ मध्ये इतके निम्न बाललिंग गुणोत्तर असलेले १४ जिल्हे निघाले. ८००-८४९ या दरम्यान बाललिंग गुणोत्तर असलेल्या जिल्ह्याची संख्या १ वरून ३१ वर पोहोचली. १००० हून अधिक बाललिंग गुणोत्तर असलेल्या जिल्ह्याची संख्या २१ वरून ५ वर रोडावली.

स्त्री हत्येच्या विविध पद्धती

जनगणना २००१ मधील बाल लिंग गुणोत्तरातील मोठी घट ही स्त्री निर्दलनाच्या विविध पद्धतीमध्ये घडून आली आहे. हे वेगळे सांगावयास नको. त्यातही स्त्री अर्भक हत्या जी काही जिल्ह्यातील ठराविक जातीमध्येच प्रचलित आहे आणि दुर्लक्ष आणि भेदभावपूर्ण वागणुकीमुळे मुख्यत्वे इखचअठण राज्यातील निम्न समाज स्तरात घडणारे बालिकेचे / मुलीचे मृत्यू यापेक्षा लिंग भेदात्मक गर्भपात हे स्त्री हत्येचे अधिक विकसित स्वरूप आहे. तांत्रिकदृष्ट्या सुक्ष्म, कुशल, तत्काळ व अधिक गोपनीय आहे. समाजात प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या उच्चभ्रू व मध्यमवर्गात त्याचा वापक प्रमाणात अवलंब होतो. संस्कृतीकरणाच्या कचाट्यात सापडलेले समाजातील इतर मोठे स्तर त्यांचे अनुकरण करतात. सुदैवाने स्त्री हत्येचे घातक हत्यार म्हणून ओळखले जाणारे गर्भधारणापूर्व लिंग निवड हे तंत्र व्यावसायिकदृष्ट्या नफेखोर ठरण्यासाठी अजुनही पूर्णपणे विकसित व्हायचे आहे. तरीही गेल्या तीन दशकातील लिंगचिकित्सा तंत्रज्ञानाचा झपाट्याने झालेला विस्तार पाहता गर्भधारणापूर्व लिंग निवड तंत्र, प्राथमिक स्वरूपात का असेना, जेव्हा जेव्हा उपलब्ध होईल तेव्हा अधिकच भारतीय समाज स्तरावरत्यास अभूतपूर्व प्रतिसाद मिळेल याची खात्री बाळगता येते.

स्त्री हत्याऱ्यांचा नवा प्रोफाईल

स्त्री साक्षरतेतील वाढीबरोबरच स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाणनही वाढले आहे. मुंबई विषयी अशाच एका अभ्यासाच्या प्राथमिक निकालानुसार गर्भपात केलेल्या स्त्रियांच्या नमुन्यापैकी १०% स्त्रियांनी स्त्री गर्भ काढून टाकण्यासाठी गर्भपात

केल्याचे कळविले याहूनही सुन्न करणारी माहिती अशी की, वरील ४% स्त्रियांनी जर मुल जन्मले असेल तर त्यांनी ते ठार केले असते असे सांगितले.

CMAI अभ्यासामध्ये दिल्लीतील इस्पितळात नोंदवलेले जन्मावेळचे गुणोत्तर (SRB)

स्थिती

SRB	सर्वसाधारण	८६.९
SRB	दुसऱ्या अपत्यासाठी पहिला मुलगा असल्यास	९६.९
SRB	दुसऱ्या अपत्यासाठी पहिली मुलगी असल्यास	५४.२
SRB	तिसऱ्या अपत्यासाठी पहिले दोन मुलगे असल्यास	८९.४
SRB	तिसऱ्या अपत्यासाठी पहिला मुलगा मुलगी असल्यास	५५.८
SRB	तिसऱ्या अपत्यासाठी पहिल्या दोन मुली असल्यास	३२.९

बाल लिंग गुणोत्तर वेगाने ढासळल्यास १९९० च्या दशकात सुरुवात झाली. भारताने जागतिकीकरण स्वीकारण्याचा काळही हाच होता.हां केवळ योगायोग नव्हे. गेल्या दोन दशकात भारतातील मेध्यम वर्गाला जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील आपली ताकद व नेतृत्व क्षमता गवसली. यापुढील काळात याच वर्गातील सक्षम स्त्रिया कुटुंबाच्या किंवा बाजारपेठेच्या प्रभावामुळे अपत्याचे लिंग निवडण्याच्या हक्काची मागणी अधिकाधिक प्रमाणावर करतील व ही मागंणी स्त्री मुक्तीच्या आवरणाखाली केली जाईल, याची दाट शक्यता आहे.

गर्भपाताविषयीच्या जागतिक स्त्रीमुक्तवादी विमर्शात आजवर अनुच्चारित राहिलेल्या प्रश्नाला भिडण्याचा दुर्मिळ प्रयत्न जगभराच्या स्त्रीवादी चळवळीच्या केंद्रभागी असलेल्या गर्भपाताविषयी स्त्रियांचा हक्क व बालिकेचा जगण्याचा हक्क (जो ही एक महत्त्वाचा सामाजिक स्त्री वादी विषय आहे) यामध्ये समन्वय साधण्यात आहे असे पामेला फिलिपोज सुचवितात. दुसरीकडे व्यक्तिगत स्वायत्तता या निवडीच्या हक्कावरील भर हा सामुहिक, सामुदायिक व राष्ट्रीय स्तरावरील निर्णय प्रक्रिया प्रभावित करण्याच्या उद्दिष्टापेक्षा महत्त्वाचा आहे. असा प्रश्न विना मुजूमदार उपस्थित करतात.. किंबहुना आपण उपस्थित केलेल्या प्रश्नाला असे ठाम उत्तर देत म्हणतात, समतेच्या लढ्यात व्यक्तीच्या लैंगिक व प्रजनन स्वातंत्र्यावर भर देतात व पाश्चिमात्य आणि तिसऱ्या जगातील स्त्रीवादाच्या विविध प्रणालीमधील मूलभूत फरक आहे. तिसऱ्या जगातील स्त्रियांना याची जाणीव आहे की, व्यक्तिगत लढून खूप काही साध्य होणार नाही. वैयक्तिक निषेध नोंदवून प्रबळ व्यवस्था बदलत नसतात.

लिंग भेदात्मक मानसिकतेचे निदान

लिंगभेदात्मक गर्भपाताच्या प्रार्दूभावासाठी हुंडा, स्त्री अर्भक हत्येची परंपरा इ. अनेक कारणे पुढे केली जातात. परंतु माझ्याच ते या विषयाची कोणतीही परिकल्पना (Hypothesis) खालील दोन तपशिलामध्ये स्पष्टीकरण देण्यास समर्थ असावयास हवी.

१) काही ठराविक भौगोलिक पट्ट्यात (उदा. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात भारत, दक्षिण कोरिया व चीन यांमधील काही भाग) एका विशिष्ट कालखंडात ही प्रथा प्रचलित असते.
२) प्रदेशावर व समुदायानुसार तिच्या पद्धतीत फरक व सातत्य असते.

या संदर्भात मी १९९२ मध्ये लिंगभेदात्मक गर्भपाताच्या स्पष्टीकरणार्थ DELTA ही अद्याक्षरी परिकल्पना मांडली.

१) स्त्रियांना निःपात करण्यापर्यंत समाजामध्ये स्त्रियाप्रती भेदभावपूर्ण वागणूक.
२) अशा निपाताला नैतिक अधिष्ठान.
३) अशा लिंगभेदात्मक निर्दलनाला पोषक फायदे.
४) बऱ्यापैकी मोठ्या लोकसंख्येला संबंधित तंत्रज्ञानाची उपलब्धता.
५) लहान कुटुंबाचा दंडक.

असे सर्व घटक एका विशिष्ट समयी ठराविक जनसमुदायावर प्रभाव टाकत असतील तर त्या समुहामध्ये लिंग केंद्रीत गर्भपाताचे प्राबल्य आढळून येते.

परिणाम

२००९ च्या जनगणना झाल्यानंतर लिंग गुणोत्तराची चर्चाही निःपातामुळे त्याचे मूल्य वाढेल या मागणी-पुरवठा गृहीतावर घेतलेल्या युक्तिवादापासून पूर्णतः मुक्त आहे. तरीही लिंग गुणोत्तरातील वाढता असमतोल व त्याच्या समाजाच्या खास करून स्त्रियांच्या वर्तमानावर व भविष्यावर होणारा परिणाम या बद्दलचे गांभीर्य सार्वजनिक सद्सद् विवेक बुद्धीला अजुनही शिरपायचे आहे. आज आपल्यात असे दिसते की, विविध कारणामुळे अनेकांना याविषयी चिंता वाटत आहे. काहींना सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशामधील वाढत्या हिंसाचाराचे प्रमाण व त्यांचा जागतिक शांततेवर होणारा परिणाम याबद्दल जिज्ञासा आहे.

लिंग गुणोत्तर वाढत्या असमतोलामुळे बलात्कार, बळजबरीने लग्न लावणे व बहुपत्नीत्व या रुपात स्त्रिया विरुद्धच्या हिंसेमध्ये व आत्याचारात वाढ होत राहीलच. चीनमध्ये गुन्हेगार टोळ्या स्त्रियांचे अपहरण करून त्यांना लग्नेच्छूक पुरुषांना विकतात असे सांगितले जाते.

भारतात काही प्रदेशामध्ये स्थितीही तितकीच बिकट आहे. हरियाणामधील रोहटकमध्ये वधुंचा तुटवडा असल्याचे जगजाहीर आहेच तर गुजरातमध्ये साटेलोटे विवाह पद्धतीचे पुनरुज्जीवन झाले आहे. अशा लग्न पद्धतीमध्ये एखाद्या पुरुषाचे एखाद्या मुलीशी लग्न तेव्हाच लावले जाते जेव्हा परतफेड म्हणून त्या पुरुषाचे बहिणीचे वधूच्या भावाशी लग्न लावण्यास तयारी दर्शविली जाते. अशा प्रकारचे साटे लोटे विवाह स्त्रियांसाठी तुरुंग बनतात. गुजरातमध्ये खास करून तेथील धनाढ्य पटेल समूहामध्ये वधुची कमतरता असल्यामुळे राज्याच्या आदिवासी भागातून वधू विकत घेतल्या जातात. अशाप्रकारे हरियाणातील काही कुटुंबे वधुच्या 'शॉपिंग' साठी पश्चिम बंगल व ओरिसा सारख्या राज्याकडे वळले आहेत.

उपाययोजना

लिंग गुणोत्तरासंबंधीच्या समस्या सोडवताना व ती खालावण्यापासून रोखताना आपण काही गैर समजुतीपासून सावध राहणे आवश्यक आहे. तांत्रिक व व्यवस्थापकीय उपायापासून या समस्येवर मात करता येईल. ही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील निर्णयकर्ते व विश्लेषकांना खोलवर रुजलेली धारणा फोल असल्याचे पटवून देणे हे धोरणात्मक स्तरावरील सर्वात मोठे आवाहन आहे. विशिष्ट भागातील प्रत्येक गर्भार स्त्रीवर लक्ष ठेवणे, चढझ कायदा १९७१ 'गर्भनिरोधकांचा फोलपणा' ही गर्भपात करून घेण्यासाठी उल्लेखलेली तरतूद वगळल्याने अनावश्यक गर्भ धारणेपासून स्त्रियांची सुटका करणारा शेवटचा मार्गही बंद होईल.

वरील समस्यांवर कायमस्वरूपी उपाय काढण्यासाठी खालील गोष्टी उपयोगी पडू शकतात.

१) शासनाने समतेचा हक्क उचलून धरावयास हवा.

२) नागरी समाजाचे पाठबळही या दृष्टीने आवश्यक आहे. कारण त्याविना कोणताही कायदा व धोरण आपले हेतू साध्य करू शकणार नाही.

३) सध्याबद्दल वैद्यकीय समुदायाने या प्रवृत्तीच्या विरोधात एक मुखाने आवाज उठवावयास हवा व या गैर व्यवहारात सामील असलेल्यांना बचाव करणे थांबवावे. त्याचबरोबर सरकारने कुटुंब नियोजनाअंतर्गत निर्धारित केलेल्या दोन मुलांचा दंडक हा लिंग गुणातील समतोल राखण्यास मारक ठरला आहे. सरकारने त्यावरील भर कमी करून कुटुंबा अंतर्गत लिंग भावनात्मक समतेचा आग्रह धरला पाहिजे.

४) अस्तित्वात कायद्यामधील काही त्रुटी वगळल्यास हा कायदा समाजास बोळ काढलेल्या लिंग भेदात्मक अपप्रवृत्तीवर काही अंकुश ठरू शकतो.

५) लिंग गुणोत्तराविरोधी मागील मोहिम व धोरणामध्ये पुरुषांना स्थान नव्हते व ही त्यांच्यातील महत्त्वाची उणीव होती. मुलीच्या निपाताच्या मुद्दाही स्त्रियांचा प्रश्न नसून तो समाजाच प्रश्नच आहे हे बिंबवणे गरजेचे आहे.

...क्ष व भेदभावातून होणारी बालिकांची हत्या रोखणे ही त्या समस्या निवारणाची दुसरी बाजू आहे. हा मुद्दा बहुसंख्य भारतीय स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या निकृष्ट जीवनमानाशी संबंधित आहे.

संदर्भ सूची

१. अगरवाल – बीना (१९९४) 'ए फील्ड ऑफ वन्स ओम' जेंडर अॅन्ड लॅन्ड राईटस् इन साऊथ एशिया, ओ.यु.पी. दिल्ली.
२. अग्निहोत्री एस. बी. (२०००) सेक्स रेशिओ पॅटर्नस इन दी इंडियन पॉप्युलेशन ए फ्रेश एक्सप्लोरेशन, सेज, नवी दिल्ली.
३. बोझ, आशिश (२००१) विदाऊट माय डॉटर – दि लिंग फील्डस् ऑफ दी माईंड, दि टाईम्स ऑफ इंडिया – एप्रिल – २५
४. फिलिपोज – पामेला (२००६) दि अनआस्कड ..... इनदी फिटिसाइड डिबेट – दी इंडियन एक्सप्रेस एप्रिल – ०५.
५. डिसूझा जे. बी. (१९८८) 'शूड देअर बीए चाईस' दी टाईम्स ऑफ इंडिया, जानेवारी – १०
६. जोमेफ जे व उधऊअ (२००६) रिफ्लेक्शन ऑन दि कॅपेन अगेन्स्ट सेक्स सिलेक्शन अॅन्ड एक्स्टलोरिंग फेज फारवर्ड णछत्रझअ भारत.

TRUE COPY
For PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalava, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur (M.S.)

TRUE COPY
PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur (M.S.)

Interdisciplinary International Conference contemporary Issues & Challenges in Social Sciences & Languages

22nd Sept.2018

Organizer

Department of Political Science,

Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur

Special Issue published By

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
ISSN 2349-638x
Peer Review and Indexed Journal
Impact Factor 4.574
Website www.aiirjournal.com
Email :- aiirjpramod@gmail.com

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
भारतीय प्रजासत्ताकापुढे पूर्वीपासून आजपर्यंत ज्या ज्या समस्या आ वासून उभ्या आहेत त्यामध्ये जातीवाद ही एक मुलभूत समस्या आहे तिचे निर्मुलन उच्चाटन करणे गरजेचे वाटते कारण त्याच्या शिवाय भारतीय लोकशाही यशस्वी होणार नाही. भारतातील अनेक प्रबोधनकारांनी विचारवंतांनी आपआपल्या दृष्टीकोनातून जातीचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला परंतू त्याला काही शंभर टक्के यश आले नाही आज आपण २१ व्या शतकात जगत आहोत जग अधुनिकतेकडून उत्तर अधुनिकतेकडे धावत्या घोड्या सारखे जात असताना भारतात मात्र लोकशाहीला राजकारणाला जातीयतेचा कर्करोग झालेला दिसून येतो. भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून आपण जगभर दवंडी देत फिरतो परंतू भारतीय लोकशाही पुढील जातीयतेची समस्या मात्र अजून कायम असलेली दिसते.

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधकांनी उपरोक्त प्रश्नाची उकल करण्याचा थोडक्यात प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी माहिती संकलनासाठी द्वितीय माहिती स्त्रोताचा वापर केलेला आहे.

कोणत्याही देशाकडून त्या देशातील चांगल्या गोष्टीचे सादरीकरण जागतिक स्तरावर केले जाते परंतू देशा अंतर्गत असणाऱ्या समस्यांना विशेष करुन सामाजिक प्रश्न आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडण्याचा प्रयत्न केला जात नाही.

एच. ड्रमंड यांनी महत्वपूर्ण ओळी सांगितल्या आहेत.

"जो विवेक करीत नाही तो धर्मांध होय,
जो विवेक करु शकत नाही तो मुर्ख होय,
जो विवेक करण्याचे धैर्य दाखवीत नाही तो गुलाम होय."

"महात्मा गांधी असे म्हणत की अस्पृश्यता हा हिन्दू धर्मावरील लागलेला कलंक आहे." हा कलंक कसा पुसून काढायचा याबद्दल म. गांधीजींची दृष्टी स्वतंत्र आहे ती डॉ. आंबेडकरांच्या तंत्रापेक्षा वेगळी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या 'जाती संस्थेचे उच्चाटन' या पुस्तकात त्यांनी जाती संस्थेच्या उच्चाटना संबंधी अतिशय मौलिक व व्यवहार्य अशा पध्दतीचे विवेचन केले आहे.

ते असे म्हणतात की आज देखील जातीभेदाचे पुरस्कर्ते असावेत हा दैवदुर्विलास नव्हे काय ? देशात जातीभेदाचे समर्थन नाना तऱ्हेने केले जातात जातीभेद हे श्रमविभाजनाचे दुसरे नांव आहे असे सांगतात. आणि सर्व सुधारलेल्या समाजाचे श्रमविभाजन हे जर प्रमुख लक्षण आहे तर जातीभेदात काही विपरीत नाही असे सांगण्यात येते याला उत्तर देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, जाती व्यवस्था ही निखळ श्रम विभागणी नाही, ती श्रमिकांची विभागणी आहे. जाती व्यवस्था तर ती एक उतरंड (कळशीरलहू) आहे.

I/C PRINCIPAL
Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

जाती भेदाकडे दुसऱ्या दृष्टीकोनातून पाहिल्यास जन्मजात लादलेल्या धंद्याची पध्दती, ही संपूर्ण भारतीय समाजास घातक आहे.

भारतीय समाजात अगदी पुरातन काळापासून, जातीचे मूळ व अस्पृश्यता या अगदी खोलवर रुजल्या आहेत. त्याचे पुरावे अनेक पुस्तकात सापडतात ते आता ही उपलब्ध आहेत. आर्याचे भारतात आगमन त्यांच्या इथल्या लोकांशी आलेला संबंध व त्यातूनच स्वत:चे श्रेष्ठत्व सिध्द करुन इतरांना हिन समजणे म्हणजे इथच उच्च – निच्च, श्रेष्ठ – कनिष्ठ याचा पाया घातला गेला.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेचा मुळ कारणावर प्रबंध लिहिला त्यांचे (अस्पृश्य) हे पुस्तक अतिशय महत्वपूर्ण आहे त्यांनी हिंन्दु आणि अस्पृश्य यांच्यात फरक केलेला आहे.

भारतामध्ये विविध धर्मामध्ये कमी अधिक प्रमाणात जात संस्था आपल्याला दिसून येते धर्मातील एक जात दुसऱ्या जातीला शत्रू मानीत आली आहे. अर्थातच आपपसात स्पर्धा, संघर्ष, कलह, विरोध करीत असतात.

सद्यस्थितीत सामाजिक आणि धार्मिक स्वरुप बदलताना दिसते. पूर्वीसारखी भयंकर जातीयता दिसून येत नाही. परंतू तिचे तंत्र बदलले आपल्याला दिसून येते. आज विविध जाती धर्मांमध्ये रोटी–बेटी व्यवहार होताना दिसतो परंतू या जातीयता संपुष्टात आली म्हणणे म्हणजे जास्तच घाई केल्या सारखे होईल. आपल्या देशातील सामाजिक व राजकीय यांना जातीयतेला अनुकूल परिस्थिती निर्माण करताना दिसतात.

सद्यस्थितीत तर भारतीय राजकीय रंगमंचावर जातीला अत्यंत महत्व दिलं जात आहे. जाती व्यवस्था ही भारतीय लोकशाहीवरील फार मोठे गडांतर आहे असे म्हटले ते वावगे ठरु नये.

प्रा. रजनी कोठारी यांनी आपल्या 'उर्रीश ळप खपवळरप झेश्रळींळली' या पुस्तकात चांगल्या पध्दतीने विवेचन केले आहे. त्या असे म्हणतात की, ''भारतीय राजकारणात जात ही अशी खिडकी आहे की त्या खिडकीतून राजकारणात प्रवेश करता येतो.''

तसेच अनिल भट्ट यांच्या अभ्यासातून असे पुढे आहे की, ''बडी संख्या मे उच्च, मध्यम और निम्न जाती के व्यक्ती राजनैतिक दलों के प्रबल परिचायक (डीपस खवशपींळषळशी) थे यह कहा जा सकता है की जाती राजनैतिक दलो की पहचान या तादात्म्य को प्रभावित करणेवाले कारंको में से प्रमुख है ।''

भारतीय स्वातंत्र्य लढा एकंदरीत जातीय आधारावरच वाढत गेला त्याचे नेतृत्व दीर्घकाळ उच्च जातीय नेत्यांच्याच हाती राहिल्यामुळे निम्न जातीयांच्या हित संबंधाबद्दल अनास्थाच नव्हे तर काहीसा आकसही या चळवळीत टिकून राहिला.

स्वातंत्र्य चळवळीत सुधारणावादी, राष्ट्रवादी, प्रागतिक, मवाळ–जहाल असे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले. तरी कोणत्याही उपरोक्त प्रवाहाला जाती व्यवस्था यांना समाजात असलेली अधिमान्यता नेस्तनाभूत करता आली नाही असे विवेचन भा. ल. भोळे यांनी आपल्या पुस्तकात केले आहे. ते खरे वाटायला वाव आहे.

स्वातंत्र्याच्या चळवळीच्या नेतृत्वापासून वरचढ जातीच्या राजकारणाला सुरुवात झाली आणि अर्ध्याअधिक दशकापर्यंत उच्च जातीचे भारतीय राजकारणात प्राबल्य राहिले आहे.

स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतपुर्नरचनेची मागणी पुढे आली. त्याचे कारण उच्च जातीच्या लोकांना त्या-त्या राज्यात आपला राजकीय प्रभाव टिकवून ठेवायचा होता. या हेतूने भाषावार प्रांतपुर्नरचनेची मागणी उच्च जातीच्या लोकांनी केली होती. अशी टिका डॉ. आंबेडकर यांनी केली होती.

सद्या भारतीय राजकारणात जातीयवादी आणि संप्रदायवाद आणखीन जोर धरु पहात आहे. औद्योगिकरण आणि शहरीकरण यामुळे जातीयतेचे साखळदंड तुटून पडत असतांना राजकारणात जातीचा वापर केल्यामुळे पुनश्च एकदा जातीयवाद जिवंत होत आहे. यामुळे भारतीय लोकशाहीला धोका निर्माण झाला आहे. हा विचार रजनी कोठारी खोडून काढण्याचा प्रयत्न करतात. त्या म्हणतात की, वास्तविक जात आणि राजकारण यांच्या मिश्रणाने एक वेगळेच परिणाम दिसून येतात. त्या म्हणतात की, जातीचे राजकीयकरण होते परिणामी संघर्ष कलह मिटतो. (It if not Politics that gets caste ridden, it is caste that gets politicization) विविध जातीने / संप्रदायाने राजकारणात सहभाग नोंदवल्यामुळे राष्ट्रीय भावनांचा उदय होतो आणि त्यांची जवळीकता वाढते आणि राजकीय एकिकरण होते.

उपरोक्त विवेचन पाहिल्यानंतर प्रा. रजनी कोठारी यांनी भारतीय राजकारणातील टोकाचा संघर्ष हिंसा यांचा उल्लेख केलेला नाही. भारतात जातीय संर्घष अनेक काळापासून सुरु आहे. सरकारने एखादा सामाजिक निर्णय घेतला असेल तर तो निर्णय सर्व जातींना भारतात उपयुक्त ठरत नाही. डॉ. आंबेडकरांच्या म्हणण्याप्रमाणे भारतात एक जात दुसऱ्या जातीला शत्रू मानत असते. भल्याही त्या एका धर्मातील का असेना अगदी अलिकडे भारतात आरक्षणाच्या मागण्यांसाठी विविध जाती समुहाने लोकशाही मार्गाने मोर्चे काढले. ते मोर्चे विशिष्ट जातीचे होते. या मोर्चांना सर्वच जातीचे समर्थन मिळू शकले नाही. ही वास्तविकता आहे. म्हणून रजनी कोठारी यांचे विवेचन काही अंशी खरे असले तरी पूर्णपणे बरोबर आहे असे म्हणता येणार नाही.

भारतातील जाती व्यवस्था आणि समकालीन राजकारण द्वंद्वात्मक व आंतरक्रियात्मक आहे. सांराशरुपाने आपल्याला या संशोधनाच्या माध्यमातून असे सांगता येईल की, भारतातील जाती व्यवस्था प्राचीन आहे. भारतीय लोकशाही पुढे तिने मोठे आव्हान उभे केले आहे. भारतीय राजकारणात बराच काळ उच्च जातीच्या लोकांनी नेतृत्व केले आहे. जातीमुळे जातभावना प्रभावित होवून जातीवर आधारीत विविध राजकीय पक्ष, दबाव गट निर्माण झाले. परिणामी राजकीय अस्थिरता वाढली. भारतीय राजकारणात जात आणि राजकारण असे समीकरण बनत चालले आहे.

म्हणून जातीच्या उच्चटनाची जबाबदारी शासनाने घ्यावी असे या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

संदर्भ सूची :

१) भा. ल. भोळे - भारतीय गणराज्याच्या शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
२) डॉ. बी. एल्. फडीया - राजनिती विज्ञान, साहित्य भवन प्रकाशन, आग्रा.
३) डॉ. बी. आर. आंबेडकर - जाती संस्थेचे उच्चाटन, (अनुवाद - वसंत मुन) नाग नालंदा प्रकाशन, सांगली.
४) डॉ. बी. आर. आंबेडकर - शुद्रपूर्वी कोण होते (अनुवाद - चांगदेव खैरमोडे).
५) एस. एम. मायकेल - अधुनिक भारतातील दलित (अनुवाद - विद्या भालके), डायमंड प्रकाशन, नवी दिल्ली.

19-20 02
282
VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAY, KALE
Arts, Commerce & Science

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

Golden Jubilee Year 2019-20 of

Department of Political Science

&

Shivaji University Political Science Association

Conference Prociding of Two Days National Seminar

&

37th Maharashtra Political Science & Public Administration Conference

"Contemporary Issues in Political Science"

10th & 11th January 2020

Editor
Prof. (Dr.) Ravindra Bhanage
Head of Department,
Political Science, Shivaji University,Kolhapur

Navjyot Kavala

ISSN - 2277 - 8063

International Interdisciplinary research Journal
(Humanities, Social Sciences, languages, Commerce & Management)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

21	भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप	प्रा. संजय ए. मराठे	84-87
22	'भारताच्या संसदिय राजकारणात नव–सामाजिक चळवळींचे अस्तित्व, वाटचाल व आव्हाने'	प्रा.राजेंद्र दिलीप आगवाने,	88-91
23	राजकीय पक्षांची आघाडयांच्या संदर्भात जुळणी आणि पूनर्जुळणी	प्रा. द्वारकाप्रसाद वि. वायाळ	92-95
24	महाराष्ट्रातील राजकीय पक्षांची आघाडीची जुळणी आणि पुर्नजूळणी	प्रा. डॉ. विलास आघाव	96-100
25	'संसदिय निवडणूक प्रक्रियेतील महिलांचा राजकीय सहभाग व त्यापुढील अडथळे'	प्रा.डॉ. संजय अंकुश काळे	101-105
26	नागरिकत्व सुधारणा कायदा आणि सामाजिक व राजकीय अस्थिरता	डॉ अजय बापूसाहेब पाटील	106-107
27	भारतीय संघराज्याची पुनर्रचना आणि राष्ट्रीय एकात्मतेची समस्या	डॉ. पी. यु. नेरपगार	108-112
28	महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष व राज्यपालांचा 'स्व' विवेक	डॉ. प्रदीप पंजाबराव दंदे	113-114
29	भारतीय संघराज्याची पुनर्रचना आणि राष्ट्रीय एकात्मतेची समस्या	प्रा. भुषण अहिरराव	115-119
30	सोशल मिडीया : भारतातील लोकशाही व्यवस्थेपुढील एक आव्हान	प्रा. अरूण पेंटावार	120-124
31	'महिलांच्या मानवी हक्कांचे रक्षण आणि राज्यसंस्थेच्या भूमिकेपुढील मर्यादा'	प्रा.एस.एस.कावळे प्रा.डॉ.व्ही.डी.कापडी	125-128
32	वर्तमान भारतातील उत्तम शासन कारभारा समोरील आव्हाने	डॉ. खंडेराव ज्ञानदेव खळदकर	129-135
33	सुधारित नागरिकत्व कायदा २०१९–वाद, विवाद	प्रा. डॉ. अर्जुन येरगे	136-138
34	नागरिकत्व सुधारणा काल आणि आज: एक आढावा	मनिषा मधुकर कुरणे,	139-141
35	समाजमाध्यमे आणि लोकशाही राजकारण	प्रा. डॉ. विठ्ठल दहिफळे	142-148
36	नागरीकत्व सुधारणा विधेयक २०१९:एक चिकीत्सक अभ्यास	प्रा. डॉ. एस.के.खडसे प्राजक्ता राजेंद्र बाबर	149-152
37	भारतीय संघराज्याचा अविष्कार	प्रा. कमलाकर एन. राक्षसे	153-155
38	भारत आणि निवडणूक (Psephology) विश्लेषण शास्त्र	प्रा.डॉ. राक्षसे सिद्धार्थ गुणाजी	156-161
39	महाराष्ट्रात माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 ची अंमलबजावणी (कालखंड 2005 ते 2015)	प्रा.राजीव मधुकर पवार प्रा.डॉ.दत्तात्रय एम.टेकाडे	162-164
40	भारतीय संघराज्याची पुनर्रचना समकालीन समस्या	प्रा. विलासराव लवटे	165-168
41	भारतीय राजकारणातील राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांचे बदलते समीकरणे विशेष संदर्भ : हरियाना व महाराष्ट्र	प्रा.डॉ.व्ही.एच.टकर	169-172
42	भारतीय राज्यघटना : दलित हक्कांची चिकित्सा	सिद्धार्थ केरबा मुंगे सुमित भूजंगराव वाघमारे	173-175

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

'भारतीय संघराज्याचा अविष्कार'

प्रा. कमलाकर एन. राक्षसे
राज्यशास्त्र विभाग, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
Email-ID : kamlakar7662@gmail.com मो.नं. ९९२१२९९८९२

प्रस्तावना :—आधुनिक काळात जगात वेगवेगळया राजकीय व्यवस्था निर्माण झाल्या आहेत त्याचे वर्गीकरण आपण संसदीय आणि अध्यक्षीय शासनपध्दती, संघराज्यात्मक आणि एकात्मक शासन या प्रकारे करु शकतो ज्या देशात एक भाषा, एक धर्म, संस्कृती आणि भौगोलिक एकता असते अशा देशात शक्यतो संघराज्यात्मक शासनाऐवजी एकात्म शासन व्यवस्था निर्माण केली जाते आणि ज्या देशात विविधता आढळून येते त्या देशात संघराज्यात्मक शासन व्यवस्था निर्माण केली जाते. भारत, अमेरिका, रशिया या देशांनी ही व्यवस्था स्विकारली आहे.

जगामध्ये ज्या ज्या ठिकाणी संघराज्य निर्माण झालेले आहे ते दोन प्रवृत्ती मधून निर्माण झाले आहेत अर्थातच संघराज्य निर्मितीच्या दोन प्रवृत्ती आपल्या आढळून येतात. त्यापैकी पहिली प्रवृत्ती आहे केंद्राकर्षी या प्रवृत्तीमध्ये राज्ये समान हित संबंधाच्या व संरक्षणाच्या आवश्यकतेमुळे एकत्र येतात व संघराज्य स्थापित करतात अमेरिकन संघराज्य, स्वित्झरर्लंड संघराज्य या प्रवृत्तीतील उदाहरणे म्हणून आपल्याला सांगता येतील संघराज्य प्रकाराची दुसरी प्रवृत्ती केंद्रोत्सारी संघराज्य या प्रवृत्तीमध्ये /प्रकारामध्ये विकेंद्रीकरण दिसून येते या संघराज्यात मुळ देश सोडून इतर सार्वभौम राज्य सामील होत नसतात विकेंद्रीकरणाच्या भूमिकेतून घटकराज्याची निर्मिती केली जाते. त्यांना काही अधिकार बहाल केले जातात. भारत व कॅनडा हे देश या प्रवृत्तीचे उदाहरणे म्हणून सांगता येतील.

सदर संशोधन लेखामध्ये भारतीय संघराज्य व्यवस्थेचा आढावा घेवून भारतीय राजकीय व्यवस्थेत संघराज्य कशा पध्दतीने सिध्दांत आणि व्यवहारामध्ये राहिले आहे याचा अभ्यास करुन निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सदर संशोधनाची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) संघराज्य संकल्पना समजून घेणे. २) भारतीय संघराज्य समजून घेणे
३) भारतीय संघराज्य सिध्दांत आणि व्यवहार समजून घेणे.
४) भारतीय संघराज्याची व्यवहार्यता समजून घेणे.

विषय विवेचन

भारतीय संघराज्याचे स्वरुप :भारतीय संघराज्य केंद्रोत्सारी पध्दतीतून निर्मित झाले आहे देशाचे ऐक्य; भारताचा मोठा विस्तार, प्रादेशिक विविधता, अनेक भाषा यामुळे प्रदेशांना स्वायत्ता देवून केंद्राने अधिकचे आणि महत्वपूर्ण अधिकार घेवून तसेच उरलेले अधिकार सुध्दा केंद्राकडेच ठेवून केंद्रसरकार अधिक बलशाली बनवले गेले अशी घटनात्मक तरतूद आहे. जगातल्या संघराज्यातील केंद्राला अधिकचे अधिकार देण्याकडे कल वाढल्याचे दिसून येते भारतातून पाकिस्तानची निर्मिती झाली होती हे ऐतिहासिक सत्य घटनाकारांच डोळयासमोर होते म्हणून संघराज्यातून घटकराज्यांना फुटून निघण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने दिला नाही त्यामुळे भारतात संघराज्य शासन पध्दती जरी स्विकारली असली तरी सामर्थ्यशाली केंद्र ही भूमिका भारतीय घटनाकारांनी स्विकारली आहे आणि संकटकाळात तर एकात्म शासन व्यवस्था व्यवहार्य ठरते म्हणून त्याचीही व्यवस्था भारतीय संघराज्यात अंतर्भुत आहे म्हणून भारतीय संघराज्य जगातल्या इतर संघराज्यापेक्षा वेगळे दिसून येते साधर्म्य शोधायचे झाले तर कॅनडाशी साधर्म्य आपल्या दिसून येते.?

संघराज्याची काही तत्वे असतात.

१) लिखीत राज्यघटना २) दुहेरी शासन व्यवस्था
३) सत्ता विभाजन ४) न्यायालयीन स्वातंत्र्य

भारताची भौगोलिक विस्तीर्णता, संस्कृती, धर्म, भाषिक अनेकदा यामुळे भारताने संघराज्यात्मक व्यवस्थेचा अंगिकार केला आहे. भारताच्या 'संविधानात Federation' हा

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

शब्द कुठेही वापरला नाही तर 'राज्याचा संघ' (Union of States) सर शब्दाचा वापर करण्यात आला आहे. भारताच्या संघराज्याबद्दल अनेक विचारवंतानी आपले भाष्ये केले आहे. कारण की भारतीय संघराज्य अतिशय वैशिष्टयेपूर्ण आहे भारतीय राज्यघटना आवश्यकतेनुसार परिदृढ व कधी — कधी लवचिक बनत असते शांततेच्या काळात संघवाद उपयोगी बनतो परंतु अराजकता निर्माण होते तेव्हा मात्र भारतीय संघराज्य एककेंद्री बनते म्हणूनच भारतीय संविधान निर्माणकर्त्यांनी आपल्या देशासाठी आगळेवेगळ संघराज्य बहाल केले आहे.भारतीय संघराज्य हे संघराज्य या संकल्पनेत बसत असले तरी हे संघराज्य एककेंद्री वाटते या संदर्भात पाटसकर असे म्हणतात त्यांच्या अंतरंगात मात्र बदल केलेला आहे. म्हणून ते संघात्मक आहे परंत त्याचा आत्मा मात्र एककेंद्री आहे. डॉ.सी.डी. देशमुख सदरच्या व्यक्तींनी तर भारतीय संघराज्य संघात्मक नाही आणि एकात्मकही नाही असे म्हटलेले होते. काही अभ्यासक भारतीय संघराज्याला अर्ध संघराज्य सुध्दा म्हणतात. भारतीय संघराज्य कोणत्याही देशाची नकल नसून ते स्वयंभू आहे डी.डी.बसु सारखे विचारवंत/अभ्यासक म्हणतात की,

'भारतीय संघराज्य हे 'Sui-generis' (म्हणजे स्वत: सारखेच आहे) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानसभेत चर्चा करताना म्हणाले होते की, ''भारतीय संविधान व्दिदल शासन निर्माण करते त्यामुळे ते संघराज्यात्मक आहे.'

अलिकडच्या काळात म्हणजेच १९९४ साली एस.आर.बोम्माई खटल्यात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने भारताचे संविधान संघात्मकच आहे असे नमूद केले होते. काही टिकाकार अमेरिकन संघराज्याचे प्रतिमान डोळयासमोर ठेवून टीका करताना दिसतात.

भारतीय संघराज्य हे एककेंद्री आहे अधिकार वाटणीत केंद्राला झुकते माप दिले असले तसेच ते अर्ध संघराज्य आहे अशी वेगवेगळी मतमतांतरे असली तरी भारतीय संघराज्य हे संघराज्य आहे भले त्याचे प्रतिमान वेगळे असेल परंतु भारत हे संघराज्य देशी आहे घटनाकारांच्या मस्तिष्कामधून ते बाहेर आलेले आहे भारतीय संघराज्याचा प्रवास पहात असताना देशात काही काळ केंद्र आणि राज्याचे संबंध सोहार्दपूर्ण राहिलेले आहेत त्याचे कारण देशात एकाच राजकीय पक्षाचे सरकारे बरीच वर्षे राहिले होती तसेच केंद्रात सुध्दा याचा परिपाक म्हणून घटक सरकारे व संघसरकार यांच्यात तणाव कधी होत नव्हता जे नेते राज्यात काम करत होते त्यांचे वरिष्ठ नेते केंद्रात सत्ताधारी असायचे परिणामी केंद्रीय नेतृत्वाविषयी प्रादेशिक नेते काहीच बोलायचे नाही म्हणजेच घटक सरकारे ही मूग गिळूनच होती त्याची कारणे केंद्रीय नेतृत्वाकडूनच राज्याचा मुख्यमंत्री कोणाला करायचे हे ठरवले जायचे. स्वातंत्र्यानंतर कॉग्रेस पक्ष हा तर बरीच वर्षे सत्तेवर राहिला प्रो. रजनी कोठारी यांनी भारतीय राजकीय व्यवस्थेला 'कॉगेस व्यवस्था' म्हणून संबोधले होते अधीच जवळ तीन दशके कॉग्रेस पक्ष सत्तेवर राहिल्यामुळे केंद्रीकरणाची ही प्रक्रिया गतीने वाढत गेली. १९६७ नंतर केंद्र — राज्य संबंध/संघराज्य व्यवस्थेमध्ये व्यवहारिकदृष्टया बदल झाल्याचे दिसून येते संघराज्य घटकात घटक राज्यांच्या स्वायत्तेच्या विचाराला चालना मिळाली १९६७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर भारतीय राजकरणाला एक वेगळे वळण प्राप्त झाले अनेक घटक राज्यात वेगवेगळया राजकीय पक्षाची/आघाडयांची सरकारे निर्माण झाली होती हे सरकारे कॉग्रेस विरोधी पक्षाची सरकारे होती. या सरकारांबद्दल केंद्र सरकारने भेदभाव केला असा आरोप करण्यात आला. 'कॉग्रेस विरोधाचे भांडवल निवडणुकांपूर्वी करुन एकत्र आलेल्या पक्षांनी ऐक्य टिकविण्यासाठी 'केंद्र विरोधाचा' आधार नंतर घेतलेला दिसतो. (भोळे भा.ल. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण पृष्ठ क्रं. १५८)

१९९० च्या दशकानंतर देशात आघाडयांच्या राजकारणाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली परिणामी भारताच्या संघ चौकटीला जास्तच तडे गेल्याचे दिसून येते काही राज्यांनी तर स्वायत्तेच्या मुद्दयावर राजकारण केले समृध्द असलेली राज्य सुध्दा — स्वायतता मागू लागले मार्क्सवादी साम्यवादी पक्षाने तर संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकारच मागितला (अशा प्रसंगी केंद्र बलशाली असणे गरजेचे वाटते)आघाडी सरकारच्या युगामुळे प्रादेशिक स्तरावर असणारे राजकीय पक्ष केंद्र सरकारला सत्कार बनविण्यासाठी सहकार्य करीत

असल्यामुळे केंद्र राज्याच्या सरकारचे लाड पुरवित होते यातून भारतात या काळात 'सौदेबाजीचे' संघराज्य निर्माण झाले होते.

भारतीय संघराज्याचा प्रवास तीन ते चार कालखंडात विभागाला तर वेगवेगळे प्रतिमान पहावयास मिळतात स्वातंत्र्योत्तर कालखंडात जवळ — जवळ तीस वर्ष कॉग्रेस पक्षाचे प्राबल्य देशात होते परिणामी या कालखंडात सहकारी संघराज्य होते. १९६७ नंतर देशात जनता पक्षाचे सरकार आले म्हणजेच १९६७ ते ७१ कालखंडात संघर्षमय त्यानंतर आघाडी सरकारच्या युगात/कालखंडात सौदेबाजीचे/संघराज्य निर्माण झाले. नरेंद्र मोदींच्या कालखंडात संघर्षमय संघराज्य निर्माण झाले आहे अलिकडच्या काही घटना बघितल्यानंतर हे दिसून येते यामध्ये केंद्रीय गुन्हे अन्वेशन विभाग, ईडी, केंद्रीय दक्षता आयोग या सारख्या केंद्रीय चौकशी संस्थांचा गैरवापर होत असल्याचा आरोप करण्यात येतो.

सारांशरुपाने भारतीय संघराज्य सिध्दांत आणि व्यवहार याचा संशोधनात्मक अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष मांडता येतात.

निष्कर्ष

१) व्यवहारिक दृष्टीकोनातून भारतीय संघराज्याचे वेगवेगळे प्रतिमान तयार झालेले दिसून येतात.

२) भारतीय संघराज्याची तुलना इतर संघराज्याशी होवू शकत नाही कारण घटनाकारांनी भारतीय परिस्थितीचा अभ्यास करुन तयार केले आहे.

३) भारताच्या संघराज्य चौकटीला सरकारच्या धोरणामुळे धक्के अनेकदा पोहचले आहेत.

४) भारतीय संघराज्याचा आर्थिक दृष्टीकोनातून विचार केल्यास घटक राज्ये ही केंद्रावर अवलंबून आहेत महत्वाची विषय केंद्राकडे असल्याने घटकराज्याची अवस्था महानगरपालिकेसारखी होऊन बसली आहे.

५) राजकीय दृष्टीकोनातून विचार केल्यास सामर्थ्यशाली केंद्र सरकारची आवश्यकता वाटते. संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार घटकराज्यांना कादापीही देता येणार नाही.

६) केंद्र व राज्य संबंधाच्या बाबतीत सरकारीया आयोग, राजमन्नार समिती नेमण्यात आली होती परंतु त्याचा उपयोग झाल्या नसल्याचे दिसून येते.

७) देशातील घटकराज्यांना राज्यसभेत समान प्रतिनिधीत्व दयायला हवे.

८) कलम ३५६ च्या गैरवापराबाबत विचार करुन त्या संदर्भात ठोस पाऊली उचलून — गैरवापर टाळण्यात यावा.

एकंदरीतच भारतीय संघराज्याचे भवितव्य केंद्र आणि घटकराज्याच्या वर्तनावर आवलंबून आहे. देशात सर्वत्र प्रादेशिक अस्मितांच्या जाणिवा प्रगल्भ होताना दिसून येतात केंद्राने त्याचा योग्य प्रकारे अभ्यास करुन संघराज्य संकल्पनेला अधिक उजेडात आणण्याचा प्रयत्न करायला पाहिजे.

केंद्राने एखादा कायदा / निर्णय घेत असताना जास्तीत—जास्त घटक राज्यांची सहमती कशी मिळेल याकडे लक्ष दयायला हवे.

संदर्भसूची :—

१) दिवाण मोहन, देवधर जयंत, दिवाण विवेक, भारतातील राज्याचे राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर.

२) भोले भा.लं. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.

३) भारत का संविधान — एक परिचय

४) काश्यप सुभाष (संपा) युनियन — स्टेट रिलेशन्स इन इंडिया.

५) घांगरेकर चि.गं., तुलनात्मक राजकीय व्यवस्था, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.

59 60

Shri Prince Shivaji Maratha Boarding House's

THE NEW COLLEGE, KOLHAPUR

25th Annual Session of Shivaji University Rajyashastra Parishad

organized by

Department of Political Science,

The New College, Kolhapur

CONFERENCE PROCEEDING

Two Days National Seminar

on

'INDIAN POLITICS IN 21ST CENTURY'

Jointly Organized by

The New College, Kolhapur and
Nehru Study Centre, Shivaji University, Kolhapur

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

TRUE COPY
PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur (M.S.)

ISSN 2277-8063

March 2019

Special Issue

Navjyot

नवज्योत

Internationai Interdisciplinary Research Journal
[Humanities, Social Sciences, Languages, Commerce &Management]

विशेषांक

२१ व्या शतकातील भारतीय राजकारण

- Published by-

HOUSA Publication, Kolhapur

TRUE COPY

PRINCIPAL
Vasantrao Patil Mahavidyalava, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur (M.S.)

भारत — पाकिस्तान संघर्षाचे बदलते स्वरुप : कारगील, पीर पंजाल व बालाकोट

डॉ. शार्दुल सेलूकर, राज्यशास्त्र विभाग, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे.

.....

"You can do a lot with diplomacy but of course you can do a lot more with diplomacy backed up with firmness and force.... Prime minister, ladies and gentlemen, sound defence is sound foreign policy". [Kofi Annan - The UN secretary-general]

प्रस्तावना

फाळणीनंतर स्वतंत्र झालेल्या भारत आणि पाकिस्तानचे संबंध परस्पर संशय, तणाव, संघर्ष, युध्द इ मुळे प्रभावित झालेले दिसतात. मुळातच पाकिस्तान म्हणजे *'not India'* या भावनेमुळे किमान तेथिल राजकारणी आणि सैन्य यामध्ये भारताविषयी शंका आणि व्देशाची भावना असने क्रमप्राप्त होते. फाळणीचे अनुभव, स्विकारलेली शासन पध्दती, धार्मिकता विरुध्द धर्मनिरपेक्षता नव्याने निर्माण होणारे वाद आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील परस्पर विरोधी भुमिका यामुळे भारत — पाकिस्तान संबंध गेली ७ दशके सलोख्याचे नव्हते असेच म्हणावे लागेल. संपत्तीच्या हस्तांतरणाचा आणि मोबदल्याचा प्रश्न, संस्थानांच्या विलीणीकरणाचा प्रश्न, नदयांच्या पाणीवाटपाचा प्रश्न टप्प्या टप्प्याने सोडवण्यात यश आले मात्र सीमावाद व काश्मिर प्रश्न सोडवण्यात आलेल्या अपयशामुळे दोन्ही देशांचे संबंध कायम प्रभावित राहिले.

भारत पाकिस्तान यांच्या दरम्यान १९४८, १९६५, १९७१ असे तीन पारंपारीक व मोठे युध्द झाले आहेत. या तीन्ही युध्दात पाकिस्तानचा पराभव झाला. १९७१ मध्ये तर पंतप्रधान इंदिरा गांधींच्या मुत्सददी धोरणामूळे भारताला तिहेरी यश मिळाले, एक म्हणजे पाकिस्तानची फाळणी, दुसरे म्हणजे युध्दात आपण पाकिस्तानला पराभूत करुन त्यांचे मोठया प्रमाणावर सैन्य जेरबंद केले आणि पाकिस्तानला शिमला करार करावयास भाग पाडले आणि तिसरे म्हणजे याहया खानची लष्करी सत्ता नष्ट करुन जुल्फिकार अली भुटटोंचे लोकशाही शासन प्रस्तापित झाले. यामुळे पाकिस्तान काश्मिर सह सर्व समस्यांची सोडवणुक व्दिपक्षीय चर्चेने करण्यास बाध्य झाला. सलग ३ पारंपारीक युध्दामध्ये आपण भारताला पराभूत करु शकलो नाही हे ओळखून पाकिस्तानने १९८० नंतर भारतासोबत दहशतवादाच्या रुपाने नव्या युध्दाचा पुरस्कार केला. (bleed India through a thousand cuts – Policy) त्यानुसार प्रथम पंजाब व नंतर काश्मिर मध्ये पाकिस्तानने दहशतवाद पसरवला. पंजाबमधील दहशतवाद मोडीत काढण्यात इंदिरा गांधींना यश आले मात्र काश्मिर आजही एक धगधगते रण बनले आहे.

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये आपण यानंतरच्या बदललेल्या युध्दनीतीचा व भारताच्या बदललेल्या प्रतिक्रयांचा आढावा घेणार आहोत.

कारगील

१९८० च्या नंतर अमेरिका — पाकिस्तान — चीन हा त्रिकोण आकार घेत होता. भारतासाठी ही चिंता वाढवणारी बाब होती. यावर प्रतिक्रीया म्हणून वाजपेयी सरकारला १९९८ मध्ये अणुस्फोट घडवून आणावे लागले. प्रतिक्रीया म्हणून पाकिस्ताननेही अणुचाचन्या केल्या. मात्र अण्वस्त्र संपन्नतेनंतर युध्दाच्या विस्ताराबाबत कायमच भारताला जागतीक दबावाला सामोरे जावे लागले आहे. याचाच फायदा घेत पाकिस्तानने भारताविरुध्द असंख्य वेळा पारंपारिक युध्द पुकारलेले दिसते, मात्र केवळ तिव्र शब्दात निषेधाशिवाय भारत काहीच करु शकला नव्हता. हा पाकिस्तानचा एक प्रकारचा अनैतिक विजयच म्हणावा लागेल.

एकिकडे अणुचाचणीने भारताला अण्वस्त्र सज्ज देशांच्या पंक्तीला नेवून बसवले परंतू त्याच बरोबर पाच दशके एक विवेकी सत्ता म्हणून भारताने मिळवलेला जगातला दर्जा भारताला अण्वस्त्रांच्या प्रथम वापराबाबतचा हक्क नाकारत होता. त्यामुळेच भारत

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

५. भारताची संरक्षण सिध्दता अश्या प्रसंगामध्ये भविष्यात चीन सारख्या शत्रुसोबत कमी पडू शकते हे संरक्षण मंत्र्यांना प्रकर्शाने जाणवत होते.
६. कारगील मध्ये दहशतवादयांच्या आडून पाक सैन्याने घुरखोरी केली हे उघड झाले. यापुढे दहशतवादयांसोबत घुसखोरीत पाकिस्तान सैन्य असणार नाही याची काळजी पाकने घेतली.

पीर पंजाल (सर्जीकल स्ट्राईक १)

कारगील युध्दानंतर पाकिस्तानमध्ये मुशर्रफ यांनी शरीफ यांचे लोकशाही शासन संपवून पुन्हा एकदा लष्करी अमल सुरु केला तर दुसरीकडे अमेरिकेने भारताचे महत्व ओळखुन अणुचाचण्यानंतर लादलेले निर्बंध माघारी घेण्यास सुरुवात केली. वाजपेयी शासनानंतर २००४ मध्ये मनमोहन शासन सत्तेमध्ये आले. ते दहा वर्षे सत्तेत होते. २०१४ साली जवळपास ३ दशकानंतर मोदी शासनाच्या रुपाने एक पुर्ण बहूमताचे शासन सत्तेत आले. एन डी ए च्या घोषणापत्रात जरी दहशतवादास चोख प्रतिउत्तर देण्याची भाषा असली (Election Manifesto 2014: Ek Bharat Shreshta Bharat) तरी अंबुश:मणिपुर — २०१५, गुरुदासपुर — २०१५, पठाणकोट नगरोटा व उरी — २०१६, सुक्मा व अमरनाथ — २०१७, पडगमपोरा — २०१८ आणि पुलवामा — २०१९ हे गेल्या पाच वर्षातील मोठे दहशतवादी हल्ले आहेत.

१८ सप्टेबर २०१६ रोजी जैश ए महोंम्म या दहशतवादी संघटनेच्या ४ दहशतवादयांनी भारताच्या उरी या लष्करी तळावर हल्ला केला. यात भारताचे १८ जवान शहीद झाले तर २० जखमी झाले. एका पाठोपाठ लष्करी तळावर होणारे हल्ले हे जवानांचे मनोधैर्य खच्चीकरण करणारे होते. भारताने या हल्ल्यानंतर नेहमीप्रमाणे सर्व साक्षी पुरावे जगजाहिर केले मात्र एवढे करुन आता भागणार नाही याची जाणीव नेतृत्व व सेना दोघांनाही होती. ले. जनरल हुडा यांच्या नेतृत्वामध्ये एक वर्षापुर्वीच मॅनमार येथे अश्याच प्रकारे भारतीय सैन्यतळावरील दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून एक सर्जीकल स्ट्राईक करण्यात आली होती. विशेष म्हणजे याबाबतची माहिती पहिल्यांदाच भारतीय सैन्याने प्रेस कॉन्फरन्स करुन जगाला दिली. गुप्तचर यंत्रणेकडून भारतावरील संभाव्य दहशतवादी हल्ल्याची सूचना मिळाली. यानुसार २९ सप्टेबर २०१६ रोजी पहाटेच्या आंधारात पाक व्याप्त काश्मिरमध्ये जवळपास १०० कि.मी. च्या सीमेवर पीर पंजाल भागात विविध ठिकाणी जवळपास चार तास ही लष्करी कार्यवाही करुन दहशतवादी लॉच पॅड उध्वस्त करण्यात यश मिळवले. विशेष म्हणजे यादरम्यान सीमापार केलेल्या एकाही सैनिकाला कोणतीही इजा न होता ही कार्यवाही पार पाडण्यात सैन्याला यश आले. याच वेळेला ही कार्यवाही संपली असली तरी यावरील कोणत्याही प्रतिक्रीयेला भारतीय सैन्य तयार आहे हे लष्करी अधिकारी सांगायला विसरले नाहीत. या हल्ल्याने भारताने भारतावरील दहशतवादी हल्यापाठीमागचा खर्च (Cost of Terrirism)वाढवण्यात यश मिळवले. (Chadha Vivek and Others. 2016. Pg. 1-12)

सर्जीकल स्ट्राईक १ मधिल काही महत्वपूर्ण बाबी पुढील प्रमाणे—

१. दहशतवादी हल्ला होण्यापुर्वीच भारताने संरक्षणात्मक खबरदारी म्हणूंन पहिल्यांदाच सीमेपार एवढया मोठया प्रमाणात अशी कार्यवाही केली होती.
२. या कार्यवाहीचे व्हीडीओ रेकॉर्डिंग करण्यात आले होते, जे वॉर रुममध्ये बसून पंतप्रधान, सैन्याचे जेष्ट अधिकारी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार व इतर महत्वाच्या वक्ती घटनाक्रम घडत असताना पहात होत्या. कालांतराने सैन्याने हे रेकॉर्डिंग सार्वजनिक केले.
३. ही कार्यवाही दहशतवादांच्या लॉच पॅडस वर केल्याचे खुद्द सैन्याने जगाला सांगीतले.
४. १५० सैनिकांपैकी एकाही सैनिकाला मोठी इजा/दुखापत झाली नाही.

काश्मिरमध्ये सैन्याच्या ताब्यात अडकला. यावेळी प्रधानमंत्री देशातील भाषनामधून तर परराष्ट्रमंत्री रशिया, चीन व इस्लामिक राष्ट्रांच्या दौऱ्यातून भारतासाठी समर्थन मिळवण्यात यशश्वी होत होत्या. कुख्यात दहशतवादी अझहर मसूद याला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषीत करुन त्याच्या जैश ए महोम्मद या संघटनेवर बंदी घालावी असा प्रस्ताव फ्रांस, इंग्लंड व अमेरिकेने सुरक्षा परिषदेसमोर आणला, रशियाने समर्थन दिले तर चीन प्रारंभी विरोध दर्शवत होत मात्र नंतर तो शांत झाला.

पाकिस्तानने वैमानिकाला सोडवण्याच्या मोबदल्यात चर्चेला बसण्याची अट प्रारंभी समोर ठेवली, मात्र भारताकडून प्रतिसाद मिळाला नाही. उलट लवकरात लवकर वैमानिकाला जिन्हेवा कराराच्या अंतर्गत भारताच्या ताब्यात दिले नाही तर पाकिस्तानने भारताविरुध्द युध्द पुकारले आहे, असा अर्थ होतो व मग भारत आपल्या वैमानिकाला कश्या पध्दतीने सोडवायचे हे चांगले जानतो, असे वक्तव्य परराष्ट्रखात्यामार्फत करण्यात आले. पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी दुसऱ्याच दिवशी आपण वैमानिकाला सोडत आहोत असे त्यांच्या संसदेत जाहिर केले. पडदया आड तनावशैथिल्याचे महाशक्तींचे प्रयत्न सुरु होते. भारतालाही निवडणुकांच्या तोंडावर संघर्ष नको होता. आठवडयाभरामध्ये परिस्थीती निवळली, पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय दबावापुढे नमते घेत जैश च्या नेत्यांना नजरबंद केले.

सर्जीकल स्ट्राईक २ मधिल काही महत्वपूर्ण बाबी पुढील प्रमाणे—

१. पाकिस्तानच्या भूमिवर केलेली ही पहिलीच कार्यवाही होती.
२. हा हल्ला लॉच पॅडवरील नेहमीप्रमाणे केलेला हल्ला नव्हता तर तो दुरवर केलेला प्रशिक्षण स्थळावरील हल्ला होता.
३. भारतावर हल्ला करणारे पाकिस्तानमध्ये कोठेही सुरक्षीत नाहीत हा निरोप यशश्वीरीत्या पोहंचला होता.
४. मृतांच्या आकडेवारीबाबत संभ्रम निर्माण केला जात असला तरी, वायुदलाच्या प्रवक्त्याच्या म्हणण्याप्रमाने आम्ही टार्गेट हिट करायला गेलो होतो, किती मेले हे पहायला नाही, व आम्ही ८० टक्के टार्गेट हिट केलेले आहेत.
५. यावेळी भारताने हल्ल्याची बातमी दिली नाही तर ती पाकिस्तानने दिली. याप्रसंगी त्यांची वार्ताहार परिषदेतील विधाने हस्यास्पद होती.
६. यापुढे दहशतवादी हल्ला झाला तर यापेक्षा मोठी कार्यवाही करण्याचा दबाव सैन्यावर येणार आहे, सैन्यानेही तशी कार्यवाही करण्याचे संकेत दिले आहेत.
७. घटनाक्रमाच्या उत्तरार्धात भारताच्या कुशल राजनयाचा प्रत्यय आला.

सारांश

प्रस्तुत लेखात आपण कारगील, उरी व पुलवामा हल्ल्याच्या वेळी भारताच्या प्रतिक्रियेचा आढावा घेतला. तिन्ही घटनांच्या वेळी भारतीय नेतृत्वासमोरील परिस्थीती, मर्यादा आणि पर्याय यामध्ये भिन्नता होती. कारगील प्रसंगावेळी भौगोलिक अडचणी, वाजपेयी सारखे मवाळ परंतू मुत्सददी नेतृत्व, नुकत्याच दोन्ही राष्ट्रांनी केलेल्या अणुचाचण्या व त्यानंतरची बंधने याला अनुसरुन भारताला निर्णय घ्यावे लागले. तेव्हाचे संरक्षण मंत्री जसवंत सिंग कोणत्याही परिस्थीतीत सीमारेषा ओलांडायची नाही या मतावर ठाम होते. तुलनेने पुढील दोन्ही प्रसंग हे भारतीय नेतृत्वाच्या विचारातील बदल दर्शवनारे होते. मोदी दोन्ही प्रसंगी सैन्याच्या मागे ठामपणे उभे होते. संसदेवरील हल्ला असेल किंवा मुंबईवरील हल्ला असेल सैन्य दोन्ही वेळा कोणत्याही पातळीवर लढून दोषींना शिक्षा देण्याच्या मनस्थीतीत होते. मात्र तेव्हाच्या नेतृत्वाने आम्हाला संमती दिली नाही असे निवृत्त सैन्यअधिकारी उघड उघड वाहिण्यावर सांगत आहेत. याउलट मोदी भाषणांमधून सैन्याला पुर्ण स्वातंत्र्य आहे असे म्हणत आहेत.

(60) Prof. Dr. selukar S.M

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 7 No - 2 Issue - 20 August. 2019 ISSN- 2347-9639

37 Years

VICHAR MANTHAN

IIJIF Impact Factor 2.283

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

Loksabha 2019

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

विचार मंथन

लोकसभा २०१९

मुख्य संपादक - प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
संपादक - डॉ. प्रमोद पवार | डॉ. बाळ कांबळे
डॉ. मनोहर पाटील | प्रा. डॉ. विलास आवारी

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

37 Year's
Maharashtra Political Science & Public Administration Conference

VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(A Peer Reviewed Journal)
Vol. - 7 , No - 2 Issue - 20 August. 2019 ISSN- 2347-9639

♦ Peer Reviwed Committee ♦
Prin. Dr. P. D. Deore (Chief Editor)
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc., Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13 Mob : 9423980457

♦ Editor / President ♦
Prin. Dr. Pramod Pawar
Email- pramodpawar1761@gmail.com Mob:9423582073

♦ Editor / Secretary ♦
Prin. Dr. Manohar Patil
Email-manoharpatil123@gmail.com Mob:9422287053

♦ Dr. Bal Kamble (Karjat - Pune) ♦ Dr. Vilas Awari (Kopargaon) ♦ Dr. Vitthal Dahifale (Nanded)

♦ Advisory Editors ♦

Dr. Vitthal More (Latur)
Dr. Alka Deshmukh (Nagpur)
Dr. Balasaheb Bhosale (Tasgaon)
Dr. Rajeshwari Deshpande (Pune)
Dr. Liaqat Khan (Mumbai)
Dr. Ashok Naikwade (Aurangabad)
Prof. Urmila Chavhan (Meeraj)
Dr. Manik Sonawane (Pune)
Dr. Sanjay Gore (Gadchiroli)
Dr. Pyarelal Suryawanshi (Amravati)
Dr. Pramod Shambharkar (Chandrapur)
Dr. Meera Phad (Nanded)
Dr. Vakil T. Shaikh (Koradi-Nagpur)
Dr. Sanjay Wagh (Mumbai)
Dr. Suresh Bhalerao (Parbhani)
Dr. Sachin Patil (Sangali)
Dr. Kusum More (Latur)
Dr. Prakash Pawar (Kolhapur)
Dr. Ravindra Bhanage (Kolhapur)
Dr. Ram Jadhav (Nanded)
Dr. Chaitra Redkar (Mumbai)
Dr. Prashant Amrutkar (Aurangabad)
Dr. Sunil Shinde (Parbhani)
Dr. Jyotsna Sonkhaskar (Nashik)
Dr. Nandaji Satpute (Gadchiroli)
Dr. Vinod Gaikwad (Shegaon)
Dr. Sandeep Kale (Selu-Vardha)
Mr. Dattatray Wabale (Pune)
Mr. Mahesh Birhade (Raigad)
Dr. Hanumant Phatak (Baramati-Pune)
Dr. Prashant Vighe (Paratwada-Amrawati)

♦ BOS Chairmen ♦

Dr. Mohan Kashikar (Nagpur)
Dr. Bharti Patil (Kholapur)
Dr. Dilipsing Nikumbha (Jalgaon)
Dr. Vilas Aaghav (Nanded)
Dr. Bal Kambale (Pune)
Dr. Navnath Aaghav (Aurangabad)
Dr. Rajendra Muttamvar (Gadchiroli)
Prof. Dr. Sham Sirsath (Aurangabad)

♦ Hon'ble Guest Editors ♦

Dr. Sushama Yadav (New Delhi)
Dr. Subhash Chandrakar (Raipur)
Dr. Anita Deshpande (Bhopal)
Dr. Sunilkumar Goyal (Khandwa)
Dr. J. Prabhash (Kerala)
Dr. B. Chandrashekhar (Hydrabad)
Dr. Sanjeevkumar Sharma (Meerut)
Dr. Shilpi Bose (Raipur)
Dr. Garima Jawualkar (Bhopal)
Dr. Ketan Govekar (Panji-Goa)
Dr. Shaikh Abul Barkat (Hydrabad)

♦ Editing Assists ♦

Dr. Sambhaji Patil (Shindkheda)
Dr. Gautam Bhalerao (Jalgaon)
Dr. Sanjay Patil (Chopada)
Asst. Prof. Ganesh Chavhan (Muktainagar)
Dr. Viqar Shaikh (Jalgaon)
Asst. Prof. Jawed Tadavi (Aadgaon)

♦ Managing Editor ♦
Mr. Yuvraj Mali

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985
Visit Us : www.mpspa.com E-mail : vicharmanthanjournal@gmail.com

Scanned by CamScanner

* अनुक्रमणिका *

संपादकीय ३
- 00000

- सतराव्या लोकसभा निवडणुकीतील महिलांचे प्रतिनिधीत्व ५
  - वैशाली प्रकाश पवार
- २०१९ च्या लोकसभा निवडणुकीचे विश्लेषण ८
  - प्रा. डॉ. महेंद्र पाटील
- भारतातील निवडणूक प्रक्रिया : लोकशाहीचे दर्शन ११
  - श्री. संदिप जगन्नाथ वारूळ
  - डॉ. संतोष शिवकुमार खत्री
- सतराव्या लोकसभा निवडणुकीचा जनादेश १३
  - वैशाली प्रकाश पवार
- १७ व्या लोकसभेतील स्त्री प्रतीनिधीत्व १७
  - सहा. प्रा. शशिकांत भालचंद्र पाटील
- एक राष्ट्र – एक निवडणुक : एक विश्लेषण २१
  - डॉ. शार्दुल सेलुकर
- 'आमच ठरलय' एक देश, एक निवडणूक, एक नेता, एकच पक्ष २५
  - प्रा. डॉ. प्रदीप पंजाबराव दंदे
- लोकसभा निवडणूक २०१९ विश्लेषण २९
  - कामिनी प्रफुल्ल पाटील
  - प्रा. डॉ. मनिषा अनिल कचवे
- लोकसभा निवडणूक २०१९ विश्लेषण ३०
  - श्रीमती सीमा भास्कर सैंदाणे
- स्थानिक संस्थांची कामगिरी : लोकशाही आणि सामाजिक न्याय ३३
  - प्रकाश पवार
- भारत : एकपक्षीय राजवटीच्या दिशेने ४४
  - प्रा. प्रदीप दंदे
- २१ व्या शतकात महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता ४७
  - प्रा. डॉ. रमेश शेवाळे
- समकालीन काळात महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता ५०
  - डॉ. मनिषा यादव
- समकालीन युगात महात्मा गांधींचे ग्रामीण, विकासातील विचार : एक दृष्टीक्षेप ५४
  - डॉ. व्ही. एच. भटकर
- वर्तमान सदी की चुनौतियों के समाधान के लिए गाँधी जी के विचार ५६
  - डॉ. व्हि. आर. कोडापे

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

एक राष्ट्र – एक निवडणुक : एक विश्लेषण

– डॉ. शार्दुल सेलुकर
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
(संलग्नीत - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

प्रस्तावना

२१ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच भारतामध्ये एक राष्ट्र-एक निवडणुक हे धोरण राबवता येईल का? याची चाचपणी सुरु आहे. जनमताचा कानोसा घेणे सुरु आहे. भारत सरकारच्या विधी आयोगाने एकत्रीत निवडणुकांवर एक समुदा २०१८ मध्ये प्रकाशीत केला आहे. त्यानुसार 'एकत्रीत निवडणुका म्हणजे एकाच वेळी निर्वाचन आयोग ठरवेल त्या टप्प्यांप्रमाणे केवळ लोकसभेच्या आणि राज्य विधानसभांच्या ागांसाठीच्या एकाच मतदारसंघातील निवडणुका एकाच दिवशी घेणे.' गेल्या दोन दशकात या धोरणाच्या बाजूने आणि विरोधात बरीच चर्चा, वादविवाद झाले आहेत. राष्टीय पक्ष आणि प्रादेशिक पक्षांनी आपली बाजू स्पष्ट केली आहे. कायदेतज्ञांनी याबाबतच्या शक्याशक्यतांवर भाष्य केले आहे. तसेच, राजकीय विश्लेषकांनी होणाऱ्या नफा नुकसानीबाबत उहापोह केला आहे. २०१९ नंतर आलेल्या भाजपा प्रणित केंद्रसरकारने पुन्हा एकदा हा मुद्दा चर्चेत आणला आहे. विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी याबाबत आग्रही दिसतात. तसे पूर्वी अटल बिहारी वाजपेयी देखील आग्रही होते. मात्र बहुमताअभावी त्यांना हा विषय पुढे नेता आला नाही. मात्र २०१९ मध्ये परिस्थिती बदलली आहे. भारतीय जनता पक्षाला लोकसभेत पूर्ण बहूमत तर एन.डी.ए ला ३५० जागा मिळालेल्या आहेत. राज्यसभेत नुकतेच कामचलाऊ बहुमत प्राप्त झाले आहे. सध्या भाजपा १० राज्यांमध्ये पूर्ण बहुमतात आहे, २ राज्यांमध्ये मोठा पक्ष आहे तर ५ राज्यांमध्ये भाजपाच्या पाठिंब्यावर राज्यसरकार एनडीएचे घटकपक्ष चालवत आहेत. म्हणजे १७ घटकराज्यात भाजपा व एन डी ए ची सरकारे आहेत. त्यामुळे संसदेत फ्लोअर मॅनेजमेंट करून आपण हे धोरण प्रत्यक्षात आणू शकतो असा विश्वास भाजपा नेतृत्वाला असू शकतो. यामुळे या चर्चेचे गांभीर्य व महत्त्व वाढले आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आपण एक राष्ट्र-एक निवडणुक या धोरणाची पार्श्वभूमि, धोरणाचे फायदे, तोटे तसेच धोरण राबवण्यासाठीच्या अडचणी यांचा उहापोह करणार आहोत.

एक राष्ट-एक निवडणूक : जागतिक स्थिती

जगात बहुतांश राष्टांनी प्रतिनिधीक शासनपद्धती स्विकारलेली आहे. लोकप्रतिनिधी निवडीच्या प्रक्रियेला निवडणूक म्हणतात. निवडणुकांच्या अनेक पद्धती आहेत. प्रत्येक देश स्वत:च्या सोईने निवडणुकांची पद्धती स्वीकारतो. जगातील १९५ देशांमध्ये जशी क्षेत्रफळाच्या बाबतीत विषमता आहे तशीच ती शासनपद्धतींच्या बाबतीतही आहे. यामध्ये प्रामुख्याने एकात्म शासन व्यवस्था आणि संघराज्य शासन व्यवस्था असे दोन प्रकार पाडता येतील. क्षेत्रफळाने लहान असलेल्या किंवा सांस्कृतिक एकात्मता असणाऱ्या देशांनी एकात्म शासनव्यवस्था स्वीकारली तर बहुतांश खंडप्राय देशांनी शासन कारभाराच्या सोईसाठी संघराज्य पद्धतीचा अवलंब केला आहे. (चीन याला अपवाद आहे. क्षेत्रफळ जगात तिसरा व लोकसंख्येने जगात पहिला असतानाही चीनने एकत्म शासनव्यवस्थेचा स्विकार केला आहे.) सध्या जगात साधारणात: २८ देशांनी संघराज्य व्यवस्था तर १६० पेक्षा अधिक देशांनी एकात्म शासन व्यवस्था स्वीकारलेली आहे.

संघराज्यात केंद्रशासन व राज्यशासनाच्या निर्मितीसाठी स्वतंत्र निवडणुका होत असतात. अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, भारत अशा खंडप्राय संघराज्यांमध्ये घटकराज्यांच्या व केंद्रशासनाच्या निवडणुका एकाच वेळेला घेणे अशक्यप्राय असते. जगातील १९५ देशांपैकी द. A{ 8 6 जर्मनी[२], आणि बेल्जीयम[३] हे तीन संघराज्य आहेत तेही आकाराने व लोकसंख्येने फार मोठे नाहीत. इंग्लंड, स्वीडन यासारख्या एकात्म शासनव्यवस्थांनी आपापल्या अनुरूप अशी एकत्रीत निवडणुकीची प्रक्रिया स्वीकारलेली आहे. परंतु जगामध्ये क्षेत्रफळाने लहान असलेल्या परंतु एकत्रीत निवडणुकीचा स्वीकार न करणाऱ्या देशांची संख्या अधिक आहे. अशा परिस्थितीत भारतामध्ये लोकसभेच्या व विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याचा विचार समोर आल्यानंतर धोरणनिर्धारकांच्या हेतूवर शंका उपस्थित करणे क्रमप्राप्त आहे. या सर्व शंकांचे योग्य निरसन झाले नाही तर धोरणाचे कायद्यात रुपांतरीत होण्यात आणि त्याच्या अंमलबजावणीत अडचणी येवू शकतात.

भारतासाठी 'एक राष्ट्र-एक निवडणुक' धोरणाचे फायदे

कोणतेही धोरण स्वीकारण्याआधी त्याचे फायदे आणि तोटे याचा ताळेबंद तयार करणे गरजेचे असते. त्याशिवाय त्या धोरणाची उपयोगीता लक्षात येऊ शकत नाही. तसेच या धोरणातील संभाव्य अडचणी किंवा धोके लक्षात घेऊन धोरण ठरवणे अधिक सोपे जाते.

एक राष्ट्र - एक निवडणूक या धोरणाचे समर्थक या धोरणाचे पुढील फायदे मांडतात.

१) सेंटर फॉर मिडीया स्टडीज यांच्या एका सर्वेनुसार कर्नाटक विधानसभेच्या २०१८ च्या निवडणुकीचा खर्च ९५०० ते १०५०० कोटी एवढा होता. याच संस्थेच्या एन. भास्करराव यांच्या अंदाजप्रमाणे २०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकांचा खर्च अंदाजे ५५००० ते ६०००० कोटी एवढा झाला आहे.[५] प्रति मतदार हा खर्च ७०० रु. एवढा होता. प्रत्येक मतदारसंघात १०० कोटी पेक्षा अधिक खर्च केला गेला. अनेक मतदारसंघात निवडणुक आयोगाने घालून दिलेल्या ७० लाखाच्या मर्यादेच्या ४० ते ५० पट अधिक म्हणजे जवळजवळ ४० कोटी इतका खर्च काही उमेदवारांनी केला आहे.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur
Scanned by CamScanner

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर निवडणुकांवरील खर्च कमी होईल असा समर्थकांचा विश्वास आहे.

२) सततच्या निवडणुकांमुळे लागणाऱ्या आचारसंहितांमुळे विकासकामात अडथळा निर्माण होतो. मोठमोठे प्रकल्प रखडतात आणि विलंबामुळे प्रकल्पाची किंमतही वाढते. नागरीकांच्या सोईपेक्षा आचारसंहितेला महत्त्व प्राप्त होते. सर्व प्रशासकीय यंत्रणा निवडणुक कामात गुंतल्यामुळे ही लोकसेवेवर परिणाम होतो. याचा त्रास अंतिमत: जनतेलाच होतो.

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर विकास कामांना सातत्य व गती प्राप्त होईल.

३) गेल्या चार-पाच दशकापासून निवडणुक आयोग हा सतत निवडणुक कार्यात गुंतलेला दिसतो, विशेषत: कोणत्याही मोठ्या कर्मचारी वर्गाशिवाय. यामुळे निवडणुक आयोगाबरोबरच उर्वरीत शासकीय व निमशासकीय यंत्रणेवर ताण पडतो. सतत चालणाऱ्या निवडणुका संरक्षण यंत्रणेवर फार मोठा ताण टाकतात.

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर प्रशासकीय यंत्रणा आणि सुरक्षा यंत्रणेवरील सततचा ताण कमी होईल.

४) निवडणुकांमुळे शासनाचा कल मतदारांना आकर्षित करण्यासाठीच्या धोरणांकडे जास्त असतो. याचा ताण अर्थव्यवस्थेवर पडतो. निवडणुक काळात मोठमोठी आश्वासने दिली जातात. याची थोडीफारतरी पुर्तता शासनाला निवडून आल्यावर करावी लागते. तसेच निवडणुका जाहिर होण्याआधीच सरकार मतदारांना प्रलोभीत करण्यासाठी आकर्षक योजना जाहीर करते, त्यावर खर्चही सुरू करते. हा खर्च शासनाच्या तिजोरीतूनच होणार असतो.

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर राजकीय पक्षांना निवडणुकांच्या राजकारणापेक्षा विकासकामावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी वेळ मिळेल.

५) वारंवार निवडणुकांचा खर्च प्रत्यक्षातील असो वा कागदोपत्री असो न झेपणारा आहे. निवडणून आलेला उमेदवार येणाऱ्या काळात प्रचारासाठी खर्च झालेला त्याचा पैसा कोणत्या न कोणत्या माध्यमातून परत मिळवण्याचा व पुढील निवडणुकीसाठी भांडवल जमवण्याचा प्रयत्न करतो. यातून भ्रष्टाचाराला चालना मिळते.

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर निवडणुकांवरील खर्चच कमी होईल त्यामुळे भ्रष्टाचार व काळापैसा याला आळा बसेल.

६) शासनाला वेळोवेळी आर्थिक सुधारणा कराव्या लागतात. ज्यामुळे आपला आर्थिक विकास योग्य गतीने होईल यासाठी प्रसंगी आर्थिक सुधारणांबाबतचे कठोर निर्णय शासनाला घ्यावे लागतात. हे निर्णय अनेक वेळेला जनतेला प्रथमदर्शनी न आवडणारे असतात, ज्याचा परिणाम मतदानावर होऊ शकतो. वारंवार निवडणुकांमुळे असे निर्णय घेणे अडचणीचे ठरते परिणामी आवश्यकता असतानाही अशा धोरणांबाबत टाळाटाळ होण्याची शक्यता अधिक असते. ज्यामुळे देशाचा आर्थिक विकास मंदावतो.

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर शासनाला कठोर निर्णय घेणे सोपे जाईल, ज्यामुळे देशाच्या आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होणार नाही.

वरील काही मुद्दे एक राष्ट्र - एक निवडणुकीच्या समर्थनार्थ भारतासंदर्भात मांडले जातात. पैकी बहुतांश बाबी अवास्तव नाहीत, हे सत्य आहे. तरीही एकत्रीत निवडणुकांना काही राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते, समाजकार्य करणाऱ्या संस्था, पत्रकार इ. चा विरोध आहे. त्यांच्या भूमिकेवरही आपण प्रकाश टाकला पाहिजे.

भारतासाठी एक राष्ट्र - एक निवडणुक धोरणाचे संभाव्य तोटे

भारतामध्ये एकत्रीत निवडणुकांना विरोध करणारे साधारणपणे पुढील मुद्यांच्या आधारे आपली बाजू मांडताना दिसत आहेत.

१) लोकसभेच्या, राज्यविधिमंडळाच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे मुद्दे वेगवेगळे असायला हवेत, कारण प्रत्येक सभागृहाचे कार्यक्षेत्र भिन्न आहे. तेव्हा प्रचाराचे मुद्देही त्यापद्धतीनेच असायला हवेत. परंतु सर्वसाधारणपणे जेव्हा लोकसभेच्या सर्वसाधारण निवडणुका होत असतात अशा प्रसंगी सोबत होणाऱ्या घटकराज्यांच्या विधानसभांमध्ये देखील प्रचारामध्ये राष्ट्रीय पातळीवरीलच मुद्यांचा विचार होताना दिसतो.

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर निवडणुक प्रचारात प्रादेशिक तसेच स्थानिक मुद्यांना कमी महत्त्व मिळेल यामुळे सहाजीकच प्रादेशिक प्रश्नांवर निर्माण झालेल्या प्रादेशिक पक्षांना कठिण दिवस येतील.

२) २०१९ च्या निवडणुकीच्या वेळी ७ फेऱ्यांमध्ये मतदान झाले. मतदानाच्या दिवशीपासूनच मतदानयंत्राच्या सुरक्षेचा प्रश्नन गंभीर बनला होता. यामुळे निवडणुक प्रक्रियेतील विश्वासहर्ता कमी होते व अफवांचे पीक येते. मतदान आणि निवडणुकांचा निकाल यामधील वेह जेवढा कमी असेल तेवढी निकालाबाबत विश्वाहर्ता जास्त असते याउलट होणारा विलंब अनेक शंकानुशंकांना जन्म देतो. पराजीत पक्षाला आपल्या पराभवामागे सत्ताधारी पक्षाचे कटकारस्थानाची शंका न येता त्यांनी पराभव मान्य करून सकारात्मक विरोधी पक्षाची भूमिका निभावण्याची ग्वाही देणे ही बाब सुदृढ लोकशाहीसाठी आवश्यक असते.

एकाच वेळी लोकसभांच्या आणि सर्व किंवा काही घटकराज्यांच्या निवडणुकांची मतमोजणी करावयाची व निकाल घोषीत करावयाचे ही वेळ खाणारी बाब बनेल.

३) निर्वाचन आयोगाला स्वत:चा असा मोठा कर्मचारी वर्ग नाही. भौतिक सुविधांचे पाठबळ नाही तसेच आवश्यक असणाऱ्या मतदान यंत्रांची संख्याही पुरेशी नाही. प्रशासकीय, शायकीय आणि निमशासकीय सेवकांचा वापर करून निवडणुक आयोग आपले कार्य पूर्ण पाडत असतो.

Scanned by CamScanner

याबरोबरच निवडणुक आयोग निवडणुकीच्या वेळी शासकीय किंवा खाजगी संस्थांच्या जागा मतदानकेंद्राआठी वापरते. शासनाच्या किंवा खाजगी गाड्यांचा वापर वाहतुकीसाठी केला जातो. थोडक्यात मतदानासाठी आयोगाला तात्पुरत्या स्वरूपात सर्व यंत्रणा उभी करावी लागते.

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर भौतिक सुविधा, मान संसाधन व तंत्रज्ञान सामग्रीचा प्रश्न निर्माण होईल.

४) भारतीय संविधानामध्ये केंद्र शासन, राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची निर्मिती, कामकाज व बरखास्ती याबाबत स्वतंत्र कलमांद्वारे तरतूदी केलेल्या आहेत. आता आपणास लोकसभा व राज्यातील विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घ्यावयाच्या असतील तर अनेक संवैधानिक प्रश्नांना तोंड द्यावे लागेल. अनेक अस्तीत्वात असलेल्या राज्यविधीमंडळांचा कालावधी वाढवावा किंवा कमी करावा लागेल. तसेच यानंतरच्या सर्व सभागृहांचा कालावधी पाच वर्षासाठी निश्चित करावा लागेल. वास्तविक या सर्व बाबींचा उहापोह संविधान सभेमध्ये झालेला आहे व यांच्या अव्यवहार्यतेमुळेच वर्तमान व्यवस्था स्वीकारली आहे.

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर अनेक संवैधानिक अडचणी निर्माण होतील.

५) भारत हे एक वेगळे संघराज्य आहे. राष्ट्रनिर्मात्यांना व संविधान निर्मात्यांना भारताच्या सांस्कृतिक विविधतेची पुर्ण कल्पना होती. याची बलस्थाने आणि संभाव्यं अडचणी यांची जाणीव होती. भारत हा भौगोलिक दृष्ट्या एक देश आहे. पाश्चात्त्य कल्पनेनुसार राजकीयदृष्ट्या एक राज्य आहे. मात्र सांस्कृतिकदृष्ट्या एक राष्ट्र होऊ शकत नाही. भारतात अनेक राष्ट्र असल्यामुळे अखंड राष्टनिर्मितीचे प्रयत्न भारतात फारसे यशस्वी झाले नाहीत. हिंदी भाषेला दाक्षिणात्य राज्यांकडून झालेला आणि होत असलेला विरोध सर्वश्रुत आहे.

एकत्रीत निवडणुका घेतल्यानंतर गेल्या ७-८ दशकामध्ये निर्माण झालेला संघराज्याचा समतोल ढासळेल.

पुढील दिशा

या धोरणाची जमेची बाजू पाहिली असता काही बाबतीत समर्थकांचा आशावाद स्पष्ट दिसतो जो वास्तवात उतरणे सध्यातरी कठीण वाटते. जसे या धोरणामुळे राजकीय पक्षांचा खर्च कमी झाल्यामुळे भ्रष्टाचार व काळापैसा यावर आळा बसेल असे मत मांडणे म्हणजे निव्वळ आदर्शवाद आहे. याउलट कदाचीत लोकसभा उमेदवार आणि विधानसभांचे उमेदवार मिळून निवडणुकीत पैसा खर्च करतील आणि निवडून आल्यानंतर मिळून भ्रष्टाचाराच्या माध्यमातून तो पैसा वसूल करतील. तसेच विकास कामांना योग्य दिशा आणि सातत्य प्राप्त होईल हेही आपण ठामपणे म्हणू शकत नाही. राजकीय पक्ष लोकसभेच्या निवडणुकानंतर येणाऱ्या विधानसभांच्या निवडणुकासाठी तरी आश्वासन पुर्ततेचा प्रयत्न करतील. परंतु एकाच वेळेस लोकसभेच्या आणि विधानसभांच्या निवडणुका घेतल्या तर ते पुढील पाच वर्ष मतदारसंघात फिरकणारही नाही.

एकत्रीत निवडणुकांचे तोटे पाहिले असता काही बाबतीत प्रथमदर्शनी मनात काही भीती निर्माण होणे साहजिक आहे. प्रादेशिक पक्षांना हे धोरण कठीण जाणारे आहे. एकाच वेळेला दोन मतदान घेणे हे संसाधन आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने आव्हान असणार आहे. अनेक संवैधानिक अडचणी निर्माण होणार आहेत. मात्र काही बाबतीत विनाकरण बाऊ केला जात आहे हेही समजण्याजोगे आहे.

१) राष्टीय निवडणुकांमध्येही प्रादेशिक मुद्यांना उचलून मतदारांना भ्रमित करणाऱ्या पक्षांना निश्चितच यामुळे तोटा होणार आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आपण मतदारांच्या विवेकावर प्रश्नचिन्ह उपस्थीत करत आहोत. आपला मतदार हा ७-८ दशकाच्या लोकशाहीने प्रगल्भ झालेला मतदार आहे. त्याला त्याच्या भविष्यासाठी काय आवश्यक आहे हे समजते. त्यावर आधारीतच तो मतदान करत असतो. प्रादेशिक पक्षांनी राष्टीय-आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर आपली भुमिका का बनवू नये. यावर आधारीत मतदान मागावे मतदार राजा सुज्ञ आहे तो योग्य तो निर्णय घेतो. बीजू जनता दल २०१४ व २०१९ दोन्ही निवडणुका लोकसभेसाठी आणि विधानसभेसाठी भाजपाच्या विरोधात लढला आणि दोनही निवडणुकांमध्ये एकत्रीत निवडणुका होऊनही राज्यात बहुमताने निवडून आला. २०१९ मध्ये मात्र ओरीसाच्या मतदारांनी २१ पैकी ८ जागांवर भाजपाचे उमेदवार निवडून दिले. त्याच वेळी विधानसभेसाठी मात्र १४६ पैकी ११२ उमेदवार बीजू जनता दलाचे निवडून देत प्रगल्भतेचे उदाहरण दिले. आंध्रप्रदेशमध्येही जगमोहन रेड्डी यांचे यश या भूमिकेला छेद देते की राष्टीय मुद्यांमुळे प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व धोक्यात येईल. प्रादेशिक अस्मितांचे भांडवल करणाऱ्या पक्षांना मात्र आपल्या भूमिकांच्या नव्याने विचार करावा लागले.

२) निवडणुक निकालांना विलंब लागेल हे विधान म्हणजे हास्यास्पद आहे. अवघ्या काही तासांमध्ये लोकसभेचे निकाल लागतात. फार फार तर काही तास आणखी वाट पहावी लागेल एवढेच. मात्र हा विलंब एक दोन दिवसांपेक्षा जास्तीचा नसेल हे निश्चित. दुसरी बाब आहे ती मतदान यंत्राच्या सुरक्षीततेची, २०१९ च्या निवडणुकीत अनेक ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: सुरक्षेची खात्री दिली होती. एकत्र निवडणुका घेतल्या तर सुरक्षीततेसाठी आणि विश्वासहर्ता राखण्यासाठी सर्वसंमत अशी यंत्रणा उभी करावी लागेल.

३) तंत्रज्ञान आणि साधन सामग्रीच्या प्रश्नावर माजी निवडणुक अधिकारी एस. वा. कुरेशी यांचे मत अतिशय बोलके आहे, त्यांच्या मते, "From EC point of view this is the easiest thing to happen. The voter is the

Scanned by CamScanner

same,polling stations are same and the security needed is the same... Once the voter enters the polling station whether he voted for one election or two or three, it is the same thing...."

४) या धोरणामुळे काही संवैधानिक अडचणी निर्माण होणार आहेत हे उघड सत्य आहे. मात्र यावर भारताचे कायदे मंत्रालय काम करीत आहे. २०१८ साली जो मसूदा कायदे मंत्रालयाने प्रसिद्ध केलेला आहे त्यामध्ये वर्तमान राज्यघटनेतील कोणकोणत्या कलमात काय काय सुधारणा कराव्या लागतील हे अतिशय सविस्तर रित्या दिलेले आहे. याउपर वर्तमान विधानसभांचे काय करायचे याबाबतही अनेक पर्याय दिलेले आहेत. कोणताही एक सर्वमान्य पर्याय निवडला जाऊ शकतो. बहुतांश राज्यात भाजपाचीच सरकारे असल्याकारणाने त्यांचा या धोरणाला विरोध होणार नाही मात्र विरोधी पक्षांची सरकारे ज्या राज्यांमध्ये आहेत त्यांनी याबाबत सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे.

सारांश

प्राचीन काळापासून ते ब्रिटिशांची राजकीय सत्ता या देशात प्रस्थापित होई पर्यंत येथील बहुजनव मागासलेला समाज शिक्षणापासून वंचित राहिलेला होता.यांचे कारण म्हणजे या देशातील वर्णव्यवस्था होय ,या वर्णव्यवस्थेत येथील समाज ब्राम्हण ,क्षेत्रीय ,वैश्य व शूद्र अशप्रकारे या चार भागात येथील समाज विभागला होता.या चार वर्णापैकी ब्राम्हण हा वर्ण इतर वर्णापेक्षा सर्वश्रेष्ठ वर्ण म्हणून पुढे आला होता. कालांतराने ब्राम्हणाचे वर्चस्व येथील प्रसमाजव्यवस्थेने मान्य केले होते ,म्हणून तत्कालीन काळात निर्माण झालेली ब्राम्हणाची शिक्षणावरील मक्तेदारी सर्वमान्य झाली होती.परिणामतः येथील बहुजन व मागासलेला शुद्र समाज हा शिक्षणापासून वंचित राहिला होता- राम राज्याच्या काळात शूद्र समाजातला शंभू ने वेद म्हटल्याबद्दल त्याला रामाने मृत्यूदंडाची शिक्षा केली होती तर आधुनिक काळात महात्मा ज्योतिबा फुले यांना शाळेतून काढून पारंपारिक व्यवसाय करण्यासाठी त्यांच्या वडिलांचे मन वळविण्यात आले होते. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मुंवई येथे एल्फिन्स्टन महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमासाठी संस्कृत हा विषय घेऊ देण्यात आलेला नव्हता अशा प्रकारच्या परिस्थितीत येथील बहुजन व मागासलेला शुद्र समाज शेकडो वर्षापासून निरीक्षण ,अज्ञानी, मानसिक गुलामी, आर्थिक दारिद्र्य, व सामाजिक दृष्ट्या मागासलेले जीवन जगत आलेला होता अशा प्रकारच्या परिस्थितीत जीवन जगत आलेल्या समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व व त्यांचे समाजावर होणारे परिणाम ओळखून या देशातल्या समाज व्यवस्थेमध्ये शेकडो वर्षापासून लाचारीचे जीवन जगत आलेल्या समाजाला शिक्षणाचा हक्क व शिक्षण मिळवून देण्याकरिता आयुष्यभर या समाज व्यवस्थेच्या विरुद्ध विविध आघाड्यावर आक्रमक व निर्भयपणे यशस्वी संघर्ष करत राहिले.

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्रशान करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही" हे विधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजाला उद्देशून म्हणले आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते शिक्षण हे माणसाच्या सर्वांगीण विकासाचे माध्यम आहे. म्हणून या देशातल्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या सर्व बहुजन व मागास समाजाला शिक्षण देण्यासाठी विविध माध्यमातून अहो रात्री यशस्वीपणे प्रयत्न करीत राहिले.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक कार्य**
- **बहिष्कृत हितकारणी सभा:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातल्या बहिष्कृत असलेल्या अस्पर्श समाजाला शिक्षण व्यवस्थेत समाविष्ट करण्याच्या उद्देशाने १९२४ मध्ये या सभेची स्थापना केली .या सभेच्या माध्यमातून समाजातील दीनदुबळ्यां निरक्षर पालकांच्या मुला मुली करिता वसतीगृह उघडून शिक्षणाचा प्रसार केला तसेच वाचनालय व अभ्यास मंडळे सुरू करण्यात आली होती. या समितीच्या सहकार्याने १९२५ मध्ये सोलापूर येथे दलित वर्गाच्या विद्यार्थ्याकरिता एक वस्तीगृह सुरू करण्यात आली. या वस्तीग्रहातील मुलांना कपडे ,लेखनसाहित्य व भोजन इत्यादी खर्च डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः केले. तर तेथील नगरपालिकेने यासाठी ४० रुपये अनुदान मंजूर केले तसेच येथील एका नगरसेवकाने व्यवस्थापनाचे काम पाहत राहिले .अशाप्रकारे अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञान आणि विद्या व सामाज सेवेबद्दल प्रेम यांची आवड निर्माण व्हावी म्हणून बहिष्कृत हितकारणी सभेने एक संस्था स्थापन केली .या सभेच्या मार्गदर्शनाखाली सरस्वती विकास नावाचे मासिक चालवले जात होते त्याच्या जोडीला मुंबई येथे एक मोफत वाचनालय सुरू करण्यात आले होते. तर इ.स. १९२७ मध्ये प्राथमिक शिक्षणाची प्रगती फार मंद गतीने होत आहे अशी खंत व्यक्त केली होती तेव्हा ज्या गतीने शिक्षणाची प्रगती होत होती त्याच वेगाने सुरू राहिली तर शिक्षणाच्या कक्षेत आणण्यासाठी शाळेत जाणाऱ्या मुलांना आणखी चाळीस वर्षे लागतील म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षणावरील अधिक खर्चासह व सक्ती हा उपाय सुचविला होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार मांडत असताना त्यांनी या देशातल्या समाजव्यवस्थेतील शेवटच्या स्तरातील समाजाला शिक्षण जितके स्वस्त करता येईल तितके केले पाहिजे अशा प्रकारचा अहवाल शासनाला केले होते जर समाजातील सर्वच जमातींना समानतेच्या पातळीवर आणावयाचे असेल तर शिक्षण हाच एक उपाय सांगितला होता. 1928 मध्ये अस्पृश्य समाजातील मुला मुलींची शालेय शिक्षण भक्कम पायावर संघटित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वर्ग शिक्षण संस्थेची स्थापना केली होती दीनदलित वर्गाच्या विदयार्थ्यांच्या कल्याणासाठी माध्यमिक शालेय शिक्षणाचा भार सहन करण्यास असमर्थ होते .त्यांना वस्तीगृह पुरविण्याच्या कार्यात दलित वर्ग शिक्षण संस्थेला सहाय्य करण्याचे आव्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई शासनाला केली होती. ही मागणी मुंबई शासनाने मंजूर करून पाच वस्तीग्रह देण्याचे मान्य करून वार्षिक वर्गणी म्हणून नऊ हजार रुपये अनुदान देण्याचे मंजूर केले .तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वर्ग शिक्षण संस्थांचे कार्य करत असताना आलेल्या अडचणीची

पूर्तता करण्यासाठी निरनिराळ्या विभागात जाऊन देणगया गोळा कराव्या लागल्या धर्मदाय संस्था व मोठ्या मनाच्या माणसांना मदतीसाठी त्यांनी आव्हान केले.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण विषयक विचार:-**

डॉ. आंबेडकर यांच्या मते अध्यापन विद्यापीठ हे अध्यापकाचे विद्यापीठ होते आणि अध्यापनाचे प्राधिकृत निर्देशन विद्यापीठाला अध्यापन विद्यापीठ बनवीत होती म्हणजेच समानतेच्या अटीवर विद्यापीठ आणि महाविद्यालय उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी भागीदार होतील संलग्न विद्यापीठ महाविद्यालयात अध्यापन आणि संशोधन यांच्या व्यवस्थापन यावर नियंत्रण ठेवण्यासाठी व पर्यवेक्षण करण्यासाठी विद्यार्थ्याकडे प्रात शक्ती असली पाहिजे तरच उच्चशिक्षणाचा दर्जा टिकून राहील व उच्च शिक्षणाचे नियंत्रण सुशिक्षित वर्गाने केले पाहिजे, दुर्देवाने सुशिक्षित वर्गाकडे सामाजिक सद्गुण नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केले. सुशिक्षित लोक केवळ जनतेच्या उपेक्षा करतात तर जनतेला उच्च शिक्षण द्यावे याला सुद्धा विरोध करतात .म्हणून विद्यापीठाचे मूल्यांकन केवळ त्यांच्या ज्ञान संपादनाने न होता त्यांच्या सामाजिक वागणुकीने झाली पाहिजे अशी त्यांची इच्छा होती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातींमध्ये उच्च शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या शिक्षण संस्थे अंतर्गत मुंबई येथे २४ जून १९४६ रोजी सिद्धार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय सुरू करण्यात आले आज तेच महाविद्यालय भारतातील एक अग्रगण्य महाविद्यालय म्हणून सिद्ध झाले आहे. या शिक्षण संस्थेचे ध्येय असे होते की या देशातल्या तरुणांना बौद्धिक. सामाजिक व नैतिक लोकशाहीचे प्रचलन करता येईल . तसेच इ .स. सन १९४६ मध्ये मुंबई येथे सिद्धार्थ विधी महाविद्यालय सुरू करण्यात आले, तर १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद कला आणि विज्ञान महाविद्यालय सुरू करण्यात आले. तसेच १९५३ मध्ये मुंबई येथे सिद्धार्थ वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय सुरू केले.म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला उच्च शिक्षणाकडे आकर्षित करण्याकरिता विविध प्रकारच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाचा सामाजिक आर्थिक शैक्षणिक व संस्कृतीक विकास घडून आणणे व या समाजव्यवस्थेत त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी यशस्वी संघर्ष करत राहिले

"शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा" या तीन तत्त्वांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षणाचे सार समाविष्ट केले आहे. क्रियाशील बना, अन्याय अत्याचार यांचा विरोध संघर्ष करा आणि आपले ध्येय साध्य करण्यासाठी संघटित व्हा, अशा प्रकारचा संदेश त्यांनी दिला. कारण हे तीन तत्व समाजात क्रांती घडवू शकतात. देव ,दैव , नशीब ,धर्मभोळेपणा या विरोधात त्यांनी ठाम मत व्यक्त केले. आई-वडील

मुलांना जन्म देतात पण कर्म देत नाहीत, असे म्हणणे ठीक नाही, पण मुलांना चांगले संस्कार करून यशाचा योग्य मार्ग दाखवतात हे मात्र निश्चित आहे. म्हणून योग्य संस्कार मुलांच्या मनात रुजविण्यासाठी योग्य शिक्षण ही त्यांना देणे गरजेचे आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात उच्च शिक्षणातूनच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा जन्म होतो.आपण आपल्या व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला शोध असतो स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्वाची प्रतिष्ठा निर्माण करण्याची शक्ती ही एकाच शिक्षणात असते यातूनच स्वतःच्या कर्तुत्वावर विश्वास असलेला माणूस घडत असतो.

संदर्भ ग्रंथ

(1) महाराष्ट्रातील समाज सुधारक - के. सागर
(2) डॉ. आंबेडकर तत्व आणि विचार - डॉ. धनंजय कीर
(3) http://www.pudhari.news/editorial/editorial/Dr-Ambedkar-s-educational-ideas/

TRUE COPY
PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalava, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur M.S.

TRUE COPY
PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalava, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur M.S.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

महाराष्ट्र राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषद

Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985

VICHAR MANTHAN

विचारमंथन

National Research Journal of Political Science and Public Administration
(A Peer Reviewed Journal)
Vol. - 8, No - 4 Issue - 25 Oct-Dec. 2020 ISSN- 2347-9639

♦ Editor ♦

Prin. Dr. Pramod Pawar

Prin. Dr. Manohar Patil **Prin. Dr. Bal Kamble**

Prof. Dr. Ravindra Bhanage **Dr. Vitthal Dahiphale**

Dr. Sandip Nerkar

♦ President ♦
Prin. Dr. Pramod Pawar
Email : pramodpawar1761@gmail.com
Mob : **9423582073**

♦ Secretary ♦
Prin. Dr. Manohar Patil
Email : manoharpatil123@gmail.com
Mob : **9422287053**

♦ Guided by ♦
Prin. Dr. P. D. Deore
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc.,
Savarkar Nagar, Gangapur Road, **Nashik-13**
Mob : **9423980457**

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985
Visit Us : vicharmanthanjournal.org
E-mail : vicharmanthanjournal@gmail.com

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

* अनुक्रमणिका *

१. **कोविड–१९ : भारतीय समाजजीवनावर सामाजिक व आर्थिक परिणाम** ९
डॉ. प्रशांत विघे

२. **ग्लोबल गांधी** २०
डॉ. संदीप बी. काळे

३. **असहकार चळवळीचे भारतीय राष्ट्रवादातील योगदान** २३
सहा. प्रा. शशिकांत भालचंद्र पाटील, प्रो. डॉ. प्रमोद मनोहर पवार

४. **अहिंसेचा संदेश देणारे महामानव महात्मा गांधी यांच्या प्रेरक विचारांचा अभ्यास** २८
डॉ. संभाजी संतोष पाटील

५. **महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्यसंबंधीचे विचार : तुलनात्मक व टीकात्मक** ३५
प्रा. डॉ. विलास भारतराव बनसोडे

६. **भारतीय संविधान आणि लोकशाहीची वास्तवता** ३८
प्रा. डॉ. संजय वामनराव भोळे

७. **भारतीय संविधानातील लोकशाही आणि लोकांची भूमिका** ४३
प्रा. नागसेन भीमरावजी ताकसांडे

८. **काळाराम मंदिर प्रवेश चळवळ – स्त्री जागृती** ४६
डॉ. श्रीमती कल्पना महादू वाजे

९. **महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेचा ७३ व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने अभ्यास** ५०
संध्या कृष्णा जगताप, प्राचार्य डॉ. प्रमोद पवार

१०. **भारतीय आरोग्य व्यवस्था** ६३
प्रा. डॉ. सचिन महादेव पाटील

११. **लेवा पाटीदार जातीचे स्थलांतर : एक अभ्यास** ६८
प्रा. गणेश चव्हाण, प्रा. डॉ. प्रमोद पवार

१२. **आघाड्यांचे राजकारण : एक दृष्टिक्षेप** ७३
प्रा. डॉ. कमलाकर एन. राक्षसे

१३. **स्वतंत्र विदर्भ राज्य मागणीसंदर्भातील कारणांचा विश्लेषणात्मक अभ्यास** ७९
पौर्णिमा लक्ष्मण देशमुख

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

आघाड्यांचे राजकारण : एक दृष्टिक्षेप

प्रा. डॉ. कमलाकर एन. राक्षसे
राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे.

आधुनिक जग हे लोकशाही मान्य असलेले जग आहे. लोकशाहीमध्ये कायदेमंडळ सर्वोच्च मानले गेले आहे. कायदेमंडळातील सदस्य विविध पक्षांचे असतात. त्यातल्या त्यात प्रातिनिधिक लोकशाहीचे प्रत्येक राष्ट्रास आकर्षण असल्याचे आपणांस पाहावयास मिळते. लोकशाहीमध्ये राजकीय पक्षांना फार महत्त्व असते. राजकीय पक्ष हे विविध विचारधारेचे असू शकतात. राजकीय पक्षांना सत्ता हस्तगत करणे, एवढेच शुद्ध उद्दिष्ट त्यांच्या डोळ्यांसमोर असते. याच प्रक्रियेचा भाग म्हणून युरोपियन देश आणि भारतात राजकारणाला वेगवेगळे आयाम व आकार प्राप्त झालेले दिसून येतात. एकंदरीत जगाच्या अणि भारंताच्या राजकीय जीवनाचा प्रवास बघितल्यानंतर या राजकीय प्रवासात आघाड्यांच्या राजकारणाचे एक महत्त्वपूर्ण वळण आहे. त्यावर प्रकाश टाकणे गरजेचे वाटते. म्हणून सदर संशोधन लेखात आघाड्यांचे राजकारणाचे संशोधनात्मक विश्लेषण केलेले आहे.

आघाडीच्या राजकारणाला सिद्धांतहीन, तत्त्वहीन म्हटले जात असले, तरी एका पक्षाची एकाधिकारशाही, राजकीय अरेरावी, लहानसहान घटकांकडे जाणूनबुजून केलेले दुर्लक्ष, विशिष्ट समूहाच्या घराणेशाहीचे वर्चस्व याला आव्हान देण्यासाठी आघाडीचे राजकारण या संकल्पनेचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. ही अपरिहार्यता लक्षात घेता, सदर विषयाची प्रासंगिता आपल्या ध्यानात येईल.

प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी/अध्ययनासाठी माहितीचा स्त्रोत हा दुय्यम साधने असून, सदर संशोधनपर लेखात आघाड्यांच्या राजकारणावर संशोधनपर प्रकाश टाकण्यात आला आहे. सदर संशोधनपर लेखात खालीलप्रमाणे गृहीतकृत्ये निश्चित करण्यात आली आहेत.

गृहीतकृत्ये

» एक पक्ष प्रभुत्व पद्धतीचा ऱ्हास झाला आहे.
» राजकारणात पक्षीय स्पर्धा वाढली आहे.
» राजकारणाचे नवे आकृतिबंध निर्माण झाले आहेत.

आघाडी सरकारचा प्रयोग आपल्या देशात नव्यानेच सुरू झालेला दिसतो. मात्र, युरोपियन देशात २० व्या शतकात अनेक राष्ट्रांमध्ये आघाडीचे शासन अस्तित्वात आलेले आपणांस पाहावयास मिळते. एकंदरीत युरोपियन लोकांनी आघाडी सरकारचा/ राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव घेतलेला दिसतो. जर्मन फेडरल गणतंत्रातील ख्रिश्चियन डेमोक्रेटीक पक्ष व सोशल डेमोक्रेटस या दोन मोठ्या पक्षांनी फ्री डेमोक्रेटस या पक्षाबरोबर व 'मोठी आघाडी'मध्ये सामील होऊन सरकार बनविले होते. हॉलंड, बेल्जियम आणि डेन्मार्क या देशांमध्ये तर आघाडीचे सरकारे हाच पर्याय आहे.[१]

ज्या देशामध्ये बहुपक्ष पद्धती आहे, अशा देशात आघाड्यांचे सरकारे उदयास आलेले आपणांस पाहावयास मिळतात. सर्वसाधारणपणे निवडणूकपूर्व किंवा निवडणुकीनंतर सत्ता संपादन करण्यासाठी अनेक पक्ष एकत्र येऊन आघाड्या निर्माण करतात व सरकारेही बनवितात. त्याला आपण 'आघाडीचे शासन' असे संबोधतो. युरोप खंडात आघाडीच्या राजकारणाला २० व्या शतकात प्रारंभ झाला.

इंग्लंड या देशाने जगाला संसदीय शासनपद्धती दिली; परंतु इंग्लंडमधील जनता आघाडी सरकारला पसंद करत नाही.[२] युरोप खंडातील विविध देशांत मात्र आघाडी शासनाची संकल्पना चांगलीच रुजलेली दिसून येते.

'आघाडी' या मराठी शब्दाला इंग्रजीत 'Coalition' असे म्हटले जाते. 'Coalition' हा शब्द लॅटिन भाषेतील 'Colitio' या शब्दापासून बनलेला आहे. ज्याचा अर्थ एकत्र, प्रबंधन, संमिश्र असा होतो. म्हणजेच सत्ता प्राप्त करण्यासाठी अनेक राजकीय पक्षांनी एकत्रित येऊन बनविलेले प्रबंधन आहे.

संसदीय शासनपद्धतीमध्ये कायदेमंडळातील कनिष्ठ

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala Dist. Kolhapur

अशी स्थिती पाहावयास मिळते. तिसऱ्या प्रारूपाबद्दल आपल्याला असे म्हणतात येईल की, विशिष्ट राजकीय पक्षाला विरोध म्हणून निर्माण झालेली आघाडी; ही एक अशी राजकीय आघाडी असते की, या आघाडीत सहभागी झालेले राजकीय पक्ष विशिष्ट राजकीय पक्षाला समान शत्रू मानतात. त्या पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

या प्रारूपामध्ये सहभागी राजकीय पक्षाचे राजकीय विचारधारेचे तत्त्व नसते, ते केवळ त्या पक्षाला विरोध म्हणून एकत्रित आलेले असतात. १९६७-१९७२ या कालखंडात देशातल्या अनेक राज्यांमध्ये 'बिगरकाँग्रेसवाद' या एकमेव विचारावर आघाडी सरकारे उदयाला आली होती. १९९६ पूर्वी केवळ काँग्रेसला विरोध म्हणून आघाडी सरकारे उदयाला आली होती; परंतु नंतरच्या काळात भाजपला विरोध म्हणून विविध राज्यांत आघाडी सरकारे उदयाला येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यानंतर आपण चौथे प्रारूप पाहूया - राष्ट्रीय सरकार ज्या वेळेस राष्ट्रीय संकट येते, त्या वेळेस अशा प्रकारचे सरकार उदयाला येते. परकीय आक्रमण, अंतर्गत गंभीर समस्या अशा काही कारणास्तव, अशा काही कारणामुळे देशातील प्रमुख राजकीय पक्ष सरकारमध्ये सामील होतात. याचे उदाहरण म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात राष्ट्रीय सरकारची निर्मिती झाली होती. आपल्या देशामध्येसुद्धा १९७९, १९६६ व १९९७ मध्ये सरकारे ही काळजीवाहूच होती.

युरोपातील आघाड्यांचे राजकारण याचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, विशेषतः पश्चिम युरोपात आघाड्यांचे शासन अग्रस्थानी होते. विसाव्या शतकामध्ये पश्चिम युरोपातील काही काळापुरते का होईना आघाड्यांची सरकारे अस्तित्वात होती. आजतागायत बहुतेक देशांमध्ये आघाड्यांची सरकारे अस्तित्वात आहेत. १९८० च्या दशकामध्ये युरोपातील ब्रिटन, स्पेन आणि ग्रीस या देशांमध्ये एक पक्षाचे बहुमताचे सरकार होते, तर अन्य देशांमध्ये आघाड्यांची सरकारे होती. इंग्लंडची जनता आघाडी सरकारे स्वीकारत नसतील, तरीही काही आर्थिक संकटामध्ये अपवादात्मक परिस्थितीमध्ये आघाडी सरकारे उदयाला आली आहेत.

सौदेबाजी, वाटाघाटी ही आघाड्यांच्या राजकारणाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली आहेत. सदर वैशिष्ट्ये युरोपातील राजकारणात ठळकपणे दिसून येतात. १९९० ते १९९५ या कालखंडामध्ये ९१ अशी मंत्रिमंडळे होती की, ज्यामध्ये १९ एकपक्षीय शासन, ६८ बहुपक्षीय शासन आणि चार ते पाच काळजीवाहू सरकारे अस्तित्वात होती. असे असले तरी संसदीय व्यवस्थेप्रमाणे आघाड्यांच्या शासनाचे संस्थीकरण झालेले नाही. आघाड्यांच्या राजकारणाचे विश्लेषण करताना जो काही यासंदर्भातला जो सिद्धांत आहे, तो व्यापक स्वरूपातील कालखंडात विकसित होत गेलेला आहे. आघाडीचे राजकारण परस्परविरोधी दिशांशी जवळ येताना दिसते. एका बाजूला युरोपियन राजकारणाची परंपरा आहे, तर दुसऱ्या बाजूला खेळी सिद्धांताची परंपरा आहे.

युरोपियन आघाडीच्या राजकारणाचा अभ्यास करण्यासाठी जी माहिती उपलब्ध आहे, ती वास्तविक असलेल्या आघाडीच्या शासनाची माहिती आहे. विशेषकरून युरोपियन राजकीय परंपरा अनुभव संशोधन यावर आधारित आहे. युरोपातील आघाडीच्या राजकारणातील अनुभवाशी सिद्धांताद्वारे एकप्रकारचा सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला जातो. यात 'विशिष्ट लक्षी' अभ्यासपद्धती वापरली जाते. अतिशय सुरुवातीच्या आघाडी सिद्धांताच्या कसोटीवरून आघाडीच्या शासनाची मूलभूत माहिती घेऊन त्या कसोट्यांचा उपयोग नवीन सिद्धांत विकसित करण्याकरिता होऊ लागला. सिद्धांताचे मूल्यांकन करण्यासाठी जुन्या माहितीच्या आधारेच केले जाई. या बाबीला दोषपूर्ण म्हणू शकत नाही. कारण, युरोपियन अनुभव युद्धेत्तर काळातील काही मर्यादा होत्या. संशोधक/अभ्यासकांकडून यात नवीन माहितीचा भर घालण्याचा प्रयत्न केला जातो.

आघाड्यांचे शासन आणि युरोपची राज्यव्यवस्था यांची सांगड आहे, ती अतिशय गुंतागुंतीची आहे. ती समजून घेणे अवघड आहे. अनेक राजकीय पक्षव्यवस्थेतील गतिमानता यामुळे आघाड्या एक प्रमाण बनतात व त्यामुळे वेस्ट मिनिस्टर व्यवस्थेपेक्षा अधिक गुंतागुंतीच्या बनतात, असे बॉडनर यांचे मत आहे.

आघाडीच्या राजकारणाचे विश्लेषण खेळी सिद्धांतातून लक्षात येते. आघाडी ही खेळी सिद्धांतातील महत्त्वाची संकल्पना आहे. यामध्ये आघाडीची निर्मिती ही प्रक्रिया आहे. या प्रक्रियेला खेळाची उपमा दिली आहे. यासंदर्भात विल्यम रिकर यांनी 'Theory of

ISSN 2230-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३८ वे अंक २५ वा डिसेंबर, २०२०.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे शिर्षक	लेखक	पृ. क्र.
१.	जातीय हिसांचार: एक समाजशास्त्रीय विश्लेषण	संजयकुमार कांबळे	...१
२.	आदिवासींची वर्तमान स्थिती: आव्हाने आणि उपाय	पद्माकर सहारे	...१५
३.	सामाजिक क्रांतीचे अग्रदूत: पेरियार इ. वी. रामासामी	प्रियदर्शन भवरे	...२१
४.	मराठवाडयातील अनुसूचित जातीच्या सामाजिक विकासात....	मा. म. गायकवाड	...२८
५.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार....	मधुकर धुतुरे	...१९
६.	मोबाईलचा वापर व स्त्रिया: एक स्त्रीवादी अध्ययन	धनंजय सोनटक्के	...२१
७.	कुटुंब आणि कौटुंबिक हिंसाचार	दिपक पवार	...२८
८.	टी. व्ही. पाहण्याच्या सवयीमुळे लहान बालकांवर.....	मंजुषा नळगीरकर	...३७
९.	प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनामध्ये स्वयंसेवी संस्थेची भूमिका	हरिश पेटकर	...३०
१०.	अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजशास्त्रीय चिंतन	हनुमंत मिसाळ	...३३
११.	महिलांवरील वाढते अन्याय–अत्याचार	ज्योती दिघाडे	...३७
१२.	नाथजोगी भटक्या जमातींचे .....वास्तव:	गणेश बहादे	...३५
१३.	लॉकडाउन आणि कौटूंबिक हिसांचाराची दाहकता	अंजली जोशी	...४४
१४.	लिंगभाव दृष्टिकोन व स्त्री पुरूष समानता	रमेश पाटील	...४७
१५.	भारतातील प्रदेशवाद: कारणमिमांसा व उपाययोजना	रामेश्वर मोरे	...५१
१६.	कोरोनाचा सामाजिक जिवनावर पडलेला प्रभाव:	रविंद्र विखार	...५४
१७.	खारवी समाजाची सांस्कृतिक स्थित्यंतरे	सचिन सनगरे	...५७
१८.	पश्चिम मुंबईतील महिला भिक्षेकरी समस्या	ज्योती पोटे	...६०
१९.	कचरा वेचक कामगारांच्या सामाजिक समस्या	कैलाश अंबुलगेकर	...६३
२०.	नागरी कुटुंबाचे बदलते स्वरूप	किशोर राऊत	...६७
२१.	स्त्रीभ्रूण हत्या: एक ज्वलंत सामाजिक समस्या	रामराव चव्हाण	...६९
२२.	स्त्री कायद्यामागचं वास्तव:	अंजली वाठ	...७४
२३.	लैंगिक गुन्हयातील बळी स्त्रियांचा समाजशास्त्रीय.....	वायभासे एस. व्ही.	...७८
२४.	कोराना महामारीचा भारतीय समाजावरील परिणाम	विद्या खंडारे	...८१
२५.	इतर मागासवर्गातील नौकरी करणाऱ्या विवाहित स्त्रियांच्या....	गावंडे, खंदारे	...८७
२६.	लिंगभाव आणि तृतीयपंथी: एक आकलन	विलास चव्हाण	...९१
२७.	महिलांचे आरोग्य आणि पोषण आहार विषयक वास्तव:	विनोद शेंडे	...९४
२८.	स्त्री पुरूष समानता: काळाची गरज	सुरेखा दांडगे	...९८
२९.	कोरोनाचा उच्च शिक्षणावर झालेला परिणाम	सुनंदा भद्रशेट्टे	...१०५

HOD PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya,
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

प्रका
डॉ. नारायण
द्वारा : पद

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार: एक समाजशास्त्रीय विश्लेषण.

डॉ. मधुकर धुतुरे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, विठठ्लराव पाटील महाविद्यालय, कळे, मो. ७७२००७४९२५

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी शिक्षण वंचित दलित समाजाच्या शिक्षणासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून दलित समाजाला जे शिक्षणाचे दान दिले ते जेवढे क्रांतिकारी आहे तेवढेच मागासवर्गीयांच्या शिक्षणा संदर्भात बाबासाहेबानी जे चिंतन केले आहे तेही तितकेच मूलगामी स्वरूपाचे आहे. ज्ञाना अभावी व्यक्ती आणि समाजाचे नुकसान जसे होते तसेच एखादी व्यक्ती वा समुहाला शिक्षण नाकारणे म्हणजे माणूस म्हणून त्यांचे अस्तित्व नाकारून त्यांच्या क्षमता मारून टाकणे होय. अशी बाबासाहेबांची शिक्षण विषयक धारणा होती. लोकांनी नेहमी ऊर्जितावस्थेत जगण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा मूलमंत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी दिला. ज्ञान म्हणजे प्रकाश ही ज्ञानाची अति सुंदर व्याख्या तथागत बुध्दानी जनसमुदायासाठी केली होती. तथागत बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचाराचा सार आहे. क्रियाशिल बनून अन्याय, अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करणे आणि ध्येयासाठी संघटन बांधणे म्हणजे क्रांतीचा मार्ग खुला करणे होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ज्ञान, तृष्णा कधीही न संपणारी होती. ज्ञानाचा उपयोग समाज परिवर्तनाचे मुख्य हत्यार म्हणून केला. निरक्षर जनतेला कवडझोपेतून जागे करण्याचे अवघड कार्य डॉ. बाबासाहेबानी केले. त्याचे शैक्षणिक तत्वज्ञान मानवाचे डोके, हृदय आणि हात यांच्या अंतर्गत गुणवंताना जोपासणारी प्रक्रिया म्हणून शिक्षण संकल्पीत करते ती मानवी अंगात मुरलेली शक्ती मुक्त करते. पशुतुल्य अस्तित्वाच्या पातळीवरून ते त्याग, विशुध्दता, सद्‌गुण आणि सात्विकता यांच्या पातळीपर्यंत उन्नत करते. सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग होय. शिक्षणातून लोकांचे नैतिकिकरण आणि सामाजिकरण करणे हा हेतू होता. सभ्यता आणि संस्कृती यांचा शिक्षण हा पाया होता असे त्यांनी जाहिर प्रतिपादन केले. त्यांचा आग्रह होता की, जाती प्रथेवर उघड उघड हल्ला करण्यासाठी अस्पृश्यांनी शिक्षण घेतलेच पाहिजे.

मिलिंद महाविद्यालयाच्या शिलान्यास प्रकरणी बोलताना बाबासाहेब म्हणूनच म्हणतात हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्व किती आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्यांचे मानण्यात येते पण हे चूक आहे. कारण हिंदुस्तानातील दलित समाजातील उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवार्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करण्यास भाग पाडणे नव्हे तर खालच्या वर्गाची प्रगती मारून त्यांना दुसर्याचे गुलाम व्हावे लागत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण होणारा न्यूनगंड नाहिसा करणे हे खरे शिक्षणाचे ध्येय आहे. आमच्या सर्व सामाजिक दुखवटयावर उच्चशिक्षण हेच एकमेव औषध आहे. तात्पर्य – बाबासाहेबांना उच्च शिक्षणाव्दारे, समता, स्वातंत्र्य, बंधुभासव ही नविन मूल्ये स्विकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करावयाचा होता. बाबासाहेबांच्या शैक्षणिक विचारांचा हाच खरा मुलाधार आहे.

१९२८ मध्ये डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्याच्या बहिकृत हितकारिणी संस्थेची स्थापना झाली. या संस्थेची उद्दिष्टे अशी होती– १. वसतीगृह उघडून दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे किंवा त्यासाठी इष्ट वाटणारी साधने उपयोगात आणणे. २. वाचनालये समाजकेंद्र वर्ग किंवा अभ्यास मंडळे उघडून दलित वर्गामध्ये संस्कृतीच्या प्रसाराचे प्रचालन करणे. ३.औद्योगिक व कृषीशाळा सुरू करून दलित वर्गाच्या आर्थिक स्थिती मध्ये प्रगती आणि सुधारणा करणे. १९२५ ला बहिकृत हितकारीक संस्थेने दलित विद्यार्थ्यांसाठी सोलापूर येथे वसतिगृह सुरू केले. विद्यार्थ्याच्या मनात ज्ञान, विद्या व समाजसेवेबद्दल प्रेम व आवड निर्माण व्हावी यासाठी सरस्वती विलास मासिक चालवले. मुंबई येथे एक मोफत वाचनालय व महार हॉकी क्लब सुरू केले. १९२७ मध्ये प्राथमिक शिक्षणाची गती फारच संथ होती. शिक्षणावर फक्त १४ आणे दरडोई खर्च केले जात होते. त्यामुळे गळतीचे प्रमाण जास्त होते. हे थांबविण्यासाठी प्राथमिक शिक्षणावर अधिक प्रमाणात खर्चासह सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा उपाय सुचविला. शिक्षण विभागाचे धोरण हे निम्नस्तरीय वर्गासाठी जितके स्वस्त करता येईल तितके करण्याचे असले पाहिजे. १९२८ मध्ये दलिताच्या शिक्षणासाठी बाबासाहेबानी डिप्रेस्ड क्लासेस एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली. त्याव्दारे दलित वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी वस्तीगृहे पुरविण्याच्या कार्यात संस्थेची साहाय्य करण्याचे अवाहन मुंबई शासनाला केले. मुंबई शासनाच्या राज्यपालानी या योजनेला संमती देऊन जाहिर केले की, दलित वर्गातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पाच वस्तीगृहे स्थापन करणेसाठी ९००० रू. वार्षिक अनुदान संस्थेस दिले.

बाबासाहेब मागासवर्गीयाच्या शैक्षणिक हक्काचा आग्रह धरताना म्हणतात विद्यापीठाच्या प्रतिनिधी सभेत मागासवर्गीय सदस्यांना स्थान मिळाले पाहिजे. प्रतिनिधी सभा ही कायदे बनविणारी संस्था आहे व सर्व वर्गाच्या प्रतिनिधींना त्यात स्थान मिळवून प्रत्येक वर्गाच्या समस्येवर तोडगा काढला पाहिजे. ते पुढे म्हणतात समाजातील बहुसंख्य घटक मागे राहिला याचा अर्थ उच्च वर्गातील लोकांनी या मागासवर्गा प्रती चांगुलपणा दाखविलेला नाही. तेंव्हा शैक्षणिक विषयातील तज्ञ मंडळी जी मोठ्य प्रमाणात उच्चवर्णीय आहेत ती मागासवर्गीयाच्या समस्या सोडवतील यावर माझा विश्वास नाही. मागासवर्गीयाना म्हणूनच उच्चयवर्णीयाच्या दयेच्या भरोवशावर न सोडता त्यांना प्रतिनिधी सभेत स्थान मिळाले पाहिजे. (मुंबई प्रांतिक विधी मंडळातील भाषणे – १९२७)

जातिव्यवस्था नष्ट करावयाची असेल तर दलितानी मोक्याच्या जागा मिळविल्या पाहिजेत. समाजातील उच्च नीचता दृढमूल होण्यासाठी जाती व्यवस्था तर जबाबदार आहे पण जातीच्या गुणवैशिष्टयामुळेही तीस चिरास्थायीत्व मिळते. उदा. सरकारी नोकर्या, मामलेदार, पोलिस अधिकारी इ. सारख्या जागा अस्पृश्य समाजास मज्जाव आहे. अस्पृश्य समाजाची यामुळे अवहेलना होते ही स्थिती बदलावयाची तर आपण मोक्याच्या जागा मिळवल्या पाहिजेत व शिक्षणाशिवाय हे होणार नाही.

शिक्षण सक्तीचे करावे – डॉ. बाबासाहेबानी शिक्षणाचा पायाभूत विचार करताना ज्याना शिक्षणाचे महत्व कळत नाही त्यांच्यासाठी सक्तीचा कायदा असावा असे म्हटले. शिक्षण सरसकट सर्वांसाठी मोफत न करता जे फी देऊ शकतात त्याच्याकडून फी घ्यावी म्हणजे सक्तीच्या शिक्षणाचा खर्च भागविण्यास मदत होईल असेही त्यांचे मत होते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मदत म्हणून शिष्यवृत्ती देण्यात यावी असे सांगताना बाबासाहेब म्हणतात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे पालक इतके गरीब असतात की, स्कॉलरशीप ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला केलेली मदत आहे. कुटुंबाला दिलेली देणगी नव्हे. हे विसरून विद्यार्थ्यांना मिळणार्या शिष्यवृत्तीचा ते दुरूपयोग करतात. म्हणून या पैशातून सरकारने व खाजगी संस्थांनी

वस्तीगृहे चालविणे विद्यार्थ्यांच्या हिताचे होईल.

डॉ. बाबासाहेबांनी स्वातंत्र्यपूर्व हिंदुस्थान सरकारकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ३ लक्ष रूपयांचा निधी मिळविला होता. परिणामी बर्याच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू लागली होती. तरीही आपलेच विद्यार्थी मोठ्य प्रमाणात नापास होतात या विषयी नाराजी व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात लहानशा चाळीत राहत होतो. या खोलीमध्ये माझे कुटूंब, बहिणीची दोन मुले, एक बकरी, जाते, पाटा होता. मिणमिणत्या दिव्याखाली मी अभ्यास करीत होतो. आता विद्यार्थ्यांना चांगली वसतिगृहे असताना त्यांनी अभ्यास का करू नये असा प्रश्न उपस्थित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ष्आपल्या देशात गोखले, रानडे, सरफरोजशहा, मेहता, यांचे सारखे किती तरी आस्थेवाईक विद्यार्थी निर्माण झाले. त्याच्यामध्ये एक शक्ती होती, उर्मी होती जबाबदारीची जाणिव होती पण अशी जाणिव आजच्या विद्यार्थ्यांना नाही असे सांगून शिक्षण हाच जीवनाच्या प्रगतीचा मार्ग आहे हे जाणून विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा आणि समाजाचे विश्वासू नेते बनावे.

मिलिंद महाविद्यालयाची उभारणी करून मराठवाड्याचा शैक्षणिक विकास :– डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी १९ जून १९५० साली मिलिंद महाविद्यालयाच्या रूपाने मराठवाड्यत उच्च शिक्षणांची सुरवात झाली. निजामाच्या हैद्राबाद संस्थानांत शिक्षणाची प्रचंड आबाळ होत होती. १९३१ मध्ये हैद्राबाद संस्थानात साक्षरतेचे प्रमाण अवघे ५ टक्के तर १९४१ मध्ये ९.३ टक्के १९४८–५० च्या दरम्यान हैद्राबाद संस्थानात १७ महाविद्यालये तर ७६१५ विद्यार्थी होते तर याच काळात मुंबई राज्यात ५० महाविद्यालयात ५० हजार ३५९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. निजाम संस्थानातून माध्यमिक शिक्षणाचा प्रसार मंदगतीने होता. शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. प्रत्येक जिल्ह्यात एक प्राथमिक शाळा होती. एखादा दुसरा अपवाद वगळता खाजगी शाळा नव्हत्या. औरंगाबादला इंटरपर्यंतचे शिक्षण देणारे शासकिय महाविद्यालय होते. १९३८ मध्ये हैद्राबाद संस्थानात मॅट्रिकच्या शिक्षणाची संख्या अवघी ७० होती. अनुसूचित जातीच्या मुलांचे व मुलींच्या शिक्षणाची स्थिती बिकट होती. बाबासाहेबानी अशा प्रतिकूल स्थितीत औरंगादबादेत मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. मराठवाडयाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनात परिवर्तन घडविणारा एक दैदीप्यमान इतिहास निर्माण केला हे विसरता येत नाही.

ज्ञानाला चारित्र्याची जोड असावी. चारित्र्यामुळे ज्ञान चांगल्या किंवा वाईट कारणासाठी आणावयाची ह्यांची निश्चिती करता येते. शिक्षणात मानवी सभ्यता आणि संस्कृतीचा खरा पाया करण्यासाठी ज्ञान आणि चारित्र्य यांची एकात्मता आवश्यक आहे. सुशिक्षीत वर्गाकडे जर चारित्र्य नसेल तर त्यांच्या आत्म प्रगतीसाठी आणि दुबळ्या व वंचित वर्गाना अहितकारक असा ज्ञानाचा उपयोग करता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: ज्ञान आणि चारित्र्याची असाधारण अशी मूर्ती होती. वंचित लोकांच्या उध्दारासाठी त्यांनी करूणेने आपल्या ज्ञानाचा उपयोग केला. मानव जातीच्या सेवेमध्ये चारित्र्य ही मानवाची शक्ती आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता.

प्राध्यापक बहूश्रूत असला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की प्राध्यापकानी अध्ययन आणि अध्ययनात स्वत:ला इतके गुंतवून घ्यावे की, आपल्या घराकडेही बघण्याची सवड त्यांना मिळू नये. ते काम त्यांनी त्यांच्या पत्नीकडे सोपवावे व संशोधन करावे. त्याच प्रमाणे प्राध्यापक हा नुसताच विव्दान असून चालत नाही तर तो बहूश्रूत असला पाहिजे. तो उत्साही असला पाहिजे. आपल्या विषय अधिकाधिक माहितीपूर्ण आणि मनोरंजक करू अशी धमक त्याच्यात असली पाहिजे. आत्मोध्दाराचे बीज शिक्षणातून मिळते. डॉ. बाबासाहेब म्हणतात दीन दलिताचा दैन्य संपविणारा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण कार्यकर्त्यानी शिक्षणाच्या प्रसारासाठी झटले पाहिजे. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात जेंव्हा संधीची लाट येते तेव्हा तिचा योग्य प्रकारे उपयोग केला तर त्या मानवास वैभव प्राप्त होते. त्यांच्या मते स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोध्दार हे शिक्षणाचे ध्येय होय. शिक्षणातून स्वामित्वाचा जन्म होतो. आज जीवन म्हणजे आपल्या व्यक्तीमत्वाचा घेतलेला शोध असतो. स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा प्रत्यय आत्मविश्वास आत्मआदर आणि आपल्या व्यक्तिमत्वाची प्रतिष्ठा निर्माण करावयाची क्षमता शिक्षणात अत्यंत आवश्यक असते. स्वत:चा स्वत:ने करावयाचा विकास म्हणजे आत्मोध्दार असे ते म्हणतात हे आत्मोध्दाराचे बीज शिक्षणातन मिळावे अशी त्याची स्पष्ट अपेक्षा होती.

शिक्षणातून नवमानवतावाद रूजवायचा होता. जात,धर्म, वर्ण यांना नष्ट करणार्या शैक्षणिक विचारांची बाजू त्यांनी उचलून धरली. अस्पृश्यता, गुलामगिरी, अप्रतिष्ठा, यांचे दाहक चटके त्यांनी सोसले होते. हजारो वर्षानंतर स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या उच्चतम मूल्यांची किंमत त्यांना कळलेली होती. ही मूल्ये तथागत बुध्दासनी जगाला दिलेली अमोल देणगी होय. क्रांती आणि परिवर्तन शिक्षणाशिवाय देऊ शकणार नाही. हे क्रांतीचे गीताविज्ञान त्यांना अभ्यासानी कळले होते. शिक्षण म्हणजे परिवर्तन हे त्यांच्या शैक्षणिक विचारांचे मुख्य सूत्र होत. शिक्षण हे समाजक्रांतीचे प्रभावी साधन आहे. म्हणून प्रत्येकाने शिक्षण घ्यावयालाच पाहिजे असा डॉ. बाबासाहेबांचा आग्रह होता. मव्यक्तीला जाणीव देते ते शिक्षण होयफ अशी शिक्षणाची सुस्पष्ट व्याख्या केली आहे. उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस निर्बल होऊन अल्पायूषी होतो. शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो.

संदर्भग्रंथ

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आत्मचरित्र – धनंजय किर
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण खंड १ व २
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आत्मचरित्र – चांगदेव भगवान खैरमोडे
४. मा.मा.गांजरे – डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे : खंड १ ते ५.
५. डॉ.डी.आर. जाधव : डॉ.बी.आर.आंबेडकर : व्यक्ति और कृतित्व.
६. धनंजय किर : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र.
७. चा.भ.खैरमोडे : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवरील चरित्र खंड १ ते १०.
८. शंकरराव खरात : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Impact Factor 7.149

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-VIII ISSUE-III March 2021

Address
· Devgiri Nagar, Ambajogai Road, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
41	डॉ. सीमा प्रकाश परदेशी	ज्ञानसंरचना निर्मितीसाठीच्या अध्ययन वातावरणाची वैशिष्ट्ये	168 To 172
42	श्री.महादेव जयसिंग जाधव	'ज्ञानोदय' मधील पत्रलेखनाचे वाङ्.यमयीन विशेष	173 To 177
43	प्रा. डॉ. सिद्धार्थ सुधाकरराव होवाळ	उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक ताणतणावाचा अभ्यास	178 To 181

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kasaba
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Impact Factor 7.149

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-VIII ISSUE-III March 2021

Address
· Devgiri Nagar, Ambajogai Road, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

'ज्ञानोदय' मधील पत्रलेखनाचे वाड्.यमयीन विशेष

श्री.महादेव जयसिंग जाधव
सहा.प्राध्यापक ,मराठी विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे.

प्रस्तावना

मराठी साहित्यामध्ये पत्रलेखन या वांड.मय प्रकाराला कथा, कविता व कादंबरी वांड.मय प्रकाराच्या तुलनेत खूपच कमी लोकप्रियता मिळाली. मराठीतील इतर साहित्य प्रकारच्या तुलनेत पत्रलेखनाला दुर्लक्षितच राहावे लागले. खरंतर पत्रलेखन हे अतिशय महत्त्वाचे असून आपल्या साहित्यामध्ये त्याची वेळोवेळी प्रचिती आली आहे . उदा: ज्ञानेश्वरांची चांगदेव पासष्टी , लोकहितवादींची शतपत्रे, साने गुरुजींची पत्रे असे अनेक पत्रलेखन आपल्याकडे प्रसिद्ध आहेत. पत्रलेखनाला मराठी साहित्यामध्ये दुय्यम स्थान मिळाले.असले तरीही त्याचं महत्त्व कोणीही नाकारलेले नाही.

ज्ञानोदयमधील पत्रलेखनाचा विचार करता ज्ञानोदयने ही आपल्या १७८ वर्षाच्या प्रवासामध्ये पत्रलेखन हा प्रकार खूप गांभीर्याने हाताळलेला दिसतो. यामध्ये वैयक्तिक स्वरूपाची वाटणाऱ्या पत्रांच्या आशयाचे सामान्यीकरण झालेले दिसते. त्यामुळे ज्ञानोदय मधील पत्रलेखनाला वांड.मयीन मूल्य लाभले आहे. ज्ञानोदयमधील पत्रलेखनातून लेखकाचे व्यक्तिमत्व प्रगट होताना दिसते. तसेच यापत्रातून भावनांना वाट मिळालेली दिसते. यामधील काही पत्रे ही माहिती देणारी, मार्गदर्शन करणारी, अनुभव कथन करणारी अशी आहेत. यापत्रामुळे विचारांची, भावनांची देवाण घेवाण झालेली दिसते. त्यामुळे ज्ञानोदय मधील पत्रलेखनाला वांड.मयीन मूल्य लाभले आहे.या पत्रांचे वांड.मयीन विशेष पाहणे येथे संयुक्तिक ठरेल.

'ज्ञानोदय' मधील पत्रलेखन -

ज्ञानोदयने आपल्या लेखन प्रवासामध्ये 'कु. स्नेहलता देवी हिचे आपल्या बापास पत्र' (फेब्रुवारी,१९१४) , 'शारदाबाईंची पत्रे' (मार्च, १९१४), 'आमचे अवगुण' (१९२१), 'हरिभाऊंची पत्रे' (१९३०), 'कु. अंजनाताईंचे दादास पत्र' (१७ फेब्रुवारी १९३८), 'मीरा दे टिळक यांनी कुसुम मराठे यांना लिहिलेले पत्र' (२६ जून १९४१), 'मंदा निरीक्षण' (१९४२) 'पंडिता रमाबाई यांचे फादर निळकंठ शास्त्री गोरे यांना लिहिलेले पत्र' (जुलै, १८८३) आणि मंजुळा शिंदे यांचे 'विवाहेच्छुकाला अनावृत्तपत्र' (१८८९) अशा अनेक पत्रलेखनातून आपली सामाजिक बांधिलकी जपलेली दिसते.

'ज्ञानोदय'मधील पत्रलेखनाचे वाड्.यमयीन विशेष -

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय होती. अनेक अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा समाजात तग धरून होत्या आणि समाज अंधश्रद्धा, जातिभेद, धर्मभेद आणि स्त्रियांबद्दलचे जाचक निर्बंधात अडकलेला होता. त्यामुळे समाज सुधारणेला वावच नव्हता. बालगुन्हेगारी, मद्यपान, विविध पंथातील अघोरी चाली रीती, मानवबळी, स्त्रीसमस्या, मागासवर्गीयांचे प्रश्न अशा गोंधळात समाज व्यवस्था बरबटलेली होती. हिंदूधर्मात अनेक अंधश्रद्धांनी थैमान घातले होते. त्यापैकी जादुटोणा, मंत्रतंत्र, भूतप्रेत, चेटूक, अंगात येणे अशा खोट्या समजुतीने समाज अधिकच मागास होऊन अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकत चाललेला दिसत होता.

विधवा स्त्रिया संन्यासीयुक्त जीवनाच्या हालअपेष्ठा सहन करण्यापेक्षा सती जाणे पसंद करीत होत्या. स्त्रियांना तर बालविवाह, जरठकुमारी विवाह, हुंडाबळी, कन्याविक्रय, सती जाणे किंवा विधवांचे हलाखीचे जीवन जगणे अशा जाचक रूढी परंपरा होत्या. अशा परिस्थितीतून समाजाला बाहेर काढण्याचे महत्वाचे काम ज्ञानोदयने साहित्याच्या वेगवेगळ्या प्रकारातून केले. यामध्ये पत्रलेखनाचा परिणामकारक वापर केलेला दिसतो. या पत्रलेखनाचे वाड्.यमयीन विशेष खालील प्रमाणे सांगता येतील.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

१) सामाजिक स्वरूपाचा आशय

ज्ञानोदय मधून प्रसिद्ध झालेली पत्रे शीर्षकावरून जरी वैयक्तिक स्वरूपाची वाटत असली. तरी ती वैयक्तिक नाहीत यामध्ये सामाजिक स्वरूपाचा महत्त्वपूर्ण आशय आलेला दिसतो व आशयाचे सामान्यीकरण झालेले दिसते.

शारदा यांनी आपल्या मुलीस जे पत्र लिहिले ते ज्ञानोदयने मार्च १९१४ 'शारदाबाईंची पत्रे' यानावाने क्रमशः प्रसिद्ध केली आहेत. यातील पहिल्या पत्रामध्ये आपली मुलगी गोदू हिचे लुगडे फाटले व त्याकरिता तिने पैसे मागितले. यावर तिच्या आईन लिहिलेले हे पत्र म्हणजे सर्वांनाच तो उपदेश आहे. तिने म्हटले पैसे पाठवून देईन पण दोन शब्द लिहिते. मागचे तुझे लुगडे काठाला फाटले होते पण मग शिवीन, उद्या शिवीन म्हणते ते अद्याप शिवले नाहीस. त्यामुळेच हे नवीन लुगडे घ्यावे लागत आहे. असा निष्काळजीपणा करू नकोस, असे यापत्रातून लिहिले आहे. आजचं काम आजच करावे, उद्या नाही. यासाठी उदाहरणेही दिली आहेत. या पत्रलेखनाचा उद्देश असा आहे की, आजचे काम उद्यावर ढकलू नये. ती फार वाईट सवय आहे. तीस वय लागण्याच्या अगोदरच तिच्यावर विजय मिळवावा. उद्या हा उद्याच राहतो. उद्या आज येत नसतो. आजच आपला आहे. आजचे काम आजच कर. यापत्राने गोदूला चूक सुधारून आपले लुगडे दुरुस्त कर मग नवीन लुगड्याकरिता पैसे पाठवतो असे म्हटले आहे. यापत्रावरून आजचे काम आजच करा, हा बोध केलेला आहे. तो फक्त गोदूस नाही तर गोदुच्या वयाच्या सर्व मुलींना लागू पडणारा आहे. या बरोबरच शारदाबाईंनी आपल्या दुसऱ्या पत्रामध्ये विदूला शाळेतील अनेक विषय निरर्थक असतात व ते शाळेत शिकवले जातात असे वाटते त्याचे उत्तर दिले आहे. शारदाबाई आपले तिसऱ्या पत्रातून निळूला उद्देशून लिहिले आहे. यामध्ये त्यांनी 'संस्कृत शिकून आम्हाला काय करायचे' याप्रश्नाचे उत्तर दिलेले दिसते. निळूला चौथ्या पत्रामधून अभिमानाचा गर्वामध्ये रूपांतर होऊ नये हा सल्ला दिलेला आहे. शारदाबाईंनी आपले सातवे पत्र गोदूस एप्रिल १९१५ मध्ये लिहिले आहे. यापत्रामधून अभ्यासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या गोदूला उपदेश केलेला आहे. त्यासाठी अभ्यास झटून करा असा उपदेश दिलेला आहे. शारदाबाईंची पत्रे ही जर गोदू, विदू, निळू यांना उद्देशून लिहिली असली तरी त्यातला आशय हा सर्व समाजाला उपयोगी पडणारा आहे व यातून समाजाचे उत्तम प्रबोधन होते हे मान्य करावे लागते.

कु. स्नेहलता देवी हिचे आपल्या बापास पत्र लिहिले आहे. यामध्ये 'हुंडा आणि मानपान, संसाराची दाणादाण' या विषयावर लिहिलेले पत्र हे सर्व समाजाला केलेला उपदेश आहे.

२) स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडली

ज्ञानोदय आपल्या पत्रलेखनाच्या माध्यमातून स्त्रियांच्या हुंडा पद्धतीवर विशेष लक्ष केंद्रित करून आपल्या पत्रलेखनाच्या माध्यमातून हुंडा पद्धतीच्या समस्येला वाचा फोडलेली दिसते. हुंड्यामुळे होणारी दानादान आणि स्त्रीची होणारी करुण अवस्था ही अंजनाताई व स्नेहलतादेवीच्या पत्रामधून मांडलेली दिसते. कु. स्नेहलतादेवी हिने आपल्या बापास पत्र लिहिले आहे. 'हुंडा आणि मानपान, संसाराची दाणादाण' याशीर्षकाने ज्ञानोदयने ते फेब्रुवारी १९१४ मध्ये छापिले आहे. आपल्यामुळे आपल्या बापाच्या गळ्याला बसलेला हुंड्याचा गळफास सोडविण्यासाठी कुमारी स्नेहलतादेवी नावाच्या ब्राह्मण कुमारीनी आपला देहत्याग केला. तेव्हा पासून बंगाली ब्राह्मणामध्ये हुंड्याची आणि मानापानाच्या विरूद्ध चळवळ उभी राहिली. यामुलीने आत्महत्या करताना जे पत्र आपल्या बापास लिहिलेते हृदय पिळवटून टाकणारे आहे. यामध्ये तिने म्हटले आहे, 'माझ्या लग्नाकरिता तुम्ही घर गहाण ठेवावे ही कल्पना सहन होत नाही. तुम्ही माझ्यावर खूप प्रेम केले. राजकन्येला स्वप्नात मिळाला नसेल असला प्रेम सुखानुभव मला दिलात त्याबदल्यात कुटुंबाने रस्त्यात यावे व तुम्ही जन्मभर दुःख भोगावे, हिच मी तुमचे ऋण फेडू का ?' असा भावनिक प्रश्न केलेला आहे व तुमचा खिन्न चेहरा व आईचे सदाखिन्न असे वदन हे पाहून मी निश्चय केला आहे की, यासर्वातून तुमचा बचाव करायचा व तिने आत्महत्येचा निश्चय केला आणि ज्यावेळी आत्महत्या तिने केली त्यावेळी ती म्हणते की, "मी गेल्यावर माझ्या रक्षे वर पिताजी, तुम्ही अश्रूंच्या धरा धराल हे मला ठाऊक आहे. मी जाईन-पण आपले घर बचावेल. तेव्हा पासून मी आपल्या ऐहिक यात्रेचा कोणत्या उपायाने शेवट करावाया विचारात आहे. अग्नि, जल किंवा विष मला पहिलाच उपाय पसंत आहे. आता मी जी होळी !'' स्नेहलताने म्हटल्या प्रमाणे तिने आत्मयज्ञ करण्याकरिता पेटविलेल्या होळीने साऱ्या देशाला आग लागो आणि त्या आगीत हे

हुंड्याचे आणि मानापानाचे जुलमी पिशाच जळून खाक हो हाच आशावाद सर्व मानव जातीसाठीचा आहे. अशा प्रकारे पत्रलेखनातून स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडलेली दिसते.

३) शिक्षण व्यवस्थेवर भाष्य

शारदाबाईंनी गोदू ,विदू, व निळू यांना जी पत्रे लिहिली यामध्ये त्यांनी विविध विषयांना हात घातलेला दिसतो. यामध्ये त्यांनी अभ्यासक्रम कोणता असावा, माणसाने सहकारी कसे बनावे यावर भाष्य केलेली आहे. यामधील शिक्षण व्यवस्थेवरील लेखन हे खूपच मौलिक स्वरूपाचे व विचार करायला लावणारे आहे.

शारदाबाईंनी आपल्या दुसऱ्या पत्रामध्ये विदू शाळेतील अनेक विषय निरर्थक असतात व ते शाळेत शिकवले जातात. या प्रश्नाचे उत्तर म्हणजे हे पत्र आहे. यामध्ये शारदाबाईंनी म्हटले आहे की, कोणत्याही विषयाचा प्रत्यक्ष फायदा होत असलेला दिसला नाही. तरी भावी काळामध्ये शाळेमधील शिक्षणाचा नक्की फायदा होईल. शाळेतून जे शिक्षण दिले जाते ते विवक्षित दृष्टीचे नसते. कारण शाळातील अभ्यासक्रम संपल्यावर विद्यार्थी कोणता धंदा करील हे निश्चित नसल्यामुळे कोणताही धंदा केला तर त्याला फायदा व्हावा. अशा प्रकारचे थोडे-थोडे शिक्षण शाळेतून दिले जाते. अशा प्रकारे या पत्रातून शाळेतील विषयाचे महत्त्व सांगण्याचा शारदाबाईंचा प्रयत्न खूप कौतुकास्पद आहे. हे पत्र सर्व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे.

शारदाबाई आपले तिसरे पत्र निळूला उद्देशून लिहिले आहे. यामध्ये त्यांनी निळूने 'संस्कृत शिकून आम्हाला काय करायचे' या प्रश्नाचे उत्तर देताना शारदाबाईंनी म्हटले आहे की, संस्कृत भाषा मराठी, बंगाली, गुजराथी वगैरे अनेक हिंदी भाषेची जननी आहे व या भाषांमधील वाङ्मय समृद्ध करण्यासाठी संस्कृत भाषेची गरज आहे. याबरोबरच नामांकित ग्रंथकार, तत्त्ववेता, शोधक व्हावयाचे असेल तर संस्कृत भाषाच तुला पुढला मार्ग दाखविले असे संस्कृत भाषेचे महत्त्व सांगताना म्हटले आहे. याबरोबर शारदाबाई निळूला चौथ्या पत्रामधून अभिमानाचा गर्वामध्ये रूपांतर होऊ नये हा सल्ला दिलेला आहे. लहान वयामध्ये स्वतःला पोक्त, सभ्यगृहस्थ समजणे किती धोकादायक आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. वडिलांसारखे कपडे घालून वडील बनता येत नाही. यासाठी यापत्रामध्ये उदाहरणे देवून ते पटविण्याचा प्रयत्न केलेला आहे. यापत्रातून निळूला या माध्यमातून सर्व मुलांना थोर गृहस्थ म्हणविण्याचा नव्हे तर बनविण्याचा सतत प्रयत्न करा असा महत्त्वपूर्ण सल्ला दिलेला आहे.

शारदाबाईंनी आपले सहावे पत्र विदूला लिहिले आहे. यामध्ये अमेरिकन मराठी मिशन विषयी माहिती सांगितलेली आहे व शमुवेलचा दाखला देवून विद्यार्थ्याने आपले ध्येयनिश्चित करावे व ते साध्य करण्यासाठी तन मनाने परिश्रम करावे असे सांगितले आहे. आपले ध्येय हे खूप मोठे असावे व त्याबद्दल कोणीही निंदा केली तरी निराश न होता प्रयत्न करावे, असा बोध करून विदूला शाळेत अभ्यासाचे ध्येय ठेव व प्रयत्न कर. यश नक्की येईल असे सांगितले. ध्येयाची निवड व ध्येयपूर्ण करण्यासाठीचा प्रयत्न करणे यागोष्टीचे महत्त्व यापत्रातून विशद केले आहे.

शारदाबाईंनी आपले सातवे पत्र गोदूस एप्रिल १९१५ मध्ये लिहिले आहे. यापत्रामधून अभ्यासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या गोदूला उपदेश केलेला आहे. यामध्ये म्हटले आहे की, आपला अभ्यास चोख करून कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा आध्यात्मिक, सामाजिक, नैतिक बाबतीत बलवत्तर बनणे हा मुख्य उद्देश शिक्षणाचा आहे. शिकून काय करायचे याचे उत्तर देताना शारदाबाईंनी मुलींना म्हटले आहे की, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय उन्नती व अवनति ज्यात बसून झुलत असते त्यापाळण्याची दोरीमातेच्या हाती असते. शिक्षणा नेमत स्वातंत्र्य मिळाले. कुटुंबात स्त्री-पुरुष भेदाभेदन राहिल्यामुळे त्याराष्ट्राची प्रगती झाली. पुरुष मालक स्त्री दासी असा समज असेल तर दास्यातून मुक्त होणारे शिक्षणच आहे व त्यासाठी अभ्यास झटून करा असा उपदेश दिलेला आहे. अशा प्रकारे अभ्यास,अभ्यासक्रम,शिक्षण व्यवस्थेवर भाष्य केलेले आहे.

४) विवाह व्यवस्थेतील गुण- दोषांवर चर्चा

ज्ञानोदय ने आपल्या पत्रलेखनाच्या माध्यमातून विवाह व्यवस्थेतील गुणदोषांवर साधक बाधक अशी चर्चा केलेली दिसते.

मंजुळा शिंदे यांनी मे १८८९ च्याअंकामध्ये 'विवाहेच्छुकाला अनावृतपत्र' याशीर्षकाने लिहिलेले हे पत्र म्हणजे विवाहाचा खराखुरा अर्थ आहे. लग्न हे फक्त आपलेच प्रतिबिंब असलेली मुले जन्माला घालण्यासाठी व आपल्या अतृप्त वासना आणि इच्छापूर्ण करण्यासाठी नव्हे तर दोघांनी एक जीव झालेल्या जीवनात अर्थपूर्णतः ठराविक दिशा,

आत्मविश्वास व समाधान मिळाले पाहिजे. ही अपेक्षा मंजुळा शिंदे यांनी व्यक्त केलेली आहे. विवाहामुळे मानसिक, शारीरिक, भावनिक चैतन्य निर्माण होईल. एकमेकांना समजून घेऊन एकरूप होणे, तुलाजमेलाका? याबरोबरच विवाहातून तुला काय मिळवायचं आहे, विवाहा पासून तुझ्या काय अपेक्षा आहेत, दोघांनी विवाह बंधनात एकत्र जोडून राहण्यात अस काय आहे? विवाह मधून अज्ञात अशा गोष्टीचा शोध घेणे आवश्यक आहे का? हे प्रश्न उपस्थित करताना तिने त्याला वैयक्तिक गोष्टीबद्दल प्रश्न उपस्थित केलेला आहे. याविषयीती म्हणते की, "तू मत्सरी आणि अधिकार शहा आहेस का? स्वार्थी व जुलूमशाह आहेस का? अति महत्त्वकांक्षी आणि अशांत आहेस का? लहरी, अस्थिर आणि लैंगिक बाबतीत अतिआसक्त आहेस का? तुला मित्र मिळविण्यास किंवा मैत्री राखण्यास कष्ट होतात का? रूढी आणि परंपरागत अधिकार यंचा तुला तिटकार आहे का?'' अशा प्रकारे विवाहासंबंधी मूलभूत प्रश्नांना हात घातलेला दिसतो. मंजुळा शिंदे यांनी विवाहा संबंधी मांडलेली मते, उपस्थित केले प्रश्न, अपेक्षा या खरंतरं प्रत्येक विवाह इच्छूकाला लागू पडणारे व विचार करण्यास भाग पाडणारे आहेत. त्यामुळे हे पत्र समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

५) मानसिक आजारातून बाहेर पडण्याचे उपाय

कोणताही आजार हा पहिला मनातून येतो. धावपळ न करता खर समाधान कशामध्ये आहे हे शोधले पाहिजे.व कोणताही आजार हवा पालट केल्याने बरा होत नसतो तर स्वभाव पालट आवश्यक आहे. असे 'मंदा निरीक्षण' या पत्रातून सांगितले आहे.

मंदा हिने आपली मैत्रीण कुन्दा हिला 'मंदा निरीक्षण' म्हणून पत्र लिहिले आहे. यामध्ये कोणताही शारीरिक आजार नसताना कुन्दाची तब्येत बरी नसते यावर मन व शरीर यांचे नाते, आपल्या शक्तीपलिकडील कष्ट, जिवाची परवा नकरता पैसा मिळवणे, आपल्या विश्वासू पतीशी खोटे बोलून 'अन्डरहॅन्ड बिझिनेस' यामुळे तात्पुरते समाधान मिळते. पण मनाला खरे समाधान मिळत नाही, असे मंदाने म्हटले आहे व हवापालट करून आजार बरा करण्यापेक्षा स्वभाव पालट करणे गरजेचे आहे. असे मंदा पत्राच्या शेवटी सांगितले आहे. कुन्दाला मंदाचे पत्र हे यापत्राचे स्वरूप मैत्रिणीचे वैयक्तिक असले तरी त्याचा अर्थ हा समाजातील धावपळ करणाऱ्या व तात्पुरते समाधान मानणाऱ्या सर्व स्त्रियांना लागू पडणारे आहे. त्यामुळे यापत्राचे वाङ्मयीन मूल्य वाढते.

६) भाषाशैली –

ज्ञानोदयच्या भाषाशैलीचे वेगळेपण हे त्याच्या प्रत्येक आशय व विषयातून प्रतिबिंबित होते. आशयाला टोकदार बनवण्यासाठी किंवा आपले विचार ह्र दयापर्यंत सहज पोहचवण्यासाठी भाषेचा उत्तम प्रकारे वापर केला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कु.स्नेहलतादेवी हिचे 'हुंडा आणि मानपान, संसाराची दाणादाण' या विषयावर लिहिलेले पत्र हे होय. या मध्ये ती म्हणते की,"मी गेल्यावर माझ्या रक्षेवर पिताजी, तुम्ही अश्रूंच्या धारा धराल हे मला ठाऊक आहे. मी जाईन-पण आपले घर बचावेल. तेव्हा पासून मी आपल्या ऐहिक यात्रेचा कोणत्या उपायाने शेवट करावाया विचारात आहे. अग्नि, जल किंवा विष मला पहिलाच उपाय पसंत आहे !''

ज्ञानोदयची साधी सोपी भाषा, छोटी छोटी वाक्ये, मुद्देसुद मांडणी, अलंकाराचा वापर ही वैशिष्टे आहेत.

समारोप –

ज्ञानोदयमधील पत्रलेखन पहाताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे यामधील सर्व पत्रे जरी वैयक्तिक व्यक्तिला लिहिली असली तरी त्यांचा आशय हा सार्वजनिक स्वरूपाचा आहे. यामधून केलेला बोध हा सर्व समाजाला लागू पडणारा आहे. यामुळे यापत्राचे वाङ्मयीन दृष्टीने खूपच मूल्य आहे, हे मान्य करावे लागते.

निष्कर्ष-

१) ज्ञानोदय मधील पत्रे ही व्यक्तिगत एका व्यक्तीस उद्देशून लिहिली असली तरी त्यातला आशय हा सर्व समाजाला उपयोगी पडणारा आहे व यातून समाजाचे उत्तम प्रबोधन होते.

२) ज्ञानोदयने पत्रलेखनाच्या माध्यमातून स्त्रियांच्या हुंडा पद्धती या अनिष्ट समस्येला वाचा फोडलेली दिसते.

३) ज्ञानोदयने पत्रलेखनातून अभ्यास,अभ्यासक्रम,शिक्षण या विषयी मांडलेले विचार खूपच मौलिक स्वरूपाचे आहेत.

४) ज्ञानोदयने विवाहासंबंधी मांडलेली मते, उपस्थित केले प्रश्न, अपेक्षा या खरंतरं प्रत्येक विवाह इच्छूकाला

लागू पडणारे व विचार करण्यास भाग पाडणारे आहेत.

५) कोणताही आजार हवा पालट केल्याने बरा होत नसतो तर स्वभाव पालट करणे आवश्यक आहे. असा संदेश ज्ञानोदयने पत्रलेखनातून दिलेला आहे.

संदर्भग्रंथ -

१) ज्ञानोदय अंक – १९२१.
२) ज्ञानोदय अंक – १९३०.
३) ज्ञानोदय अंक – १९४२.
४) ज्ञानोदय अंक – १९८९.
५) जोशी, प्र. न. - 'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास',(अर्वाचीन काळ, १८०० ते १९८० पर्यंत) स्नेहवर्धन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, सुधारित आवृत्ती, २४ एप्रिल, २००६.
६) शर्मा, सुधीर,पुणेकर, विजया - (संपादित) 'ज्ञानोदयाच्या पानातून महाराष्ट्राच्या प्रबोधनाचा मागोवा', (१८४२ ते १९९२), प्रथमावृत्ती, १९९७.
७) मोरजे, डॉ. ग. ना. - 'ख्रिस्ती मराठी वाङ्मय', अहमदनगर कॉलेज, अहमदनगर व स्नेहसदन प्रकाशन, प्रथमावृत्ती, १७ जून, १९८४.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

परिवर्तित भाषिक परिदृश्य और हिन्दी के रोज़गारपरक आयाम

डॉ. जयश्री भास्कर वाड़ेकर

इण्टरनेशनल पब्लिकेशन
कानपुर (उ.प्र.)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

© : सम्पादिकाधीन

ISBN : 978-93-90775-36-1

पुस्तक : परिवर्तित भाषिक परिदृश्य और हिन्दी के रोज़गारपरक आयाम

सम्पादिका : डॉ. जयश्री भास्कर वाड़ेकर

प्रकाशक : **इण्टरनेशनल पब्लिकेशन**
प्रकाशक एवं वितरक
6ए/540, आवास विकास, हंसपुरम्
कानपुर–208 021 (उ.प्र.)

दूरभाष : 09621955798

E-mail : internationalpub09@yahoo.com

संस्करण : प्रथम 2021

मूल्य : ₹ 395/-

शब्द–सज्जा : च्वाईस कम्प्यूटर, कानपुर

मुद्रक : आर्यन डिजिटल प्रिंटिंग प्रेस
नई दिल्ली (भारत)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur



पूज्य स्व. श्यामसुंदरजी मदनलालजी अग्रवाल

आज पालक मुलांना खेळामध्ये करिअर करू देण्यास सहज तयार होत नाही. पण अलिकडच्या काळात पालकांचा क्रीडा क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. कारण पालकांना आपल्या मुलाने चांगले शिक्षण घेवून आयुष्यात सुस्थापित व्हावे असे वाटते. पण आज विद्यार्थ्यांनी खेळात चांगले प्राविण्य मिळविले तर तो विद्यार्थी भविष्यात खेळामध्येच चांगले करिअर करू शकतो. शालेय स्तरावरून विद्यार्थ्याला नियमितपणे खेळण्याची गोडी लावल्यास त्यामधून उत्कृष्ट क्रीडापटू तयार होऊ शकतात. खेळ हे शिक्षणाचे अत्यंत प्रभावी माध्यम असून शारीरिक

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

©Copyright 2021 AMRJ. All Rights Reserved

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
(IIFS- 2.875) (ISRA JIF- 1.312) January –March 2021 VOL.02. ISSUE IV

कौशल्ये आणि क्षमता भरपूर असलेल्या मुलांमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास असतो. नव्या आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता असते व ही क्षमता विकसित करण्यासाठी खेलो इंडिया युथ गेम्स एक महत्वाची भुमिका बजावत आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना त्यांच्या कामगिरीनुसार शासकीय सेवेत थेट नियुक्त करण्यात येते.राज्यातील प्रावीण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय आणि अन्य क्षेत्रातही नोकरीत 5 टक्के आरक्षण देण्यात येते. ''खेलो इंडिया'' क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून शालेय स्तरातील मुलांना ही मोठी संधी शासनाने उपलब्ध करून दिली आहे असे मला वाटते.

नव्या क्रीडा संस्कृतीच उदय :

खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेदरम्यान वर्षाकाठी हजार ते दीड हजार खेळाडू निवडले जातात. त्यांना पुढील आठ वर्षासाठी प्रत्येकी पाच लाख रूपये प्रोत्साहनपर अनुदान दिले जाते. दरवर्षी एक हजार खेळाडू त्यात समाविष्ट करून घेणार असल्याने आठ वर्षांनी देशात खूप मोठया प्रमाणात क्रीडा संस्कृती बहरलेली आपणांस दिसून येईल या स्पर्धेसाठी खेळाडू निवडण्यासाठी शालेय स्तरापासून ते विद्यापीठ स्तरापर्यत वेगवेगळे क्रीडाप्रकार खेळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कारकीर्दीवर नजर ठेवली जाईल. योग्य खेळाडूला योग्य वयात संधी मिळाली तर क्रीडासंस्कृती नक्कीच बहरेल .

खेलो इंडिया स्पर्धा एक आढावा :

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेचा तिसरा हंगाम दि. 10 जाने. 2000 ते 22 जानेवारी 2020 या दरम्यान यशस्वीरित्या पार पडला. 17 आणि 21 वर्षाखालील मुलांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा एक चांगला उपक्रम म्हणता येईल. उत्तम दर्जाचे आयोजन स्पर्धेचे थेट प्रक्षेपण यामुळे या स्पर्धेची एक वेगळी ओळख क्रीडाजगतात तयार होत आहे. गेल्या तीन वर्षात या स्पर्धेत महाराष्ट्राने दमदार कामगिरी करत भरघोस पदके जिंकली आहेत. 78 सुवर्णपदकासह 256 पदकांची कमाई केली 16 विविध क्रीडाप्रकारात महाराष्ट्राचे निर्विवाद वर्चस्व पाहावयास मिळाले त्याच महाराष्ट्रात खूप कौतुकही आले. या मुलांना भरपूर प्रसिध्दीही मिळाली. प्रश्न हा आहे तो या कामगिरीची छाप भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर किती पडते याचा या स्पर्धेतील कामगिरीनंतर पुढील वाटचालीत खेळाडूंना फायदा आला का? त्यांच्या कामिगिरीत सुधारणा आली की अधोगती त्यातील काही खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचले. त्यांची तिथे काय कामगिरी आली या सगळयाचा आढावा घेत राहण्याची गरज आहे. खेळाडूंच्या प्रगतीचा आलेख सतत उंचावला जाईल. त्या प्रगतीचा नोंद कशी ठेवला येईल हे काटेकोरपणे पाहावयास हवे. खेळाडूंना शिष्यवृत्ती स्वरूपात पैसे दिले जातात. पण केवळ पैसे दिल्याने सगळे प्रश्न सुटतात का? ते खेळाडू त्या पैशांचा योग्य विनियोग करतात का? हे आपणांस पाहावयासे हवे.

गेल्या तीन हंगामात महाराष्ट्र आणि हरियाणा या राज्यातील खेळाडूंनी वर्चस्व राखले आहे तर तिसऱ्या क्रमांकावर दिल्लीने स्थान राखले. पण इतर राज्ये त्या तुलनेने फारच मागे आहेत ते का आहेत याचापण विचार केला पाहिजे.

खेलो इंडियाच्या माध्यमातून एक चांगले व्यासपीठ खेळाडूंना मिळाले आहे. त्यात 14 वर्षाखालील वयोगट आणता येईल का त्यातून क्रीडाक्षेत्राचा पाया रचण्यास महत्वाची भूमिका बजावता येईल का? याचा विचार करता येईल.

खेलो इंडिया यूथे गेम्स या केवळ एक वार्षिक सोहळा म्हणून या स्पर्धेकडे न पाहता त्याचा भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी नेमका कसा उपयोग करता येईल याची चाचणी करावी लागेल. ती जर केली नाही तर मात्र इतर स्पर्धेबरोबर ही एक स्पर्धा एवढाच याचा अर्थ घेतला जाईल.

संदर्भ :

- मासिक लोकराज्य – जानेवारी 2019
- 'खेलो इंडिया यूथ गेम्स' www.indianyuth.com

□ □ □

TRUE COPY
PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur (M.S.)

©Copyright 2021 AMRJ. All Rights Reserved

ISSN- 2349-638x

Impact Factor 7.149

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

Peer Reviewed and Indexed Journal

Special Issue

Sustainable Development in Science, Social Sciences and Languages

30th May 2021

Special issue - 88

Chief Editor

Mr. Pramod P. Tandale

Executive Editor

Dr. Mangalkumar R. Patil

Principal

Dr. Shah College, Kadegaon

Editor

Mr. Ashvin G. Godghate

Dr. Dattatray N. Waghmare

Dr. Nilesh. K. Shelake

Sr.No.	Name of the Aurhor	Title of Paper	Page No.
152.	वंदना गोविंद केळकर	शाश्वत विकासाचे तत्व - लिंग पद समभाव	703
153.	प्रा.सुर्यकांत प्रभाकर माने कु.शुभराणी शिवदास होरंबे कु.पौर्णिमा चंद्रकांत साठे	अर्थ साक्षरतेची आर्थिक विकासातील भूमिका: एक व्यष्टी अध्ययन	707
154.	डॉ. शोभा नारायणराव ढानकिकर	हिंदी भाषा और रोजगार के अवसर	712
155.	डॉ.आण्णासाहेब हरदारे	महिला सक्षमीकरण आणि शासनाचे धोरण	715
156.	डॉ. मृणालिनी आबासाहेब शिंदे	वेदांतील पर्यावरणसंरक्षणविषयक विचार	719
157.	डॉ. दिलीप सुदाम शहापुरे	भारतातील अन्नसुरक्षा समस्या आणि उपाय एक चिकित्सक अभ्यास	726
158.	सांते लालचन्द्र रामचंद्र	भारतातील अन्न सुरक्षितता:एक अभ्यास	732
159.	प्रा.डॉ. सुनिल भावराव देसले	रवींद्र शोभणे यांच्या साहित्यातील भेदभाव विषयक जाणीव	735
160.	श्री. अशोक खंडू मोरमारे डॉ. डी.एम. पाटील	कोळी मल्हार आदिवासी जमातीचा चौकाचा विधी एक संस्कारशील विधी	742
161.	प्रा.डॉ. शिवाजी एस.वाघमारे	लोकगीतांची परंपरा व स्वरूप	747
162.	प्रा. डॉ. दत्तात्रय रामचंद्र डुबल	महिलांचा राजकीय क्षेत्रातील सहभाग आणि वास्तव	752
163.	प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे	शारिरिक, मानसिक व संसर्गजन्य (कोरोना) रोगांवर संगीतोपचार व संगीत चिकित्सा पध्दतीचे योगदान	756
164.	प्रा. लक्ष्मी नरहरी पवार	बहिणाबाईच्या काव्यातील पर्यावरणाचे प्रतिबिंब	760
165.	तेंडोलकर दीपा दत्ताराम	ॲक्युप्रेशर: एक वरदान	764
166.	प्रा. सोनकाबळे डी. एन.	दारिद्रय निर्मूलनात मागासवर्गीय विकास महामंडळाचे योगदान	768
167.	डॉ . प्रतिभा सदाशिव देसाई	लिंगभाव समानता व स्त्रीसबलीकरणाच्या परस्पर संबंधाचा चिकित्सक अभ्यास	772
168.	सनी गजानन सुतार	गुणवत्तापूर्ण शिक्षण	778

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

दारिद्रय निर्मूलनात मागासवर्गीय विकास महामंडळाचे योगदान

प्रा. सोनकाबळे डी. एन.
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय , कळे

प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर काळात मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण शाश्वत विकास करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू याने सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचा आधार घेऊन सामाजिक न्याय विभागाची स्थापना केली. या विभागांतर्गत देशातील शेकडो वर्षापासून बहिष्कृत असलेल्या मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण शाश्वत विकास करण्याचा संकल्प करण्यात आला.याकरिता २९ जानेवारी १९५३ रोजी श्री. काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्गीय आयोग समिती नियुक्त करण्यात आली . या समितीने आपला अहवाल १९५५ मध्ये सरकारला सादर केला. परंतु यासमितीने केलेल्या शिफारशी केंद्र सरकारने स्वीकारले नाहीत. तर सरकारने समाजिक न्याय विभागांतर्गत देशातील राज्यस्थरावर मागासवर्गीय समाजाचा समाजिक, आर्थिक, शैक्षणिक,धार्मिक व सांस्कृतिक इत्यादी क्षेत्राबाबतीत शाश्वत विकास करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले . म्हणून देशातील घटकराज्य सरकारने सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती / जमाती व भटक्या विमुक्त जाती / जमाती या मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण शाश्वत विकास करण्याचा हेतू समोर ठेऊन राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वास अनुसरून विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. तरीदेखील मागासवर्गीय समाजाचा अपेक्षे इतक विकास झालेला नाही,असे विविध अभ्यासपूर्ण समित्यांनी केलेल्या निरीक्षण अहवालातून लक्षात आले. म्हणून राज्य सरकारने राज्यातील मागासवर्गीय समाजाचा शाश्वत विकासाची परिपूर्तता करण्याकरिता विविध महामंडळे स्थापण करण्याचा निर्णय घेण्यात आला.सन. १९५६ च्या कंपनी अधिनियम कायद्यास अनुसरून राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध महामंडळाची स्थापना करण्यात आली

संशोधनाची उदिष्ठ्ये

१) मागासवर्गीय समाजातील दारिद्र्याचा अभ्यास करणे

२) दारिद्र्य निर्मुलनाकरिता मागासवर्ग विकास महामंडळाने केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

गृहितक

(१) स्वयरोजगार व्यवसाय उभारणीतून दारिद्र्य निर्मुलन करता येतो.

दारिद्र्य म्हणजे काय ?

समाजातील एखादा जनसमुदाय अथवा व्यक्ती आपल्या दैनंदिन जीवनातील मुलभूत अथवा आवश्यक (अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण) गरजांची पूर्तता करू शकत नाही, अशा प्रकारच्या परिस्थितीला दारिद्र्य असे म्हणतात. असे दारिद्र्याचे जीवन जगत असलेल्या समाजाचे सर्वाधिक प्रमाण अनुसूचित जाती व जमाती मध्ये विविध अभ्यास मंडळानी केलेल्या निरीक्षणात आढळून आले आहे.

दारिद्र्याची संकल्पना

भारतात दादाभाई नौरोजी यांनी सन .१८७६ मध्ये सर्वप्रथम दारिद्र्याची संकल्पना मांडली. वास्तविक पाहता दारिद्र्याची संकल्पना दरडोई उत्पन्न व उपभोग खर्च यांच्याशी निगडीत आहे. म्हणून जगातील दारिद्र्याचे

IC PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Dist. Kolhapur

निकष विभिन्न देशात विविध प्रकारचे आहेत. परंतु भारतातील दारिद्र्य उपभोग खर्चाशी निगडीत आहे. समाजातील जी व्यक्ती किमान आपल्या आवश्यक गरजाची पूर्तता करू शकत नसेल तर ती व्यक्ती दारिद्र्यात आहे असे म्हंटले जाते. दारिद्र्याच्या सापेक्ष व निरपेक्ष अशा दोन संकल्पना आहेत.

यात सापेक्ष ही संकल्पना उत्पन्नाशी निगडीत आहे, तर निरपेक्ष ही संकल्पना उपभोगाशी निगडीत आहे .

भारतातील दारिद्र्याचे प्रमाण

देशातील विविध अभ्यास गटांनी विविध कालखंडात दारिद्र्याचा अभ्यास करून आपल्या अहवालात खालील प्रकारे दारिद्र्याचे मुल्येमापन केले आहे. त्यांची सांख्यकीय माहिती खालील कोष्ठ्कात दर्शविण्यात आली आहे.

अनु. क्र	आर्थिक वर्ष	एकूण दारिद्र्याचे प्रमाण	अभ्यास गटाचे नाव
१	१९५५-५६	६५ %	प्रा . मिन्हास
२	१९६०-६१	४४ % , ४१ %	पी .डी . ओझा. , दांडेकर
३	१९६८-६९	५४ %	डॉ. बर्धन .
४	२००९-१०	२९.८ %	सुरेश तेंडूलकर
५	२०११-१२	२९.५ %	सी . रंगराजन

संदर्भ : भारतीय अर्थव्यवस्था . श्री . रंजन कोळंबे

राष्ट्रीय नमुना पाहणी समितीच्या अहवालावरून देशात सर्वाधिक दारिद्र्याचे प्रमाण अनुसूचित जाती व जमाती या प्रवर्गात दिसून आले आहे. म्हणून या समाजातील दारिद्र्य कमी करून त्यांना प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विकास प्रव्हात समाविष्ठ करणच्या उदेशाने त्यांना रोजगार व विविध व्यवसायांच्या संधी उपलब्द करून देण्यात येत आहेत.

दारिद्र्य निर्मुलन

भारतीय समाजव्यवस्थेत शेकडो वर्षापासून समाजिक,आर्थिक व शैक्षणिक इत्यादीक्षेत्रापासून बहिष्कृत असलेल्या मागासवर्गीय समाजाला स्वातंत्र्योत्तर काळात नैसर्गिक मानवी स्वातंत्र्याचे हक्क प्राप्त करून देण्याकरिता सरकारने विविध महामंडळाची स्थापना करून त्यांना स्वयरोजगार उभारणीकरिता अर्थसह्या उपलब्द करून दिले.याच धर्तीवर राज्यात पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सामाजिक व आर्थिक विकासाकरिता वीस कलमी कार्यक्रम सर्वप्रथम सन. १९७५ मध्ये सुरु करण्यात आला. या कार्यक्रमातील मुख्ये उदिष्ठे मागास समाजात सर्वत्र पसरलेले दारिद्र्य व आर्थिक विषमता कमी करणे

तसेच समाजात सर्वत्र पसरलेला सामाजिक असमतोल दूर करणे हे होते. सन .२०१५ –१६ ते २०२०-२१ या काळात मागासवर्गीय समाजातील दारिद्र्य कमी करण्याच्या हेतूने आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या गरजू वपात्रलाभधारकाची निवड करून अर्थसाह्य दिले आहे . अशा प्रकारची सांख्यकीय माहिती खालील कोष्ठ्कात दर्शविण्यात आली आहे.

मागासवर्गीय महामंडळाच्या कार्याचे मूल्यमापन

सन. (२०१५-१६ ते २०२०-२१) वाटप लाख रु.

अनु. क्र.	आर्थिक वर्ष	महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ.		लोकशाहीर अण्णभाऊसाठे विकास महामंडळ		संतरोहीदास चर्मउद्योगव चर्मकार विकास महामंडळ		शेकडा प्रमाण
		लाभधारक	वाटप अर्थ	लाभधारक	वाटप अर्थ	लाभधारक	वाटप अर्थ	
१	२०१५-१६	९२०५	२३४८.२५	३४८७	८१३.५४	२२३७	१७०.३९	२५.१६
२	२०१६-१७	३७६३	९३३.२२	२१०७	१३१२.३५	२४४४	२१९.१	१४.०१
३	२०१७-१८	११६६५	२६४५.७६	२११८	६१४.७८	४३३	४०.५०	२३.९६
४	२०१८-१९	५१८५	२०८६.०८	२०६६	४६०.४६	३१७	३५.३०	१२.७६
५	२०१९-२०	११६०७	३६१२.०५	१२३२	२८०.०१	०१९२	२१.२२	२१.९७
६	२०२०-२१	७९२	८९६.१९	३८७	१३३.४५	००८९	०८.४०	२.१४
	एकूण	४२२१७ ७१.१६		११३९७ १९.२१		५७१२ ९.६३		१०० %

संदर्भ : महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०२० -२१

वरील कोष्ठकात महात्मा फुले विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व संत रोहिदास चार्मउद्योग व चर्मकार समाज विकास महामंडळ इत्यादी मागासवर्गीय विकास महामंडळणी राज्यातील मागासवर्गीय समाजातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृठ्या दुर्बल असलेल्या व दारिद्र्याच्या परीस्थित जीवन जगत असलेल्या गरजू व पात्र अशा लोकांना या महामंडळाकडून स्वयंरोजगार व्यवसाय उभारणीकरिता अर्थसह्या उपलब्द करून दिले आहे. या व्यवसाय उभारणीतून मागासवर्गीय समाजला रोजगार प्राप्त झाला असून यातून त्यांचा दैनदिन रोजीरोठीचा प्रशन सुठ्ला आहे.

यात महात्मा फुले महामंडळाने सन. २०१५ -१६ ते २०२० -२१ या काळात एकूण ४२२१७ लाभधारकांना अर्थसाह्य पुरवून रोजगाराची संधी उपलब्द करून दिली असून यांचे शेकडा प्रमाण ७१.१६ इतके आहे. अशा प्रकारे अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे शेकडा प्रमाण १९ .२१ इतके आहे. तर चर्मकार समाज विकास महामंडळाचे शेकडा प्रमाण ९ .६३ आहे.अशा प्रकारे या तीन महामंडळाने मागासवर्गीय समाजातील दारिद्र्य कमी करण्यासाठी प्रत्यक्षपणे कार्य करत असून त्यांच्या जीवनात एक नवसंजीवनी निर्माण करत आहे. हे वास्तव सत्य आहे.

निष्कर्ष:

शेकडो वर्षापासून आपल्या देशात सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या बहिष्कृत असलेल्या मागवर्गीय समाजाना दारिद्र्य हे तत्कालीन समाजव्यवस्थेने त्यांच्यावर लादलेला एक परिणाम आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मागासवर्गीयांचे दारिद्र्य कमी करण्यासाठी सरकारने सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध कल्याणकारी योजनाचा अंमल सुरु करून कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. हे आपणास स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळातील दारिद्र्य व सध्याचे दारिद्र्य यांच्या निरीक्षणातून दिसून आले आहे

शिफारशी :

१) महामंडळाने जास्तीतजास्त गरजू व पात्र लाभधारकांना अर्थसह्या व कर्ज देण्यात यावे.

२) महामंडळाकडून गरजू व पात्र लाभधारकाची पात्रता काळानुसार बदलण्यात यावी.

३) लाभधारकाने उभारलेल्या स्वयरोजगार व्यवसयांची महामंडळाने दरवर्षी चौकशी करवी.

४) लाभधारकांना व्यवसाय उभार्नीच्या काळात योग्य मार्गदर्शन करावे.

५) लाभधारकांना महामंडळाकडून व्यवसायिक प्रशिक्षण देण्यात यावे.

संदर्भग्रंथ :

(१) भारतीय अर्थव्यवस्था. प्रा . डॉ. राजेंद्र रसाळ

(२) भारतीय अर्थव्यवस्था. श्री. रंजन कोळंबे .

(३) भारतीय दलित समाज . श्री .सुखदेव थोरात

(४) शासकीय योजनाचा खजिना . डॉ. पुरुषोत्तम भापकर

(५) महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल. २०२० -२१, २०१९ -२० , २०१८ -१९ व २०१७ -१८

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

महत्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचा उदय आणि विकास

प्रा. देवराव नामदेव सोनकांबळे
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय , कळे
ता : पन्हाळा जिल्हा : कोल्हापूर

प्रस्तावना ,

स्वातंत्र्योतर काळात मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकास करण्याच्या ध्ययाने प्रेयारीत होऊन तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू याने सर्वप्रथम भारतीय राज्येघटनेतील कलम ३४० नुसार समाजिक न्याय विभागाची स्थापना करण्यात आली . या विभागांतर्गत देशातील समाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास समाजाचा सर्वांगीण अभ्यास करण्याकरिता श्री . काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली २९ जानेवारी १९५३ रोजी मागासवर्ग आयोग समिती नेमण्यात आली . या समितेने आपला अहवाल १९५५ मध्ये सरकारला सादर केला . परंतु केंद्र सरकारने या समितीच्या शिफारसी स्वीकारले नाहीत . तर सरकारने समाजिक न्याय विभागांतर्गत देशातील राज्यास्थरावर मागास समाजाचा समाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सास्कृतिक ईत्यादि क्षेत्राचा विकास करण्याचा दृष्टीकोण समोर ठेऊन राज्येस्तरावर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. म्हणून देशातील प्रत्येक घटक राज्यात समाजिक न्याय विभागांतर्गत (अनुसूचित जाती व जमाती , अनुसूचित भटक्या विमुक्त जाती व जमाती) राज्यातील मागास समाजाचा सर्वांगीण विकास करण्याकरिता

राज्येघटनेतील मार्गदर्शक तत्वास अनुसरून विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून देखील मागास समाजाचा समाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास अपेक्षे इतका झालेला नाही , असे विविध अभ्यासपूर्ण समित्यांनी केलेल्या निरीक्षण अहवालातून लक्षात आले आहे . म्हणून राज्ये सरकारने राज्यातील मागास समाजाचा शाश्वत विकासाची परिपूर्तता करण्याकरीता विविध महामंडळे स्थापण करण्याचा निर्णय घेतला आहे.

यास अनुसरून २ फेब्रुवारी १९७८ रोजी राज्याचे मुख्यमंत्री वसंतदादा बंडोजी पाटील याने १९५६ च्या कंपनी अधिनियमन कायद्यास अनुसरून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ स्थापण करण्याचा निर्णय घेतला आहे. या महामंडळाच्या कार्याची प्रत्यक्षात सुरुवात १० जुलै, १९७८ रोजी झाली . याच धर्तीवर राज्यात लोकशाहीर अण्णभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ , संत रोहोदास चार्मउद्योग व चर्मकार समाज आर्थिक विकास महामंडळ, वसंतराव नाईक भटक्या विमुक्त जाती व जमाती विकास महामंडळ, शबरी आदिवासी विकास महामंडळ , मौलाना आजाद विकास महामंडळ, अन्नासाहेब पाटील विकास महामंडळ , महाराष्ट्रय राज्य दिव्यांग विकास महामंडळ , महिला आर्थिक विकास महामंडळ व इतर आर्थिक दृष्ट्या मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली .

महामंडळाचा उदय :

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजव्यवस्थेत सर्वत्र समाजिक, आर्थिक, धार्मिक , राजकीय व शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात विषमता पसरलेली होती. परिणामतः समाजात रूढी , परंपरा ,अंद्श्धा व दैववाद यांचा प्रभाव समाजात सर्वत्र पसरलेला दिसून येत होता. ही समाजिक विषमता उच्चवार्नातील समाजानी कनिष्ठा वर्णातील समाजावर

VC PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

निर्दयपणे लादलेली होती. म्हणून या कनिष्ठ वर्णातील लोकस्मुहात बहुतांश पणे समाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व शैक्षणिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसत होती. अशा प्रकारच्या तत्कालीन समाजव्यवस्थेच्या विरोधात देशातील काही समाजसुधारकांनी आपल्या परखड वाणी व साहित्याच्या विचारातून उठाव केला. त्यात फुले , शाहू व आंबेडकर यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात मत मांडून मागासलेल्या समाजाना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. तर यात राजश्री शाहू महाराजांनी आपल्या राज्यात मागास समाजाकरिता सरकारी नोकरीत ५० % जागा राखीव ठेवण्यासाठी कायदा केला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या परखड वाणी व विचाराने मागास समाजाला संघटीत करून प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंड करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या आयुषाच्या शेवठपर्यंत प्रयत्न केला. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात मागास समाजाला समाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय राज्यघटनेत देशातील सर्व लोकांना मुलभूत हाक व त्याच बरोबर समाजात समाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्याकरिता काही मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. या मार्गदर्शक तत्वाचा आधार घेऊन देशातील तत्कालीन सरकारने समाजिक न्याय विभागाची स्थपना करून १९५६ च्या कंपनी आदिनियमन कायद्यानुसार २ फेब्रुवारी,१९७८ रोजी महामंडळ निर्मितीचा निर्णय घेण्यात आला . निर्णय क्रमांक एस . सी . डब्ल्यू १०७७ /५६०२६- डी- ७ या आदेशानुसार राज्यात दिनांक १० जुलै, १९७८ रोजी महामंडळाचे प्रत्यक्षात कार्ये सुरे झाले.

महामंडळाचा विकास :

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असून , त्याचे विभागीय कार्यालय मुंबई , पुणे , नाशिक , औरंगाबाद , अमरावती व नागपूर येथे आहेत . तर प्रत्येक जिल्ह्याच्य ठिकाणी जिल्हा कार्यालय असून या कार्यालय मार्फत प्रत्यक्षात प्राथमिक स्तरावर काम केले जाते .

विभागीय कार्यालय व त्याविभागातील जिल्हा कार्यालय पुढील प्रमाणे दर्शविण्यात आली आहेत .

१) मुंबई विभागीय कार्यालय - मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे , रायगड, रत्नागिरी , सिंधुदुर्ग व पालघर.

या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

२) पुणे विभागीय कार्यालय - पुणे , सातारा , सांगली, सोलापूर व कोल्हापूर. या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

३) नाशिक विभागीय कार्यालय - नाशिक , धुळे , जळगाव, अहमदनगर व नंदुरबार. या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे .

४) औरंगाबाद विभागीय कार्यालय - औरंगाबाद , जालना, परभणी ,नांदेड, हिंगोली, लातूर , बीड व उस्मानाबाद या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

५) अमरावती विभागीय कार्यालय - अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशीम. या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

६) नागपूर विभागीय कार्यालय - नागपूर, भंडारा,चंद्रपूर , गडचिरोली , वर्धा व गोंदिया . या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

महामंडळाचे भाग भांडवल :

सध्या महामंडळाचे भाग भांडवल एकूण ५०० कोटी रुपयाचे असून राज्य व केंद्र शासनाचे प्रमाण ५१ : ४९ इतके आहे . आजपर्यंत केंदें शासनाकडून प्राप्त झालेले भाग भांडवल ६४.०७ कोटी रुपये इतके आहे. एकंदरीत केंद्र व राज्य शासनाकडून महामंडळाकडे प्राप्त झालेले एकूण भांडवल ६३२.६४ कोटी रुपये आहे. म्हणजेच महामंडळाच्या एकूण भाग भांडवलात केंद्र पेक्षा

राज्य शासन जास्त गुंतवणूक केली आहे. भाग भांडवलाची विभागणी १० हजार भाग मध्ये झाली आहे. म्हणजेच प्रत्येक भागाला ५०० रुपये याप्रमाणे मिळतात. जो व्यक्ती महामंडळाची माहिती पुस्तिका विकत घेईल, तोच व्यक्ती महामंडळाचे भाग विकत घेईल .

प्रत्यक्षात केंद्र आणि राज्य शासन हे महामंडळाचे व्यक्ती नसून केवळ भागधारक आहेत .

महामंडळाची कामगिरी :

प्रत्यक्षात महामंडळाचे कार्य जिल्हा कार्यालय मार्फत चालते. या कार्लाया मार्फत अनुसूचित जाती (महार , नौव-बौद्ध, बुरुड , खाटिक, भंगी , म्हेत्तर, हिंदू भंगी , हिंदू खाटिक , व इतर सबंदित असलेल्या पोट जाती) या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरजू अशा पात्र लाभाधारकाचा शोध घेऊन महामंडळाच्या विविध योजनेचा लाभ त्यांना प्राप्त करून दिला जातो . राज्यात आजपर्यंत १०,५०,००० पेक्षा जास्त लाभधारकांना महामंडळाने ९६,८२० कोटी रुपयाचे अर्थसाह्य वितरीत केले आहे.

महामंडळाच्या विविध योजना :

१) ५० % अनुदान योजना : या योजने अंतर्गत राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरजू अशा पात्र लाभधारकांना या योजनेचा लाभ दिला जातो . या योजनेत महामंडळाकडून जास्तीत जास्त १०,००० रु . पर्यंतचे अनुदान दिले जाते. तर राष्ट्रीय , सहकारी अथवा नागरी बँकेकडून लाभधारकांना जास्तीत जास्त ४०,००० रु . पर्यंतचे कर्ज दिले जाते. लाभाधारकाकडून कसल्याही प्रकारचे तारण नसताना सुधा कर्ज वितरीत केले जाते . या कर्जाची सर्वस्वी जबाबदारी महामंडळाकडून स्वीकारली जाते . म्हणून मागास समाजातील बेरोजगार लोकांना कर्ज देण्यासाठी बँका पुढे आल्या आहेत . परिणामतः मागास समाजातील बेरोजगारांना स्वरोजगार प्राप्त झाला आहे .

परिणामतः या योजनेचा लाभ राज्यातील गरजू व पात्र लाभधारकांनाच होईल असे या योजनेच्या हेतू आहे .

२) बीज भांडवल योजना : या योजने अंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरजू अशा पात्र लाभधारकांना या योजनेचा लाभ दिला जातो . या योजनेत महामंडळाकडून जास्तीत जास्त १०,००० रु . पर्यंत अनुदान दिला जातो .

तसेच या योजनेत लाभधारकांना जास्तीत जास्त ५०,००१ रु. ते ५,००००० लाख रुपया पर्यंत कर्ज दिला जातो बँकांनी एकूण मंजूर केलेल्या कर्जापैकी २० % कर्ज आणि त्यात १०,००० रुपये अनुदानाचा समावेश असतो . या कर्जावर महामंडळाचा द. सा. द. शे . ४ रुपये प्रमाणे व्याजदर आकारला जातो व लाभाधारकांचा एकूण कर्जापैकी ५ % हिसा हा लाभधारकांचा असावा असे अनिवार्य आहे . तर उर्वरित रकमेवर बँकांनी चालू व्याजदरानुसार जो व्याजदर आकारला जातो तो व्याजदर लाभधारकांना मान्या असेल . या योजने अंतर्गत मागास समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वरोजगार प्राप्तीसाठी अर्थसह्ये उपलब्ध झाले असून त्यांचा आर्थिक व समाजिक विकास होइल . अशा प्रकारचे गृहीत ही योजना चालू करण्याच्या पाठीमागे आहे .

३) अस्वच्छ सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांचा विकास योजना : या योजने अंतर्गत राज्यातील भंगी व हिंदू भंगी या जातीमधील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या गरजू व पात्र व्यक्तीचा शाश्वत विकास करण्याच्या दृष्टीने ही योजना राज्यात कार्न्वित करण्यात आली आहे . या योजने अंतर्गत लाभधारकांना ५० हजार रुपयापर्यंत कर्ज दिले जाते . यात महामंडळा मार्फत ७५०० रुपये बीज भांडवल व १२५०० रु. अर्थसाह्ये देण्यात येते . तसेच या योजनेत राष्ट्रीय महामंडळा मार्फत १०.०० ते १५.०० लाख रुपयापर्यंत कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली जाते

परंतु सबंधित व्यवसाय हा अस्वच्छ तेवर प्रतिबद्ध घालणारा अथवा निर्जंतुकीकरण करणारा असावा असे अनिवार्य आहे .

४) राष्ट्रीय अनुसूचित जाती व वित्त् विकास महामंडळ (NSFDC) : या महामंडळाच्या विविध योजना राज्यात महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळा मार्फत राबविल्या जातात . या योजने मार्फत लाभधारकांना ५०,००० रु. ते ५,००,००० रु. पर्यंत महामंडळाकडून कर्ज उपलब्द करून दिला जातो. परंतु या योजनेत विविध लाभधारकांना अनुदान मात्र महामंडळाकडून दिला जातो . तसेच बीज भांडवलाचे कर्ज महामंडळाकडून दिले जाते.

बीज भांडवल योजनेत दिलेल्या कर्जावर व्याजदर द. सा .द. शे. ४ रु. याप्रमाणे आकारला जातो. परंतु या राष्ट्रीय महामंडळाकडून देण्यात येत असलेल्या कर्जावर व्याज मात्र अतिशय अल्प प्रमाणात असतो . द.सा. द. शे .३, ४, ५ रुपये या प्रमाणे व्याज दर आकारला जातो . यात महिलांना मात्र व्याजदरात विशेष सवलत दिली जाते.

५) राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त विकास व महामंडळ (NSKFDC) : या देशात शेकडो वर्षापासून समाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास समाजाचा सर्वांगीण शाश्वत विकास करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन केंद्र सरकारने देशात सन १९९७ मध्ये राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त विकास व महामंडळाची स्थापना केली आहे.

या महामंडळा मार्फत राष्ट्रीय सफाई कर्मचारी यांच्या कुठूभातील १८ वर्ष पूर्ण झालेल्या मुला व मुलीना या व्यवसायात येऊनये म्हणून त्यांचा कुठुबियांचा विकास करण्याच्या दृष्टीने समाजिक न्याय व मनुष्य विकास मंत्रालय,भारत सरकार द्ववारा आयोजित महामंडळा मार्फत राबविण्यात येते . या योजनेत राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या मागास समाजातील गरजू व पात्र लाभधारकांना स्वयरोजगाराकरिता ५०,००० रु. ते १०,००,००० रु. पर्यंत कर्ज उपलब्द करून दिला जातो . या कर्जावर द. सा .द. शे . व्याजदर अतिशय अल्प प्रमाणात आकारला जातो . विशेस म्हणजे महिलाकरिता व्याजदर पुरुषाच्या तुलनेत कमी आकारला जातो . परंतु व्यवसाय मात्र अस्वचछ निर्जंतुकीकरण करणारा असावा असे बंधन घालण्यात आले आहे .

निष्कर्ष :

स्वातंत्र्योत्तर काळात राज्यात अनुसूचित जाती व जमाती तसेच भटक्या विमुक्त जाती व जमाती या प्रवर्गातील समाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास समाजातील लोकांचा शाश्वत विकास करण्याच्या ध्येयाने समाजिक न्याय विभाग अंतर्गत कल्याणकारी विविध योजना राबऊन सुध्दा या समाजाचा विकास अपेक्षेइतका झाला नाही. म्हणून राज्यात १९५६ च्या कंपनी अधिनिअमन काद्यास अनुसरून महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळा मार्फत राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या गरजू व पात्र अशा लोकांचा विकास करण्याचा संकल्प या महामंडळा मार्फत करण्यात आला आहे .

संदर्भग्रंथ :

१) **महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाचा अभ्यास . लेखक** : महाजन आणि कांबळे

२) **शासकीय योजनांचा खजिना . लेखक : डॉ. पुरुषोत्तम भापकर**

३) **" यशोगाथा " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ , मर्यादित मुंबई . महराष्ट्र शासनाचा उपक्रम**

४) www.maharashtra.gov.in

५) mpbcdc.maharashtra.gov.in

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

EDITORIAL BOARD

Professor Kaiser Haq
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

Roderick McCulloch
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

Dr. Ashaf Fetoh Eata
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

Dr. Nicholas Loannides
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

Muhammad Mezbah-ul-Islam
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

Dr. Meenu Maheshwari
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

Dr. S. Sampath
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

Dr. D. H. Malini Srinivasa Rao
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

Dr. S. K. Omanwar
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

Dr. Rana Pratap Singh
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

Dr. Shekhar Gungurwar
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

Memon Sohel Md Yusuf
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

Dr. S. Karunanidhi
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

Prof. Joyanta Borbora
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

Dr. Walmik Sarwade
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

Dr. Manoj Dixit
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

Prof. P. T. Srinivasan
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

Dr. P. Vitthal
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

VOLUME - IX, ISSUE - III - JULY SEPTEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

CONTENTS OF MARATHI PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	भारतीय राजकारणातील महिलांचे योगदान **डॉ. आनंद प्रभाकर बांदेकर**	१-५
२	सेंद्रीय शेतीतुन शाश्वत ग्रामीण विकास **प्रा. विवेक शांताराम चव्हाण**	६-८
३	जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम **श्री. वामन अंकुश गावडे**	९-१२
४	शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यामधील भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास **जाधव सतीश रजनीकांत**	१३-२०
५	व्यक्तिमत्व विकासासाठी भगवद्गीता **प्रा. डॉ. श्रीमती सुजाता चंद्रकांत पंडित**	२१-२३
६	सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतीराव फुले **श्री. अजितकुमार भिमराव पाटील**	२४-३०
७	भारतीय राजकारणातील महिलांचे योगदान **सौ. सावंत वेदिका विजय**	३१-३६
८	जागतिकीकरण आणि मराठी कविता **डॉ. कल्याणी शेजवळ**	३७-४१
९	सत्यशोधक 'विद्यादेवी' : सावित्रीबाई रोडे यांचे सामाजिक कार्य **प्रा. जयंत विरूळकर**	४२-४८
१०	महिला सबलीकरणाच्या नव्या वाटा **प्रा. डी. आर. आरोलकर**	४९-५४
११	ग्रामीण भागाच्या विकासाकरिता शाश्वत शेतीची गरज **प्रा. देवराव नामदेव सोनकांबळे**	५५-५९
१२	जागतिकीकरणाचे संदर्भ आणि भर चौकातील अरण्यरुदन ही कादंबरी **डॉ. गोविंद काजरेकर**	६०-६५
१३	भारतीय राजकारणातीलमहिलांचे योगदान **सहा. प्रा. हर्षलविरेंद्र चलवादी**	६६-७०

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

VOLUME - IX, ISSUE - III - JULY – SEPTEMBER -2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

११. ग्रामीण भागाच्या विकासाकरिता शाश्वत शेतीची गरज

प्रा. देवराव नामदेव सोनकांबळे
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, काळे.

ग्रामीण भागातील शेती क्षेत्राला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. कारण शेती व्यवसाय म्हणजे ग्रामीण भागातील आर्थिक विकासाचे इंजिन आहे.स्वातंत्रोत्तर काळात देशात उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास वेगाने होत असला तरीही शेती क्षेत्राचे महत्त्व आज कमी झाले नाही. आज सुद्धा शेती क्षेत्रात सर्वाधिक रोजगार निर्मितीचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. म्हणजेच देशातील एकूण रोजगारापैकी ५८ टक्के रोजगार शेतीत निर्माण होत असून त्यांचे जीवनमान शेतीवर अवलंबून आहे.त्याचबरोबर देशातील सर्व सजीवाना अन्न पूरविण्याचे कार्य शेती क्षेत्राकडून केले जाते. तसेच देशातील लहान मोठ्या उद्योगांना कच्चामाल पुरविण्याचे कार्य सुद्धा देशातील शेती क्षेत्राकडूनच केला जातो. देशातील इतर व्यवसायसुद्धा शेती क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहेत. म्हणजेच वाहतूक सेवा, आयात निर्यात व कुटीर उद्योग इत्यादी क्षेत्रातील घटकाना शेती क्षेत्राच्या उत्पादनावर अवलंबून राहावे लागते. तसेच शेती उत्पादना वरून त्यांचे उत्पन्न बदलत असते .तसेच शासनाला महसूल वाढविण्यासाठी सुद्धा शेती क्षेत्राची मदत होते .म्हणूनच देशातील शेती व्यवसाय इतर व्यवसायाना ऊर्जा निर्माण करणारा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. म्हणून भारतीय शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे सत्य असून सुद्धा वाढत्या लोकसंख्येची गरज वाढते औद्योगीकरण वाढते पर्यावरणातील प्रदूषण लक्षात घेऊन शेती क्षेत्राच्या विकासाकरिता शाश्वत शेती क्षेत्राच्या विकासाला प्रोत्साहन देणे आजच्या काळाची गरज निर्माण झाली आहे. म्हणून शेतीमध्ये उत्पादकतेचे शाश्वत गुणधर्म टिकून ठेवण्यासाठी कृतीयुक्त शेती करणे आजच्या काळाची गरज निर्माण झाली आहे.

शाश्वत शेतीची व्याख्या

भावी पिढीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत स्रोतांना कोणत्याही प्रकारची हानी न पोहोचविता वर्तमान पिढीच्या गरजा भागविण्यासाठी अवलंबिण्यात आलेली शेती करण्याची पद्धत म्हणजे शाश्वत शेती होय.

पर्यावरणाच्या संतुनाबरोबर नैसर्गिक साधनांचा व मानव निर्मित तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून आर्थिक दृष्ट्याफायदेशीर व टिकाऊ कृषी उत्पादन करण्यासाठी ज्याशेती पद्धतीचा व शेती कामाचा समावेश केला जातो त्यात शाश्वत शेती असे म्हणतात.

शाश्वत शेतीची संकल्पना

नैसर्गिक साधनसंपत्ती व मानव निर्मित संसाधनाचा अतिरिक्त वापरामुळे होणारे दुष्परिणाम यांच्याशी संबंधित आहे.परंतु नैसर्गिक साधने मर्यादित स्वरूपाचे असल्याने ती संपण्याचा धोका असतो असे झाल्यास भविष्यात विकासाची गती मंदावण्याची भीती निर्माण होते. तसेच उत्पादन प्रक्रिया दरम्यान पर्यावरणाची हानी होते. अतिरिक्त प्रदूषित पर्यावरणामुळे त्याचा

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

दुष्परिणाम विकासावर होतो. म्हणून नैसर्गिक साधने व मानवनिर्मित तंत्रज्ञानयांचा पर्याप्त वापर करून त्याचा पर्यावरणावर कोणत्याही प्रकारचा दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन वर्तमानातील विकासा भविष्य कारण विकासाची शाश्वती आजच सूचित करणारा असावा तरच तो शाश्वत विकास ठरेल. वर्तमानातील विकास हा भविष्यातही टिकून राहणारा असेल तर तो शाश्वत विकास असतो.

शाश्वत शेतीचे आवश्यक घटक

शेतीला बारामाही पाणी पुरवठा करणे.

भारतीय शेती मोसमी पावसाचे जुगार असल्याने ती योग्य प्रकारे आवश्यकतेनुसार करता येत नाही. म्हणून शेतीला बारमाही पाणीपुरवठा केल्यास शेती योग्य प्रकारे करता येईल यासाठी सरकारने नियोजनाच्या माध्यमातून शेतीचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने देशातील विविध राज्यात नदी व दऱ्याखोऱ्या अशा ठिकाणी जलसिंचनाचे योग्य प्रकल्प उभारून शेतीला बारमाही पाणीपुरवठा करण्याची पूर्तताकेली आहे. लघु जलसिंचन, मध्यम जलसिंचन व मोठे जलसिंचन याचबरोबर विहिरी, तलाव, बोरवेल, कालवे व शेततळे यांच्या साह्याने ही शेतीला बारमाही पाणीपुरवठा केला जातो. आज देशातील केंद्रीय जल आयोगाच्या माहितीनुसार देशात ५७०१ जलसिंचन प्रकल्प आहेत. त्यापैकी सर्वात जास्त महाराष्ट्रात आहेत. एकंदरीत देशाच्या कृषी क्षेत्राचा विचार केल्यास आज ६३ दसलक्ष शेती पीक क्षेत्रासाठी उपयुक्त आहे. म्हणजेच यापैकी देशातील फक्त ४५ टक्के शेतीला बारमाही पाणी पुरवठा होतो. म्हणून शाश्वत शेतीच्या विकासाकरीता बागायत शेतीचे प्रमाण वाढविण्याची आजच्या काळाची गरज निर्माण झाली आहे.बागायत शेतीचे प्रमाण वाढविल्यास भविष्यात शाश्वत शेती करता येईल.

सेंद्रिय शेती.

सेंद्रिय शेती म्हणजे नैसर्गिक साधनांचा योग्य वापर करून खत तयार करणे व पारंपारिक खताचा वापर करणे रसायनमुक्त शेती करणे म्हणजेच सेंद्रिय शेती होय. सेंद्रिय शेती पद्धतीमध्ये शेत पिकाचे अवशेष, प्राण्यांचे मल वगोमूत्र तसेच नैसर्गिक साधनांचा योग्य वापर करून सेंद्रिय शेती केली जाते. आज जगात ११० देश सेंद्रिय शेती करत आहेत. तर भारतातील सिक्कीम या राजाने संपूर्ण राज्यात सेंद्रिय शेती करण्याचा संकल्प केला आहे. सेंद्रिय शेती केल्याने शेतीचे उपजत उत्पादकतेचे गुणवृद्धिगत होतात व यामुळे शेतीची उत्पादनशक्ती दीर्घ काळापर्यंत टिकून राहते म्हणून आजची रसायनमुक्त शेतीच्या दुष्परिणामावर उपाय म्हणून सेंद्रिय शेतीची गरज निर्माण झाली आहे.

व्यवसायिक शेती

शेतीला बारामाही पाणी पुरवठ्याची गरज पूर्ण झाल्यानंतर शेतकरी हंगामानुसार व पारंपारिक पद्धतीनुसार शेती करत असतो. बदलत्या हवामानानुसार बदलत्या मागणी-पुरवठा नुसार तसेच बदलत्या परिस्थितीनुसार शेती करणे कधीही शेतकऱ्यांना फायदेशीर ठरते. म्हणून शेतकऱ्यांनी पारंपारिक पैठणी शेती न करता व्यवसाय दृष्टिकोन समोर ठेवून शेती करणे गरजेचे आहे. ज्या शेतीचे क्षेत्र शहराच्या जवळ आहे अशा शेतीत फळभाज्या, पालेभाज्या व तसेच फुल शेती करून अपेक्षेप्रमाणे

उत्पन्न मिळविता येते. ज्या शेतीचे क्षेत्र शहरापासून दूर आहे अशा शेतकऱ्यांनी शेतीला पूरक असणारा व्यवसाय करावा जसे दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, मत्स्य व्यवसाय, रेशीम पालन, इत्यादी प्रकारचापूरक व्यवसाय करून एकंदरीत शेती उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी या व्यवसायांचा योग्य वापर होईल.

आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर करणे

शेतीला बारामाही पाणी पुरवठ्याची गरज पूर्ण झाली म्हणजे शेतीची एकूण उत्पादन क्षमता वाढते असे नाही. तर त्याकरिता शेतकऱ्यांना योग्य नियोजन करावे लागते. पिकाला अपेक्षेपेक्षा जास्त पाणी झाले तर शेतीच्या एकूण उत्पादनात घट होऊ शकते किंवा शेत पिकाचे नुकसान होऊ शकते. म्हणून शेतीला आवश्यकतेनुसार हवे तेवढेच पाणी देणे गरजेचे आहे. यासाठी आधुनिक पद्धतीने शेती पिकाला पाणी दिल्यास शेत पिकाची एकूण उत्पादनात वाढ होऊ शकते असे कशी संशोधकाचे मत आहे.म्हणून ठिबक सिंचन व तुषार सिंचन यांच्या साहयाने शेत पिकाला हवे तिथे पाणी देता येईल म्हणजे शेत पिकाला आवश्यक त्या ठिकाणी ठिबक सिंचनाच्या साहयाने पाणी देता येईल.यांचा परिणाम म्हणून अतिरिक्त पाण्याचा दुष्परिणाम टळेल व एकूण शेती उत्पादनात वाढ होईल अशा प्रकारची शेती करत गेल्यास शेतीची उत्पादनक्षमता भविष्यात टिकून राहील.

नांगरणी विरहित शेती करणे.

शेतकरी शेती क्षेत्राची मशागत करत असताना ती पारंपारिक पध्दतीने करणे योग्य नाही तर ते आधुनिक तंत्राच्या सहाय्याने म्हणजेच ट्रॅक्टरने केल्यास शेतीची मशागत योग्य प्रकारे होऊन हवेतील कार्बन व नायट्रोजन पावसाच्या साहयाने जमिनीत रुजेल व त्याचबरोबर जमिनीतील नैसर्गिक उपजत गुणधर्माची वाढ होईल परिणामतः शेती आवश्यक ते पिक घेण्यासाठी उपयुक्त होईल. म्हणून अशा प्रकारे शेती करत गेल्यास शेतीची उत्पादनक्षमतादीर्घकाळापर्यंत टिकून राहील.

जैवतंत्रज्ञान व आधुनिक प्रजोत्पादन शेती करणे.

ग्रामीण भागातील शेतकरी निरक्षर असल्याने शेती क्षेत्रात होणारे बदल आत्मसात करणे कठीण झाले आहे. म्हणून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना जैवतंत्रज्ञानाच्या शेतीची प्रात्यक्षिक करून दाखवणे गरजेचे आहे. जैवतंत्रज्ञान मध्ये सजीव सृष्टीतील घटकांचा समावेश असतो. म्हणजेच सुक्षमजिव वनस्पती व प्राणी यापासून मिळणाऱ्या उत्पादनाचा शेतीसाठी कशा प्रकारे उपयोग करता येईल व तसेच पर्यावरणाचे संरक्षण कसे टिकवून ठेवता येईल अशा प्रकारचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना करून दाखविणे गरजेचे आहे. जैवतंत्रज्ञानशेत पिकाच्या वाढीसाठी योग्य प्रकारे उपयोग करून शेतीची उत्पादनक्षमता टिकून ठेवणे गरजेचे आहे. म्हणजेच सोयाबीन, कापूस, भात, गहू, ऊस, फळभाज्या व पालेभाज्याइतर पिकाच्या उत्पादनात जैवतंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतीची एकूणच उत्पादन क्षमता मोठ्या प्रमाणात वाढविण्यास मदत झालेली आहे.

शेतमालाला हमीभाव जाहीर करणे.

शेतमाल उत्पादनाचा अंतर मशागत खर्च लक्षात घेऊन शेतमालाला हमीभाव जाहीर करणे. इतकेच नाही तर जाहीर केलेल्या किमतीनुसार शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करून शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच खाजगी

VOLUME - IX, ISSUE - III - JULY – SEPTEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

व्यापारी किंवा कमिशन एजंट यांच्याकडून शेतकऱ्यांची होत असलेली लूट थांबवण्यासाठी त्यावर प्रशासकीय नियंत्रण ठेवावे. म्हणजेच शेतकऱ्यांचा शेतमाल विक्री व्यवस्थित होत असलेला काळाबाजार थांबेल.

शेत मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देणे.

शेतकरी आपला शेतमाल देशातील बाजारपेठेत विक्रीसाठी आणला असता, त्यांच्या शेतमालाला योग्य दर मिळेल याची शाश्वती नसते. कारण देशातील खाजगी व्यापारी सावकार व कमिशन एजंट इत्यादी व्यवसायिकांनी शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारपेठेत आला असता, अशा वेळी त्यांच्याकडे उपलब्ध असलेला शेतमालाचा साठा बाजारपेठेत विक्रीसाठी ठेवला जातो. बाजारपेठेतील मागणी व पुरवठा च्या नियमानुसार, अतिरिक्त पुरवठा याचा परिणाम म्हणून शेतमालाच्या किमती कमी होतात. अशावेळी सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य दर प्राप्त होईल. परिणामतः शेतकऱ्यांची हित साध्य होऊन शेती करण्यात शेतकरी प्रोत्साहित होईल.

शेतीसाठी सुलभ पतधोरणाचा अवलंब करणे.

ग्रामीण भागातील शेतकरी शेतीच्या विकासासाठी सर्वसाधारणपणे दोन मार्गाने कर्ज काढतो. पहिला मार्ग म्हणजे संस्थात्मक मार्ग व दुसरा मार्ग म्हणजे बिगर संस्थात्मक मार्ग या दोन मार्गापैकी संस्थात्मक मार्गात सहकारी सोसायट्या व राष्ट्रीयकृत बँका या आहेत तर बिगर संस्थात्मक मार्गात जमीनदार, सावकार, व्यापारी, कमिशन, एजंट, मित्र व नातेवाईक इत्यादी. परंतु या दोन मार्गातील बिगर संस्थात्मक मार्गाने काढलेले कर्ज हे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक केली जाते. म्हणून देशातील बहुतांश शेतकरी हा अल्पभूधारक असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होते. अशा अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य उदाहरणात नवीन सुधारित वाण, रासायनिक खते, कीटकनाशके, सुधारित शेती अवजारे, तसेच विहीर बोरवेल शेततळे व पाईपलाईन इत्यादी साहित्य खरेदीसाठी किंवा दुरुस्तीसाठी आवश्यक ते मार्गदर्शन करून, सुलभ कर्ज सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच विविध माध्यमाच्या सहाय्याने सेंद्रिय शेती करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. यासाठी सरकारने आवश्यक मार्गदर्शन करून सहकार्य करावे.

ग्रामीण भागातील रस्ते व बीज पुरवठा सुरळीत करणे

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारपेठेत आनण्यासाठी ग्रामीण भागातील कच्चे रस्त्याचे पक्या रस्त्यात रूपांतर करून ते रस्ते मुख्य रस्त्याला जोडले जावे. परिणामतः शेतकऱ्यांचा शेतमाल शहरातील बाजारपेठेत वेळेवर पोहोचेल याकरिता प्रयत्न करंणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांचा शेतमाल विक्रीचा प्रतवाढ विण्यासाठी विविध बाजारपेठातील शेतमालाचे दर वेळोवेळी विविध माध्यमाच्या सहाय्याने प्रकाशित करून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतमाल किमतीविषयी त्यांची जाणीव निर्माण करून देणे. तसेच देशातील शेतकरी आज फक्त मोसमी पावसावरच शेती करतो असे नाही तर काही शेतकरी विहिरी बोअरवेल शेततळे त्यांच्या साहयाने बारामाही शेती करत आहेत. म्हणून विजेच्या साहाय्याने शेतीला पाणी पुरवत आहेत याकरिता ग्रामीण भागात वीज पुरवठा सुरळीत करून शेती विकासाला प्राधान्य देण्यात यावे.

कृषी उद्योगाचा विकास

आज देशातील बहुतांश उद्योग शेतीच्या विकासावर अवलंबून आहेत. उदाहरणात साखर उद्योग, कापड उद्योग, कागद खाद्यतेल, जूट उद्योग, चहा उद्योग, भात सडणयाच्या मिलाव इतर कुटीर म्हणून वरील सर्व उद्योगांच्या विकासाकरीता आवश्यक असलेले घटक वीज, पाणी, रस्ते, भांडवल, तंत्रज्ञान व श्रम इत्यादी घटक योग्य वेळी पुरवून उद्योगांचा विकास केल्यास शेतमालाची मागणी वाढेल, परिणामतः शेतमाल किमतीत वाढ होऊन शेतकऱ्यांना शेती उत्पादकतेची क्षमता वाढवण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.

सारांश

साधारणपणे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाकरिता शाश्वत शेती करणे गरजेचे आहे कारण हा देशातील बहुतांश शेतकरी अल्पभूधारक झाला आहे व तसेच वाढत्या लोकसंख्येचे तन शेतीवर पडत असल्याने शेती उत्पादकतेला मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत मागणी निर्माण झाली आहे.म्हणून शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध प्रकारची रासायनिक खते, जैविक बियाणे यांचा अतिरिक्त वापर करून शेतीची नैसर्गिक उत्पादन शक्ती घटत पावत आहे. म्हणून आज वर्तमान कालीन गरजांची पूर्तता करण्यासाठी करत असलेले सर्व प्रयत्न हे भविष्यकालीन गरजांच्या क्षमतेला कसल्याही प्रकारचा परिणाम होणार नाही याची सर्वांनी काळजी घेऊन सेंद्रिय शेती करणे गरजेचे झाले आहे.

संदर्भ ग्रंथ

१. भारतीय अर्थव्यवस्था देसाई भालेराव
२. भारतीय अर्थव्यवस्था रंजन कोळंबे
3. https://sendriyaindia.com/home/home-2/

TRUE COPY
PRINCIPAL
Yashwantrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur, M.S.

TRUE COPY
PRINCIPAL
Yashwantrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur, M.S.

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

ENGLISH / MARATHI PART - III / HINDI

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

EDITORIAL BOARD

Professor Kaiser Haq
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

Roderick McCulloch
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

Dr. Ashaf Fetoh Eata
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

Dr. Nicholas Loannides
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

Muhammad Mezbah-ul-Islam
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

Dr. Meenu Maheshwari
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

Dr. S. Sampath
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

Dr. D. H. Malini Srinivasa Rao
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

Dr. S. K. Omanwar
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

Dr. Rana Pratap Singh
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

Dr. Shekhar Gungurwar
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

Memon Sohel Md Yusuf
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

Dr. S. Karunanidhi
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

Prof. Joyanta Borbora
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

Dr. Walmik Sarwade
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

Dr. Manoj Dixit
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

Prof. P. T. Srinivasan
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

Dr. P. Vitthal
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

CONTENTS OF MARATHI PART - III

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१४	संत जनाबाईंच्या अभंगातील स्त्रीजीवनाचा आविष्कार **प्रा. माधवी सुरेंद्र पवार**	६०-६५
१५	संत मुक्ताबाई यांच्या साहित्यातील तत्त्वज्ञानात्मक विचार **डॉ. रत्ना लाला जवरास**	६६-७३
१६	वारकरी संप्रदायाचे ग्रंथलयामध्ये योगदान **रीता श्रीमंतराव कदम**	७४-७७
१७	'ज्ञानेश्वरी' तील लोकशिक्षण - एक अभ्यास **प्रा. सौ. प्रेरणा एल. चव्हाण**	७८-८१
१८	संत साहित्यातील भक्ती विचार **प्रा. सौ. धनश्री राणे**	८२-८६
१९	तथागतांचा मध्यम मार्ग "अरियो अठठड़िग्को" **ताजणे सिद्धार्थ कोंडीराम**	८७-९२

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhar

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com) AP-4

१७. 'ज्ञानेश्वरी' तील लोकशिक्षण - एक अभ्यास

प्रा. सौ. प्रेरणा एल. चव्हाण
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

तेराव्या शतकापासून संत ज्ञानेश्वरांची अमृतवाणी महत्वपूर्ण ठरली आहे. त्यांच्या विचारांचा अनमोल ठेवा आज 'ज्ञानेश्वरी' च्या रुपात अस्तित्वात आहे. समाजातील विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या देशीकार लेणे असलेल्या मंदिरातून संतांचे विचार भजन, किर्तनाच्या माध्यमातून ऐकावयास मिळतात. संत ज्ञानेश्वरांचा जन्म इ.स.1275 (शके 1197) मध्ये झाला आणि इ.स.1296 (शके 1218) मध्ये ते समाधीस्त झाले. संत ज्ञानेश्वर एकवीस वर्षे जगले. या अल्पशा कालावधीत त्यांनी जे साहित्यविषयक कार्य केले, त्यातून संस्कृतीची जडणघडण झाली. संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा अनमोल ठेवा आज लोक शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाचा वाटतो. संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' म्हणजे महाराष्ट्रीय शारदेच्या गळ्यातील देशीकार लेणे आहे, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे.

ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र हा भरकटलेल्या अवस्थेत होता. जारणमारण, जादूटोणा, जोतिषविद्या इत्यादी मोहाला बळी पडला होता. अशा समाजाला मार्ग दाखविण्याची जबाबदारी पंडितांवर येऊन पडली होती. पण पढिक पंडित माणुसकीला पारखी झाली होती. संत ज्ञानेश्वरांनी त्यांच्या ज्ञानेश्वरीतील दहाव्या अध्यायात या पंडितांच्या अभ्यासाला फाफट पसारा असे म्हटले आहे व हे ज्ञान म्हणजे मोराच्या पिसाऱ्यातील अंगभर डोळ्याप्रमाणे आहे. हजारो डोळे असून देखील ते दृष्टिहीन आहेत. त्यामुळे समाजात सर्वत्र लोक क्रोधाला आणि मोहाला बळी पडली होती. समाजातील शांतता व विवेक लयाला गेले होते. अशा या समाजाला योग्य दिशा मिळणे गरजेचे होते. म्हणून संत ज्ञानेश्वर यांनी आध्यात्मिक विचाराच्या बैठकीतून दलितोध्दाराचे व धर्मजागृतीचे कार्य हाती घेतले. समाजातील सर्वसामान्य व्यक्तींना रुचेल, पचेल अशा अमृतवाणीने लोकोध्दाराचे कार्य केले.

संत, पंत व तंत या पुस्तकात श्री. म. भाटे म्हणतात, "संत ज्ञानेश्वरांनी सर्व जाती, कुल, वर्ण यांची महती नाकारून भक्तीचा पुरस्कार केला आहे."[1] प्रवचने आणि किर्तने करीत संत ज्ञानेश्वर आळंदीस परत येत असता तेथे नेवाशास त्यांनी मुक्काम केला केला व तिथेच त्यांनी लोकांचे प्रबोधन करता करता त्यांना ग्रंथनिर्मितीची प्रेरणा मिळाली. 'बोली अरुपाचे रुप दावीन' अशी ज्ञानेश्वरांनी प्रतिज्ञा घेतली आणि प्रवचन किर्तनाच्या माध्यमातून त्यांनी त्यांचे विचार लोकांपर्यंत पोचविले. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या आधारे वास्तविक आणि नवीन विचार मांडले. त्यात सामाजिक समता होती. ही समता त्यांनी केवळ लोकांना सांगितली नाही तर त्याचे प्रत्यक्ष अवलोकन भक्तीच्या प्रवाहात सर्वांना एकत्र आणून केले. संत ज्ञानेश्वरांचा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ म्हणजे भगवतगीतेवरचा टिकाग्रंथ आहे. भगवत्गीतेतील संस्कृत भाषेतील

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

बोजड शब्द जनसामान्य लोकांना समजत नव्हते. म्हणून सर्वसामान्य दीलदलित वर्ग भक्तीच्या मार्गापासून वंचित राहिला होता. अशा समाजाला भक्तीच्या प्रवाहात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले आहे.

पा. ना. कुलकर्णी यांच्या मते, "संत ज्ञानेश्वर हा ग्रंथ म्हणजे नैतिक आदर्श आहे."[2] संत ज्ञानेश्वरांनी यादवकालीन समाजाला नवविचाराचे दान दिले. ते केवळ ज्ञानीच नव्हते; तर ते एक प्रतिभासंपन्न साहित्यिक, क्रांतीदर्शी तत्त्वज्ञ व प्रभावी नीतीशिक्षक होते. 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' हे एक उत्कृष्ट काव्य असले तरी त्यातील शब्दाशब्दातून तत्त्वज्ञान पेरले होते. या ग्रंथाच्या आधारे त्यांनी समाजाला एक नैतिक आदर्श घालून दिला. चांगले म्हणजे काय, वाईट म्हणजे काय याची ओळख समाजाला करून दिली. त्यांचा हा नीतीविषयक विचार आजही समाजाला तितकाच लागू पडणारा आहे, जितका तो पूर्वी होता. या आदर्शाची शिकवण आज विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या माध्यमातून करवून देणे गरजेचे आहे. त्यासाठी हा अभ्यास केवळ मराठीपुरताच करून उपयोगाचे नाही, तर तो इंग्रजीतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन पोचणे गरजेचे आहे. केवळ कला शाखाच नाही तर त्यांच्या ज्ञानाची महती विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांपर्यंत तसेच मेडिकल आणि इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन पोचावी असे मला वाटते. म्हणजे त्यांच्या आध्यात्मातील विधायक विचार त्यांच्यापर्यंत जाऊन पोचतील आणि समाजाला एक आदर्श वळण लागेल. माणूस शिक्षणाने, पैशाने, पदाने मोठे होतील पण त्यांच्यात नैतिक विचाराची बैठक नसेल तर अशी पदे कुचकामी ठरतील म्हणून आज सर्वगुणसंपन्न विचारधारा पेरण्यासाठी, माणसातले माणूसपण जागे करण्यासाठी, समाजात समता, शांती, न्याय, शिस्त नांदण्यासाठी आजही संत ज्ञानेश्वरांच्या विचारांची गरज आहे, असे मला वाटते.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतून भक्तीमार्ग सांगितला. भक्तीमार्ग सांगत असताना आध्यात्मिक भूमिकेवरून जरी ते बोलत असले तरी त्यांनी समाजात नीतीची प्रतिष्ठापना केली. समाजात नीतीमत्ता कशी उंचावेल या दृष्टीने त्यांनी पाऊले उचचली होती. 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' या पुस्तकात ग.बा. सरदार म्हणतात, "ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील संत चळवळीचे, धार्मिक प्रबोधनाचे आद्य प्रणेते होते, तरी त्यांना त्यात डोळ्यात भरण्याजागे यश मिळाले नाही. ज्ञानेश्वरांनी आपल्या संजीवन साहित्याने आणि त्यातील ललितरम्य मधूर शैलीने हजारो लोकांचे मन वेधून घेतले. त्यांचे अध्यात्म निरूपण हे सर्वांसाठी असले तरी त्यामुळे समाजातील दीन-दलितांना दिलासा मिळाला. ज्यांना मराठीखेरीज दुसरी भाषा अवगत नव्हती, परमार्थ प्राप्तीसाठी ज्यांना भक्तीशिवाय अन्य मार्ग उपलब्ध नव्हता, अशा शुद्रातिशुद्रांच्या अंतःकरणात ज्ञानेश्वरप्रणित भागवत धर्माविषयी खास आपुलकी उत्पन्न झाली. नामदेवादि काही संत अगोदरच विठ्ठलभक्तीत रंगले होते. पण ज्ञानेश्वरांनी त्यांना अंतर्मुख बनविले. त्यांच्या भक्तीला तत्त्वज्ञानाची बैठक मिळवून दिली. निरनिराळ्या जातीतील व थरांतील असंख्य मुमुक्षजन त्यांचे अनुयायी

झाले. त्यांच्या साहित्यातील तत्त्वबोधाच्या साहाय्याने आपले कष्टमय व निःसत्व जीवन उजळून टाकण्यात त्यांनी प्रयत्न केला."[3]

अर्थात संत ज्ञानेश्वरांनी तत्कालीन समाजाचे धार्मिक चळवळीच्या माध्यमातून प्रबोधन केले. शिवाय त्यांच्या ललितरम्य शैलीतील साहित्याने समाजातील लोकांना जीवन जगत असताना योग्य दिशा मिळाली. समाजातील सर्व थरातील लोकांना ज्ञानेश्वरीच्या निमित्ताने एकत्र आणण्याचे कार्य त्यांनी केले. म्हणजेच पारंपारिक संस्कृती मोडून काढण्याचे धाडस संत ज्ञानेश्वरांनी केले व समाजात विश्व बंधुता निर्माण केली. जे दीन, दलित, अजाण आहेत अशांना भक्तीचा मार्ग दाखवून समता पेरली. संत ज्ञानेश्वरांनी लोकांना केवळ भक्तीचाच मार्ग दाखविला नाही तर त्यांनी समाजाचे फार मोठे प्रबोधन केले. ते एक प्रतिभासंपन्न साहित्यिक असले तरी त्यांच्या शिकवणीत तत्त्वज्ञान ओतप्रोत भरले होते. ते एक उत्तम तत्त्वज्ञ होते, असे म्हणावयास हरकत नाही. जातिभेद निर्मुलन, अंधश्रद्धा निर्मुलन यासारखी महत्त्वाची समाजकार्ये त्यांनी केली. समाजात आजही जात संघर्ष, अंधश्रद्धा या बाबी टिकून आहेत. परंतू संत ज्ञानेश्वरांनी तत्कालीन समाजामध्ये सर्व जातीभेदाच्या भिंती ओलांडून सर्वांना एका भक्तीच्या छताखाली आणले. हे त्यांचे कार्य आजही समाजाला दिशा दर्शक ठरणारे आहे.

आज समाजात लोक शिक्षणासाठी वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग केला जातो. ही माध्यमे इतकी बलशाली आहेत की, एकाचवेळी जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोचणारी आहेत. तरीही समाजात आज भाईचारा खूपच कमी प्रमाणात आहे. आजही ग्रामीण आणि शहरी भागातून पथनाट्याच्या माध्यमातून लेक वाचवा अभियान, व्यसनमुक्ती, पर्यावरण संरक्षण असे कार्यक्रम राबविले जातात. पण त्याचा परिणाम समाजावर होतो का किंवा कितपत होतो, ही बाब चिंताजनक आहे. आज मूठभर विद्यार्थी सोडले तर बाकीचे टी.व्ही. आणि मोबाईलमध्ये व्यस्त आहेत. या माध्यमाचा सदुपयोग करून घेण्याऐवजी दुरुपयोग होताना दिसत आहे. अशी युवा पिढी भरकटलेल्या स्थितीत सापडण्याचा धोका संभवू शकतो. आज आंतरजातीय विवाहातून संघर्ष उद्भवत असल्याचे तथा समाजात विविध गुन्हे घडत असल्याचे दररोज वृत्तपत्रातून पहावयास मिळत आहे. बेकारी, भिकारी, जातीभेद, अंधश्रद्धा, स्त्रियांना दिलेली हीन वागणूक याचे चित्रण आजही विविध प्रकारच्या साहित्यातून वाचावयास मिळते आहे. म्हणून असे वाटते की, आज संत ज्ञानेश्वरांच्या तथा सर्वच संतांच्या विचारांची गरज समाजाला आहे. त्यांचे विचार लिखित स्वरुपात आजही आहेत. पण ते समाजापर्यंत नेऊन पोचविण्याची नितांत गरज आहे. हे कार्य तुमचे आमचे आहे. लिखाणाच्या, भाषणाच्या, साहित्याच्या माध्यमातून आपण हे विचार लोकांपर्यंत पोचवू शकतो.

संत ज्ञानेश्वरांनी समाजात राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचे कार्य भक्तीच्या आधारे केले. अजाणांना सुजाण केले. अंधारातल्या लोकांना प्रकाशाचा मार्ग दाखविला. हे सर्व कृत्य तत्कालीन समाजाला रुचणारे नव्हते. म्हणून त्यांना समाजाचा रोष पत्करावा लागला. समाजाविरोधी कृत्य करण्याचे धाडस दाखवून संत ज्ञानेश्वरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता, एकता, न्याय यांची धुरा स्वतःच्या खांद्यावरून वाहिली

आणि लोकांमध्ये नैतिक आचरण, भक्तीभाव, तात्विक जीवन क्रांती, निःस्वार्थी वृत्ती, सदाचार, मानवतावाद, पावित्र्य, सहृदयता रुजविली व 'ज्ञानेश्वरी' च्या शेवटी संत ज्ञानेश्वरांनी मानवाच्या कल्याणाचे पसायदान मागितले.

संदर्भः

1. माटे श्री.म., 'संत, पंत व तंत' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, 14 नोव्हेंबर, 2006, पृ.40
2. संपा. कुलकर्णी पां.ना. ज्ञानेश्वरी नववा अध्याय, प्रस्तावना पृ.19, फडके प्रकाशन, कोल्हापूर 1997.
3. नसिराबादकर ल. रा., *'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर. आठवी परिस्कृत व विस्तारित आवृत्ती ऑगस्ट 2008. पृ.71.

Peer reviewed Journal Impact Factor 7.265 ISSN-2230-9578

Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred Journal

May-2021 *Volume-11* *Issue-13*

Chief Editor
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)







Address
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

32	स्त्री-वादी चळवळींच्या विचारांचा अभ्यास श्री. टी. एम. गोदडे, श्री. डी. एन. महाडिक	121-124
33	भारतीय सेंद्रिय शेती: महत्व, अडचणी आणि उपाययोजना सहा. प्रा. सुरेश विष्णू इंगळे	125-128
34	प्रवासी हिंदी साहित्य : कल, आज और कल डॉ. प्रवीणकुमार न. चौगुले	129-132
35	बढ़ता नगरीकरण और इसके प्रभाव गिरीश टी. पंचभाई	133-137
36	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक लोकशाहीच्या विचारांचा अभ्यास. श्री. डी. एन. महाडिक, श्री. टी. एम. गोधडे.	138-142
37	कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम प्रा. तटाळे पद्माकर बळीराम	143-145
38	यात्रा साहित्य में साहित्य विधायक चिंतन डॉ. विक्रम रामचंद्र पवार	146-148
39	अनुसूचित जातीच्या संकल्पनेचा विश्लेषणात्मक अभ्यास प्रा.डॉ.वसंत तुकाराम नाईक, नारायण हणमंतराव पांचाळ	149-152
40	ई - संसाधन व्यवस्थापनाचे तंत्र MR.Mahesh.S.Tanawade, Mrs.S.M.Mallade	153-154

Page No.
1-3
4-6
7-8
9-10
11-14
15-17
18-21
22-26
27-30
31-36
37-38
39-41
42-46
47-50
51-53
54-58
59-60
61-62
63-66
67-69
70-72
73-77
78-86
87-91
92-94
95-98
99-102
103-106
107-112
113-116
117-120

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, May-2021, Volume-11, Issue-13

कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम

प्रा. तटाळे पद्माकर बळीराम
अर्थशास्त्र विभाग, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे

प्रस्तावना-

कोरोना नावाचा विषाणूची देन ही चिनी दिली आहे असे जग मानतअसले तरी या विषाणूची लागण सर्वप्रथम चीन मधूनच झाली असे मानले जाते. पहिला कोरोना विषाणू चा रुग्ण सुहान या शहरात सापडला. सदर व्यक्ती हा सी फूड मार्केटशी संबंधित असल्याचे बोलले जाते याच व्यक्तीला सर्वप्रथम 1/12/2019 मध्ये कोरोना विषाणूची लागण झाली. जागतिक आरोग्य संघटनेने यावर आपले मत प्रकट करत असताना असे म्हटले की हा विषाणू एखाद्या विषारी प्राण्यांपासून माणसांमध्ये पसरवण्यात आला. संपूर्ण जगात या रोगाची सुरुवात चीन मधून झाली त्यामुळे चीनचा सुवातीला क्रमांक एक असलेला आपणास पहावयास मिळते नंतरच्या काळात एतर देशात हा रोग झपाट्याने वाढला. भारताच्या संदर्भात याचा विचार करता भारतात देखील याची सुरुवात चीन मधील वुहाण शहरातील विद्यापीठात शिकत असलेला एक तरुण या विषानुणे संक्रमित झाल्यानंतर तो केरळमध्ये दाखल झाला होता तोच भारतातील पहिला कोरोनाचा रुग्ण आहे असे मानले जाते. महाराष्ट्रात कोरोना चा पहिला रुग्ण 9 मार्च 2020 रोजी पुणे येथे सापडला त्यानंतर 17 मार्च 2020 रोजी महाराष्ट्रात पहिला कोरोना बाधित व्यक्तीची मृत्यूची नोंद झाल्याचे आपणास पहावयास मिळते. भारतातील कोरोना रुग्णाचा विचार करता महाराष्ट्राच हे भारतातील सर्वाधिक प्रभाव झालेले राज्य म्हणून म्हटले जाते.

कोरोना विषाणु ची लक्षणे-

ज्या व्यक्तीला कोरोना विषाणूची लागण झालेली आहे त्या व्यक्तीमध्ये नाक गळणं, खोकला, घसा खवखवणे, डोके दुखी ईत्यादी लक्षणे आढळतात कमकुवत रोग प्रतिकारक शक्ती असलेल्या लोकांना या विषाणूची लागण लवकर होते तसेच वयस्कर आणि लहान मुलांना देखील या विषाणूची लागण लवकर होताना आपणास पहावयास मिळते निमोनिया, फुप्फुसांमध्ये सूज, शिंका येणे, दमा इत्यादी ही लक्षणे या विषाणूची असू शकतात.

कोरोना विषाणूपासून बचावाचे उपाय-

जागतिक आरोग्य संघटनेने कोरणा विषयानुसार संसर्ग रोखण्यासाठी काही खबरदारी घेण्यास सांगितले त्या पुढील प्रमाणे 1 हात साबणाने स्वच्छ धुवावेत, 2.खोकताना किंवा शिंकताना तोंडावर रुमाल ठेवणे, 3. ज्यांना सर्दी किंवा तापाची लक्षणे आहेत त्यांनी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, 4.धूम्रपाणवमद्यपान टाळावे, 5. लक्षण आढळल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा, 6.प्राण्याचा सहवास टाळावा, 7. दोन व्यक्तिमधील अंतर तीन मीटर आसावे
या मार्गाचा आपण जर अवलंब केल्यास कोरोंना विषाणू पासून होणाऱ्या आजारापासून आपण स्वतचा बचाव करू शकतो

भारतातील राज्य निहाय कोरोना परिस्थिती - भारतात कोरोना विषाणूचा सर्वप्रथम लागण झाल्यापासून ते आज पर्यंत या विषाणूने संम्पुर्ण देशभर कसा फैलाव केला तो पुढील प्रमाणे.

अनु. क्र.	राज्य	लागण झालेले लोक	बरे झालेले लोक	मृत	सध्या अस्तित्वात असलेले रुग्ण
1	भारत	28047534	25692342	329100	152734
2	महाराष्ट्र	5731815	5362370	94844	18600
3	कर्नाटक	2587827	2217117	28679	20378
4	केरळ	2514179	2281518	8641	19894
5	तमिळनाडू	2068580	1739280	23754	28864
6	उत्तरप्रदेश	1690016	1628456	20346	1864
7	आंध्रप्रदेश	1685142	1508515	10832	13400

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

8	दिल्ली	1425592	1389341	24151	946
9	पं.बंगाल	1366240	1255932	15410	11284
10	छातीसगड	969300	917023	13016	1655
11	राजस्थान	938460	880919	8317	2298
12	गुजरात	807486	762270	9815	1871
13	म.प्रदेश	778825	743650	8019	1476
14	ओडिसा	756684	670527	2719	9541
15	हरियाणा	755389	726081	8221	1542

संदर्भ - आरोग्य सेतु अप्प 31/05/2021 ची माहिती

वरील आकडेवारीचा विचार करता कोरोनाची लागण सुरू झाल्यापासून ते आज पर्यंत म्हणजे 31 मे 2021 पर्यंत संपूर्ण भारतात 28047534 लोकांना कोरोना विषाणूची लागण झाली त्यापैकी 25692342 लोक या मधून बरे झाले तर संपूर्ण देशभर 329100 लोकांनी आपला प्राण गमवावा लागला तर 31 मे 2021 रोजी संपूर्ण भारतात 152734 लोक कोरोना बाधित असल्याचे दिसून येते राज्य निहाय हेच प्रमाण पाहिले असता यात कोरोनाविषाणूची सर्वाधिक लागण झालेले राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याकडे पाहिले जाते 31 मे 2021 मधील परिस्थिती पाहिली असता आपणास असे दिसून येते की आजपर्यंत महाराष्ट्रात 5731815लोकांना या विषाणूची लागण झाली पण यातून 5362370 लोक बरे झाले तर 94844 लोकांना यात आपला प्राण गमवावा लागला 31 मे 2021 रोजी महाराष्ट्रात 18600 लोक या रोगावर उपचार घेत असल्याचे आपणास दिसून येते भारतात सर्वात आधी जरी कोरोनाचा रुग्ण केरळमध्ये आढळला असला तरी 31 मे 2021 रोजी केरळ मध्ये 19894 लोक या आजारावर उपचार घेताना दिसून येतात मात्र केरळमध्ये मृत्यूचे प्रमाण पाहिले आता हे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते कोरोनाविषाणू मुळे होणाऱ्या मृत्यूचा आकडा पाहिला असता तो सर्वाधिक महाराष्ट्रात असल्याचे आपणास पहावयास मिळते या आकडेवारीचा विचार करता कोरोनाविषाणू ची साखळी तोडण्यासाठी भारतात प्रथम भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी 22 मार्च 2020 रोजी सकाळी सात ते नऊ पर्यंत स्वयम् लादलेले कर्फ्यू पाळण्याची भारतातील लोकांना विनंती केली या पाठीमागील भारतातील कोरोना व्हायरस या प्रसार कमी होण्यास मदत मिळावी हा होता व त्यानंतर 24 मार्च 2020 पासून पुढील एकवीस दिवसाकरता संपूर्ण भारतभर लॉक डाऊन जाहीर करण्यात आला यानंतर खऱ्या अर्थाने संपूर्ण भारतभर लॉक डाऊनव्यवस्था सुरू झाली याच लॉक डाऊनचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला आपणास दिसून येतो.

संशोधन लेखाचे गृहिते -

सदर संशोधन लेख खालील गृहितावर आधारित आहे

1 कोरोना विषाणूचा इतिहास समजून घेणे

2. भारतातील कोरोना विषाणूची लागण झालेल्या रुग्णांची माहिती घेणे

3.कोरोना विषाणूचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम अभ्यासणे

संशोधन पद्धती-

सदर संशोधन लेख लिहीत असताना प्रामुख्याने यामध्ये दुय्यम आधारसामग्री चा आधार घेण्यात आला असून त्यात वर्तमानपत्र, इंटरनेटवर माहिती चा प्रामुख्याने उपयोग करण्यात आला आहे

भारतात या कोरोना विषाणू मुळे अनेक क्षेत्र डबघाईस आलेले दिसून येतात त्यात प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, पर्यटन क्षेत्र,या क्षेत्राचा समावेश होतो या कोरणा विषाणू पासून कृषिक्षेत्र वाचले असले तरी याही क्षेत्रावर कोरोनाचा परिणाम झालेला आपणास पहावयास मिळतो

कोरोनामुळे करण्यात आलेल्या देशव्यापी लॉक डाऊन मुळे ठप्प पडलेली अर्थव्यवस्था, बंद पडलेलला रोजगार आणि त्यामुळे पुरवटा व असलेली मागणी मध्ये असलेली तफावत याचा परिणाम म्हणून सन 2020 या आर्थिक वर्षामध्ये देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये तब्बल 7.3 टक्के घट झाली आहे ही घट गेल्या चाळीस वर्षातील ही सर्वात मोठी घसरण असून याआधी करण्यात आलेल्या अंदाजापेक्षा भारतीय अर्थव्यवस्थेची घसरण कमी प्रमाणात च काय तो

दिलासा राट्रीयसांख्यिकी कार्यालयाच्या 2020-21 साठीच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनाचे आकडेवारी जाहीर केली त्यानुसार जानेवारी ते मार्च 2019 मध्ये जीडीपीमध्ये 1.6 टक्क्यांनी वाढ झाली आहे मात्र मागील एक वर्षाचा विचार करता जानेवारी ते मार्च या तिमहई मध्येजीडीपी मध्ये 3 टक्क्यांची वाढ झाली होती.

आरोग्य व्यवस्थाभारतात कोरोंना विषाणूचा प्रसार झाल्यानंतर आरोग्य व्यवस्था पाहिली आता आपणास असे दिसून येते की या व्यवस्थेवर सर्वाधिक ताण पडला परंतु भारत सरकार याकोरोंनाविषाणूशी दोन हात करण्यास कमी पडलेले आपणास दिसून येते कारण या प्रकारचा विषाणू यापूर्वी भारतात आढळला नव्हता त्यामुळे नेमक्या कोणत्या पद्धतीने यावर उपाय योजना करता येतील याबद्दल यात ज्ञान माहीत नसल्यामुळे संपूर्ण आरोग्यव्यवस्थेवर त्याचा ताण पडला कोरोंना विषाणूची लागण झालेल्या रुग्णांचे प्रमाण पाहिले असता हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात जरी कमी असले तरी या कमी असणाऱ्या लोकसंख्येला देखील भारतीय अर्थव्यवस्थेत आरोग्य सुविधा आपण पुरवू शकलो नाही हेच यावरून आपणास दिसून येतेयातच भारतात आरोग्य व्यवस्था अपुरी असल्याचे कोरोंना साथीने दाखवून दिले जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमाणकानुसार हजार लोकांमागे एक डॉक्टर असला पाहिजे परंतु भारतामध्ये हेच प्रमाण खूप कमी असल्याचे आपणास दिसून येते ग्रामीण भागात तर पंचवीस हजार लोकांमागे एक डॉक्टरचे प्रमाण दिसते ग्रामीण भागातील केवळ 13 टक्के लोकांना प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा मिळते हॉस्पिटल मध्ये खाटेच्या उपलब्धतेचे राष्ट्रीय प्रमाण एक हजार लोकांमागे 0.55 टक्के असे आहे आपल्या लोकसंख्येच्या 17 टक्के लोक तर यापेक्षाही भीषण परिस्थितीत राहतात. आरोग्य सेवांच्या बाबतीत चीन, श्रीलंका, भूतान आणि बांगलादेश हे शेजारी राष्ट्र देखील आपल्या पुढे असल्याचे दिसून येते.

पर्यटन क्षेत्रावरील परिणाम पाहता आपणास असे दिसून येते की गेल्या दीड वर्षापासून या क्षेत्राला खूप मोठी हानी स्वीकारावे लागलली आहे कारण संपूर्ण जगभर लॉक डाउन लागल्यामुळे इतर देशातील पर्यटक आपल्या देशात पर्यटनासाठी येऊ शकत नाही त्यामुळे या क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांना अर्थार्जनाचा मार्ग रोखला गेला आहे विदेशी पर्यटकासोबतचस्थानिक लोक देखील या पर्यटन क्षेत्राकडे जाऊ शकत नसल्यामुळे या क्षेत्राला खूपच मोठी हानी झालीअसे आपणास दिसून येते.

शिक्षण क्षेत्राचा विचार केला आता गेल्या दीड वर्षापासून शिक्षण क्षेत्र हे पूर्णपणे कोलमडलेले आपल्याला दिसून येते गेल्या दीड वर्षापासून विध्यार्थी शाळेत हजर नाहीत थोड्याफार प्रमाणात ऑनलाईन शिक्षणाचा जरी आपण स्वीकार केला असला तरी या ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कितपत वज्ञान समजले असेल याबाबतही शंका या ठिकाणी व्यक्त केली जाते.

वर्ष 2020-21 मध्ये शेती आणि संलग्न क्षेत्रात 3.6 % ने वाढ झालेली वगळता इतर सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट होत असताना आपला दिसून येते यात खनकर्म - 8.5% वस्तू निर्माण - 7.2 टक्के, वीज गॅस पाणी आणि इतर सेवा 1.9 टक्के बांधकाम - 8.6 टक्के ,हॉटेल वाहतूक आणि दळणवळण -18.3 टक्के ,व्यावसायिक सेवा आणि वास्तव क्षेत्र -1.5% सार्वजनिक प्रशासन, संरक्षण आणि इतर सेवा-4.6 टक्के ने घटल्या आहेत तर येत्या तीमाहित त्या थोड्याफार प्रमाणात वाढल्याचे आपणास पहावयास मिळत असले तरी यावरून देशाच्या आर्थिक वर्धिच्या राहसाचीकल्पना येते यातून बाहेर पडायचे असेल तर केंद्र सरकारने अर्थव्यवस्थेची होणारी पडझड नियंत्रित करण्यासाठी आणि तिचे पुनर्वसन करण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

संदर्भ-

1. *विविध वर्तमान पत्रातील माहिती*
2. *इंटरनेट वरील माहिती*
3. *आरोग्य सेतु अप*
4. *Encyclopedia of Britannica*

2nd 2021-22

Impact Factor 7.149

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-VIII ISSUE-VII July 2021

Address
· Devgiri Nagar, Ambajogai Road, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

VC PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
48	अशोक बाळू पाटील	भूमंडलीकरण और समकालीन हिंदी उपन्यास–''दौड'' उपन्यास के संदर्भ में	219 To 221
49	प्रा. ज्ञानेश्वर बोंपिलवार	भारतीय समाजात संगीत वाद्यांचे स्थान	222 To 223
50	डॉ.एल.बी. डोंगरे	पंतप्रधान नरेंद्र मोदी कालीन भारताच्या परराष्ट्र धोरण आणि आव्हाणे एक अभ्यास	224 To 229
51	प्रा. डॉ. राहूल मल्हारी भोरे	पं. कुमार गंधर्व : दिव्यानंद	230 To 237
52	डॉ. श्वेता दीपक वेगड़	घरानों के बदलते आयाम	238 To 241
53	प्रा. डॉ. मधूकर बाबूराव अनंतकवळस	भारतीय कृषी यांत्रिकीकरण : सद्यस्थिती व भविष्यकालीन दिशा	242 To 249
54	प्रा. रामकृष्ण सुर्यकांत गडकरी	सार्वजनिक ग्रंथालये : लोकशिक्षणाचे केंद्र	250 To 252
55	प्रा. विद्या प्र. गांवडे	शास्त्रीय संगीतामध्ये ठूमरीचे स्थान	253 To 254
56	प्रा.डॉ.आर.बी.लक्षटे शिवाजी कराळे	शिक्षणाचा हक्क कायदा 2009 : वास्तव आणि अपेक्षा	255 To 261
57	डॉ. कैलास सर्जेराव मोटे	उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांचे योगदान : एक अभ्यास	262 To 268
58	डॉ. विजय कुमार	प्रगतिवादी कवि ः शिवमंगल सिंह सुमन	269 To 272
59	प्रा.डॉ.कमलाकर एन. राक्षसे	महाराष्ट्राच्या राजकारणातील शिवसेनेचे बदलते स्वरूप	273 To 276
60	डॉ. प्रकाश कांबळे	महात्मा गांधी : एक शिक्षण प्रवास	277 To 280
61	प्रा.डॉ.नामदेव कोंडबाराव दळवी	जागतिक कोरोना महामारी एक अभ्यास	281 To 285
62	सौ. रिता प्रेमदास खोब्रागडे डॉ. नुज़्जत सुलताना एम. बी.	आदिवासी क्षेत्रातील आदिवासी आश्रम शाळेतील मुली आहारातून प्राप्त करीत असलेल्या प्रमुख पोषण तत्वांचे मूल्यमापन	286 To 290
63	प्रा.पद्माकर बळीराम तटाळे	भारतीय शेती व शेती क्षेत्रातील अनिश्चितता	291 To 294
64	सौ. रिता प्रेमदास खोब्रागडे डॉ. नुज़्जत सुलताना एम. बी.	आदिवासी आश्रम शाळेतील मुलींना आहारातून प्राप्त होणाऱ्या सुक्ष्म पोषण घटकांचे मूल्यमापन	295 To 301

Vitthalrao Patil Mahavidyalaya
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- VII JULY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

महाराष्ट्राच्या राजकारणातील शिवसेनेचे बदलते स्वरूप

प्रा.डॉ.कमलाकर एन. राक्षसे
राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे.

प्रस्तावना

जगातल्या अनेक देशांनी लोकशाहीचा स्विकार केलेला आहे. यामध्ये प्रत्यक्ष लोकशाही असो की प्रातिनिधिक लोकशाही असो लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष महत्त्वाची भूमिका बजावित असतात. भारत तर बहुपक्षपद्धती असलेला देश आहे. भारत हा देश इतर देशापेक्षा वैविध्यपूर्ण असलेला देश आहे. त्यामुळे भारताच्या राजकीय जीवनात नवनवीन राजकीय पक्ष उदयाला आलेले दिसतात. यामध्ये महाराष्ट्रात शिवसेनेसारख्या पक्षाचा समावेश होतो.

खरे तर 1990 च्या दशकानंतर देशात नवनवीन राजकीय पक्ष उदयाला आले असले तरी शिवसेना नावाचा राजकीय पक्ष सत्तरच्या दशकात उदयाला आला आहे. शिवसेनेची स्थापना महाराष्ट्रात कॉग्रेस पक्षाच्या व्यापक सामाजिक आधारांना खिंडार पाडण्यासाठी झाली. याच्यातून शिवसेनेचा विस्तार होत गेला आहे. मुंबईतील मराठी माणूस 1963 पासून त्यांची गाऱ्हाणी घेऊन बाळ ठाकरेंना भेटायला येवू लागला. त्यांच्या मनामध्ये मराठी आहे म्हणून मला नोकरी व रोजगाराच्या संधी नाकारल्या जात आहेत अशी भावना विकसीत व्हायला लागली. परिणामी मराठी लोकांची एक संघटना असावी असे लोकांनाही वाटू लागले होते. प्रबोधनकार ठाकरे यांनी बाळ ठाकरेंना सांगितले की, हे एवढे मराठी लोक येतात याला काही ऑर्गनाईज्ड स्वरूप द्यायचं वा नाही?[1]

प्रबोधनकार ठाकरेंना वाटायचं की मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी प्राणपणाने झुंजणारी संघटना काढणं हाच एक मार्ग आहे.[2]

19 जून 1966 रोजी मुंबईत शिवसेनेची स्थापना झाला. मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी लढणारी एक संघटना स्थापन करीत असल्याचे प्रतिपादन मे 1966 च्या अंकात केले. एकंदरीतच शिवसेनेचा पाया मराठी तरुणांसाठी लढणे या विचार प्रणालीच्या पार्श्वभूमीवर रचला गेला. परंतु शिवसेनेच्या विचार प्रणालीमध्ये अनेकवेळा बदल झालेले पहावयास मिळतात. सिद्धांत आणि व्यवहार यात अंतर जाणून येते. अर्थातच शिवसेनेच्या मुळ मुखड्यात झालेले बदल यावर सदर संशोधन पेपरमध्ये संशोधनात्मक दृष्टिकोनातून प्रकाश टाकण्यात आला आहे. सदर संशोधन पेपर लिहिण्यासाठी माहितीचा स्त्रोत हा दुय्यम साधने हा आहे.

प्रबोधनकारांनी सांगितल्याप्रमाणे मराठी माणसांसाठी त्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारी शिवसेना नावाची एक लढाऊ संघटना स्थापन झाली. प्रारंभीच्या काळात शिवसेना एक संघटना होती. 20 जूनच्या मार्मिकच्या अंकामध्ये शिवसेना संघटनेचे बोधचिन्ह म्हणून डरकाळी फोडणारा वाघ छापण्यात आला होता आणि सोबत शिवाजी महाराज आणि मागच्या बाजूला महाराष्ट्राचे चित्र आणि मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा हे वचन लिहिले होते आणि मोठ्या अक्षरात शिवसेना असे नाव छापलेले होते. सोबत भगवा ध्वज होता. हे येथे मी मुद्दामहून नमूद

PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

मुस्लिमांबरोबर ख्रिश्चन समाजाला व दलित समाजाला हिणवण्याची मिळालेली संधी त्यांनी गमावली नव्हती. या एकंदरीतच मुद्द्यांच्या बाबतीत शिवसेनेने मराठीचा मुद्दा बाजूला करत हिन्दुत्व स्विकारलेले आहे.

शिवसेनेने मराठी अस्मितेला बगल दिली.

सामान्यतः बहुतेत प्रादेशिक पक्षांचे कार्यक्षेत्र विशिष्ट राज्यापुरतेच मर्यादित असते. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारणात प्रादेशिकवाद हा प्रभावी घटक मानला गेला आहे.

डॉ. इक्बाल नारायण म्हणतात की, 'भारतीय राजकारणाचे एक प्रमुख निर्धारत तत्त्व म्हणजे प्रादेशिकवाद होय.'[4]

प्रादेशिकवादाला प्रमाण मानून भारतात अनेक राजकीय पक्ष उदयाला आली आहेत. उदा. अंध्रात तेलगू देसम, तामिळनाडूत द्रमूक आणि अण्णाद्रमुक, पंजाबमध्ये अकाली दल याच राजकीय प्रक्रियेचा भाग म्हणून महाराष्ट्रात शिवसेनेचा उदय साहजिकच आहे. परंतू शिवसेनेने हिन्दुत्वाचा मुद्दा स्विकारून अथवा उचलून धरून मराठी अस्मितेला जाणीवपूर्वक फाटा दिलेला दिसतो. जे की इतर प्रादेशिक पक्षात असे मुद्दे कधीही स्विकारले नाहीत.

भूमिपुत्र सिद्धांताची ऐसी की तैसी

भारतात एकेरी नागरिकत्वाची तरतूद भारतीय संविधानात आहे. तरी सुद्धा प्रांताप्रांतामध्ये भेदभावाची भावना विकसित झाली आहे. महाराष्ट्रात शिवसेना या सिद्धांतानुसार जन्माला आली. शिवसेनेच्या 5 जून 1966 च्या अंकात एक चौकट प्रसिद्ध झाली. त्यामध्ये असे नमूद केले होते की, यंडूगंडूचे मराठी माणसाच्या हक्कावरील आक्रमण परतवून लावण्यासाठी शिवसेनेची लवकरच नोंदणी सुरू होणार! विशेष माहितीसाठी मार्मिकचा पुढील अंक पहा. 1966 पासूनच मार्मिकच्या माध्यमातून दक्षिणात्यांना विरोध केला गेला. 'बजाव पुंगी - हटाव लुंगी' अशी जहाल घोषणा देण्यात येत होत्या. परंतू नंतरच्या काळात शिवसेनेकडून अनेक अमराठी लोकांना लोकसभा-राज्यसभा निवडणुकीची तिकीटे देवून त्यांना निवडूनही आणले गेले. यामध्ये नंदी, केनिया, निरुपम, जेठमलांनी इ. नावे घेता येतील. म्हणूनच शिवसेनेने भूमिपुत्रांचा सिद्धांत येथे डावलला आहे, असे दिसते.

शिवसेनेचा दलित विरोध आणि शिवशक्ती आणि भीमशक्ती

शिवसेनेचा दलित विरोध सर्वश्रृत आहे. विशेष करून महाराष्ट्रातील नवबौद्ध समुदायाला शिवसेनेने विरोध केल्याचे दिसून येते. शिवसेनेने मराठवाड्यात विस्तार करण्यासाठी तेथील दलित (नवबौद्धांना) विरोध केला होता. बहुजन विरूद्ध दलित या तेथील परंपरागत संघर्षाचा मोठ्या चलाखीने वापर करून घेण्यात आला होता. त्यासाठी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरास विरोध हा सेनेने एक प्रमुख मुद्दा केल्याचे दिसून येते. शिवाय मराठवाड्यात फार मोठ्या संख्येने असलेल्या बिगर दलित वर्गाला आकर्षित करून घेण्यासाठी शिवसेनेनी गायरान जमिनीच्या प्रश्नाचाही वापर केलेला दिसून येतो. तत्पुर्वी 1974 ला दलित पँथर्सची भूमिका शिवसेनेला पटली नाही. म्हणून येथूनच संघर्षाला सुरुवात झाली. राजा ढाले, नामदेव ढसाळ, ज.वि. पवार इ. पँथर्स नेते आणि शिवसेना यात मोठा संघर्ष झाल्याचे दिसून येते. दलितांमध्ये नवबौद्धांचे प्रमाण मोठे होते. शिक्षणाचा प्रसार आणि लढाऊ बाण्यामुळे हा वर्ग मोठ्या वेगाने प्रगती करत होता. शिवसेनेने त्यांच्या विरोधात दलितामधील चर्मकार व मातंग या समाजाला जवळ करण्याचा प्रयत्न शिवसेनेने केल्याचे दिसून येते. शिवसेनेने 'मराठी माणूस' हा सोयीचा विषय घेऊन ठाणे-

Impact Factor 7.149

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-VIII ISSUE-VII July 2021

Address
· Devgiri Nagar, Ambajogai Road, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
48	अशोक बाळू पाटील	भूमंडलीकरण और समकालीन हिंदी उपन्यास–''दौड'' उपन्यास के संदर्भ में	219 To 221
49	प्रा. ज्ञानेश्वर बोंपिलवार	भारतीय समाजात संगीत वाद्यांचे स्थान	222 To 223
50	डॉ.एल.बी. डोंगरे	पंतप्रधान नरेंद्र मोदी कालीन भारताच्या परराष्ट्र धोरण आणि आव्हाणे एक अभ्यास	224 To 229
51	प्रा. डॉ. राहूल मल्हारी भोरे	पं. कुमार गंधर्व : दिव्यानंद	230 To 237
52	डॉ. श्वेता दीपक वेगड़	घरानों के बदलते आयाम	238 To 241
53	प्रा. डॉ. मधूकर बाबूराव अनंतकवळस	भारतीय कृषी यांत्रिकीकरण : सद्यस्थिती व भविष्यकालीन दिशा	242 To 249
54	प्रा. रामकृष्ण सुर्यकांत गडकरी	सार्वजनिक ग्रंथालये : लोकशिक्षणाचे केंद्र	250 To 252
55	प्रा. विद्या प्र. गांवडे	शास्त्रीय संगीतामध्ये ठूमरीचे स्थान	253 To 254
56	प्रा.डॉ.आर.बी.लक्षटे शिवाजी कराळे	शिक्षणाचा हक्क कायदा 2009 : वास्तव आणि अपेक्षा	255 To 261
57	डॉ. कैलास सर्जेराव मोटे	उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांचे योगदान : एक अभ्यास	262 To 268
58	डॉ . विजय कुमार	प्रगतिवादी कवि ः शिवमंगल सिंह सुमन	269 To 272
59	प्रा.डॉ.कमलाकर एन. राक्षसे	महाराष्ट्राच्या राजकारणातील शिवसेनेचे बदलते स्वरूप	273 To 276
60	डॉ. प्रकाश कांबळे	महात्मा गांधी : एक शिक्षण प्रवास	277 To 280
61	प्रा.डॉ.नामदेव कोंडबाराव दळवी	जागतिक कोरोना महामारी एक अभ्यास	281 To 285
62	सौ. रिता प्रेमदास खोब्रागडे डॉ. नुज़्जत सुलताना एम. बी.	आदिवासी क्षेत्रातील आदिवासी आश्रम शाळेतील मुली आहारातून प्राप्त करीत असलेल्या प्रमुख पोषण तत्वांचे मूल्यमापन	286 To 290
63	प्रा.पद्माकर बळीराम तटाळे	भारतीय शेती व शेती क्षेत्रातील अनिश्चितता	291 To 294
64	सौ. रिता प्रेमदास खोब्रागडे डॉ. नुज़्जत सुलताना एम. बी.	आदिवासी आश्रम शाळेतील मुलींना आहारातून प्राप्त होणाऱ्या सुक्ष्म पोषण घटकांचे मूल्यमापन	295 To 301

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- VII JULY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

भारतीय शेती व शेती क्षेत्रातील अनिश्चितता

प्रा.पद्माकर बळीराम तटाळे
अर्थशात्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय,कळे.
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

प्रस्तावना

भारताची अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. स्वातंत्र्यानंतर जरी आपणास कृषीवरील अवलंबित्व जरी कमी झालेले दिसून येत असले तरी आजही 70 टक्के इतकी लोकसंख्या ही या क्षेत्रावरच अवलंबून असलेली दिसून येते. भारतात प्रामुख्याने शेती ही उदरनिर्वाहासाठी केली जाते. साधारणपणे शेतकऱ्याने उदरनिर्वाहासाठी किंवा धंदा म्हणून स्वतःच्या शेतीवर चालवलेला व्यवसाय अशी ढोबळमानाने शेतीची व्याख्या केली जाते. भारतातील शेतीचा विचार केला तर प्रामुख्याने भारतातील शेती निसर्गावर अवलंबून आहे.त्यामुळे शेती व्यवसायात अनेक धोके व अनिश्चितता आढळून येते यातच पुर ,वादळ,अवर्षण, टोळधाड इत्यादी कारणामुळे शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चढ-उतार होताना आपणास दिसून येतात भारतातील शेतीच्या प्रकाराचा विचार केला असता शेतीचे वर्गीकरण चार प्रकारात केले जाते, ज्यात किसान प्रधान शेती, सामुदायिक शेती ,भांडवल प्रधान शेती ,सरकारी शेती चा समावेश होतो. किसान प्रधान शेती याचा विचार करता यात वैयक्तिक पणे शेतकरी स्वतःच्या पद्धतीने शेती करतात आणि आपल्या शेती व्यवसायाचे तेच व्यवस्थापन आणि संघटक असतात. सहकारी शेतीत अनेक शेतकरी एकत्र येऊन शेतीचा सर्वांचा सर्व किंवा काही कामे हे अनेक शेतकरी एकत्र येऊन स्वेच्छेने सहकारी पद्धतीने करतात तर सामुदायिक शेतीत सर्वसाधारणपणे व्यवस्थापक मंडळाच्या नियंत्रणाखाली एकत्र येऊन शेती केली जाते या प्रकारची शेती प्रमुखाने रशिया व चीन मध्ये थोड्याफार प्रमाणात आपल्याला दिसून येते. भांडवल प्रधान शेती ही शेती प्रामुख्याने अवाढव्य प्रमाणावर गुंतवणूक करण्याच्या भांडवली पद्धतीवर अवलंबून आहे तर सरकारी शेतीत शेतीची व्यवस्था ही सरकार आपल्या स्वतःचा नोकर वर्ग नेमून किंवा अधिकृत मंडळा प्रमाणे एखादी व्यवस्थापक मंडळ नेमून पाहत असते.

थोडक्यात, वरील प्रमाणे शेतीचे प्रकार जरी असले तरी भारतात किसान प्रधान शेती फार मोठ्या प्रमाणात केली जात असल्याचे दिसून येते.

संशोधन लेखाचे उद्देश

भारतीय शेती व त्यातील अनिश्चितता हा संशोधन लेख पुढील उद्देश समोर ठेवून लिहिण्यात आला आहे.

1. भारतीय शेतीच्या प्रकाराचा अभ्यास करणे
2. शेतीतील अनिश्चिततेचे स्वरूप समजून घेणे
3. शेतीच्या उत्पादनात अनिश्चितता निर्माण करणाऱ्या कारणाचा अभ्यास करणे
4. शेती क्षेत्रातील धोके व अनिश्चितता नियंत्रणाचे उपाय सुचवणे

वरील उद्देश समोर ठेवून प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यात आला आहे

संशोधन पद्धती

संशोधन लेख हा प्रामुख्याने दुय्यम आधारसामग्रीवर आधारित असून यात पुस्तके, दैनिक व मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या माहितीचा वापर करण्यात आला आहे.

भारतातील शेतीचा विचार करता, भारतातील शेती ही प्रामुखाने निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असलेली दिसून येते. आज ही हंगामात पाऊस वेळेवर पडला तर शेती मधून निघणारे उत्पादन हे योग्य प्रकारे पिकताना आपनास दिसून येते

PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

त्यामुळे या क्षेत्रात अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्राच्या मानाने जास्त धोके असल्याचे आपणास दिसून येते याचा विचार केला असता भारतातील शेती क्षेत्रातील अनिश्चिततेचे स्वरूप खालील घटकामुळे आल्याचे आपणास दिसून येते.

शेती क्षेत्रातील अनिश्चिततेचे स्वरूप

1. किंमत अनिश्चितता

भारतातील शेतीतील उत्पादित होणाऱ्या मालाचा विचार केला असता आपणास असे दिसून येते की शेतकरी हा जरी उत्पादनाच्या प्रक्रियेचा संघटक असला तरी त्याचे उत्पादित होणाऱ्या मालाच्या किमतीवर नियंत्रण नसते या मालाची किमत ठरवणारा दूसरा घटक असतो तसेच शेतमालाच्या किमतीवर शासकीय धोरणाचा ही प्रभाव पडत असल्याचे आपणास दिसून येते.त्यामुळे शेतमालाच्या किंमतीत अनिश्चितता निर्माण होऊ शकते.

2. तांत्रिक अनिश्चितता

शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी आवश्यक असणारा घटक म्हणून तांत्रिक बाबीकडे पाहिले जाते नवीन तंत्र शेतकऱ्यांना उपयुक्त आणि फायदेशीर आहे किंवा नाही याबाबत हे विचार करावा लागतो जर अंदाज चुकला तर उत्पादन प्रक्रियेत जी अनिश्चितता निर्माण होते त्यास तांत्रिक अनिश्चितता असे म्हणतात. तांत्रिक अनिश्चिततेमुळे देखील शेतकऱ्यांना होणाऱ्या फायद्याचे प्रमाण बदलू शकते.

3. साधनाची अनिश्चितता

शेती ही अनेक घटकावर अवलंबून आहे यात शेतमजूर,भांडवल, बी बियाणे, खते इत्यादीचा समावेश या घटकांमध्ये होतो.यातील एका जरी साधनात असमतोल निर्माण झाला तर शेतीच्या उत्पादनात अनिश्चितता निर्माण होऊ शकते. याच बरोबर या साधना च्या किमती बाबतही अनिश्चितता असल्याचे आपणास दिसून येते.

4. कुळाबाबत अनिश्चितता

साधारण पुणे पूर्वी भारतात शेती ही कुळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात केली जात होती. आज थोड्या फार प्रमाणात या कुळाच्या माध्यमातून जरी शेती केले जात असले तरी यामुळे अनिश्चितता निर्माण झालेली दिसून येते कुळाला शेती करण्याबाबत शाश्वती नसते आणि मालकाला कुळाने कब्जा केला तर मालकी हक्कावर पाणी सोडावे लागेल अशी भीती असते त्यामुळे उत्पादनात कुळामुळे अनिश्चितता निर्माण होते.

5. उत्पादनाबाबत अनिश्चितता

शेतीच्या उत्पादनाच्या प्रक्रियेत नैसर्गिक आपत्ती, हवामान, रोगराई ,दुष्काळ, पूर यामुळे अनिश्चितता निर्माण होते त्यास उत्पादनाबाबत अनिश्चितता असे म्हणतात.

6.किमतीतील चढ-उतारामुळे निर्माण होणारी अनिश्चितता

शेतीमधून उत्पादित होणाऱ्या मालाच्या किमतींमध्ये सतत चढउतार होत असतात त्यामुळे देखील अनिश्चितता निर्माण होते.

अनिश्चिततेचे कारणे

शेतीच्या उत्पादनात अनिश्चितता निर्माण होण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत असलेले आपणास दिसून येतात त्यात खालील घटकांचा समावेश होतो. यात पाऊस, बी-बियाणे भांडवल हे घटक प्रामुखाने यावर परिणाम करताना दिसून येतात.

1. पाऊस-

कृषि उत्पादनासाठी आवश्यक असणारा घटक म्हणजे पाऊस. पाऊस जरर वेळेवर पडला तर शेतीमधून निर्माण होणारे उत्पादन हे भरपूर प्रमाणात निघते मात्र या उलट परिस्थिती जर पाऊस वेळेवर झाला नाही तर उत्पादनात घट देखील होऊ शकते.

2. बी- बियाणे

शेतीत वापरले जाणारे बी बियाणे योग्य गुणवत्तेचे नसले तरी देखील उत्पादनात अनिश्चितता निर्माण होऊ शकते त्यामुळे योग्य व प्रमाणबद्ध बी- बियाणे वापरणे गरजेचे आहे.

3. सरकारचे शेती विषयक धोरण

वेळोवेळी शासन आपले शेती विषयक धोरण जाहीर करत असते परंतु सरकारने शेती विषयक धोरण योग्य वेळी जाहीर न केल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक अंदाज चुकू शकतात व त्यामुळे या क्षेत्रात अनिश्चितता निर्माण होते बराच वेळा

शासन विविध पिकांबाबत हमीभाव जाहीर करीत असते.व त्या नुसार शेतकरी पीक पद्धती ठरवीत असतो जर शासनाने हमी भाव वेळेत ठरविले नाही तर अनिश्चितता निर्माण होऊ शकते.

4. भांडवल पुरवठा

भारतातील शेती ही संपूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे त्यामुळे शेतकरी या सतत आर्थिक विवेचनात असतो त्यामुळे त्याच्याकडे योग्य असा भांडवल साठा उपलब्ध नसतो त्यामुळे त्याला योग्य वेळी बँकेकडून कर्ज पुरवठा झाला नाही तर त्याचे नुकसान होऊ शकते परंतु जर हाच भांडवल पुरवठा योग्य वेळी शेतकऱ्यांला उपलब्ध झाला तर शेती उत्पादनाबाबत अनिश्चितता निर्माण होऊ शकत नाही.

5. शेतमाल किंमत

भारतातील शेतीमध्ये उत्पादित होणारे मालाची किंमत उत्पादक असणारा संयोजक म्हणजे शेतकरी निश्चित करत नाही तर व्यापारी अशा उत्पादित मालाच्या किमती निश्चित करत असतात. त्यामुळे शेतकऱ्याला त्याने उत्पादित केलेल्या मालाला उचित किंमत मिळेल का हे माहीत नसते त्यामुळे उत्पादित झालेल्या शेतमालाला योग्य किमत मिळाली नाही तर शेतकऱ्यांला या परिस्थितीत अतोनात नुकसान सोसावे लागते.

शेतीक्षेत्रातील अनिश्चितता नियंत्रणाचे उपाय

भारतीय शेतीचा विचार केला असता शेती क्षेत्रात अनेक अनिश्चितता आपणास दिसून येतात या अनिश्चिततेचे वर मात करण्यासाठी पुढील उपायाचा वापर केल्यास या अनिश्चितता दूर होऊ शकतात.

1. शेती क्षेत्राचे विविधीकरण

शेती क्षेत्रातील ही अनिश्चितता टाळण्यासाठी शेतकऱ्याने पारंपरिक पद्धतीने पिके न घेता या पद्धतीत बदल केला तर हे धोके टाळता येणे शक्य होऊ शकते पारंपारिक पद्धतीने एक पीक पद्धतीचा वापर न करता शेतकऱ्याने बहुविध पीक पद्धतीचा वापर केला तर एखाद्या कारणाने एखादे पीक अडचणीत आले तर त्याची भरपाई इतर पिकाच्या उत्पादनाच्या माध्यमातून करता येऊ शकते याच बरोबर केवळ शेतीमधून निघणाऱ्या उत्पन्नावरच अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी शेती सोबतच पूरक व्यवसाय केले तर होणारे नुकसान टाळता येऊ शकते.

2. योग्य पिकाची निवड

विविध पिकांच्या उत्पादनाचे प्रमाण,त्यांना लागणारा वेळ, उत्पादन व विक्री खर्च ,अनुभव इत्यादी बाबींचा अभ्यास करून योग्य अशी पीक पद्धती निवड केल्यास काही प्रमाणात तरी धोका व अनिश्चितता टाळता येणे शक्य आहे.

3.पीक रचनेत बदल

शेतकऱ्यांनी आपण देत असलेल्या पीक रचनेत बदल केला तर धोक्यांना व अनुसूचित दिला काही प्रमाणात आळा घालता येऊ शकतो करून दीर्घ मुदतीच्या पीक आवजी अल्पमुदती तयार होणारे पिकाचे उत्पादन घेतल्यास त्यापासून उत्पन्न महिन्यात देखील मदत मिळू शकते याचा अर्थ शेतकऱ्यांनी क्षेत्रात चाटर धोरण न अवलंबिता लवचिक धोरण स्वीकारणे आवश्यक आहे.

4. पुरेसे भाग भांडवल

शेती क्षेत्रात नैसर्गिक आपत्ती किंवा विविध आपत्ती आकाश मे अपने येण्याची शक्यता कांबळे येणाऱ्या संकटांना सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांकडे भांडवलाचा पुरेसा साठा असणे गरजेचे आहे जेणेकरून अचानक येणाऱ्या या संकटांना शेतकऱ्याला यशस्वी पुणे तोंड देता येईल.

5. पूरक उद्योगावर लक्ष केंद्रित करावे

शेतकऱ्यांनी केवळ शेती क्षेत्रावरच लक्ष केंद्रित न करता पूरक उद्योगावर देखील लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे करण शेतीही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेतीमधून निघणारे उत्पादन किती निघेल याबाबत शेतकऱ्यांना शाश्वती शासन नसते त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीवर अवलंबून न राहता खरच पूरक उद्योगावर देखील लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

6. शेतमालाचा विमा उतरविणे

शेतकऱ्याने आपण घेत असलेल्या विविध पिकांचा विमा उतरविण्यास विम्याच्या हप्त्याच्या मोबाईल या शेतकऱ्याला किमान हमे मिळते व त्याचे नैसर्गिक व इतर

आपत्तीपासून सोरप्शन होते त्याचप्रमाणे किमान शेती उत्पन्नाच्या मुळे शेतीक्षेत्रात अस्थिरता निर्माण होण्यास एक प्रकारे मदत मिळू शकते.

7. बाजारपेठेचा अभ्यास

सर्व शेतकऱ्यांनी एकाच वस्तूचे उत्पादन केल्यास उत्पादनाच्या पुरवठ्यामध्ये वाढ होऊन त्या शेतमालाचे भाव कमी होऊ शकतात त्यामुळे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी बाजारपेठेचा अभ्यास करणे आवश्यक आहे बाजारपेठेमध्ये भविष्यात कोणत्या मालाला मागणी येऊ शकते याचा विचार करून जर शेतीमध्ये उत्पादन घेतल्यास शेतकऱ्यांना फायदा होण्याची शक्यता होऊ शकते.

8. उत्पादित मालाची गुणवत्ता टिकवणे

शेतीमधून निर्माण होणाऱ्या मालाची गुणवत्ता शेतकऱ्याने टिकून ठेवली तर शेतकऱ्याला त्या मालास योग्य किंमत मिळू शकते त्यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादित माल कशाप्रकारे गुणवत्तापूर्ण राहील याकडे लक्ष दिले तर शेती क्षेत्रातील अनिश्चितता टाळता येऊ शकते.

संदर्भसूची

1. डॉ. कायदे पाटील गंगाधर, कृषी अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक
2. डॉ. देसाई, डॉ.भालेराव , कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय, निराली प्रकाशन, पुणे 3. डॉ. कविमंडन विजय, कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर
4. डॉ. वाणी नीता, कृषी अर्थशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
5. डॉ दत्त डॉ सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, चांद अँड कंपनी लिमिटेड, दिल्ली

Impact Factor 7.149

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-VIII ISSUE-VIII Aug. 2021

Address
· Devgiri Nagar, Ambajogai Road, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Sr.No.	Author Name	Research Paper / Article Name	Page No.
28	डॉ. शकुंतला देवी राणा	मीडिया और बाजारवाद	111 To 114
29	मिस. रमनदीप कौर डॉ.गुरमीत सिंह	महिलाओं का सामाजिक एवं आर्थिक क्रियाकलापों के प्रतिमानो के प्रति अवधारणा का विश्लेषणात्मक अध्ययन	115 To 120
30	डॉ.व्ही.सी.ठाकुर	विमर्श की नई धारणा– स्त्री विमर्श	121 To 122
31	डॉ. शकुंतला देवी राणा	नाथ पंथ और बालकनाथ का ऐतिहासिक–सामाजिक अवदान	123 To 125
32	डॉ. मोहनन वी टी वी	एण्डन पोपॉविक तथा अनुवाद के क्षेत्र में उनका योगदान	126 To 127
33	डॉ. प्रकाश कांबळे	महात्मा फुले : बहुजन के शिक्षा साहयकर्ता	128 To 131
34	प्रा.डॉ. शोभना वि. जोशी प्रविण म. पाथरकर	निवड आधारित श्रेयांक पद्धतीची अंमलबजावणी करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना	132 To 136
35	डॉ. युवराज पंढरीनाथ जाधव	भारतातील विदेशी गुंतवणुकीवर कोव्हिड–१९ चा झालेला परिणाम	137 To 142
36	प्रा. पदमाकर बळीराम तटाळे	महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था-विशेष संदर्भ कोल्हापूर महानगरपालिका	143 To 147
37	प्रा. डॉ. गणेश लहाने	संत चोखामेळा यांच्या अभंगातील भावसौंदर्य	148 To 150
38	शंकर बालासाहेब गिरी	पंचायत राज आणि महिला आरक्षण धोरण	151 To 153
39	प्रा. तानाजी संभाजी माने	संसदीय लोकशाही आणि महिलांचा राजकारणातील सहभाग	154 To 160
40	प्रा.डॉ. शोभना वि. जोशी प्रविण म. पाथरकर	निवड-आधारित श्रेयांक प्रणाली: गुण आणि मर्यादा	161 To 165

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- विशेष संदर्भ कोल्हापूर महानगरपालिका

प्रा. पदमाकर बळीराम तटाळे
अर्थशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर
Email.padmakartatale487@gmail.com

प्रस्तावना

भारतात स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास पाहता हा खूप प्राचीन असल्याचा आपणास दिसून येतो. भारतात प्राचीन काळापासून यासारख्या संस्था कार्यरत असल्याचेही आपणास पहावयास मिळतात. ग्रामीण भागातील लोक एकत्र येऊन गावातील समस्यावर विचार विनिमय करीत त्यासाठी गावातील नागरिकांची सभा भरविली जात असे तिला ग्रामसभा असे म्हणत. वैदिक काळात देखील ग्रामसभेचा उल्लेख आपणास ऋग्वेदात आढळतो .ब्रिटिश सरकारच्या काळात स्थानिक स्वराज संस्थेत आमूलाग्र बदल झाले तत्कालीन ब्रिटिश शासनाने प्रथम 1850 च्या कायद्याने ग्रामपंचायतीपेक्षा मोठ्या शहरातून नगरपालिका स्थापन करण्याचा हक्क त्या त्या नगरातील लोकांना दिला. त्यानुसार स्थानिक संस्थांची निर्मिती झाली. या कायद्यानुसार महाराष्ट्रातील सातारा, वाई आदी शहरांमधून नगरपालिका स्थापन झाल्या त्यामुळे शासन व नागरी जनता यात प्रत्यक्ष संपर्क सुरू झाला . पुढे लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेला मर्यादित स्वरूपात स्वायतता दिली. 1907 मध्ये रॉयल कमिशन ऑन डीसेंट्रलायझेसन नेमण्यात आले या आयोगाने ग्रामपंचायती मजबूत करण्याची शिफारस केली व त्यानंतर 1919 च्या भारत सरकारच्या कायद्यात कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थेचा टप्प्याटप्प्याने विकास करण्याचे धोरण जाहीर झाले त्यानुसार सर्व प्रांतामध्ये ग्रामपंचायत ,जिल्हाबोर्ड, नगरपालिका यासारखा संस्था स्थापन झाल्या या पुढील काळात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात लोकशाही प्रणाली विकसित करण्याच्या उद्देशाने सरकारने कल्याणकारी शासन व्यवस्थेचा स्वीकार केला या संकल्पनेत केंद्र शासन, राज्य शासन आणि ग्रामपंचायतीपासून ते महानगरापर्यंतच्या सर्व स्थानिक संस्थांना स्वायत्तता प्रदान करण्यात आली.

संशोधन लेखाचा उद्देश

महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- विशेष संदर्भ कोल्हापूर महानगरपालिका हा संशोधन लेख पुढील उद्देश समोर ठेवून लिहिण्यात आला

1. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या ज्ञात करणे.
3. कोल्हापूर महानगरपालिकेच्या संदर्भात अभ्यास करणे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन लेख लिहित असताना यात प्रामुख्याने व्यष्टी संसोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे त्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरण्यात आली आहे याबरोबरच या संशोधनासाठी दुय्यम आधारसामग्री चा वापर करून हा संशोधन लेख लिहण्यात आला आहे.

महाराष्ट्रात पंचायत राज्याची पद्धती स्वीकारण्यापूर्वी 1960 मध्ये त्यावेळचे महाराष्ट्राचे महसूल मंत्री श्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली व या समितीने आपला अहवाल 1961 मध्ये शासनाला सादर केला व हा अहवाल शासनाने मान्य करुन त्यानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम 1961 हा कायदा संमत केला व त्यानुसार महाराष्ट्रात 1 मे 1962 रोजी महाराट्रात पंचायत राज्याची स्थापना झाली व त्यानुसार जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, तालुका पातळीवर पंचायत समिती, आणि ग्रामपातळीवर ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय पद्धती स्वीकारले गेली. नागरी भागात नगरपरिषद, महानगरपालिका, कटक मंडळे व शहर विस्तार समित्या यासारख्या संस्था स्थापन करून नागरी भागातील प्रशासन चालवले जाताना आपणास दिसून येते. कोल्हापूर महानगरपालिकेचा अभ्यास

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

करण्यापूर्वी कोल्हापूर शहरा विषयी थोडक्यात माहितीचा अभ्यास करणे या ठिकाणी आवश्यक वाटते कोल्हापूर हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे शहर असून प्राचीन काळापासून दक्षिण काशी या नावाने प्रसिद्ध आहे महालक्ष्मी मंदिर आणि ज्योतिबाचे मंदिर यामुळे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते तसेच ऐतिहासिक दृष्ट्या कोल्हापूर महत्वाचे शहर असून प्राचीन काळापासून ते विविध राजघराण्याचे राजधानीचे ठिकाण होते. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारने मुळे कोल्हापूरने नवा आदर्श निर्माण केला. कोल्हापूर हे कला, शिक्षण, उद्योग, खेळ व विशेषता कुस्ती साठी प्रसिद्ध आहे. महालक्ष्मीच्या प्रतीष्टापनेनंतर शहराचा उल्लेख करवीर असा आढळतो. त्यापूर्वी कोल्लापूर, कोल्लपूर, कोल्लगिरी, कोल्लदिगिरीपट्टन असे नावे प्रचलित होते. कोल्ल म्हणजे दरी व दर्याचे गाव म्हणजे कोल्हापूर अशी ही व्युत्पती मानली जाते.सारांश काय तर ब्रह्मपुरी, करवीर व कोल्हापूर अशी स्थल नामाची बहुविध रुपे आपणास पहावयास मिळतात. महालक्ष्मीच्या देवलयाच्या स्थापनेमुळे कोल्हापुरात धार्मिक केंद्राचे स्वरूप प्राप्त झाले त्यातूनच सांस्कृतिक व आर्थिक क्रांतीचे नानाविध रुपे प्रकट झालेले आपणास पहावयास मिळतात . कोल्हापुरात 12 ऑक्टोबर 1956 रोजी प्रथम नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. नगरपरिषदेची स्थापना झाल्यानंतर आधुनिक कोल्हापूर शहराच्या पद्धतशीरपणे विकास होण्यास प्रारंभ झाला. 1939 ते 1945 हा कालावधी नगरपालिकेच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिण्यासारखा आहे या काळात नागरी जीवनाच्या विविध क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण परिवर्तन घडून आले मात्र 1941 मध्ये झालेल्या त्रेवार्षिक निवडणूकीत स्थानिक स्वराज्य संघ ही संस्था स्थापन करण्यात आली. त्यात भाई माधवराव बागल,गोविंदराव कोरगावकर रत्नाप्पा कुंभार या तिघांचे नियंत्रण मंडळ स्थापन करण्यात आले. कोणताही भेद न करता जनतेचे निरपेक्ष सेवा करणे हे या संघाचे धेय होते इतर कोणतेही राजकीय संस्थेची या संघाचा संबंध नव्हता दरबारने स्थानिक स्वराज्याचे जेवढे हक्क जनतेच्या हवाली केले आहेत त्याचा पुरेपूर उपयोग करून घेणे हे आपल्या संघाचे कर्तव्य वाटते असे या संघाच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे .1954 ते 1971 हा कालखंड कोल्हापूर शहराच्या गतिमान विस्ताराचा कालखंड म्हणून ओळखला जातो या काळात नगरपालिका वेगाने महानगरपालिकेकडे वाटचाल करताना आढळते 1960 साली नगरपालिकेत 44 सदस्य कार्यरत असल्याची नोंद आहे त्यापैकी 37 सर्वसाधारण, तीन मागास वर्गासाठी राखीव व 4 स्त्रीयासाठी राखीव आसल्याचे आढळते. 1956- 57 सालापासून शहरात रस्त्याचे जाळे तयार झाले, आवश्यक तेथे नवीन पूल उभारण्यात आले, पाणी पुरवठा व्यवस्था कार्यक्रम करण्यात आले ,नवनवीन मार्केट ,उद्याने उभारून शहराच्या सौंदर्यात भर टाकण्यात आली याचाच परिणाम म्हणून कोल्हापूर शहरात उदयोगप्रियता वाढीस लागून यांत्रिकीकरणाचे नवे युग सुरू झाले उदयम नगरीच्या विशाल परिसर यंत्रसामुग्री व सुटे भाग यांच्या निर्मिती कार्यात मग्न राहिला. कोल्हापूर उद्योग वसाहतीतील उत्पादने अनेक आशियाई, आफ्रिका देशात निर्यातही होऊ लागले. कोल्हापूर शहराच्या औद्योगिक वाटचालीत नगरपालिकेला वारंवार साहय्याभूत असे कार्य केले. याच कालखंडात 1962 साली राधाकृष्णन यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली व कोल्हापूर हे प्रगत शैक्षणिक पुनर्रचनेचे केंद्र म्हणून उदयास आले. या काळात अशा प्रकारेनगरपालिकेच्या सहयोगाने औद्योगिक व शैक्षणिक पूर्णरचनेत हातभार लागला. डिसेंबर 1972 मध्ये नगरपरिषद मंडळ बरखास्त करण्यात आले व त्याचे महानगरपालिकेत रूपांतर झाले. शहराची वाढती लोकसंख्या व वाढत्या नागरी समस्या सोडविण्यासाठी नगरपालिका ही काळाची गरज होती 1972 ते 1978 या काळात द्वारकानाथ कपूर ,श्री ना. मा.देवस्थळे ,श्री डी. टी.जोसेफ, श्री वी.ना. माखिजा यांनी प्रशासक या नात्याने कार्य पाहिले 1960च्या नगर विकास योजनेनुसार नगररचनाशास्त्राच्या आधारे उपनगराची रचना करण्यात आली.विकासयोजना राबविताना विस्थापित झालेल्या नागरिकांचे पुनर्वसन करण्याचा कार्यक्रम देखील या वेळी अमलात आणला गेला.

1978 मध्ये खऱ्या अर्थाने पहिले लोकनियुक्त महानगरपालिका अस्तित्वात आली या काळात श्री बाबासाहेब कसबेकर, नानासाहेब यादव, द न कनेरकर, बाबुराव पारखे, सुभाष राणे यांनी महापौर या नात्याने कोल्हापूर शहराच्या विकासात सिंहाचा वाटा उचलला आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था

महाराष्ट्रात सध्या ग्रामीण व नागरी भागात खालील प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था कार्य करताना दिसून येतात

ग्रामीण	संख्या	नागरी	संख्या
जिल्हा परिषद	33	महानगरपालिका	27
पंचायत समिती	351	नगरपरिषद	237
ग्रामपंचायत	27896	कटक मंडळे	07

वरील आकडेवारीचा विचार करता सध्या महाराष्ट्रात 33 जिल्हा परिषदा, 351 पंचायत समिती व 27896 ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम चालू आहे तर 27 महानगरपालिका 237 नगरपरिषद वसाहत कटक मंडळाच्या माध्यमातून नागरी भागात प्रशासन चालवले जात असल्याचे आपणास दिसून येते.

बच्चे को जन्म देना नारी के लिए एक दिव्य अनुभव होता है। इसमें शारीरिक यातनाएँ तो मिलती ही हैं, लेकिन सृजन का आनंद और मातृत्त्व पाने का आनंद भी मिलता है। इस अनुभव का वर्णन मालतीजी ने 'प्रतिदान' इस कहानी में किया है। 'स्नेहबंध' जैसी कहानी में इन्होनेने सास-बहू के संबंध को दर्शाया है। बहू के बारे में सास की पारंपारिक सोच तथा इसी कारण बहू पर होनेवाला अन्याय भी चित्रित किया गया है। बाद में अपने अच्छे व्यवहार के कारण वह अपने सास का मन भी जीत लेती है। वह दिखा देती है कि एक आधुनिक शिक्षित नारी होने के बावजूद भी वह कैसे एक श्रेष्ठ भारतीय बहू भी हैं। इसी कहानी में मीता और धुव्र के अंतर्जातीय विवाह को दिखाया गया है। इससे हमें पता चलता है कि लेखिका किसी भी जाति व्यवस्था को मानने से इनकार करती है। वृद्धा अवस्था तक आते-आते मनुष्य अपनी जिंदगी जी चुका होता है। जीवन से उसे कुछ लेना- देना नहीं होता है। उसका मन बच्चों को लेकर, नाती-पोतों को लेकर एक स्वप्न बुनने लगता है। पर बच्चों की इच्छाएँ कुछ और ही होती है उसमें हम कहीं नहीं होते। तब जबरदस्त 'मोहभंग' हो जाता है इसका चित्रण मोहभंग इस कहानी में किया है।

मालती जी ने जिस तरह पारिवारिक, दांपत्य जीवन के संबंधित कहानियाँ लिखी है, उसी तरह आर्थिक समस्याओं से संबंधित भी कहानियाँ लिखी है। 'औकात' इसी विषय से संबंधित ही कहानी है। यह कहानी नारी की औकात का चित्र अंकीत करती है। आधुनिक युग में अर्थ के अभाव में स्वाभाविक गुणसंपन्न तथा सुंदर व्यक्ति अपने आदर्श गुर्णो के बावजूद भी मूल्यहीन बन जाता है। आस-पास के लोग भी उसे उसकी औकात दिखाते है।

'मीना' एक गरीब माता-पिता की बेटी है। उसके पास पहनने के लिए ढंग के कपडे भी नहीं है। वह अपने मौसेरी बहन नीता की शादी में जाती है, तो वहाँ भी उसे सभी लोग उसकी औकात दिखाते है। 'आस्था के आयाम' जैसी कहानी में नारी के स्वाभिमान का चित्रण भी किया है। धीरेंद्र की शादी कौमुदी के साथ तय की जाती है। कौमुदी और उसकी माँ कोकौमुदी के पिता ने घर से बाहर निकाल दिया था, अब बहुत साल होगए उनमें कोई बातचीत भी नहीं है। धीरेंद्र के घरवाले शादी में लडकी के पिता की उपस्थिति को महत्त्वपूर्ण मानते है। लडकी के घरवाले भी अपना आत्मसम्मान भूलकर इस बात को मान लेते है। लेकिन कौमुदी इसे इनकार करती हुई कहती है, ''अच्छा आंटी! वह उठ खडी हुई, बस यही कहने आई थी कि अगर माँ मेरे अभिभावक के रूप में आपको ग्राह्य नहीं हैं तो मुझे भी यह रिश्ता मंजूर नहीं है। शादी को लेकर वैसे भी मन में कोई सुंदर कल्पना नहीं है, पर इस कीमत में तो वह बहुत ही महँगी है।"[5] मालती जी यहाँपर नारी के आत्मसम्मान को जागृत करती हुई नजर आती है ।

भ्रष्ट राजनीति का चित्रण भी मालतीजी ने अपनी कहानीयों में किया है। राजनीतिक जाल से आंतंकित परिवार का चित्रण 'शुभकामना' कहानी में हुआ है। राघवन साहब एक मंत्री है। राघवन साहब के परिवार से मिला-जुला परिवार सदानंद का परिवार है। सदानंद ईमानदार इंजिनियर है। इनकी आर्थिक स्थिति अच्छी नहीं है। मंत्री साहब की असलीयत सदानंद को मालूम होने से मंत्री जी सदानंद का मुंह बंद कराने के लिए उसे प्रमोशन देकर उसका तबादला करवाते है। पति के भ्रष्ट होने की बात उसकी पत्नी गौरी को अच्छी नहीं लगती। वह अपनी नाराजी प्रकट करती हुई कहती है- ''अब वह विश्वास वह अभिमान टूट गया है रोहित! तेरे पापा बिक गए हैं। अपना मुंह बंद रखने की कीमत लेकर चुपचाप यहाँ से जा रहे हैं।''[6] यहाँपर एक नारी के विद्रोही रूप को चित्रित करने की कोशिश की है ।इस तरह इसमें भ्रष्टाचार विरोधी नारी का क्रोध भी दिखाई देता है।

'प्राब्लम चाइल्ड' जैसी कहानी में आधुनिक पढाई ने बच्चों के व्यवहार में कैसे बदलाव आया है, इसका चित्रण किया है। बच्चों को हम लोग स्कूल भेजने लगे हैं, जहाँ उनके नाजुक कंधों पर पढाई का बोझ लाद दिया जाता है। एक दिन बच्चा स्कूल न जाए तो माता-पिता के सामने बहुत सारी समस्याएँ खडी हो जाती है। जिस उम्र में खेलना-कूदना होता है, उसी उम्र में उसके उपर पढाई का बोझ भी लाद दिया जाता है। बच्चों के साथ-साथ माता पिता में भी मानसिक समस्याएँ बढ रही है। निरुपमा अपने पति से कहती है ''वो प्यार-व्यार तोठीक है, पर होमवर्क का तो आज कुंडा ही हो गया न ? सुबह देखों स्कूल जाते समय कैसे महाभारत मचेगा और कल नहीं तो मुझे झख मारकर अडोस-पडोस में कॉपी माँगने जाना पडेगा। नहीं तो परसों का होमवर्क भी गोल हो जाएगा।"[7] इस तरह आज माता – पिता अपनी इच्छाओं का बोझ बच्चों पर लादते हुए नजर आने लगे है ।

सारांश रूप में हम कह सकते है कि मालती जी ने अपने अनुभव का चित्रण यथार्थ रूप में अपनी कहानियों में किया है। मालती जोशी की समग्र कहानियाँ संवेदना से नारी दर्द से ओतप्रोत है। इन्होंने अपनी कहानी में नारी की विविध समस्याओं का चित्रण किया है। साथ ही नारी की सूक्ष्म भावनाओं का चित्रण भी इनकी कहानियों में मिलता है। स्त्री का अकेलापन, स्त्री जीवन की विडम्बना, विधवा विवाह की समस्या, दांपत्य जीवन से संबंधित समस्याएँ, अनमेल विवाह, अतंर्जातीय विवाह आदि से संबंधित समस्याओं का चित्रण इनकी कहानियों में मिलता

है। मध्यवर्ग का परिवार इनकी तो कहानी का प्रमुख विषय रहा है। इसमें महानगरीय भागदौड, बढती महँगाई आदि के कारण ये मध्यवर्गीय परिवार पीस रहा है। उसका चित्रण इनकी कहानियों में मिलता है। नारी और मध्यवर्गीय परिवार की समस्याओं के साथ-साथ इनकी कहानियों में राजनितिक, आर्थिक समस्याओं का चित्रण भी मिलता है ।लेकिन इनकी कहानियों का मूल विषय नारी समस्या ही रहा हैं।

संदर्भ ग्रंथ

1. रतनकुमारी वर्मा, - महिला साहित्यकारों का नारी चित्रण, अध्ययन प्रकाशन,नई दिल्ली,पृष्ठ 227
2. वही , पृष्ठ 225
3. मालती जोशी ,- आखिरी शर्त कहानी संग्रह, पृष्ठ 13
4. मालती जोशी ,- दस प्रतिनिधि कहानियाँ,किताबघर प्रकाशन,नई दिल्ली, पृष्ठ 21
5. वही, पृष्ठ 101
6. मालती जोशी , आखिरी शर्त कहानी संग्रह, पृष्ठ 40
7. मालती जोशी ,- दस प्रतिनिधि कहानियाँ,किताबघर प्रकाशन,नई दिल्ली, पृष्ठ 85

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.3 No.5 Nov – Dec 2022

जागतिक महामंदी आणि भारतीय शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा(१९२९-१९३९): एक ऐतिहासिक अभ्यास

प्रा. संदिप भैरू जाधव

सहाय्यक प्राध्यापक, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

Corresponding Author- प्रा. संदिप भैरू जाधव

DOI-10.5281/zenodo.7398838

गोषवारा:-

ऑक्टोबर, १९२९ मध्ये अमेरिकेत सुरु झालेली जागतिक महामंदी संपूर्ण जगभर पसरली. जागतिक महामंदीमुळे वस्तूंच्या किंमती घसरून लोकांना पराकाष्टेच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. या जागतिक महामंदीचे परिणाम सर्वच क्षेत्रावर कमी-अधिक प्रमाणात झाले. याकाळात भारतात फारसा औद्योगिक विकास झाला नसल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी अर्थव्यवस्था होती. पर्यायाने भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेवरही या महामंदीचे दूरगामी परिणाम झाले. अर्थात शेतकऱ्यांवरही जागतिक महामंदीचा प्रभाव पडून शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणात प्रचंड वाढ झाली.

जागतिक महामंदीच्या या बिकट आर्थिक परिस्थितीत भारतातील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे हा या शोधनिबंधाचा महत्वाचा उद्देश आहे.

प्रस्तावना:-

ऑक्टोबर, १९२९ मध्ये अमेरिकन शेअर मार्केट कोसळल्यानंतर जागतिक महामंदीची सुरुवात झाली. जगभरातील सर्व राष्ट्रे एकमेकांशी आंतरराष्ट्रीय संबंधाने जोडली गेली होती. शिवाय जागतिक अर्थव्यवस्था फारशी सुस्थिर नव्हती. त्यामुळे अमेरिकेतील महामंदीची लाट युरोपभर व त्यानंतर संपूर्ण जगभर पसरली. महामंदीमुळे वस्तूंच्या किंमती घसरून उत्पादन कमी झाले आणि बेरोजगारी वाढली. लोकांना पराकाष्टेच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.

भारत अगोदरच जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडला गेला असल्यामुळे महामंदीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणे अपरिहार्य होते. याकाळात भारतात फारसा औद्योगिक विकास झाला नसल्यामुळे भारताची अर्थव्यवस्था ही कृषी उत्पादनावर अवलंबून होती. त्यामुळे भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेवर पर्यायाने शेतकऱ्यांवर या जागतिक महामंदीचा अधिक प्रभाव पडला.

पतव्यवस्था :-

पुरेशा जलसिंचनाच्या सुविधाअभावी भारतीय शेती ही बहुतांशी मौसमी पावसावर अवलंबून असल्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना कृषिउत्पादनासाठी नेहमी मौसमी पावसावर अवलंबून राहावे लागत असे.[1] योग्यवेळी व योग्यप्रमाणात पाऊस झाला तरच चांगले उत्पादन होऊ शकत असे. दुष्काळ किंवा अतिवृष्टी झाली तर शेतकऱ्याला आर्थिक झळ सोसावी लागत असल्यामुळे कर्ज काढून आपला उदरनिर्वाह व सरकारी महसूल भरावा लागत असे. ह्या कर्जाचे प्रमाण फार मोठे असून, ते कर्ज बहुतेक अनुत्पादक(Unproductive Debt) अशा स्वरूपाचे होते.[2] ब्रिटीशांची सत्ता भारतात स्थापन होण्यापूर्वी भारतातील शेतकऱ्यांना सरकार आणि जमिनदार यांच्याकडून शेतीच्या कामाकरिता तगाई दिली जात असे आणि दैनंदिन खर्चाकरिता सावकारांकडून कर्ज मिळत असे. ब्रिटीशपूर्व काळात ग्रामसभेचा समाजावर प्रभाव असल्याने सावकारांकडून शेतकऱ्यांची लुबाडणूक होत नसे. त्यावेळी दामदुपटीच्या नियमानुसार कर्जावरील व्याजाची रक्कम मूळ कर्जाच्या रक्कमेपेक्षा जास्त होऊ दिली जात नसे.[3] परंतु ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर वसाहतवादी शोषणाचे आणि विशेषतः भारतीय शेती आंतरराष्ट्रीय भांडवलशाहीशी जोडली गेल्याचे भिषण परिणाम शेतकऱ्यांना भोगावे लागले. १८७९ च्या डेक्कन अग्रिकल्चरिस्ट बिलाच्यावेळी बोलताना बॉम्बे रेव्हेन्यू अधिकारी टी. होप यांनी म्हटले, to our revenue system must in candour be ascribed some share in the indebtedness of your ryot.[4]

भारताला स्वातंत्र्य मिळेतोपर्यंत सहकारी सोसायट्यांचा प्रसारही मर्यादित प्रमाणातच झाला होता.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

त्यामुळे ग्रामीण भागातील फारच थोडे शेतकरी या सहकारी सोसायट्यांमार्फत कर्ज घेऊ शकत होते. त्यामुळे शेतकऱ्यांना जमीनमहसूल भरण्यासाठी, शेतीच्या कामाकरिता आणि वैयक्तिक खर्चाकरिता सावकारांकडून कर्ज घेण्याशिवाय पर्याय राहत नसे. ज्यांचे व्याजदर गगनाएवढे प्रचंड असत.[5]

जागतिक महामंदी आणि शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा:-

ग्रामीण कर्जबाजारीपणा हा मुळातच भारतीय कृषिव्यवस्थेचा एक महत्वाचा दोष होता. तसेच तो ब्रिटीशकाळात भारताला लागलेला एक गंभीर आजार होता. कारण ब्रिटीशांनी निर्माण केलेल्या कायदेपद्धतीमुळे सावकारांना संरक्षण मिळाले. ब्रिटिशांनी निर्माण केलेली कायदेव्यवस्था ही सावकारांच्या बाजूने होती आणि न्यायदानव्यवस्था एखाद्या मशीनप्रमाणे काम करीत होती. शेतजमीन ही सावकारांकडे हस्तांतरित होणे म्हणजे ब्रिटीशांच्या ग्रामीण भागातील सत्तेचे विकेंद्रीकरण होणे अशा प्रकारची भिती निर्माण झाल्यानंतर एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी काही प्रतिबंधक उपाय म्हणून सावकारी नियंत्रण कायदे करण्यात आले.[6] परंतु वसाहतवादी सरकारने त्यांच्या अंमलबजावणीकडे फारसे लक्ष दिले नाही. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला ज्यावेळी किंमती वाढत होत्या, त्यावेळी धनको आणि ऋणको यांच्यातील संबंध चांगले होते. पण जागतिक महामंदीच्या काळात किंमती घसरू लागल्यानंतर या दोघांच्यातील संबंध परस्परविरोधी बनले आणि ते सौहार्दाचे ठेवणे सरकारला अशक्य बनले.[7]

शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामध्ये जागतिक महामंदीमुळे भर पडली. जागतिक महामंदीमुळे शेतमालाच्या किंमती घसरून शेतकऱ्यांचा नफा कमी झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होऊन त्यांची आर्थिक स्थिती फारच बिकट झाली. परिणामी सरकारला द्यावा लागणारा जमिनमहसूल, खंड यासारख्या कायम बांधिलकी असणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्याला कर्ज काढण्याशिवाय पर्याय राहिला नाही. त्यातच सहकारी सोसायट्यांनी थकबाकीमुळे कर्जपुरवठा करण्याचे थांबविल्यामुळे[8] शेतकऱ्यांना सावकाराचे पाय धरावे लागले. मुळातच कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्याला बिघडलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे कर्जफेड करणे दूरच उलट सरकारी जमिनमहसूल किंवा शेतसारा भरण्यासाठी आपल्या शेतजमिनी गहाण ठेवून सावकार म्हणेल त्या व्याजदराने कर्ज घ्यावे लागले. सावकारांनी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना भारी व्याजदराने कर्जे दिली. प्रसंगी त्यांच्या जमिनी आपल्या ताब्यात घेतल्या आणि त्यांना त्याच्याच शेतजमिनीमध्ये कुळ म्हणून राबण्यास भाग पाडले. अशाप्रकारे जागतिक महामंदीच्या काळात बिघडलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे सावकारांकडून शेतकऱ्यांचे अपरिमित शोषण होऊन त्यांचा कर्जबाजारीपणा वाढू लागला.[9] शिवाय कृषी उत्पादनांच्या उतरलेल्या किंमतींमुळे आणि कर्ज परतफेड न झाल्याने सावकार व सहकारी सोसायट्यांमधील आपली पत शेतकऱ्यांना गमवावी लागली.[10] यातूनच सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यास सुरुवात केली. पंजाब, बॉम्बे प्रेसिडेन्सी व संयुक्त प्रांतातील शेतकऱ्यांची जमिनी गहाण टाकण्याची आणि जमिनविक्रीची आकडेवारी या अनिष्ट प्रवृत्तीची द्योतक आहे. सन १९२६ ते १९३६ च्या दरम्यान बॉम्बे प्रेसिडेन्सीतील अहवालानुसार एकूण शेतजमिनीच्या २०% शेतजमीनी सावकारांच्याकडे गेल्या.[11] शेतकऱ्यांच्या जमिनी प्रंचड प्रमाणात शेती न कसणाऱ्या सावकारांच्या हातात जात असल्याचे १९३१ च्या जनगणना अहवालात म्हटले होते.[12] सन १९३७-३८ मध्ये हैद्राबाद संस्थानात नेमण्यात आलेल्या समितीने(Tenancy Committee) संस्थानातील एकूण जमिनीपैकी १/३ जमीन ही शेतकऱ्यांकडून सावकारांकडे हस्तांतरित झाल्याचे नमूद केले.[13]

थोडक्यात जागतिक महामंदीमुळे शेतकऱ्यांचे जवळपास निम्म्यापर्यंत खाली आलेले उत्पन्न आणि कमी न होता आहे तसाच चालत राहिलेला खंड, जमीनमहसूल हे सन १९२९ नंतर मोठ्या प्रमाणावर वाढत जाणाऱ्या ग्रामीण कर्जाचे कारण होते.[14] १९११ साली भारतातील संपूर्ण कृषीकर्ज हे ३०० कोटी रुपये होते.[15] तर १९२१ साली ते ५३३ कोटी रुपये असल्याचा अंदाज होता.[16] जागतिक महामंदीमुळे त्यामध्ये वाढ होऊन ते १९३१ साली ९०० कोटी रुपये झाल्याचे १९३१ च्या केंद्रीय बँकिंग चौकशी समितीच्या अहवालात नमूद केले होते.[17] तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कृषि विभागाच्या(Agricultural Credit Department) अहवालाप्रमाणे १९३७ साली हे कर्ज एकूण १८०० कोटी रुपयांवर गेले.[18] थोडक्यात १९११ ते १९२१ या दहा वर्षात कृषीकर्ज हे ३०० कोटी रुपयावरून ५३३ कोटी रुपये झाले; १९२१ ते १९३१ या दहा वर्षात ५३३ कोटी रुपयावरून ९०० कोटी रुपयावर गेले. तर १९३१ ते १९३७ या सहा वर्षात ते ९०० कोटी रुपयावरून १८०० कोटी रुपयावर गेले. ही आकडेवारी मंदीमुळे किती मोठ्या प्रमाणात कृषीकर्जात वाढ झाली याचे निदर्शक आहे.[19] जागतिक महामंदीच्या काळातील शेतकऱ्यांच्या कर्जातील ह्या प्रचंड वाढीवरून कृषी क्षेत्रातील वाढत्या बिकट आर्थिक परिस्थितीची कल्पना येते.[20] जागतिक महामंदीमुळे झालेल्या चलनघसरणीच्या धोरणाचे प्रतिबिंब बँकेच्या व्याजदरावर पडले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्याजदराची घसरण सुरु झाल्यामुळे त्याचा परिणाम भारतावर होऊन भारतातील व्याजदरही घसरले.[21] पण या व्याजदर घसरणीचा उपयोग ग्रामीण भागातील पुनर्जीवनासाठी न झाल्याने ग्रामीण भागातील चलन हस्तांतरण जवळपास

कमी-अधिक प्रमाणात बंद झाले. ग्रामीण भागातील सावकारांनी याचा फायदा घेऊन कर्जदारांवर जबरदस्ती करून त्यांच्याकडून सोन्याचे दागिने, अलंकार घेऊन आपली कर्जवसूली करण्याचा प्रयत्न केला, ज्या सोन्याची किंमत जागतिक बाजारपेठेत वाढलेली होती.[22]

कर्ज-तडजोड मंडळ(Debt Conciliation Board):-

जागतिक महामंदीच्या काळात भारतातील ग्रामीण कर्जबाजारीपणा वाढला होता. ग्रामीण कर्जबाजारीपणाचा हा प्रश्न सोडविण्यासाठी, कर्जे कमी करण्यासाठी आणि तडजोडीच्या मार्गाने हा प्रश्न सोडविला जावा ह्यासाठी सरकारने कायदा करून कर्ज-तडजोड मंडळाची पद्धत स्विकारली.[23] विशिष्ट प्रकारची विशिष्ट रक्कमेपर्यंतची कर्जे अशा मंडळांमार्फत विचारात घेऊन तडजोडीच्या मार्गाने समेट घडवून आणली जात असे. सन १९३३ मध्ये मध्य-प्रांत व बेरार सरकारने अशा प्रकारचा कायदा बनविला. त्यास अनुसरून सन १९३४ ते १९३७ या काळात पंजाब, बंगाल, मद्रास, इत्यादी अनेक प्रांतात कर्ज-तडजोड मंडळाचे कायदे केले गेले.[24] ग्रामीण कर्जबाजारीपणाचा प्रश्न सोडविण्यासाठी या मंडळाची स्थापना करण्यात आली असली तरी कायद्याच्या किंवा काही तांत्रिक उणिवांमुळे ह्या मंडळाचे कार्य फारसे यशस्वी होऊ शकले नाही. फक्त मध्य-प्रांत व बेरार आणि पंजाब या प्रांतात थोडेफार यश मिळू शकले.[25]

सावकारी नियंत्रण कायदे (Money Lenders Acts):-

जागतिक महामंदीच्या प्रभावामुळे सावकारी नियंत्रित करण्यासाठी कायदे करण्याची गरज मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली. सुरुवातीला पंजाब सरकारने १९३० मध्ये सावकारी नियंत्रित करणारा कायदा पास करून उदाहरण घालून दिले. त्यानंतर १९३३ मध्ये बंगालमध्ये सावकारी कायदा तयार करण्यात आला.[26] अनेक प्रांतांनी सन १९३३ ते १९४० या काळात सावकारी नियंत्रण कायदे केले.[27] या कायद्यांच्या तरतुदीनुसार सक्तीचा सावकारी परवाना, कर्जदाराला दिलासा, खोटे हिशेब ठेवल्यास अगर अयोग्य व्यवहार केल्यास सावकारांना दंड करण्याची तरतूद, व्याजाचे निश्चित दर यासारखे कडक निर्बंध लादून सावकारांवर नियंत्रण ठेवले.[28] प्रांतीय सरकारांनी सावकारी नियंत्रण कायदे केले असले तरी ते फारसे परिणामकारक ठरले नाहीत. कारण काही सावकारांनी आपला व्यवसाय कमी करून, आपला पैसा इतर व्यवसायात गुंतविला. तर इतरांनी या सावकारी नियंत्रण कायद्यातील उणीवांचा आधार घेऊन परवाना काढण्याच्या फंदात न पडणाऱ्या सावकारांना रान मोकळे होते.[29] शेतकऱ्यांना कर्जाची गरज असल्यामुळे शिवाय त्यांना कर्ज घेण्याचा दुसरा पर्याय नसल्यामुळे ते सावकारांच्या अशा अटी कबुल करण्यास तयार होत. तसेच प्रांतीय सरकारांनी सावकार नियंत्रण कायदे केले, पण सावकारांच्या व्यवहारावर योग्य प्रकारे देखरेख ठेवण्याची व्यवस्था केली गेली नाही. सन १९५१ च्या अखिल भारतीय कर्जविषयक पाहणी समितीने आपल्या अहवालात असे नमूद केले होते कि, "या कायद्यांमुळे सावकारांवर अगर त्यांच्या व्यवहारांवर फारच थोडा परिणाम झालेला असून कायद्याच्या बुरख्याखाली बेकायदेशीर व्यवहार करण्याच्या दृष्टीने नवे मार्ग शोधून काढणे त्याला आवश्यक वाटू लागले. ("……had little effect on the money- lender or his operations beyond putting him to the necessity of devising a variety of legal camouflage for a whole variety of illegality.")[30] थोडक्यात या सावकारी नियंत्रक कायद्यांचा फारसा उपयोग शेतकऱ्यांना झाला नाही.

कर्जाच्या दबावाखालून सहजपणे बाहेर येण्यासाठी बहुतांशी पाश्चात्य देशातील सरकारांनी शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य पुरविले. त्याचवेळी जागतिक महामंदीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक दबावातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी क्रांतिकारी कृषी उपाययोजना स्विकारल्या. अनेक देशांनी कर्जवसुली पूढे ढकलली, नवीन कर्जे देण्यास प्राधान्य दिले, अल्प मुदतीची कर्जे दीर्घ मुदतीमध्ये रुपांतरीत केली आणि शेती उत्पन्नानुसार ठराविक देयके ठरवून दिली.[31] भारतामध्ये मात्र शेतकरी वर्गाला जागतिक महामंदीच्या बिकट आर्थिक परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी सरकारने फारसे प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे शेतकरी अधिकच नागवला गेला.

सारांश:-

थोडक्यात जागतिक महामंदीच्या काळात शेतमालाच्या किंमती कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले. परंतु सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल म्हणून कोणत्याही उपाययोजना किंवा फारस्या सवलती दिल्या नसल्यामुळे आपल्या जमिनमहसूलासारख्या कायमस्वरूपी जबाबदाऱ्या पार पडण्यासाठी त्याला कर्ज घेण्याशिवाय पर्याय राहिला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला. एकंदरीत जागतिक महामंदीमुळे निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडले आणि सावकाराच्या भारी व्याजदरामुळे देशोधडीला लागले. सरकारच्या अनास्थेमुळे जागतिक महामंदीच्या या आर्थिक बिकट परिस्थितीतही त्याचे सावकारांकडून आर्थिक शोषणच झाले. हा वसाहतवादी व्यवस्थेच्या शोषणाचा एक धडधडीत पुरावा आहे.

संदर्भ :-

1. The Imperial Gazetteer of India, The Indian Empire, Vol.III, Economic, New Edition, at the Clarendon Press, Oxford, 1908, Page No. 4-5.
2. गोखले (प्रा.)रामचंद्र महादेव, भारताचा आर्थिक इतिहास(१७५०-१९४७) भाग पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७७, पृ. ५५.
3. Shinde J. R., Dynamics of Cultural Revolution 19th Century Maharashtra, Ajanta Publications, Delhi, 1985, Page No. 8-9.
4. Dutt Rajani Palme; Misra Archna and Mishra Kundan(Ed.), The Agrarian Crisis in India before Independence .....towards its solution, Gambol Books, Australia, 1980, Page No. 58.
5. Mamoria (Dr.)C. B. & Saksena (Dr.)R. D., Co-Operation in India, Kitab Mahal, Allahabad, 1973, Page No. 71-77.
6. Rothermund Dietmar, The Indian Economy Under British Rule and other Essays, Manohar Publications, New Delhi, 1983, Page No.131-132.
7. Ibid, Page No.131-132.
8. Ghanekar (Dr.)V. V., Co-operative movement in India 1904-2004 Observations and New Challenges, Institute of Rural Development and Education, Pune, October 2004, Page No. 3.
9. Tomlinson B. R., The New Cambridge History of India-III The Economy of Modern India, 1860-1970, Cambridge University Press, Cambridge, 1993, Page No. 72-73.
10. Annual Report of the Department of Agriculture in the Bombay Presidency for the year 1931-32, printed at the Government Central Press, Bombay, 1933, Page No. 88.
11. वैद्य (डॉ.)सुमन आणि कोठेकर (डॉ.)शांता, आधुनिक भारताचा इतिहास १९२१ ते १९४७, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००१, पृ. २९९.
12. Census of India, 1931, Vol-1, Part-1, Page No. 288.

Dutt Rajani Palme; Misra Archna and Mishra ....., Op- Cit, 1980, Page No. 74.

13. Qureshi A. I., Economic Development of Hyderabad, Orient Longmans Ltd., London, 1947 , Page No.133.
14. Singh Kanti, The Great Depression and Agrarian Economy, Mittal Publications, Delhi, 1987, Page No. 32.
15. Report of the Bombay Provincial Banking Enquiry Committee 1929-30 Volume I, Printed at the Government Central Press, Bombay, 1930, Page No. 38.
16. Darling Malcolm Lyall, The Punjab Peasant in Prosperity and Debt, Humphrey Milford, Oxford University Press, London, New York, Bombay, Calcutta, Madras, Second Edition, 1928, Page No.10-11.
17. Report of the Peasant Enquiry Committee of The Maharashtra Provincial Congress Committee, 1936, Published by S. D. Deo, President, Maharashtra Provincial Congress Committee, Poona, 1936, Page No. 61.
18. Desai A. R., Social Background of Indian Nationalism, Popular Prakashan PVT LTD, 1948, Page No. 48.
19. Dutt Rajani Palme; Misra Archna and Mishra Kundan(Ed.), Op- Cit, Page No. 76.
20. दत्त रजनी पाम, आजकालचा भारत India Today मराठी अनुवाद, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, मराठी आवृत्ती-२००६, पृ. २५३.
21. Government of India, Finance Department, File No. 7(111)-F1935.
22. Rothermund Dietmer, Op-Cit, Page No.163.
23. Ibid, Page No. 135.
24. Department of Education, Health and Lands, Govt. of India, File No. 178/35-A, 1935.
25. Government of the Central Provinces and Berar, Department of Land Records, Season and Crop Report of the Central Provinces and Berar for the year ending the 31st May 1937, Government Printing, Central Provinces, Nagpur, 1938,Page No. 12.
26. Rothermund Dietmar, Op-Cit, Page No.134.
27. Tomlinson B. R., Op-Cit, Page No. 73.
28. गोखले महादेव रामचंद्र, उपरोक्त, पृ. ६१-६२
29. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-४, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, जून १९९३, पृ. ३८-४६.
30. गोखले महादेव रामचंद्र, उपरोक्त, पृ. ६२.
31. Rothermund Dietmar, Op-Cit, Page No. 57.

शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर, महाराष्ट्र

दूरशिक्षण केंद्र

बी. ए. भाग-२ : इतिहास

भारताचा इतिहास ([illegible])

स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास ([illegible])

([illegible] सन २०१९-२० पासून)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

© कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

प्रथमावृत्ती : २०२०

बी. ए. (भारताचा इतिहास / स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास) भाग–२ इतिहास पेपर ४ व ६ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

प्रती : १,०००

■

प्रकाशक :
डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

मुद्रक :
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर–४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-76-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (भारत)

Scanned by CamScanner

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Seating Arrangement

Course : 388-B. A.(Semester) Pattern : semester

Course Part : B. A. Part No -III SEM VI

Centre College : 250-Vitthalrao Patil (Arts, ... lege,Kale, KOLHAPUR

Paper : (65714) SOCIOLOGY PA... Theory)

Date Time : 06th November 2019, Wednesday , 03:00 PM TO 05:00 PM

अनुक्रमणिका

घटक क्रमांक Block No.			घटकाचे शीर्षक Seat Nos.: 69996 - 69998	पान क्रमांक Total Students : 3
69996	69997	69998		

Total Student : 3

सेमिस्टर–३ : पेपर–५

१.	भारतातील कंपनीच्या राजवटीची स्थापना	१
२.	ईस्ट इंडिया कंपनीचे वसाहतवादी धोरण	३७
३.	वसाहतकालीन अर्थव्यवस्था	७१
४.	कंपनी सरकारविरुद्ध उठाव	१०५

सेमिस्टर–४ : पेपर–६

१.	राष्ट्रवादाचा उदय	१३७
२.	गांधी युग	१८४
३.	स्वातंत्र्य चळवळीतील इतर प्रवाह	२२२
४.	जमातवाद आणि फाळणी	२५४

Date : 15/10/2019

Scanned by CamScanner

४. **डॉ. बी. एल. ग्रोव्हर, डॉ. एन. के. वेल्हेकर :** *'आधुनिक भारताचा इतिहास'*, एस. चन्द, २००२.

५. **बिपन चंद्र :** *''इंडियाज् स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स भारताचा स्वातंत्र्य संघर्ष,* के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००३.

६. **डॉ. माणिक लाल गुप्त :** *'आधुनिक भारत का इतिहास'*, साहित्य रत्नालय, कानपूर, २००७.

७. **वैद्य सुमन, कोठेकर शांता :** *'आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०),* श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०००.

८. **गाठाळ एस. एच. :** *'आधुनिक भारताचा इतिहास'*, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०००.

९. **कदम य. ना. :** 'आधुनिक भारत', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

❑❑❑

Scanned by CamScanner

शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर, महाराष्ट्र

दूरशिक्षण केंद्र

एम. ए. भाग-२ : इतिहास : Elective group E : Paper 320

१९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

© कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

प्रथमावृत्ती : २०१९

एम. ए. भाग - २ करिता (१९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

प्रती : १,०००

■

प्रकाशक :
डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

मुद्रक :
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-34-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

अभ्यास घटकांचे लेखक

लेखक	घटक क्रमांक
डॉ. अवनिश पाटील इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	१
डॉ. अभय पाटील सौ. एम. आर. जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज, कराड	२
डॉ. सुरेश वसंत शिखरे श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर	३
प्रा. संदीप जाधव विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर	४

■ संपादक ■

डॉ. अवनिश पाटील
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

हास)
३२०

अनुक्रमणिका

घटक क्रमांक	घटकाचे शीर्षक	पान क्रमांक
१.	प्रास्ताविक	१
२.	कृषीविषयक व्यवस्था आणि त्याचे परिणाम	२८
३.	उद्योग	५०
४.	व्यापार	९७

Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र

प्रमाणपत्र

दूर शिक्षण केंद्रांतर्गत तयार करण्यात आलेल्या एम. ए. भाग २ राज्यशास्त्र विषयाच्या खालील स्वयं अध्ययन साहित्यामध्ये डॉ. **एस. एम. सेलुकर, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे** यांनी घटक लेखन केले आहे.

अ.क्र	स्वयं अध्ययन साहित्याचे नाव	आयएसबीएन नंबर	शेरा
१	एम.ए. भाग २ सत्र ३ राज्यशास्त्र : आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सिध्दांत (मराठी माध्यम)	978-81-8486-672-8	एक घटक लेखन (घटक क्रमांक १ : प्रस्तावना)
२	एम.ए. भाग २ सत्र ४ राज्यशास्त्र : समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारण (मराठी माध्यम)	978-81-8486-665-0	एक घटक लेखन (घटक क्रमांक ३ : समकालीन समस्या I)

सदरचे प्रमाणत्र डॉ. सेलुकर यांचे मागणीवरुन देण्यात येत आहे.

8/5/2017
संचालक

संदर्भ : शिविको/दूशिके/225

दिनांक : 18 MAY 2017

दूर शिक्षण केंद्र कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

TRUE COPY

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur (M.S.)

शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर, महाराष्ट्र

दूरशिक्षण केंद्र

बी. ए. भाग-२ : राज्यशास्त्र

(सत्र ३ : पेपर ४) (सत्र ४ : पेपर

भारतीय राजकीय

(शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya,
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

© कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

प्रथमावृत्ती : २०२१

बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ पेपर ४ व ६ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

प्रती : ८००

■

प्रकाशक :
डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

मुद्रक :
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-02-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र

अध्यक्ष - **प्रा. डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. प्रकाश पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स ॲण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अनिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज-४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

*अभ्यास घटकांचे लेखक

लेखक	घटक क्रमांक
सत्र–३ : पेपर–४ : भारतीय राजकीय विचार	
प्रा. आंगद नरसगौंडा पाटील कर्मवीर भाऊराव पाटील आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, कळे ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर	१
प्रा. डॉ. भारती पाटील राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	२
डॉ. विजय एस. पानस्कर बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा	२
प्रा. अनिल मोहिते एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर	४
सत्र–४ : पेपर–६ : भारतीय राजकीय विचार	
डॉ. निळकंठ लोखंडे छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, जि. सातारा	१
डॉ. पांडूरंग विष्णू पाटील प्रा. संभाजीराव कॉलेज, देऊर, ता. कोरेगाव, जि. सातारा	२
डॉ. सूर्यकांत लकाप्पा गायकवाड 'कर्मवीर छाया' बॅरिस्टर पी. जी. पाटील बंगल, ५२९ अ पारसनीस कॉलनी, पवई नाका, सातारा, जि. सातारा	३
डॉ. शार्दूल माणिकराव सेलूकर विठ्ठलराव पाटील आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर	४

■ संपादक ■

प्रा. डॉ. भारती पाटील
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. शार्दूल माणिकराव सेलूकर
विठ्ठलराव पाटील आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स
कॉलेज, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

The system of Distance Education has the potential to fulfil the enormous responsibility of universalization and democratization of education by maintaining the standard of education, providing Education relevant to the needs of the country at reasonable costs and making optimum use of the media.

Our endeavour is :

1. to provide an alternative non-formal channel for higher education.
2. to reduce the pressure on the conventional university system by supplementing it.
3. to provide a means for continuing and life-long education so as to enrich the lives of people.
4. to bring higher education within the reach of those who have had no access to it.
5. to democratize higher education by providing access to large segments of the population-particularly the disadvantaged groups such as those living in remote and rural areas, including working people, women and other adults who wish to acquire and upgrade their knowledge and skills through studies in various fields.
6. to help those who wish to improve their educational qualifications and are interested in undertaking advanced studies of their interest, without being required to join as full time students.

Dr. V. D. Nandavadekar
Registrar
Shivaji University, Kolhapur
Website : www.unishivaji.ac.in

Prof. (Dr.) A. M. Sarawade
I/c Director
CENTRE FOR DISTANCE EDUCATION
Telephone No. : 2693771, 2693871,
2694171, 2694771

ISBN : 978-93-92887-02-4

109 105

शिवाजी विश्वविद्यालय,

कोल्हापुर, महाराष्ट्र

दूरशिक्षण केंद्र

बी. ए. भाग-3 : हिंदी

सत्र-5 : पेपर - 8 (DSE-E-7)

साहित्यशास्त्र

सत्र-6 : पेपर -13 (DSE-E-132)

साहित्यशास्त्र और हिंदी आलोचना

(शैक्षिक वर्ष 2021-2022 से)

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Ka
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

© कुलसचिव, शिवाजी विश्वविद्यालय, कोल्हापुर (महाराष्ट्र)
प्रथम संस्करण : 2021
बी. ए. भाग 3 (हिंदी : बीजपत्र-8 और 13)
सभी अधिकार विश्वविद्यालय के अधीन। शिवाजी विश्वविद्यालय की अनुमति के बिना किसी भी सामग्री की नकल न करें।

प्रतियाँ : 300

■

प्रकाशक :
डॉ. व्ही. एन. शिंदे
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विश्वविद्यालय,
कोल्हापुर - 416 004.

■

मुद्रक :
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विश्वविद्यालय मुद्रणालय,
कोल्हापुर - 416 004.

■

ISBN- 978-93-92887-25-3

★ दूरशिक्षण केंद्र और शिवाजी विश्वविद्यालय की जानकारी निम्नांकित पते पर मिलेगी-
शिवाजी विश्वविद्यालय, विद्यानगर, कोल्हापुर-416 004. (भारत)

दूरशिक्षण केंद्र
शिवाजी विश्वविद्यालय,
कोल्हापुर

	सत्र 5	सत्र 6
★ प्रा. नितीन विठ्ठल पाटिल विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापुर	1	-
★ प्रा. डॉ. सिद्राम कृष्णा खोत चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी	2	-
★ प्रा. डॉ. मिलिंद नामदेव साळवे विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा	2	-
★ प्रा. मारुफ समशेर मुजावर कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगांव, ता. खटाव	3	-
★ डॉ. संदिप किर्दत छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, जि. सातारा	4	-
★ डॉ. आरिफ शौकत महात विवेकानंद कॉलेज, कोल्हापुर	-	1
★ प्रा. सुवर्णा नरसू कांबळे आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, शुक्रवारपेठ, सातारा, जि. सातारा	-	2
★ डॉ. मानसी शिरगावकर कन्या महाविद्यालय, शिवाजी रोड, शिवाजीनगर, मिरज, जि. सांगली	-	3
★ डॉ. गोरखनाथ किर्दत यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, उरुण इस्लामपूर, जि. सांगली	-	4

■ सम्पादक ■

डॉ. सरोज एस. पाटिल
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापुर

डॉ. बबन एस. सातपुते
मिरज महाद्यिालय, मिरज,
ता. मिरज, जि. सांगली

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

इकाई 1

काव्य/साहित्य : स्वरूप, तत्त्व, प्रयोजन

अनुक्रम

1.1 उद्देश्य

1.2 प्रस्तावना

1.3 विषय – विवेचन

1.3.1 काव्य / साहित्य : स्वरूप

1.3.1.1 संस्कृत आचार्यों के काव्य–लक्षण

1.3.1.2 प्राचीन हिंदी आचार्यों के काव्य–लक्षण

1.3.1.3 आधुनिक हिंदी विद्वानों के काव्य–क्षण

1.3.1.4 पाश्चात्य विद्वानों के काव्य–लक्षण

1.3.1.5 निष्कर्ष

1.3.2 काव्य / साहित्य : तत्त्व

1.3.2.1 भाव तत्त्व

1.3.2.2 कल्पना तत्त्व

1.3.2.3 बुद्धि तत्त्व

1.3.2.4 शैली तत्त्व

1.3.2.5 निष्कर्ष

1.3.3 काव्य : प्रयोजन

1.3.3.1 संस्कृत आचार्य : काव्य प्रयोजन

1.3.3.2 प्राचीन हिंदी आचार्य : काव्य प्रयोजन

1.3.3.3 आधुनिक हिंदी विद्वान : काव्य प्रयोजन

1.3.3.4 पाश्चात्य काव्यशास्त्र में काव्य प्रयोजन

1.3.3.5 निष्कर्ष

1.4 स्वयं – अध्ययन के लिए प्रश्न
1.5 पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
1.6 स्वयं – अध्ययन प्रश्नों के उत्तर
1.7 सारांश
1.8 स्वाध्याय
1.9 क्षेत्रीय कार्य
1.10 अतिरिक्त अध्ययन के लिए

1.1 उद्देश्य :

इस इकाई के अध्ययन के बाद आप,

1. काव्य (साहित्य) शब्द के अर्थ और स्वरूप से परिचित होंगे।
2. भारतीय एवं पाश्चात्य विद्वानों द्वारा बताए गए काव्य (साहित्य) के लक्षणों को पढकर साहित्य का स्वरूप समझने में सक्षम होंगे
3. काव्य (साहित्य) के विभिन्न तत्त्वों से परिचित होंगे।
4. काव्य प्रयोजनों से परिचित होंगे।
5. काव्य (साहित्य) के महत्त्व को समझ सकेंगे।

1.2 प्रस्तावना :

साहित्य के सम्यक अनुशीलन का कार्य साहित्यशास्त्र के अंतर्गत होता है। जिसमें साहित्य की विभिन्न विधाओं का शास्त्रीय दृष्टि से सांगोपांग विवेचन किया जाता है। 'शास्त्र' शब्द संस्कृत 'शास्' धातु से बना हुआ है, जिसका अर्थ है अनुशासन। साहित्यशास्त्र हमें साहित्य के विषय में अनुशासित करता है। साथ ही साहित्य निर्माण के नियमों की जानकारी भी प्रदान करता है। साहित्यशास्त्र के लिए 'काव्यशास्त्र', काव्यालोचन और काव्यमीमांसा जैसे शब्द भी प्रचलित है। प्राचीन काल में तो इसके लिए 'अलंकार शास्त्र' का भी प्रयोग होता था। कालांतर में इस शब्द की व्याप्ति संकुचित होती गयी और इसी स्थान पर साहित्यशास्त्र नाम रूढ होता चला गया।

विश्व की लगभग सभी भाषाओं के साहित्य में काव्यशास्त्र पर विचार हुआ है। अध्ययन की सुविधा की दृष्टि से इसके भारतीय तथा पाश्चात्य दो भेद किए जाते हैं। भारतीय काव्यशास्त्र की परंपरा में उपलब्ध ग्रंथों के आधार पर भरतमुनि को काव्यशास्त्र का प्रथम आचार्य माना जाता है। उनका 'नाट्यशास्त्र' ग्रंथ भारतीय काव्यशास्त्र का प्रथम ग्रंथ माना जाता है। अतः इसमें काव्यशास्त्र के विभिन्न अंगों का विवेचन-विश्लेषण मिलता है।

17-18

ISBN : 978-81-927211-9-6

SANGRUL EDUCATION SOCIETY'S

S.B.KHADE MAHAVIDYALAYA, KOPARDE,

TAL KARVEER, DIST. KOLHAPUR

PROCEEDING

A ONE DAY

NATIONAL SEMINAR

ON

THE PORTRAYAL OF SUBALTERNS IN INDIAN LITERATURE

TUESDAY , 20TH February, 2018

Edited by

Prin. Dr. D.D.Kurlapkar

Prof. S.V.Sutar **Prof. S.B. Raut** **Prof. S.S. Chougale**

PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Ka
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

©Editor

Sangrul Shikshan Sanstha, Sangrul's
S.B. KHADE MAHAVIDYALAYA, KOPARDE
TAL. KARVEER, DIST. KOLHAPUR 416 204.

ISBN: 978-81-927211-9-6

No part of this publication may be reproduced or transmitted in any form by any means, electronic or mechanical, including photocopy, recording or any information storage and retrieval systems without permission in writing from the copyright owners.

DISCLAIMER

The authors are solely responsible for the contents of the papers compiled in this volume. The publishers or editors do not take any responsibility for the same in any manner. Errors, if any, are purely unintentional and readers are requested to communicate such errors to the editors or publishers to avoid discrepancies in future.

Publisher:

PraRup Publications
Kolhapur. (Maharashtra)
Pin – 416 008

Sr. No.	Title	Author	Page No.
19	आदिवासी कवितेतील वंचित जीवन	प्रा.प्रेरणा एल.चव्हाण	113
20	नारायण सुर्वे यांच्या कवितेतील कामगार जीवन	प्रा. श्रीमती नंदा श्रीपती पाटील	116
21	स्त्रीवादपूर्वकालीन स्त्रीलिखित कादंबरी	डॉ.रचना सचिन माने	122
22	प्रेमानंद गज्वी यांच्या 'तनमाजोरी' नाटकातील वेठबिगारीचे चित्रण	प्रा. डॉ. शीला धम्मपाल रत्नाकर	132
23	मानवाधिकार नाकारणारी 'भंगार' मधील जातपंचायत	प्रा. एस. व्ही. सुतार	139
24	दलित साहित्य : एक अभ्यास	कु.सालवाडगी शितल संग्राम	144
25	वंचित स्त्रियांचे कथालेखन	प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर	150
26	संत चोखाबाची संत साहित्यातील बंडखोरी	प्रा.सुहास निर्मळे	172
27	दलित कविता आणि दलित कवयित्रि	प्रा. सुकुमार दादू आवळे	175
28	ग्रामीण कथाकार :व्यंकटेश माडगूळकर	सुनिता बाबुराव मोटे	181
29	स्वप्नांना सत्याकडे नेणारा कांतिकुलाचा काफिला'	प्रा. डॉ. उदय जाधव	190
30	बलुतेदारी जीवन —पखालच्या अनुषंगाने	सौ. वैशाली श्रीकांत गुंजेकर	195
31	**'साहित्य समन्वय' मधून व्यक्त झालेल्या दलित जाणिवा व विद्रोही कविता.**	**विष्णू शिवाजी कांबळे**	200

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya,
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

आदिवासी कवितेतील वंचित जीवन

प्रा.प्रेरणा एल.चव्हाण
(मराठी विभाग)
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय,
कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये ग्रामीण दलित साहित्याबरोबरच आदिवासी साहित्याची निर्मिती झाली. परंपरागत जातीव्यवस्थेने दलित समाजाला गावाकुसाबाहेर राहावे लागले. याचे पडसाद दलित साहित्यातून दिसून येतात. दलित साहित्याची प्रेरणा घेऊन पुढे आदिवासी जे की, गावकुसाबाहेरसुद्धा राहत नाहीत. राहण्याचे एक विशिष्ट ठिकाण नाही. अशा भटकंती करणाऱ्या आदिवासी लेखक,कवींनी आदिवासी साहित्याची निर्मिती केली. यामध्ये भूजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, डॉ. उत्तमराव धोंडगे, नीलकांत कुलसंगे, विनायक तुमराम, वामन शेळमाके, पुरूषोत्तम शेळमाके, कुसुम अलाम, उषाकिरण अत्राम, कविता अत्राम, कृष्णकुमार चांदेकर, सुनील कुमरे इत्यादी कवी,कवयित्रींचा समावेश होतो.

आजपर्यंत ज्या आदिवासी कवी कवयित्रिंनी काव्यलेखन केले. त्या कवितेतून उपेक्षित जीवन जाणीव व्यक्त होते. निसर्गाच्या सानिध्यात राहिल्यामुळे त्यांचे जीवन अनुभव व लेखन यात निसर्गचित्रण येते. आदिवासी साहित्य प्रवाहात न येण्याच्या मागचे कारण म्हणजे त्यांची स्वत:ची असलेली बोलीभाषा, मानवसमूहापासून दूर राहिल्यामुळे ही बोली आदिवासीपूरतीच मर्यादित राहिली,परंतु नंतर आदिवासी साहित्य मराठी भाषेतून लिहिले गेले. त्यामुळे मराठी साहित्यामध्ये आदिवासी साहित्याचा समावेश करण्यात आला. १९६० नंतर ग्रामीण,दलित साहित्याबरोबरच आदिवासी साहित्य प्रवाह उदयाला आला.

आदिवासींची एक संस्कृती आहे. वेगवेगळ्या जमातीमध्ये त्यांच्या ठरवीक भाषा आहेत. जन्म, मृत्यू, लग्न हे विधीपार पाडण्यासाठी त्यांची विशिष्ट एक संस्कृती आहे, पद्धती आहे,असे दिसून येते. मौखिक गीते, नृत्य हे आदिवासींमध्ये आजही आहे. आरोग्य चांगले राहावे म्हणून औषधी वनस्पतींची त्यांना जास्त ओळख आहे. याचेही चित्रण आदिवासी साहित्यातून दिसून येते.

आता आदिवासी समाज समाजापासून दूर नाही. तर तो समाजात गावात वास्तव्यास आहे. त्यात काही लेखक—कवी आहेत. जे जगले,अनुभवले ते सांगावे, या उद्देशाने आदिवासी साहित्यिक लेखन करू लागले. आदिवासींच्या साहित्यामध्ये

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

आदिवासी लेखक आणि बिगर आदिवासी लेखक असे दोन प्रकारचे साहित्य पाहावयास मिळते. त्यामध्ये जे जन्मजात आदिवासी आहेत. अशाच लेखकांना आदिवासी साहित्यिक म्हणता येईल. आदिवासी साहित्य फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. त्यास आदिवासी लोकसाहित्य म्हणून ओळखले जाते.

आदिवासी कवितेतून आदिवासीचे जीवन कशा प्रकारे वंचित होते,याचे चित्रण येते. वामन शेळमाके म्हणतात. वनवासी सारे भोगती दु:ख/प्रस्थापित सारे भोगती सुख। प्रस्थापित समाजरचनेला विरोध करत विद्रोही शब्द लेखन करण्याचे सामर्थ्य दलित साहित्याने केले. डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाला शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा अशी चेतावणी दिली. दलित समाज शिकू लागला. लिहू लागला, प्रस्थापित समाजाला हादरे देऊ लागला. दलित साहित्याच्या पावलावर पाऊल ठेवून आदिवासी साहित्यिक लिहिते झाले. त्यांच्या लेखनात, त्यांच्या जीवनात दु:ख,आगतिकता, वंचितता दिसून येते.

कुंदानी पेंढी खोदता खोदता
दिव फिरी गया
आजून भाकरना पत्ता नाहा
खोदता खोदता
हाडक्क गयत मसानमा

वाहरु सोनवणे यांनी आदिवासी श्रमिक जीवनाचे चित्रण वरील कवितेतून केले आहे. श्रमाचे मूल्य किती आणि कसे असावे. केवळ भाकरीचा तुकडा मिळू नये. असे श्रम असतील तर शोकांतिका आहे. वाहरु सोनवणे श्रमिक चळवळीतून घडलेले कवी आहेत. आदिवासी जीवनातील अस्सल जीवनानुभव त्यांच्या कवितेतून दिसून येतो.

वस्त्र म्हणावे तर लंगोटी
स्त्रियासही ना अंगभर साडी ।

सौ.कुसुम आत्राम आदिवासी जमातीतील गोंड जमातीतील वंचित स्त्री जीवनाचे चित्रण करते. अन्न,वस्त्र, निवारा ही माणसाची मूलभूत गरज आहे. या गरजा पूर्ण न होणे हीच त्यांची संस्कृती सर्व परिचित आहे. सवर्णाच्या स्त्रीयांना लज्जा असते. अब्रु असते, पण आदिवासी स्त्री अर्धनग्न राहणे, ही तिची संस्कृती समजली जाते. म्हणून आदिवासी समाजाला या संस्कृतीतून जागे करण्यासाठी उषाकिरण आत्राम म्हणतात—

रान बेवड्यांनो । आतातरी शहाणे व्हा।
रानात फुलू नका, आता तरी विळख्यात जखडू नका ।

सर्व जाती पातीनी आपापले रंग, निशाण वाटून घेतले आहेत. आदिवासी समाज काळा टिळा लावतात. रानावनात फिरतात निसर्गाला देवता समजतात, असा हा समाज अर्धपोटी, अर्धनग्न, उपेक्षित, वंचित जीवन जगतो याचे चित्रण आदिवासी कवितेतून इथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

आदिवासी साहित्याची चळवळ फार मोठया प्रमाणात अस्तित्वात नाही. जो आदिवासी समाज सुशिक्षित होऊन समाजात प्रतिष्ठेचे जीवन जगत आहे. अशा लोकांना ही चळवळ पुढे न्यावी. अशी अपेक्षा आहे. आदिवासी साहित्य चळवळ पुढे जाऊ न देणारे शत्रू शोधून त्यांच्याशी वैचारिक मंथन करणे गरजेचे आहे, व हा वाङ्. मयीन प्रवाह फुलता बहरता कसा होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

सारांश :

आदिवासींना इथले मूळ निवासी म्हणून ओळखले जाते. १९६० नंतर साहित्याच्या प्रवाहात ग्रामीण, दलित साहित्याबरोबर आदिवासी साहित्य लिहिले गेले. असले तरी, फार प्राचीन काळापासून आदिवासी साहित्य मौखिक रुपाने अस्तित्वात होते. या शोध निबंधातून आदिवासी कवितेतून चित्रित झालेले आदिवासी समाजाचे दु:ख, व्यथा,वेदना, उपेक्षित व वंचित जीवन थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भ ग्रंथ

१. डॉ. दादा गोरे गौरव ग्रंथ वाङ्.मयीन प्रवृत्ती: तत्वशोध,संपादक केशव मेश्राम, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
२. आदिवासी साहित्य स्वरुप आणि समीक्षा— डॉ. विनायक तुमराम, नागपूर
३. आदिवासी स्त्री— डॉ. शौनक कुलकर्णी, डायमंड प्रकाशन, पुणे.